
PEARL PUBLICATION
PM-1

50nP

महात्मा आणि हुकूमशहा

ब. ग्रं. सं. ठाणे
क्र. 9903

ऑर्थर कोअेस्लर



REFBK-0009462

महात्मा आणि हुकूमशहा

व इतर निबंध

(Marathi Translation of the Book
"The Yogi & The Commissar"—By Arthur Koestler)

लेखक
आर्थर कोएस्लर १९६२...
अनुवादक

दा. न. शिखरे

परदेशी ग्रंथ संग्रहालय, आर्थर स्थलांतर.
अनुक्रम ..... दि: .....
क्रमांक ...२२४३... तौलणिक अनु...

PEARL PUBLICATION

REFBK-0009462

पर्ल पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई-१

किंमत ५० नये पैसे

ए. डी. पिटर्स, लंडन (इंग्लंड) यांच्या सहकार्यानें
प्रकाशित केलें

मूळ पुस्तकाचा मराठींतील भारतांत केलेला
प्रथम अनुवाद

पुनर्मुद्रणाचे सर्व हक्क प्रकाशकांकडे



पहिली आवृत्ति : १९५७

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४.
प्रकाशक : जी. एल्. मिरचंदानी, पर्ल पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड.
२९, वीर नरिमन रोड, मुंबई १.

प्रोफेसर मायकेल पोलनी

यांस—

अनुक्रम ..22434.. वि: ..निबंध..
क्रमांक .....7703.... नों: दि: ..२८।२।५८..

प्रस्तावना

या पुस्तकांतील कांहीं निबंध प्रथम अमेरिकन मासिकांसाठीं लिहिलेले होते. त्या मासिकांविषयीं असें ऐकतों कीं, त्यांच्या वाचकांचे डोक्यांत प्रत्येक मुद्दा अगदीं ठोकून बसवावा लागतो. बाकीचे निबंध इंग्रजी 'होरायझन्' मासिकासाठीं लिहिलेले होते. त्यांत प्रत्येक मुद्दा नखानें कोरून काढण्यांत येतो. त्या दोहोंच्या वाचक-वर्गांची प्रवृत्ति अशी भिन्न भिन्न आहे असें म्हणतात. अशा भिन्न उद्देशांचे व भिन्न तोलांचे लेख एकत्र आणणें हें एका दृष्टीनें ठिगळें लावलेल्या गोधडीसारखें दिसेल. पण दुसऱ्या दृष्टीनें, त्यांत विविधतेला वाव मिळेल हा केवढा लाभ!

अर्थात्, हें या पुस्तकाच्या पहिल्या दोन विभागांनाच लागू आहे. रशियांतील प्रयोगाचें समालोचन करून त्यावरून कांहीं निष्कर्ष काढणारा तिसरा विभाग 'संशोधन' हा केवळ याच ग्रंथासाठीं लिहिलेला आहे. तो यापूर्वी अन्यत्र प्रसिद्ध झालेला नाहीं.

२

यांतील कांहीं निबंध हे राजकारण व मानसशास्त्र यांच्या गुंतागुंतीचा विचार करणारे आहेत. मला सोपी भाषा आवडते. पण मूळ अर्थाची हानि करण्याइतका अतिसोपेपणा मात्र मला रुचत नाहीं. तसेंच, ऑग्डेन पंथाचें भाषिक वैराग्यहि मला मानवत नाहीं. पुष्कळ वेळां आपण सत्याकडे जवळच्या वाटेनें जाण्यासाठीं निघतों, पण त्यापेक्षां दूरचा रस्ताच जवळचा ठरतो. एकदां आइन्स्टाईन या प्रसिद्ध शास्त्रज्ञाला कोणी म्हटलें, "तुमचा सिद्धांत फारच लांबलचक व गुंतागुंतीचा आहे, त्यापेक्षां न्यूटनचा सिद्धांत किती सोपा सुटसुटीत आहे!" तेव्हां आइन्स्टाईननें उत्तर दिलें, "तुम्हांला सत्य निवेदन करावयाचें आहे ना? मग सजावट ही शिंप्याकडे सोंपवा." या विचारानें मला समाधान आहे.

३

गेल्या वर्षीं मी किती मूर्ख होतों, याचें नवल मला, शाळेंत जात होतों तेव्हांपासून, प्रत्येक वर्षीं वाटत आलें आहे. प्रत्येक नवें वर्ष माझ्यासाठीं नवें ज्ञान

घेऊन येई—आणि मग पूर्वी आपण कसलीं मतें धारण केलीं होतीं हें लक्ष्यांत येऊन मला लज्जा वाटे व राग येई. थोड्याफार प्रमाणांत हें अजून चालू आहे. गेल्या वर्षीं मी घनघोर अज्ञानांत कसा चांचपडत होतों, हें आज मला कळेनासें होतें.

परंतु आतांशा एक फरक पडला आहे. तो म्हणजे नव्या ज्ञानासुळें जुन्यांचा संपूर्ण संहार न होतां, मूळच्या सिद्धांताशीं नव्या विचारांचा धागा जोडला जातो. प्रस्तुत पुस्तकांतील पहिला लेख व शेवटचा लेख यांत तीन वर्षांचा काल गेलेला आहे, आणि विषयांची तर विविधता आहेच. तरीसुद्धां या लेखांतून एक एक-जिनसी वस्तु वाचकवर्गाचे हातीं लागेल अशी मला आशा आहे—आणि म्हणूनच हा ग्रंथ मी प्रकाशित करीत आहें.

लंडन–ऑक्टोबर १९४४.

अनुक्रम

मंथन

योगी व हुकूमशहा	१
फ्रेंच विचारांची सांथ	१२
कादंबरीकाराला पडणारे मोह	१८
वाचकाला पडलेलें कोडें	२६
एक विक्षिप्त वल्ली	३२
रिचर्ड हिलरी याच्या स्मरणार्थ	३४
बुद्धिजीवी वर्ग	४८

पुरस्कार

जगाचा गाळ	६१
अविश्वसनीय अत्याचार	७१
गंजलेल्या चिलखतांतील शिलेदार	७८
निराशावाद्यांची संघटना	८५
"राजा मृत्यु पावला ..."	९३

संशोधन

भ्रमाची मीमांसा	१००
रशियाविषयीं भ्रम व सत्य	१११
भ्रम—निरास	१६५
योगी व हुकूमशहा (२)	१९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

अनुक्रम ..... विः .....

क्रमांक ..... नोंः दिः .....

बसवी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांत.
अनुक्रम ८२.५३.५... वि: ...१९४३...
क्रमांक ...२१७... नों: दि: ...२९/१२/५०
...महात्मा हुकूमशहा...

स्थिर वर्ण–पट

ऐखादा पदार्थ-विज्ञानि-शास्त्री सूर्यकिरणांचें जसें पृथक्करण करतो, त्याप्रमाणें सामाजिक चालीरीतींचें पृथक्करण करणारें यंत्र आपल्या हातीं असावें असें मला वाटतें. अशा यंत्रांतून मानवाचे जीवनविषयक सर्व दृष्टिकोन स्वच्छ, सुबक व व्यापक स्वरूपांत दिसूं लागतील. एका पांढऱ्या शुभ्र सूर्य-किरणांत इंद्रधनुष्याचे सात रंग पदार्थ-विज्ञान-शास्त्राला जसे स्पष्ट दिसतात, तसें मानवी स्वभावाचें अंतरंग उलगडून दाखविणारें यंत्र निर्माण व्हावयास हवें.

वर्ण-पटाच्या एका टोंकाला 'अतिरिक्त तांबडा' रंग असतो, तर दुसऱ्या टोंकाला 'अतिरिक्त जांभळा' रंग असतो; त्याप्रमाणें समाजाच्या एका टोंकाला हुकूमशहा असतो, तर दुसऱ्या टोंकाला महात्मा असतो. हुकूमशहाचा सारा भर बाह्य परिस्थितींत सुधारणा करण्यावर असतो. त्याला वाटतें, मनुष्यमात्राचे जे जे उपद्रव आहेत, ते सर्व केवळ क्रांतीनें नष्ट करतां येतील. आणि क्रांति म्हणजे काय ? तर मालाचें उत्पादन व वांटप यांची पद्धति समूळ बदलणें—त्यासाठीं अवश्य ती हिंसा, लबाडी, विश्वासघात, विषप्रयोग—इत्यादि सर्व साधनें वापरणें, तर्कशुद्ध युक्तिवाद हाच अचूक वाटाड्या मानणें, आणि सारें विश्व हें एखाद्या घड्याळाप्रमाणें असून त्यांतील अणु-परमाणु आपापल्या गतीनें, आपापल्या कक्षेंत सतत फिरत राहातील असें समजणें. या समजुतींच्या विरुद्ध जो कोणी वागेल, तो 'पळपुटा' मानणें हेंहि त्या क्रांतीचें अंग होय. क्रांतीचें हें स्वरूप अगदीं उथळ आहे हें खरें, पण त्यांतूनच विलक्षण तेज निर्माण होतें.

वर्ण–पटाच्या दुसऱ्या टोंकाला प्रकाशाच्या लाटा इतक्या लहान व जलद असतात कीं, त्या मानवी नेत्रांना दिसूंच शकत नाहींत. तेथें रंग नाहीं, उष्णता नाहीं, परंतु सर्वव्यापी तेज मात्र असतें. अशा स्थानावर महात्मा आरूढ झालेला असतो. विश्वाला घड्याळाची उपमा देण्यास त्याचा विरोध नसतो; पण तितक्याच यथार्थतेनें तो विश्वाला संगीत–मंजूषा किंवा सरोवर मानतो. त्याच्या मतें, साध्य

हा लेख लंडन येथील "होरायझन्"मध्यें १९४२च्या जून महिन्यांत प्रथम प्रसिद्ध झाला.

अज्ञात असतें, आणि म्हणून तो सारें महत्त्व साधनांनाच देतो. कोणत्याहि परिस्थितींत हिंसा करणें तो वर्ज्य मानतो. सत्याच्या व कैवल्याच्या ध्रुव-ताऱ्याजवळ आपण जसजसे जातों, तसतशी तर्कशुद्ध युक्तिवादाची कक्षा संपुष्टांत येते. मानवी जीवनांत सार्वभौम महत्त्वाचें कांहीं असेल, तर सत्य किंवा कैवल्य हेंच.

बाह्य संघटनेनें कोणतीहि सुधारणा घडून येत नाहीं—त्यासाठीं व्यक्तीनेंच अंतःसुधारणा केली पाहिजे, असें महात्मा मानतो. याविरहित मत जो मानतो, त्याला तो महात्मा 'पळपुटा' म्हणतो. हिंदुस्थानामध्यें सावकारवर्ग गरीब शेतकऱ्यांना कर्ज देतात व त्या कर्जापोटीं काम करून घेतात. ही गुलामी हृदय-परिवर्तनानें नष्ट व्हावी—आर्थिक कायद्यानें नव्हे, अशी त्या महात्म्याची इच्छा असते. त्याला वाटतें, प्रत्येक व्यक्ति ही स्वतंत्र आहे, मात्र तिचा संबंध सर्वव्यापी तत्त्वाशीं जोडणारी एक अदृश्य नाळ आहे. या नाळेंतून त्या व्यक्तीला जो जीवनरस मिळतो, त्यावरच तिचें सर्जन-सामर्थ्य, तिचें सौजन्य, तिची सत्यनिष्ठा व तिची उपयुक्तता अवलंबून असते. या भूलोकावरील आपल्या जीवनांत मानवानें एकच एक कार्य करावयाचें, तें म्हणजे, त्या सर्वव्यापी तत्त्वाशीं आपल्याला जोडणारी ही नाळ तुटेल अशी कोणतीहि कृति, भावना वा विचार टाळावयाचा,—अशी त्या महात्म्याची विचारसरणी असते. त्या जगत्तत्त्वाचा संबंध आपल्या जीवनाशीं कायमचा राखण्यासाठीं त्या महात्म्यानें एक गुंतागुंतीचें व बिकट तंत्र तयार केलेलें असतें.

या दोन अंतिम टोंकांमध्यें मानवाच्या प्रशांत व समतोल वृत्ति क्रमानें पसरलेल्या असतात. जों जों आपण मध्यबिंदूपाशीं जावें, तों तों वर्ण-पट अंधुक होतो. कडव्या हुकूमशहाशीं तुम्ही युक्तिवाद करूं शकत नाहीं. तो एकदम आपली छाती बडवायला सुरुवात करतो आणि नंतर, तुम्ही त्याचे दोस्त असा कीं दुष्मन असा, तो तुम्हाला घट्ट मिठी मारून गुदमरून टाकतो.

उलट, एकांतिक महात्म्याशींहि तुम्ही बोलूं शकत नाहीं, कारण शब्दांची भाषाच त्याला कळत नाहीं. पण या दोहोंच्या मध्यें कांहीं परोपकारी, उदारमतवादी, युद्धोत्तर योजनांचे जनक, फेबियन, ब्रेकर, वगैरे लोक आहेत; त्यांच्याशीं तुम्ही विचारांची देवाणघेवाण करूं शकतां. पण त्याचा काय उपयोग? कारण जगाचा प्रश्न सोडविण्याचें सामर्थ्य महात्मा किंवा हुकूमशहा यांपैकीं एकालाच आहे. परिस्थितींतील बदल कीं मनःस्थितींतील बदल मानवी सुधारणा घडवून आणणार? हीच मूलभूत समस्या आहे.

संत व क्रांतिकारक—या दोहोंचा समन्वय साधला कीं ही समस्या सुटेल असें म्हणणें सोपें आहे. पण आतांपर्यंत तसें घडून आलेलें नाहीं. जें कांहीं साध्य झालें आहे तें म्हणजे विविध रंगांच्या तडजोडी. त्यांत दोन तत्त्वांचें मिश्रण झालेलें दिसत नाहीं. त्यामुळें इतिहासाचा असा खेळखंडोबा झाला आहे. व्यक्ति व समाज यांच्या संबंधांवर हुकूमशहाची भावना खिळलेली असते, तर महात्म्याचें लक्ष व्यक्ति व विश्व यांच्या संबंधांकडे लागलेलें असतें. दोघांनींहि जवळ येण्याचा थोडथोडा प्रयत्न करावा असें म्हणणें सोपें आहे, पण व्यवहारतः तें अशक्य आहे.

हुकूमशहाचें कोडें

सत्ताधीशाच्या हुकूमशाही पद्धतीनें मानवी स्वभाव सुधारण्याचे सारे प्रयत्न आतांपर्यंत फसले आहेत. स्पार्टाकसच्या सूर्यराज्यांतील सुधारणा व शिक्षा-सत्र यापासून समाजवादी रशियापर्यंत झालेले सर्व प्रयोग फसण्याचीं दोन कारणें आहेत. त्यांना कांटच्या भाषेंत व्यावहारिक बुद्धिवादाशीं विरोध म्हणतां येईल. पहिला विरोध सर्पाकृति वळणाचा, तर दुसरा घसरगुंडीचा.

मनोराज्याचें शिखर गांठण्यासाठीं फार विकट चढण चढावी लागते. वांकड्या-तिकड्या मार्गानें तेथें जावयाचें म्हटलें, तर भयंकर वळणें–वांकणें आहेत. तुम्ही जोंवर रस्त्यावरून उंच चाललां आहांत, तोंपर्यंत तुम्हांला तें शिखर कधींच दिसणार नाहीं. तुमची चाल आडव्या दिशेनें असल्यामुळें, आपण कोठें जात आहोंत हेंच तुम्हांला कळेनासें होईल; आणि बहुसंख्य लोक जर वांकड्या मार्गानें वाटचाल करूं लागले, तर ते आपल्या वाटाड्याला रस्त्यावरून बाजूस सारतील व मग पुनः त्याचे मागोमाग जातील; पण शेवटीं कोटल्याकोटेंच ते जाऊन पोहोंचतात. आतांपर्यंतच्या बहुतेक सर्व क्रांतिकारक चळवळींचा शेवट असाच झाला आहे. त्यांतील जनतेचा उत्साह दांडगा असतो. तिची सुप्तशक्ति प्रबळ प्रवाहाच्या रूपानें प्रगट होते. त्यापेक्षां अधिक सावधगिरीनें चाललेल्या सुधारणांच्या चळवळीमध्यें, प्रगतीचा वेग लवकरच मंदावतो. आणि कितीहि चढण चढली तरी, त्या शिखराभोंवतीं फेरे घालघालून तो उत्साह संपून जातो. चढणें तर कांहींच होत नाहीं, उलट त्या भ्रमणाचें पर्यवसान खालीं खालीं जाणाऱ्या मजूर–संघाच्या (ट्रेड युनियन) चळवळीसारख्या आंदोलनांत होतें.

मानवी स्वभाव सुधारण्याचे हुकूमशाही उपाय निष्फळ ठरले, याचें दुसरें कारण म्हणजे साध्य—साधनांचा संबंध न ओळखणें. साध्याच्या मानानें साधनें

तुच्छ लेखलीं जातात, नाहीं तर, साधनांच्या मानानें साध्य गौण मानलें जातें. तात्त्विक दृष्ट्या तुम्ही समेटाचीं व तडजोडीचीं 'विश्रांतिस्थानें' निर्माण करूं शकतां, पण शिरावर प्रत्यक्ष जबाबदारी पडली आणि व्यवहारांत रोकडा निर्णय करण्याचा प्रश्न उभा राहिला, म्हणजे मात्र तुम्हांला कोणती तरी एक निश्चित दिशा पत्करावी लागते. ती एकदां तुम्ही पत्करली कीं तुम्ही घसरगुंडीला लागलांत. साध्याच्या मानानें साधनांना गौण लेखण्याचें तुम्ही टरविलें, म्हणजे मग तुम्ही घसरगुंडीवरून घसरत घसरत सर्वसामान्य सिद्धांतावर येऊन पोहोंचतां. उदाहरणार्थ, प्रत्येकाला स्वसंरक्षणाचा हक्क आहे—आक्रमण हेंच संरक्षणाचें उत्तम साधन आहे—आपला बचाव करण्यासाठीं आपणच प्रथम दुसऱ्यावर चढाई केली पाहिजे—आणि ती झटपट यशस्वी व्हावी म्हणून ती चढाई अधिकाधिक क्रौर्यानें चालविली पाहिजे. दुसरें उदाहरण म्हणजे डॉक्टरची सुरी. तिनें तो शस्त्रक्रिया करतो व रोग्याला बरें करतो. त्याच तत्त्वाची तार ओढून रशियांतील सरकारनें आपल्या पक्षाचें 'शुद्धीकरण' आरंभिलें. या उतरणीवरून जाणाऱ्या मुशाफिराचे कपाळीं अखेर काय येतें हें पास्कलनें पुढील शब्दांत लिहून ठेवलें आहे. "माणूस हा देव नाहीं व पशूहि नाहीं. देवाप्रमाणें वागण्याचें तो योजतो पण तो वागतो मात्र पशूप्रमाणें—आणि त्यांतच त्याच्या साऱ्या दुःखाचें बीज सांठविलेलें आहे."

महात्म्याचें कोडें

सर्व समाजाची आंतरिक सुधारणा करून मानवी स्वभाव बदलण्याचे प्रयत्नहि असेच निष्फळ ठरले आहेत. बाह्य साधनानीं समाजांत साधुत्व निर्माण करण्याचा जेव्हां जेव्हां प्रयत्न झाला, तेव्हां त्याचेपुढें हेंच कोडें उभें राहिलें. 'धार्मिक न्यायालयांचा' प्रयोग एका दिशेनें गेला, तर 'प्रार्थनामंदिरांचा' प्रयत्न ध्येयाच्या शिखराभोंवतीं पुनः पुनः फिरत राहिला; पण त्याला एक इंचहि उंच जातां आलें नाहीं. साधनांच्या तुलनेनें साध्याला कमी लेखणें हेंहि घसरगुंडीवर बसण्यासारखेंच आहे.

हुकूमशहाच्या मार्गानें जाण्यांत सर्वसामान्य माणसांच्या समुदायाला सुखाची जितकी आशा, तितकीच या महात्म्याच्या मार्गानें जाण्यांत. पहिल्या उतरणीचा शेवट धार्मिक न्यायालयें व शुद्धीकरण यांमध्यें होतो; तर दुसऱ्या उतरणीची अखेर गोळीबार व दडपशाही यांना सपशेल शरण जाण्यांत, व घाणेरड्या खेड्यांतील दरिद्री जीवनांत होईल. महात्मा व हुकूमशहा याला संन्यासहि म्हणतील.

२. गतिमान वर्ण-पट

दोन विचार-पद्धतींचा हा समेट होय, असें महात्मा व हुकूमशहा म्हणतील. पण तें खरें नाहीं. त्या दोहोंचें एकीकरण होणेंच अशक्य. तात्पुरत्या तडजोडीनें त्या दोघांचेंहि असमाधानच राहावयाचें. ते मधूनमधून एकमेकांच्या जवळ येतात व दूर जातात. हा झपूर्झाचा खेळ इतिहासांत चालत आलेला दिसतो, पण त्याचा उलगडा करण्याला मार्क्सवादहि अपुरा पडतो. एरवीं मार्क्सवाद हा निष्णात वाटाड्याप्रमाणें उपयोगीं पडत असतो. पण येथें तोहि थोटा ठरतो.

इतिहासाच्या कांहीं कालखंडांत, मानवांचे सर्व समुदायच्या समुदाय या वर्ण-पटाच्या एका टोंकावरून दुसऱ्या टोंकाकडे जातांना दिसतात. समुद्रावर धांवणाऱ्या प्रबळ 'व्यापारी वाऱ्या' प्रमाणें, हीं सामुदायिक स्थित्यंतरें 'अतिरिक्त तांबडा' व 'अतिरिक्त जांभळा' यांच्यामध्यें होत असतात. १९ व्या शतकांत असें सामुदायिक भ्रमण 'अतिरिक्त तांबड्या' रंगाकडे—म्हणजे हुकूमशाही पद्धती-कडे—चालू झालें. पण चालू शतकाच्या तिसऱ्या दशकाचे प्रारंभापासून, १९२० सालापासून, आपण सर्वजण, कळत न कळत, राजीनाराजीनें, 'अतिरिक्त जांभळ्या' रंगाकडे—महात्म्याच्या मार्गाकडे वळत आहोंत.

या प्रवाहांत वाहतांना आपल्याला जितकी कमी जाणीव असेल, तितकें अधिक आपण राजीखुषीनें जातों. आणि जितकी जाणीव अधिक असेल, तितकी आपली संमति कमी असते. व्यक्तिशः मी दुसऱ्या कोटींतील आहें. मला असें वाटतें कीं, एखादा लेखक अजूनहि 'अतिरिक्त तांबड्या' कथानकाची कादंबरी 'अतिरिक्त जांभळा' शेवट न करतां प्रामाणिकपणें लिहूं शकेल. पण तें घडत नाहीं. कारण पदार्थ-विज्ञान-शास्त्रावर ग्रंथ लिहिणारा सच्चा शास्त्रज्ञ शेवटीं तत्त्वज्ञानाचा उपसंहार जोडल्याशिवाय राहात नाहीं, आणि खरा समाजवादी लेखक पुरोगामी पक्षाच्या पराभवाचें समालोचन करावयास बसला म्हणजे त्याला समाजाच्या मानस-शास्त्रांतील विवेकशून्य भागाचा विचार केल्याशिवाय चालत नाहीं. जो कोणी भूतकालाला आंधळेपणानें चिकटून राहील, तो मागें पडेल. आणि जो नव्या प्रवाहांत स्वत.ला तत्परतेनें झोंकून देईल तो, वाळलेल्या पानाप्रमाणें, वाहात जाईल. आपण जें कांहीं करूं शकतों तें इतकेंच कीं, या प्रवासांत अधिक जाणिवेनें व कमी राजीखुषीनें वाटचाल करावयाची.

पण पुनः प्रश्न असा कीं, असें कृति-स्वातंत्र्य आपल्याला आहे काय? सामुदायिक परिवर्तनांतून जे लोक शिल्लक राहातात, ते सर्वोत्तम असतात कीं

बोलघेवडे असतात? कांहीं लेखक 'अतिरिक्त तांबड्या' रंगांतून 'अतिरिक्त जांभळ्या' रंगाकडे माकडाप्रमाणें उड्या मारीत जातांना पाहिले म्हणजे आगें म्हणावेंसें वाटतें कीं, 'झालें गेलें विसरून जाऊं या.' पण ते लेखक म्हणतात, 'आम्ही जें लिहिलें तेंच आमचें मत असतें.' निदान तशी त्यांची श्रद्धा असते. नाहीं तरी कोणता लेखक हेतूशिवाय एक ओळ तरी लिहील? म्हणून अशा लेखकाबद्दल आरंभीं तिटकारा वाटला तरी नंतर हा तिटकारा चुकीचा आहे हें कळून येतें. परंतु 'तांबड्या-जांभळ्या' रंगांकडील धांवपळींचीं अचूक कारणें देण्यांत ते लेखक जी चलाखी करतात, ती पाहून मात्र त्यांचा पुनः तिटकारा वाटूं लागतो. अशा बाबतींत बेडौल गतीच बरी म्हटली पाहिजे. मेघपात्रता मात्र तिरस्कारार्ह आहे. मेघपात्र लोक आपलें जहाज वाऱ्याच्या उलट दिशेनें कधींच हाकारीत नाहींत. वाऱ्याची पहिली झुळूक येतांच ते त्याला शरण जातात; आणि आपलें सुकाणूं सोडून देतात. मग ते गरगरां फिरत दुसऱ्या टोंकाला हळूच जाऊन चिकटतात, त्यामुळें त्यांची कुजबूज ही वाळलेल्या पानांच्या फडफडीसारखी वाटते.

मानवी स्वभावाच्या या परिवर्तनाचे परिणाम हुकूमशहावर फार शोचनीय होतात. त्यांना त्याबद्दल फार दुःख वाटतें असें नव्हे-कदाचित् फारसें वाटतहि नसेल. आपत्कालीं जेव्हां जीवनाच्या निष्ठा कोलमडतात आणि जीवनाला फारच थोडा अर्थ उरतो, तेव्हां कलावंतांना आत्महत्त्या करावीशी वाटते. पण ते ती क्वचितच करतात. याच्या उलट क्रांतिकारकाला आत्महत्त्या करण्याचा मोह क्वचितच पडतो. पण जेव्हां तो आत्महत्त्या करतो, तेव्हां त्याला दुसरें कांहीं करणें शक्यच नसतें. एका दृष्टीनें, आध्यात्मिक जीवनाचा अर्थच मुळीं, 'मृत्यूच्या स्वीकारासाठीं मन तयार करणें,' असा आहे. ही मनाची तयारी हुकूमशहाची फार थोडी झालेली असते. पण परिस्थितीच्या दडपणामुळें त्याला त्या तयारीचें ध्येय गांठावें लागतें.

प्रवाहाबरोबर वाहात जाण्यास कलावंताचा फारसा विरोध नसतो; पण क्रांतिकारकाचा अत्यंत तीव्र विरोध असतो. हुकूमशहानें तर आपल्या अंतर्मनाचे सारे संबंध तोडून टाकलेले असतात. मला वाटतें, 'आम्ही अखेरच्या रजेवर असलेलीं मृत माणसें आहोंत,' असें लेनिन म्हणे. या मृत्यूच्या छायेंतच हुकूमशहा नेहमीं वावरत असतात. खरोखर त्यांचें जीवित गुदमरून गेलेलें असतें. ही अवस्था इतर माणसांचे बाबतींत आयुष्यांत एखादे वेळेसच येते. लहान मुलाला दांत येण्याच्या अवस्थेप्रमाणें ती मर्यादित कालापुरती असते. परंतु क्रांतिकारकाला

आपलें सबंध जीवन अशा कोंडमाऱ्यांत कंठावें लागतें. आणि जगाचे विकट प्रश्न हे त्याचें रोजचें खाद्य होऊन बसतात. सर्वसामान्य नागरिक हा या व्याकुल अवस्थेंतून लवकर बाहेर पडून अद्वैताकडे जाण्याचा प्रशांत जीवन-मार्ग शोधून काढतो. पण हुकूमशहाला तो मार्ग उपलब्ध नसतो. हुकूमशहा हा सतत तारुण्यावस्थेंत राहात असतो. पण त्याचें वर्तन मात्र अप्रौढ, आनंदशून्य व प्रेम-शून्य असें असतें. जणुं कांहीं त्याच्या अंतर्मनावर एखादा डॉक्टर आपली सुरीच चालवीत आहे. तो कधीं झोपेंत बरळून आपले दबलेले विचार मोकळे करीत नाहीं. त्या दृष्टीनें त्याचें मानसिक यश अलौकिक म्हटलें पाहिजे.

दयेशिवाय आयुष्य जगणें अशक्य आहे असें म्हणतात, तर मग स्वतःवर थोडीहि दया न करतां आयुष्य जगणें तितकेंच अशक्य असलें पाहिजे. हुकूम-शहाला दुःखें होत नाहींत असें नाहीं. पण तो जें भोगतो, तें दुःख नसून दुःखाचा पडसाद असतो—जशा कांहीं तोडून टाकलेल्या अवयवाच्या वेदनाच. आपल्याबद्दल तो लोकांकडून आदरभाव मिळवितो—आणि तशीच दयाबुद्धि-देखील. मात्र ही दया दुबळ्या लोकांना सामर्थ्यशील माणसाबद्दल वाटते, तसली क्षीण दया असते. ब्लँकी, लक्झेंबर्ग, वेरा, फिग्नर या केवढ्या प्रचंड व्यक्ती! त्यांच्यापुढें आपण तोंड मिटून गप्प बसण्यापलीकडे दुसरें काय करणार? 'आपण किती दुर्बळ, निष्फळ व क्षुद्र आहोंत' याची जाणीवच आपल्याला होते, पण तरीहि आपण त्यांचेवर दया करतों.

हुकूमशहाच्या आयुष्यांत जेव्हां पेंचप्रसंग उभे राहातात, तेव्हां आपली ही दयाबुद्धि जागृत होते. एका गोष्टींत मीं असें वाचलें होतें कीं, एक न्यायाधीश एका चोराला हात तोडण्याची शिक्षा देतो. तो तोडलेला हात त्या न्यायाधीशाचे पाठीस लागतो व त्याचा गळा दाबतो. हुकूमशहाचे बाबतींत न्यायाधीश व गुन्हेगार दोन्ही एकच असतात. आणि तोडलेला अवयव हा त्याचा हात नसून परमेश्वराशीं महात्म्याचा संबंध जोडणारी नाळ असते, किंवा फ्रॉइडच्या सौम्य भाषेंत 'सागरावर तरंगणाराची भावना' असते. हें आध्यात्मिक अधिष्ठान म्हणजे केवळ चैनीची वस्तु आहे, असें हुकूमशहा जन्मभर मानीत आलेला असतो. पण आपत्काल आला म्हणजे तें तसें नसल्याची जाणीव त्याला होते. मानव व समाज यांचे संबंध मनाच्या पोषणाला पुरेसे नाहींत असा प्रकाश त्याच्या डोक्यांत एकदम पडतो, आणि मानव व विश्व यांचे संबंध जोडले गेले पाहिजेत ही जाणीव त्याला होते.

अशा वेळीं दोहोपैकीं एक घडतें. तुटलेले संबंध पुनः जोडले जातात आणि पूर्वीच्या पापाचें प्रायश्चित्त म्हणून मानव व समाज यांचें नातें तोडलें जातें. याचें

सनातन उदाहरण म्हणजे, क्रांतिकारक हा साधक बनतो—हुकूमशहापासून योगी होण्यापर्यंतची ही केवढी लांब उडी! आणि जर मानवाचा विश्वाशीं संबंध पुनः जोडला गेला नाहीं, तर तो हुकूमशहा मनांतल्या मनांत गुदमरून जातो. कैक क्रांतिकारकांचे जीव असे गुदमरून गेलेले आहेत. मॉस्को येथील खटल्यांत कित्येक क्रांतिकारक प्रेतासारखे दिसत होते, तर कित्येक सैतानी वृत्तीनें वागत होते; आणि कांहीं दीन-दुबळे भासत होते. तुफान भावना व प्रचंड कृति या दोहोंचा संगम रोजा लक्झेंबर्गशिवाय अन्यत्र सांपडणें कठीण.

इतिहासांतील वैयक्तिक प्रभाव समजून घेण्यासाठीं, या सर्व प्रक्रिया माहीत असणें अवश्य आहे. परंतु त्या प्रक्रियांची वाचक अशी शास्त्रीय परिभाषा अद्यापि आपल्याला उपलब्ध नाहीं, हें दुर्दैव होय. म्हणून त्यांचें वर्णन जो कोणी शांतपणें करूं इच्छितो, त्याला मोघम भाषाच वापरणें भाग पडतें. क्रांतिकारकांचा योगी होणें, किंवा माणूसघाण्या होणें—अशीं उदाहरणें पूर्वीच्या व आतांच्या इतिहासांत मुबलक सांपडतील. पण त्यांपैकीं एकाहि उदाहरणाची चिकित्सा मानसशास्त्राच्या तीनहि संप्रदायांतील उदंड वाङ्मयांत कोटेंहि केलेली आढळत नाहीं. जंग या स्विस् मानसशास्त्रज्ञानें या दिशेनें थोडाफार प्रयत्न केला आहे. पण त्यानें श्रीमंत मध्यमवर्गीयांचा अभ्यास केला आहे. रशिया किंवा जर्मनी यांतील 'लष्करी तुरुंगा' मध्यें डांबल्या गेलेल्या कैद्यांचा अभ्यास त्यानें करावयास हवा होता. पण तो त्यानें केला असता, तर त्याला आपली उपचार-पद्धति अपुरी असल्याचें आढळून आलें असतें; एवढेंच नव्हे तर, त्याची परिभाषासुद्धां 'अग्नये स्वाहा' करावी लागली असती. हुकूमशहाचें मानसिक परिवर्तन मानसशास्त्रज्ञाच्या वर्णपटाच्या टप्प्यापलीकडचें आहे.

'अतिरिक्त तांबडा' व 'अतिरिक्त जांभळा' या दोन टोंकांमधील निर-निराळ्या रंगांचे जे लोक आहेत, त्यांचे स्वभाव विचित्र दिसतात. त्यांना जुने पक्ष, जुने पुढारी, जुने कार्यक्रम, जुनीं ध्येयें, आणि मुख्य म्हणजे आपल्या उध्वस्त झालेल्या आकांक्षा—यांबद्दल तिटकारा वाटतो. हा भावनेचा उमाळा ओसरल्या-नंतर त्यांना वाटूं लागतें, 'समाजाकडे पहाण्याच्या आपल्या दृष्टिकोनांतच कांहीं तरी मूलभूत चूक झालेली असावी.' समाजांत चैतन्य निर्माण करण्याचे कामीं आपण अपेशी ठरलों पण फॅसिझमला भयंकर यश आलें, याची जाणीव त्यांना नंतर होते. आणि यशस्वी माणसाबद्दल अपेशी माणसाच्या मनांत असूयेशिवाय दुसरें काय उत्पन्न होणार? म्हणून या मध्यम दर्शेतील लोकांना फॅसिस्टांबद्दल द्वेष वाटत नाहीं—असूया वाटते.

शास्त्रज्ञाला मात्र या मानसिक परिवर्तनाचा फायदा मिळतो. एका अर्थानें तोच या परिवर्तनाचा उत्पादक असतो. पण त्याच्या इच्छेपेक्षांहि अधिक द्रुत गतीनें हें परिवर्तन होत- असतें. सांप्रतकालीं 'अतिरिक्त जांभळ्या' तत्त्वज्ञानांतील अविवेकाचा भाग पदार्थविज्ञान, प्राणिशास्त्र व मानसशास्त्र यांना व्यापून टाकीत आहे. याचा अर्थ शास्त्राच्या रसायन-शाळेंत त्या अविवेकी तत्त्वज्ञानानें चोरून प्रवेश केला असें नव्हे, उलट त्या प्रयोग–शाळेंतच त्या तत्वज्ञानाचा जन्म झाला आणि त्यानें नवें वातावरण निर्माण केलें.

याचें ठळक उदाहरण म्हणजे, गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत जें विवेक-निष्ठ शास्त्र होतें, तें पदार्थ–विज्ञानशास्त्र आतां अधिकाधिक योग्याच्या शास्त्राकडे वळत आहे. वस्तु, पदार्थ, काल, स्थल, कार्यकारणभाव, अचूक मोजमाप आणि संभाव्य अंदाज—हें सर्व विज्ञानशास्त्रज्ञाच्या हातांतून, वाळूप्रमाणें, खालीं गळून पडलें आहे. आणि त्याच्या हातांत कांहीं मामुली सिद्धांत मात्र शिल्लक राहिलेले आहेत. ते सिद्धांत असेः—'जुगाराच्या खेळांत अमुकच डाव पडावा अशी मुद्दाम योजना केली नसेल, तर बहुतेक प्रसंगीं तसा डाव पडण्याचा संभव नाहीं.'

हें विधान अचूक आहे हें कोण नाकारील ? पण विश्वाचें कोडें उलगडण्याची आमची भूक भागविण्यास तें अपुरें आहे. आधुनिक विज्ञान–शास्त्रज्ञ आपल्या कर्तृत्वाची कक्षा मर्यादित करूं लागले आहेत. 'जगांतील प्रत्येक भौतिक घटनेचा उलगडा करण्याचें काम आपलें नव्हे. एवढेंच नव्हे, तर भौतिक सृष्टींत नेमकें काय चाललें आहे याचें वर्णन करणें हेंहि आपलें काम नव्हे,' अशी मर्यादित भूमिका आधुनिक विज्ञान–शास्त्रज्ञ घेत असतात.

कांहीं काळापूर्वी लाप्लास या फ्रेंच ज्योतिर्विदानें असें जाहीर केलें होतें कीं, 'एखाद्या अतिमानुष बुद्धीच्या मानवानें विश्वांतील सर्व अणूंची व त्यांच्या वेगाची गणना, एखाद्या विशिष्ट क्षणीं केली, तर जगाच्या अंतापर्यंतच्या सर्व घटनांचें भाकित मी आधीं वर्तवूं शकेन—चर्चिलच्या चिरूट कोणत्या छापाचा असेल, हेंसुद्धां सांगूं शकेन.'

पूर्वीच्या हुकूमशाही काळांत जे विज्ञान–शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होऊन गेले, ते सृष्टीच्या नियतिवादाच्या दैववादी पिंजऱ्याभोवतीं फिरट्या घालणारे होते. पण त्याला त्यांचा इलाज नव्हता. १९ व्या शतकांतील विज्ञानशास्त्राप्रमाणें, जग हें घड्याळाप्रमाणें चाललें होतें, त्यांत त्याला स्वातंत्र्य नसे. त्या जगाचे 'नैसर्गिक कायदे' काय ते स्वतंत्रपणाचे असत. २० व्या शतकांतील पदार्थविज्ञान–

शास्त्रानें हें स्वातंत्र्य बारीक बारीक कणांनीं सर्वत्र सारखें विखरून दिलें आहे. १९ व्या शतकांतील विज्ञात्यांनीं जगाचा आरंभकाल संदिग्ध मानला, तर विद्यमान विज्ञान सर्व जगच संदिग्ध मानत आहे. छायाचित्रण नीट न झालेल्या चित्रपटाप्रमाणें सारें जग सारवल्यासारखें पुसट पुसट दिसतें. विज्ञानाच्या मापन-यंत्रांनीं एवढेंच दाखविलें आहे कीं, या विश्वांत विज्ञानाला अमापनीय अशा घटना घडत आहेत. आणि बहुधा यामुळें विज्ञान–शास्त्रज्ञ हा दुसऱ्या कोणाहिपेक्षां अधिक ज्ञानपूर्वक 'अतिरिक्त जांभळ्या' रंगाकडे—योग्याच्या अध्यात्माकडे-वळत आहे. वज्रोली व समाधि यांचे उपयोग सांगतांना योग–शास्त्राचे प्रचारक अतिशयोक्ति करतात. आणि हुकूमशहाचे प्रचारक तर प्रचारांत अतिशयोक्ति असावयाचीच, असें ठांसून सांगतात.

३. लंबक

हुकूमशहा, कलावंत, सत्प्रवृत्त नागरिक, शास्त्रज्ञ—या सर्वांच्या प्रतिक्रिया, मानसिक परिवर्तनाचे चावर्तीतच भिन्न आहेत असें नव्हे, तर त्यांत भाग घेण्याचे त्यांचे हेतुहि भिन्न आहेत. त्या सर्वांचा एखादा समान हेतु असेल काय? पदार्थ–विज्ञान–शास्त्रांतील क्रांतीचा परिणाम कांहीं प्रमाणांत कला–क्षेत्रावर झालेला आहे. आणि मानसशास्त्रांतील क्रांतीचा प्रभाव राजकीय विचारावर पडलेला आहे. असे आणखी एकमेकांवरील परिणामाचे नमुने अनेक सांपडतील. पण त्यांमध्यें कार्यकारण–भावाची सांखळी आढळणार नाहीं. बुखारिनची कबुली व कणवाद यांचा कार्यकारण–संबंध नसला तरी अन्य संबंध असतो. कोणता तरी संबंध सर्वत्र असतोच. जर्मनींतील वायमार लोकसत्ताक राज्याचे बिकट प्रसंगीं साम्यवादी किंवा फॅसिस्ट—कोणत्याहि स्वरूपाची राज्यक्रांति होणें शक्य होतें, मोडकळीस आलेली जुनी राजवट चालू राहाणें अशक्यच होतें. त्या वेळीं एकानें जर्मनींतील लोकांचें वर्णन असें केलें कीं, 'जनतेला आतां भांडवलशाहीची ओकारी आली आहे.' ही भावना स्थूल असली तरी प्रबळ होती. निरनिराळ्या प्रवृत्तीच्या लोकांमध्यें ही भावना निर्माण झालेली होती. 'जडवादाचा तिटकारा' हाच एक सर्वांचा समान धर्म होता. बुद्धिवाद, अस्मिता ही पचण्यासारखी नव्हती. गूढवाद, बिनबुडाचा काल्पनिक तर्कवाद, यांचें जंजाळ सर्वत्र पसरूं लागलें होतें.

विवेक व कल्पना यांमध्यें हेलकावे खाणारा लंबक हाच इतिहासाची प्रेरकशक्ति होता. एखादी नदी समुद्राकडे वाहात असते तरी तिच्यावर पुराच्या वेळीं लाटा

उठत असतात, तशी समाजाची गति असते. मार्क्सवाद इतिहासाची जी उपपत्ति लावतो, तींत एक मोठें व्यंग असें आहे कीं, नदीच्या फक्त प्रवाहाचीच तो दखल घेतो—लाटांची नव्हे. नाझीवादांतील समाजाच्या मनोवृत्तीचें मूल्यमापन मार्क्सवादी परिभाषेंत करतां येणार नाहीं. त्या नदीच्या पाण्यावरील लाटा होत. याच्या उलट, लाटांविषयीं बोलण्यापूर्वी आपल्याला नदीची माहिती असणें अवश्य आहे.

निद्रावस्था व जागृतावस्था या जशा मानवी जीवनांत आलटून पालटून येतात, तशाच स्वरूपाचीं परिवर्तनें समाजांत घडत असतात, असें मानणें फारसें धोक्याचें होणार नाहीं. समाजांत विवेकहीन कल्पनेचें जेव्हां अधिराज्य असतें, तेव्हां तो काळ निद्रेचा व स्वप्नाचा म्हणावा लागेल. सारीं स्वप्नें कांहीं शांतता देणारीं नसतात. पुष्कळ वेळां तर तीं धडकी भरविणारीं असतात. पण अंतर्मनाच्या डोहांत अशा उड्या वारंवार मारल्या नाहींत, तर मानवी मनाचें पोषण नीट होणार नाहीं आणि पुढील जागृतावस्थेसाठींहि सिद्ध राहातां येणार नाहीं. योग्याची रात्र व हुकूमशहाचा दिवस—असा हा क्रम मानवी जीवनांत चालू असतो. आणि आपली सध्यांची संस्कृति ही बहुधा मृत्युशय्येवर पडलेली नाहीं, तर साध्या शय्येवर ती निद्रा घेत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 2.2.0036 वि: ...1ली खंड -
क्रमांक .....2.2.0.3.... नों: दि: ..7.6.2245

फ्रेंच विचारांची सांथ

आमच्या या देशांतील साहित्यिकांना एका नव्या रोगानें पछाडलें आहे. संपादक, टीकाकार, निबंधकार,—इत्यादि सरस्वतीच्या दरबारांतील सर्व मानकरी फ्रेंच इन्फ्ल्युएंझाच्या सांथींत सापडले आहेत. या साथीचीं लक्षणें अशीं कीं, एरवीं समतोल, सावधान व विवेचक असणारा माणूस, फ्रेंच काव्याची किंवा गद्याची एक ओळ नजरेस पडली तरी, आपली सर्व चिकित्साबुद्धि विनशर्त गहाण टाकण्यास सिद्ध होतो. एखाद्या तापांत ज्याप्रमाणें बारीकशा निमित्तानें रोग उद्भवतो, त्याप्रमाणें 'हृदयभंग,' 'पितृभूमि,' 'युवती,' अशा एखाद्या शब्दानेंहि रोग्याच्या शरिराला झटके येऊं लागतात. त्याचे डोळे पाणावतात, त्याचें हृदय कटु-मधुर आंदोलनांनीं आकुंचित होतें, व त्याच्या अन्तःस्रावी ग्रंथींतून रक्ताचे लोट जोरानें वाहूं लागतात. 'माझी पितृभूमि', 'माझा आत्मा', 'माझें हृदय'—असे शब्द एखाद्या इंग्रज कवीनें धाडसानें वापरले, तर तो कामांतून गेलाच. पण फ्रेंच कवीनें मात्र त्याच शब्दांची मंजुळ तार छेडली कीं, हा रोगी एकदम 'वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते' अशा अवस्थेस जातो.

गेल्या वर्षीं फ्रान्समधील तीन ग्रंथ माझ्या हातीं आले. ते तिन्ही ग्रंथ साहित्य-दृष्ट्या सुप्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं 'काल्पनिक मुलाखती' हें गाईडचें पुस्तक मीं बारकाईनें वाचलें—नव्हे—अधाशीपणानें वाचलें. मंगळावरील बातम्या एखादा माणूस जितक्या आतुरतेनें ऐकेल, तसें तें मीं वाचलें. पण त्या वाचनानें मी व्यथित मात्र झालों. त्याचें सर्व लिखाण नेहमींच तरुण लेखकाच्या गूढ उन्मादानें थोडेंफार भरलेलें असतें. तो व त्याचीं पुस्तकें यांच्याभोवतीं एक पातळ, विरळ वातावरण पसरलेलें असतें. त्याची फ्रेंच युवकांवरील छाप खेदजनक आहे. याचें कारण त्याच्या लेखनांत विकृत शृंगार असतो हें नव्हे. अश्लीलतेबद्दल त्याचेवर फॅसिस्टांनीं टीकाहि केलेली आहे, पण पुस्तकें वाचून कोणी कांहीं बिघडत नाहीं. परंतु त्याचे ठायीं एक प्रकारचा उद्धट अध्यात्मवाद असतो. आपण कांहीं निराळ्या उच्च भूमिकेवर वावरत आहों आणि सुंदर मूल्यें धारण करीत आहोंत, अशा अहंकारानें त्याचें लेखन मुसमुसलेलें असतें. पण त्या मूल्यांची चिकित्सा तुम्ही करूं लागलां, तर तुमच्या ओंजळींतून सारी वाळू खालीं

लंडन येथील "ट्रिब्यून"च्या १९४३च्या नोव्हेंबरच्या अंकांत हा लेख प्रथम प्रसिद्ध झाला.

गळून पडते. गाईडचा तरुण पिढीला संदेश हा, दंतकथेंतील बादशहाच्या नव्या पोशाखासारखा, असतो. तो दिसत नाहीं, असें म्हणण्याचें धाडस कोणीच करीत नाहीं.

असा हा फ्रान्समधील तरुण मध्यम-वर्ग दुभंगलेल्या मनःस्थितींत राहात असतो. स्वार्थ व तत्त्वज्ञान या दोहोंचीं पारडीं त्याच्या जीवनांत सारखीं असतात. त्यामुळें आपल्या आध्यात्मिक जीवनाला कांहीं धक्का पोहोंचतो असें त्यांना वाटत नाहीं. दिवसां ते जुन्या मोटारींचा व्यापार करण्यांत गुंग असतात, पण रात्रीं ते बादशाही वेषांत वावरतात. 'काल्पनिक मुलाखती' या पुस्तकावरून असें दिसतें कीं, गाईडमध्यें थोडाफार बदल झाला आहे—आणि तो बदल कांहीं वाईट नाहीं. अर्थात् त्यामध्यें ना रूप ना आकार, अशा तरल कल्पनांचे तरंग ओतप्रोत भरलेले आहेत. कांहीं महिन्यांपूर्वी त्या मुलाखती मीं वाचल्या, पण आतां त्यांतील एक ओळ किंवा एक विचारसुद्धां मला आठवत नाहीं. सारी वाळू बोटांच्या फटींतून गळून गेली आहे आणि शिल्लक राहिला आहे फक्त मोघम सुगंध. 'साहित्यांतील संदेश' या शब्दांना कांहीं अर्थ असेल तर तो हा असला पाहिजे कीं, वाचलेले शब्द सुकून गेले तरी त्यांचा भावार्थ वाचकाच्या स्मृतींत दरवळत राहिला पाहिजे.

दुसरें पुस्तक लुई ॲरॅगॉन याच्या कवितांचें आहे. हा कवि 'अतिवास्तववादी' म्हणून प्रसिद्ध होता; परंतु त्याचा भ्रमनिरास झाला. आणि त्यानें अतिवास्तववादाशीं असलेला आपला संबंध, राजकीय कारणासाठीं म्हणून, सोडून दिला. तो कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झाला. इतकें सर्व होऊनहि तो एक उत्कृष्ट कवि राहूं शकला असता. आणि मग त्याच्या पूर्वीच्या खाजगी व राजकीय जीवनाची कोणी पर्वा केली नसती. परंतु फ्रेंच विचारांची सांथ फलावणारे जे लोक आहेत, ते ॲरॅगॉनला केवळ "कवि" म्हणून मानीत नाहींत, तर साम्यवादी पक्षाचा एक 'वीर हुतात्मा' म्हणून मान देतात. ते आपल्याला सांगतात, 'युद्धविरोधी काव्य लिहिल्याबद्दल ॲरॅगॉनला अटक करण्यांत आली. तो रशियास गेला...आणि हें महायुद्ध सुरू झाल्यावर, एक कम्युनिस्ट म्हणून, एका धोक्याच्या जागीं त्याची नेमणूक करण्यांत आली.'

पण सत्यस्थिति अशी आहे कीं, कम्युनिस्ट म्हणून ॲरॅगॉनचें जीवन हें अतिवास्तववादी परंपरेस शोभणारेंच आहे. तो स्पेनमधील युद्धाच्या आघाडीवर गेला; पण एका मोटारींत बसून, ध्वनिक्षेपक यंत्रांतून, सैनिकांना काव्यें सुनावण्यापलीकडे त्यानें कांहीं एक केलें नाहीं. उलट, त्याचवेळीं मालरॉ ह्यानें 'आंतरराष्ट्रीय

विमान-पथक' तयार केलें आणि कॉर्नफोर्ड व रॉल्फ फॉक्स यांनीं तर ऐन आघाडीवर आपल्या प्राणांचें बलिदान केलें. त्यांचें अनुकरण सर्व लेखकांनीं करावें, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. पण शब्दांना जर कांहीं अर्थ असेल, तर ते खरे वीर व हुतात्मे ठरतात—ॲरॅगॉनसारखे लेखक नव्हेत. एका युद्धविरोधी कवितेसाठीं त्याला झालेली अटक म्हणजे एक दिवसाचें नाटक होतें. तो रशियाला 'फरारी' म्हणून गेला असें सांगितलें जातें, पण तें चूक आहे. लेखकांच्या एका परिषदेसाठीं एक प्रवासी म्हणून तो गेला इतकेंच. तो कोणत्याहि 'धोक्याच्या जागीं' नेमलेला नव्हता—वैद्यकीय पथकामध्यें एक तरुण अधिकारी म्हणून तो काम करीत होता—इतरांप्रमाणें तें काम त्यानें चांगलें केलें हें निःसंशय.

मी पुनः सांगतों, लेखकांनीं शौर्य दाखवावें अशी अपेक्षा कोणीच करीत नाहीं. पण हें लक्षांत ठेवावें कीं, साम्यवादाचा लढा खेळणें म्हणजे कांहीं संगीतिका रचणें नव्हे. संगीतिकेंतील नटांचे अंगावर वीरांचे वस्त्रालंकार घालणें हें फ्रेंच सांथीचेंच एक लक्षण आहे. पण हें पाहून कोणालाहि शिसारीच येईल. निदान जातिवंत हुतात्म्यांविषयींचा आदर कायम ठेवण्यासाठीं तरी असा दंभ नसावा.

ॲरॅगॉननें आपल्या पुस्तकांत कवितांशिवाय एक निबंधहि लिहिला आहे. त्याचें नांव '१९४० मधील काव्य.' तो फार उद्‌बोधक आहे. फ्रेंच काव्यामध्यें आपण नवीन नवीन ज्या सुधारणा केल्या, त्या त्यानें या निबंधांत नमूद केल्या आहेत. पहिली सुधारणा म्हणजे मुक्तछंद काव्यापासून छंदोबद्ध काव्यरचनेकडे वळणें. या क्रांतीचा धागा, अतिवास्तववादी कुशलतेनें, फ्रान्सच्या पराभवाशीं जोडलेला आहे. तो म्हणतो, 'आम्ही १९४० मध्यें लिहीत आहोंत. जेव्हां नवीन जग निर्माण होत आहे, तेव्हां नवे छंद निर्माण कसे होणार नाहींत? ते निर्माण झाले आहेत असें मी उंच आवाजानें सांगतों. फ्रेंच काव्यामध्यें नभोवाणीची किंवा नव्या भूमितीची भाषा कोणी प्रविष्ट केली?' इत्यादि.

काव्यामध्यें तांत्रिक व शास्त्रीय परिभाषा योजण्याची ही प्रथा नवीन लेखकांनीं १९२०-३० या दशकांतच सुरू केली आहे. तिचें तत्त्व आपल्याला मान्य असो वा नसो, पण ऑडेनच्या प्रतिनिधीनें ती प्रथा आपल्याला मान्य करावयास लावली आहे. ॲरॅगॉनची स्फूर्ति नेहमीं दहा वर्षें उशिरां जन्मास येते. त्याला साम्यवादाचा शोध लागला तो मॉस्को येथील 'शुद्धीकरणा'च्या खटल्याचे वेळीं.

ॲरॅगॉनचा दुसरा शोध म्हणजे विराम-चिन्हांचा संहार. त्यामुळें त्याचीं सारीं वाक्यें, एकांत एक मिसळून, वितळून त्यांचा एकच एक गोळा बनतो—खिशामध्यें ठेवलेल्या चाकोलेटचा भिजून लगदा बनवा तसा.

ॲरॅगॉनची तिसरी सुधारणा म्हणजे तोटकें यमक. (Move–Love) अशा शब्दांचीं यमकें त्यानें रूढ केलीं आहेत. पण यांत नवीन काय आहे? नड भासेल त्या वेळीं अशा यमकावर काम भागवून नेण्याची प्रथा गटेच्या वेळेपासून चालूच आहे. पण त्या कवींनीं आपल्या व्यंगांना तत्त्वज्ञानाचें स्वरूप कधीं दिलें नाहीं, आणि आपलीं चुकीचीं कवनें पुढिलांपुढें कित्ता म्हणून कधीं ठेवलीं नाहींत. ॲरॅगॉन आपल्या नेहमींच्या शालीनतेनें म्हणतो, 'आतां माझीं हीं उदाहरणें मी पुरीं करतों. माझी खात्री आहे कीं, नव्या काव्याच्या उपासकांना मी नवीन मार्ग दाखवून दिलेला आहे. त्या मार्गानें जाऊन ते १९४१ च्या वसंत ऋतूमध्यें या पद्धतीचें काव्य रचतील, अशी मला आशा आहे.'

स्वतःच्या काव्यावरील ॲरॅगॉनचें हें भाष्य आहे. आतां त्याच्या प्रत्यक्ष कविता वाचल्या म्हणजे, फ्रान्सविषयीं ज्यांना ममत्वाची ओढ आहे, त्यांना त्या अत्यंत मधुर वाटतील. याचें पहिलें कारण हें कीं, प्रत्येक चरण सयमक आहे. पुष्कळ काळ स-यमक काव्य वाचण्याच्या आनंदाला आपण मुकलों होतों. दुसरें कारण म्हणजे, त्या कविता फ्रेंच भाषेंत असल्यामुळें तोंडांत द्राक्षाप्रमाणें विरघळतात. 'आगगाडी स्टेशनावर उभी असतांना, संडासाचा उपयोग करूं नये,' अशा अर्थाची फ्रेंच भाषेंतील ओळ असली, तरी ती संगीताप्रमाणें कानाला मंजुळ लागते—आणि युरोपखंडापासून चार वर्षें दूर राहिलेल्या माणसांच्या कानाला तर ती अमृताची धारच भासते. फ्रान्सच्या दुरावलेल्या भगताला पॅरिसमधील भूमिगत रेल्वे स्टेशनांचीं नांवेंसुद्धां रोमांचकारक वाटतात.

अशा भावनांच्या धुक्यांतून न पहातां, इंग्रज टीकाकाराप्रमाणें ॲरॅगॉनच्या काव्याचें आपण जर निर्विकारपणें विश्लेषण केलें, तर हा कवि म्हणजे 'लहानशा डबक्यांतील एक मोठा बेडूक' असा वाटतो. तो एक हुषार कारागीर आहे. तो जर आपल्या विशिष्ट लकबी नि लहरी सोडूं शकेल, तर आज ना उद्यां चांगला कवि बनूं शकेल व त्याबद्दल आपली पाठ आपणच थोपटून घेऊं शकेल. पण ॲरॅगॉनच्या प्रस्तुत काव्यसंग्रहाला 'सर्व युरोपला इषारा' असें म्हणून गौरविणें हा युरोपखंडाचा अपमान आहे आणि मृतवीरांची विटंबना आहे.

तिसरें पुस्तक व्हर्कारचें. हा लेखक टोपण नांवानें लिहितो. त्याचें हें पुस्तक म्हणजे एक कादंबरी आहे. ती एका म्हाताऱ्या माणसानें प्रथमपुरुषी भाषेंत सांगितली आहे. तिचें कथानक असें—

एका जर्मन अधिकाऱ्याला एका फ्रेंच घरांत ठेवलेलें आहे. त्या घरांत एक वृद्ध व त्याची पुतणी—अशीं दोघें राहातात. तो जर्मन अधिकारी संगीतज्ञ, तरुण,

सुंदर, सुसंस्कृत व अत्यंत भावनाप्रधान आहे. त्याला फ्रान्सविषयीं आदर आहे —प्रेम आहे. फ्रेंच भाषेंतील अभिजात ग्रंथ अथपासून इतिपर्यंत त्याला अवगत आहेत. आणि त्याला खात्री वाटत आहे कीं, या महायुद्धाचा शेवट शाश्वत समेटांत होईल; आणि फ्रान्स व जर्मनी यांची कायमची आध्यात्मिक मैत्री शेवटीं जमून जाईल. तेव्हां फ्रान्सचें सांस्कृतिक श्रेष्ठत्व जर्मनीच्या उपयोगीं पडेल.

हे आपले सारे विचार तो जर्मन अधिकारी आपल्या मृदु, नम्र व मधुर स्वरानें बोलून दाखवितो. १९४०–४१ च्या हिंवाळ्यांत, घरांतील शेकोटीपाशीं बसलीं असतांना, त्या वृद्धाला व त्याच्या पुतणीला, तो हे आपले विचार ऐकिवितो. मात्र तीं माणसें तोंडांतून एक शब्द बाहेर काढीत नाहींत—कधीं तोंडच उघडीत नाहींत–बहिऱ्या–मुक्या माणसांप्रमाणें 'चिरेबंदी' मौन पाळून तीं दोघें त्या अधिकाऱ्याचीं स्वगत भाषणें, त्या हिंवाळ्यांतील शेंकडों दिवशीं संध्याकाळीं, शांतपणें ऐकत बसतात. तो वृद्ध आपला चिरूट ओढीत असतो आणि ती पुतणी आपलें विणकाम करीत असते.

शेवटीं तो जर्मन अधिकारी रजा घेऊन पॅरिसला जातो. तो सुसंस्कृत व भावनाशील असूनहि त्याला पूर्वी जर्मन नाझींचें स्वरूप कळलें नव्हतें. तें त्याला पॅरिसमध्यें दिसून आलें. नाझी हे पशू आहेत, असें त्याला तेथें आढळलें. म्हणून रशियाच्या आघाडीवर स्वयंसेवक म्हणून नांव नोंदविण्याचें व युद्धांत मरून जाण्याचें तो निराशेच्या भरांत ठरवितो. हा त्याचा निर्धार त्याच्यावर अनुरक्त झालेल्या त्या पुतणीच्या कानीं पडला, तेव्हां तिनें आपल्या तोंडांतून पहिला व अखेरचा शब्द काढला, आणि तो म्हणजे, "राम राम!"

या कथानकाकडे आपण प्रथम मानसशास्त्राच्या दृष्टीनें पाहूं. एक भावनाशील माणूस, सदैव गप्प बसणाऱ्या लोकांपुढें, १०० दिवस एकटा बोलत राहील, हें तुम्हांला शक्य वाटतें काय? फार तर दुसऱ्याच दिवशीं त्याचा धीर संपला असता, आणि त्यानें त्या वृद्धाच्या खांद्याला धरून गदगदां हलविलें असतें, किंवा दरवाजा खाडकन् बंद करून तो आपल्या खोलींत निघून गेला असता आणि त्या शेकोटीपाशीं पुनः कधीं फिरकला नसता. पण असा कांहीं त्रागा त्यानें केला नाहीं. त्याच्याप्रमाणें तो वृद्ध व ती मुलगी यांचें शंभर दिवसांचें वर्तन हेंहि विचित्र आहे.

मानसशास्त्रदृष्ट्या सर्व कादंबरी पोकळ आहे; पण राजकीय दृष्ट्याहि ती वाईटच आहे. त्या अधिकाऱ्याचा प्रत्येक शब्द व विचार नाझीवादाशीं पूर्ण विरोधी आहे. परंतु 'फॅसिस्ट-विरोधी' या शब्दाचा लेखकाला तिटकारा वाटतो. एखाद्या राजकीय तत्त्वासाठीं राष्ट्रनिष्ठा सोडणें ही कल्पना त्याला त्याज्य वाटते.

म्हणून त्यानें असें दाखविलें आहे कीं, त्या कादंबरीच्या सुबुद्ध नायकानें हिटलरचें एकहि भाषण वाचलेलें नाहीं. तसेंच, जर्मन पार्लमेंटच्या दहनापासून पोलंडवरील आक्रमणापर्यंतच्या दहा वर्षांतील एकहि वृत्तपत्र त्यानें पाहिलेलें नाहीं. असें मानलें तरच कादंबरींतील विसंगति नाहींशी होईल. अन्यथा, सध्यांचें महायुद्ध म्हणजे फ्रान्स-जर्मनींचें १८१५ किंवा १८७० सालांतील युद्धाच्या परंपरेंतील एक आहे असें वाटेल. या कादंबरीकाराचें टोपणनांव जेव्हां उडून जाईल आणि त्याचें खरें व्यक्तित्व जेव्हां प्रगट होईल, तेव्हां, मी पैज मारून सांगतों, हा कादंबरीकार फ्रेंच फॅसिस्ट किंवा निदान कट्टा प्रतिगामी असल्याचें आढळून येईल.

या छोट्या कादंबरींतील अत्यंत उद्वेगकारक गोष्ट ही कीं, हीनगंड व उर्मटपणा यांचें मिश्रण तींत झालें आहे. फ्रान्सचा जर कधीं कोणी उदात्त, निःस्वार्थी, व सत्प्रवृत्त मित्र असेल, तर तो म्हणजे या कादंबरीचा नायक. त्यानें आपल्या राष्ट्रभक्तीमुळें आत्महत्त्या करण्याचीहि तयारी दाखविली. मग त्याला मुर्दाड मौन पाळण्याची शिक्षा कां? हा नाझी-विरोधी सज्जन जर्मन आईबापांच्या पोटीं आला म्हणून! १९३९ सालीं, फ्रान्समधील फॅसिस्टविरोधी जर्मनांना 'लष्करी तुरुंगांत' ज्या मनोवृत्तीनें घातलें, तीच मनोवृत्ति १९४२ सालीं येथें दिसून येते. मध्यंतरींच्या काळापासून या कादंबरीकारानें कांहींच धडा घेतला नाहीं. यातनांमुळें मनोवृत्ती शुद्ध होतातच असें नव्हे. कांहीं वेळां मानसिक आघाताचे परिणाम विपरीतच होतात. आतां अशी वेळ आली आहे कीं, जेव्हां फ्रान्सच्या उच्च सांस्कृतिक परंपरेच्या अभिमान्यांनीं खऱ्या हुतात्म्यांचें तेज व स्वतःच्या रोगट दृष्टींतून दिसणारे रंगीबेरंगी भ्रम, यांमध्यें फरक करण्यास शिकलें पाहिजे.

जे लोक फ्रान्सच्या वतीनें अधिकृतपणें बोलूं शकतील, ते गप्प बसतात. चिनी उपमेनें सांगावयाचें तर, त्यांना वाटतें, कांहीं काळ मासे धरण्याचा असतो, तर कांहीं काळ जाळें सुकत ठेवण्याचा असतो. परंतु साहित्यांतहि 'काळा बाजार' चालतो हें ध्यानीं धरलें पाहिजे. त्या बाजारांत मानवाचा त्याग, संघर्ष व निराशा यांचा सौदा केला जातो. या सर्व साहित्यावरून आपल्याला फ्रान्समधील सर्वसामान्य जनतेचें चित्र मुळींच कळत नाहीं. अमेरिकेंतील चित्रपटावरून युरोपांतील भूमिगत चळवळीची जितकी कल्पना येणें शक्य आहे, तितकाच या फ्रेंच साहित्यावरून फ्रान्समधील जनमनाचा अंदाज बांधणें शक्य आहे. अशा साहित्यामुळें फ्रान्स देशाचें कांहींच कल्याण होत नाहीं. आपल्याला ज्या खऱ्या समस्यांना पुढें तोंड द्यावें लागेल, त्यांपासून जनतेचें चित्त हिरावून घेतलें जातें ही मोठी भयंकर गोष्ट आहे.

कादंबरीकाराला पडणारे मोह

१

रशियांतील एक मोठा लेखक आपल्या मेजाखालीं कढत पाण्याची एक बादली ठेवून त्यांत पाय सोडून बसत असे, आणि आपल्या खोलीच्या उघड्या खिडकीकडे त्याचें तोंड वळलेलें असे. असें असलें तरच त्याच्या हातून लेखन होई. त्याचें नांव टुर्जीनीव्ह. मला वाटतें, कोणत्याहि कादंबरीकाराला अशीच भूमिका योग्य आहे. तें कढत पाणी म्हणजे स्फूर्ति, प्रतिभा, अंतर्मन---इत्यादींचें प्रतीक होय. आणि ती उघडी खिडकी म्हणजे सारें बाहेरचें जग---कलावंताच्या कृतीचा तोच कच्चा माल.

क्षणभर आपण तें कढत पाणी विसरूं आणि असें समजूं कीं, आपला कादंबरीकार हा जातिवंत कलावान् आहे व तो प्रतिभासंपन्न आहे. त्याला स्फूर्तीसाठीं बाह्य उपचारांची गरज नाहीं. मग बाहेरच्या जगाचे अशा लेखकावर काय परिणाम होतात हें आपण पाहूं.

खिडकीबाहेरील जगाचा लेखकावर जो प्रथम व प्रभावी परिणाम होतो तो म्हणजे खिडकीचीं दारें लावून घ्यावींत व तिचे पडदे सोडावेत असें लेखकाला वाटतें. या परिणामाचीं स्वरूपें फार भिन्न असतात. लेखकाला एकाग्रता हवी असते. त्याच्या चित्तवृत्ती सहज प्रक्षुब्ध होतात. म्हणून खिडकी उघडी टाकून तींतून खोलींत येणारे, जगांतील हास्याचे, आक्रंदनाचे व जीवनसंग्रामांतील गर्जनांचे घोष व निनाद सहन करण्यासाठीं त्या लेखकाला प्रचंड प्रयत्न पुनः पुनः करावा लागतो.

खिडकी बंद करून जगाकडे पाठ फिरविण्याच्या या मोहाचें आणखी एक स्वरूप असतें. इतर मोहांपेक्षां हा मोह अगदीं निराळा असतो. येथें मोह घालणारा हा हीन वासनांना आवाहन करीत नाहीं, तर आत्म्याच्या उदात्त भावनांना जागृत करतो. त्याचें मोहजाल म्हणजे शांतता, सौंदर्य व ईश्वराशीं सख्य. तुमचा आत्मा हिरावून नेणारा सैतान येथें नसतो, तर तुम्हांला आत्म्याची

पेन् क्लबच्या १९४१च्या सप्टेंबरमध्यें भरलेल्या १७व्या आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसमध्यें केलेलें भाषण.

देणगी देण्यासाठीं तो आलेला असतो. तो तुमच्या कानांत कुजबुजतो, 'खिडकी बंद करा, जग सुधारण्याची आशा नाहीं. कर्म हें दुष्ट असतें. कोणतीहि जबाबदारी दुष्टच. खिडकीवरील पडदे खालीं सोडा. जीवनसंग्रामांतील त्या रानटी आरोळ्या विसरा. आपल्या कानांत पूर्ण शांतता वसूं दे. आणि अनंताच्या अंधुक प्रकाशानें तुमचे दुखरे डोळे न्हाऊन निघूं देत.'

एकदां खिडकीचीं दारें लावलीं म्हणजे कधीं विचित्र तर कधीं सुंदर, अशीं कथानकें मूर्त स्वरूप धारण करून येतात. पण तीं कांचेच्या कृत्रिम घरांत वाढविलेलीं रोपटीं असतात. 'आकाश-मंदिराची' कल्पना यांतूनच निघाली. कालमानाप्रमाणें आंतल्या खोलीची सजावट बदलण्यांत येते हें खरें, परंतु काल व परिस्थिति हे खिडकी-बाहेरच असतात. जगापासून अलिप्त अशा 'आकाश—मंदिरांत' वास्तव्य करणारे लोक, रोम जळत असतांना सारंगी वाजवीत बसत नाहींत—ते प्रार्थना करतात.

पडदे सोडलेली ही खोली 'प्रार्थना—मंदिरा'च्या गाभाऱ्याचें स्वरूप कधीं कधीं धारण करते. या गाभाऱ्यांत गेल्यावर आपला दाढीवाला रशियन कादंबरीकार भूतकाळांतील आपल्या क्रांतिकार्याबद्दल प्रायश्चित्तपूर्ण स्तवनें गाऊं लागतो. शेवटीं तो एक वानप्रस्थ योगीच बनतो. हा मोहाचा पहिला प्रकार.

मोहाच्या दुसऱ्या प्रकारांत त्या उघड्या खिडकीचा कादंबरीकारावर होणारा परिणाम वेगळा असतो—दडपण टाकण्याऐवजीं, तो शोषण करणारा असतो. टेबला-जवळ बसलेल्या लेखकाला खिडकीचीं दारें बंद करण्याचा मोह होत नाहीं, तर त्या खिडकींतून वांकून पहाण्याचा मोह होतो. रस्त्यावरील घटनांचें त्याच्या मनाला इतकें आकर्षण वाटूं लागतें कीं, तो आनंदानें गाऊं—नाचूं लागतो; मोठमोठ्यानें ओरडूं लागतो. पहिल्या प्रकारांत जागृत प्रतिभेचा कादंबरीकार दाखविला आहे, पण त्याला जगाचें सत्य ज्ञान नाहीं. येथें जगाचें सत्य ज्ञान परिपूर्ण आहे, पण तें ज्ञान प्रतिभेनें पचविलेलें नाहीं. खिडकींतून फार बाहेर वांकून पहाण्याच्या भरांत आपल्या कादंबरीकारानें आपले पाय गरम पाण्याच्या बादलींतून वर काढून घेतले आहेत. याचा उघड अर्थ हा कीं, तो आतां कादंबरीकार राहिला नसून केवळ वार्तालेखक बनला आहे. 'घसरगुंडीच्या' काळांतील पुष्कळसे गद्य लेखक अपयशी ठरले याचें कारण हेंच. वर्ग-युद्धाच्या आघाडीवरून वार्तालेखकांनीं पाठविलेल्या बातमी-पत्रांप्रमाणें त्या वेळच्या कादंबऱ्या वाटतात. त्यांतील पात्रें निर्जीव व सपाट भासतात, आणि तीं कृत्रिम रणभूमीवर लुटुपुटीच्या लढाया मारीत आहेत असें वाटतें. त्यांतील पात्रांना जातिक लांबी व लैंगिक रुंदी असते, पण खोली नसते अथवा गारठून गेलेली असते.

यानंतर 'गुलाबी रंगा'नंतरच्या कालखंडांत, योगीजनांच्या युगांत, तर्कशून्य भावना ही सर्वांच्या वरचढ होते. अर्थात् खिडकी उघडी टाकणें व पाय गरम पाण्यांत ठेवणें—या दोन्ही क्रिया एकदम करणें कठीण वाटतें. म्हणून पुष्कळ जुने-नवे कादंबरीकार त्या दोहोंत तडजोड करतात. ही तडजोड म्हणजेच मोहाचा तिसरा प्रकार. या तिसऱ्या प्रकारांत खिडकीचीं दारें उघडीं नसतात व बंदहि नसतात. तीं किलकिलीं केलेलीं असतात. आणि खिडक्यांवरील पडदे असे सोडलेले असतात कीं, बाहेरील जगाचा मर्यादित भागच लेखकाला दिसावा; आणि त्याच्या दृष्टीपासून दुःखद व भयप्रद दृश्यें झांकलीं जावींत. तो लेखक त्या पडद्यांतील छिद्रांत एक दुर्बिण बसवून त्यांतून जगाचा एक लहानसा—व बहुधा क्षुद्र—भाग न्याहाळीत बसतो.

निर्विवादपणें चांगल्या असणाऱ्या पुष्कळशा कादंबऱ्या जगाच्या अशा अल्प व एकांगी ज्ञानावर रचलेल्या असतात. त्यांमध्यें प्रेम असतें, पण शृंगार नसतो; काम असतें, पण घाम नसतो; वर्ग-भेद असतो, पण वर्ग—द्वेष नसतो. मांद्य असतें पण बद्धकोष्ठता नसते.

कादंबरीकाराची दुर्बिण कधींकधीं दुसऱ्या दिशेकडेहि लावली जाते; किंवा उजवीऐवजीं डावी खिडकी उघडली जाते. मग सारीं उलटीं दृश्यें दिसूं लागतात. प्रेमाशिवाय शृंगार, कामाशिवाय घाम व वर्ग-भेदाशिवाय वर्ग-द्वेष इत्यादि. जगाच्या या अंशमात्र दर्शनावरच पुष्कळ चांगल्या कलाकृती निर्मिलेल्या आहेत. मग या यशस्वी मार्गाला 'मोहजाल' असें कां म्हणावें आणि खिडकी पूर्णपणें उघडण्याचा आग्रह कां धरावा ?

याचें कारण असें कीं, पडद्यांतील छिद्रांत दुर्बिण बसवून जगाचें ज्ञान करून घेणारे कांहीं कादंबरीकार मधून मधून तांत्रिक दृष्ट्या उत्तम अशा कादंबऱ्या लिहूं शकत असले तरी, त्यामुळें कादंबरीच्या कलेची वाढ मात्र खुंटते हें खास. यामुळेंच डिकन्स आणि झोला यांचें कौतुक करतांना आपण त्यांना वाजवीपेक्षां जास्त औदार्य दाखवीत आहों असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

'मोह' म्हटलें म्हणजे आधीं आपली अशी कल्पना होते कीं, एका विशिष्ट मुक्कामाकडे जाणारा—पूर्णत्वाला नेणारा—असा एक मार्ग आहे, आणि त्यापासून भुलवून, चकवून, फसवून कोणीतरी आपणास आडवाटेला नेत आहे. अशा मोहाला बळी पडणें म्हणजे कलेच्या क्षेत्रांत अपयश मिळविणें असाच कांहीं अर्थ नाहीं. परंतु माझा असा विश्वास आहे कीं, 'डॉन् क्विक्झोट' पासून 'वॉर ॲण्ड पीस्' या कादंबरींपर्यंत एक राजमार्ग आहे. 'विदरिंग हाइट्स्' सारख्या

कादंबऱ्या श्रेष्ठ प्रतीच्या आहेत खरें, पण त्यांचा मार्ग खुंटलेला आहे, त्यांना अखेर कोठें जावयाचें आहे हें कळतच नाहीं.

हा भेद कोणाला निराधार वाटेल, पण तो खरा आहे. तो खरेपणा पटण्यासाठीं, आपण आपल्या खिडकीकडे जाऊं या आणि त्या खोलींतील आपल्या कादंबरीकाराकडे पाहूं या. यानें पडदे ओढलेले आहेत. पण त्या पडद्यांत त्यानें एक बारीकसें छिद्र पाडलेलें आहे. त्या छिद्रांत एक दुर्बिण बसवून तो तिच्यांतून पहात आहे. त्याला कोणतें दृश्य दिसतें? एक घर आहे आणि एक बाग आहे. तेथें एक तरुणी हातांत गुलाबांचा गुच्छ घेऊन आपल्या प्रियकराची वाट पहात उभी आहे. ती कांहीं कल्पित पुस्तकें वाचणारी स्वप्नाळू मुलगी नाहीं. बड्या ग्रंथकाराचा जाडा ग्रंथ डाव्या हातांत धारण करणारी ती एक सुशिक्षित कुमारी आहे.

'ती सुंदर नाहीं काय? ती चैतन्यपूर्ण नाहीं काय? तिचें नांव सिल्व्हिया आहे.' तें घर, ती बाग, ती तरुणी आणि ते गुलाब—हे सर्व त्या दुर्बिणींतून पाहून चितारले असले, तरी खरोखरीचे भासतात आणि आपल्याला कादंबरीकाराचें मोठें कौतुक वाटतें. पण २०–२५ पानें वाचून झालीं कीं, तें कौतुक ओसरतें व आपण कादंबरीकाराला दरडावून विचारूं लागतों, 'लेखक-महाशय, माफ करा पण आम्हांला वाटतें, आपण कारखान्याचीं धुराडीं, अणूचें विच्छेदन, व्हर्नाफच्या मर्कट-ग्रंथी व लष्करी तुरुंग—हें सारें विसरून गेलां आहांत.'

'तुम्ही काय वेडे आहांत? पाठीवर वळ उठलेल्या जर्मन निर्वासिताचें चित्र मी माझ्या कादंबरींत रंगवावें, असें तुम्हाला वाटतें काय?' असा उलट टोला कादंबरीकार देतो.

'नाहीं.' हेंच याला उत्तर. कादंबरीकारानें आपल्या कथानकांत कोणाला ओढून आणावें किंवा कथानकाच्या पार्श्वभूमीवर मुद्दाम धुराडीं दाखवावीं, असें आमचें म्हणणें नाहीं. त्यानें कांहींच फायदा होणार नाहीं. पण आमच्या मनांत दुसरा एक पर्याय आहे. ती सिल्व्हिया ही केवळ मेणाची बाहुली राहावयाची नसेल, आणि या शतकांतील, या घडीची, या स्थळींची, जिवंत, रसरशीत व्यक्ति दाखवावयाची असेल तर तिचा परिस्थितीशीं काय संबंध होता हें दाखवावयास हवें. 'लष्करी तुरुंगांतील' यातनांची माहिती असूनहि ती हातांत गुलाब घेऊन उभी आहे असें दाखविलें, तरी तिच्या स्वभावांत एक आगळाच रंग भरेल. उलट, तिनें त्या यातनांचीं वर्णनें कधीं वाचलीं—ऐकलीं नाहींत असें दाखविलें, तरी तिच्या स्वभावाचा सुगावा लागेल. असे सुगावे लागले म्हणजे कोणत्याहि व्यक्तीचे आपल्या काळाशीं व परिस्थितीशीं संबंध कसे होते—किंवा नव्हते—हें

स्पष्टपणें कळतें. परंतु या महत्वाच्या गोष्टी पडद्यांतील छिद्रांतून तेवढें पहाणाऱ्या कादंबरीकाराला कशा दिसणार? आणि त्या तो आम्हांला खऱ्या स्वरूपांत कशा दाखविणार? कारखान्याचें धुराडें कादंबरींत नाहीं, म्हणून कांहीं आम्हांला चुकल्यासारखें वाटत नाहीं, तर तें कादंबरीकाराच्या मनांतच नाहीं, याची आम्हांला खरोखर रुखरुख लागते.

अशा पार्श्वभूमीचा अभाव कादंबरीकाराच्या मनांत (कादंबरींत नव्हे) असल्यामुळें तें घर, तें उद्यान व ती पुष्पवती युवती—हें सारें अर्धसत्य, असत्य भासूं लागतें. बंद केलेल्या खिडकीबाहेर काय घडत आहे, याची कादंबरीकाराला गंधवार्ता नाहीं, आणि त्यामुळें, त्याच्या कथानकाला लांबी व रुंदी राहात नाहीं, पवित्रा व प्रमाण उरत नाहीं; आणि ती उद्यानांतील तरुणी म्हणजे केवळ मेणाची निर्जीव बाहुली दिसूं लागते.

सर्वांगांनीं परिपूर्ण अशी कादंबरी सिद्ध होण्यासाठीं, कादंबरीकारानें आपली खिडकी सताड उघडी टाकली पाहिजे. त्याला आपल्या काळांतील महत्त्वाच्या घटना व प्रवाह (आंकडेशास्त्रसुद्धां) माहीत पाहिजे; आणि चालू काळांतील कल्पना व विचार (विज्ञानशास्त्रेंहि) यांचें ज्ञान त्याला असलें पाहिजे. या सर्वांगीण ज्ञानाचा उपयोग त्यानें आपल्या कादंबरींत करावयाचा आहे असें नव्हे. तो त्यानें केला तर ज्ञान-कोश निर्माण होईल—कादंबरी नव्हे. या सर्व ज्ञानाचा उपयोग पर्यायानें, सूचकतेनें करावयाचा असतो. आपल्या तोंडांतील लाळ अन्न-पचनाला जशी उपयोगी पडते, तशी ही जगाची माहिती कादंबरी-लेखनाला पोषक ठरते. ती नसेल तर, व्हिक्टोरिया राणीच्या काळांतील कथानकाप्रमाणें कादंबरीची गोष्ट स्वच्छंदीपणाची भासेल व तिच्यांतील पात्रें विकृत वाटतील. साहित्य-निर्मितीसाठीं सर्वज्ञता अंगीं असणें अवश्य आहे.

२

पण हें सारें कल्पना-चित्र नाहीं काय? शेंकडों कादंबऱ्या अशा आहेत आणि त्यांत कांहीं नामीहि आहेत. पण त्यांची नायिका अजून हातांत गुलाब घेऊन उद्यानांत अभिमानानें उभी असते. तिला आमचा विरोध इतकाच कीं, अणुबाँबसारख्या प्रलयंकर अस्त्रांची पार्श्वभूमि कादंबरीकाराचे मनांतहि नाहीं. यावर कोणी असें म्हणेल, 'तुम्ही ज्या या भयप्रद घटनांना महत्त्वाच्या मानतां, त्यांच्याशीं त्या तरुणीच्या मर्यादित जगाचा कांहीं संबंध नसला म्हणून

काय बिघडलें ? अणुबॉंबसारख्या जळत्या प्रश्नांनीं होरपळून न निघतां लाखों सिल्व्हिया आपलें जीवन जगतात कीं नाहीं ? आणि त्यांच्यावर सुंदर सुंदर कादंबऱ्या लिहिणें शक्य आहे कीं नाहीं ?'

आपण अशी कल्पना करूं या कीं, या जगापासून अलग असणाऱ्या एका बेटावर एक माणूस राहात आहे; आणि त्याला बाकीच्या जगाचें काडीमात्र ज्ञान नाहीं. त्याच्या जवळच्या परिस्थितीप्रमाणें त्याचा स्वभाव घडलेला आहे. तरी त्याचें जगाविषयींचें अज्ञान हेंच त्याच्या स्वभावाचें अत्यंत आकर्षक अंग होऊन बसेल. आपण त्याला कलेच्या प्रकाशांत पाहूं शकूं. त्याला स्वतःविषयीं जितकी माहिती असेल, त्यापेक्षां त्याची अधिक माहिती आपल्याला असेल. त्याच्या पार्श्वभूमीवर आपण शहरें, पर्वत, नद्या, रेखाटतों. पण तें सारें त्याला अज्ञात असतें. शहरें–नद्या–पर्वत यांच्या सापेक्षतेनें आपण त्याच्याकडे पहातों आणि त्याला कादंबरींतील जीवन देतों. याचा अर्थ असा कीं, त्याचें कादंबरींतील स्वभावचित्रण हें केवळ त्या बेटावरील परिस्थितीनें मर्यादित झालेलें नसतें; तर त्याच्याशीं संबंध नसलेल्या परिस्थितीमुळेंहि त्याला उठाव मिळतो. ही दूरची परिस्थिति मी जरी माझ्या मनांतून पुसून टाकली, तरी तो जिवंत राहील, पण कादंबरीच्या दृष्टीनें तो मृतच ठरेल. आणि लष्करी तुरुंग, कारखान्यांचीं धुराडीं व अणुबॉंब हे काय नद्यां-पर्वतांपेक्षां कमी सत्य आहेत ? याचा अर्थ कादंबरीकारानें नुसतें व्यक्तिचित्र रेखाटून न थांबतां त्या व्यक्तीच्या भोंवतीचें वातावरणहि दिग्दर्शित केलें पाहिजे.

याच मार्गानें गेलें तर, कादंबरीकार आडमार्गाला न लागतां व कोठेंहि कुंठित न होतां, राजमार्गानें शेवटच्या मुक्कामास जाऊन पोंचेल. कादंबरीकाराचा मोठेपणा हा त्याच्या कल्पनाशक्तीच्या लांबी–रुंदीच्या प्रमाणांत असतो. त्याचा कथा–विषय 'उद्यानांतील तरुणी' हा असला तरी त्याच्या गवाक्षांतून सकल सृष्टीचें दर्शन घडलें पाहिजे. त्याचें ध्यान एका लहानशा बांसरीच्या स्वरावर खिळलेलें असलें, तरी त्याच्या कानांत जगांतील सुसंवादी व विसंवादी असे नाना सूर भरून राहिले पाहिजेत. एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें, 'जगांत जर कोठें आशा असेल तर तिकडे तो कान देईल; आणि दुःख असेल तर त्याबद्दल तो सहानुभूति दाखवील.'

३

कादंबरीकार हा आजच्या आपल्याच काळांत वावरतो म्हणून त्याला मुख्यतः दुःखच पहावें लागतें. दुसऱ्या काळांत, कादंबरीकारानें राजकारणाकडे लक्ष देणें

हें मोहाचें ठरलें असतें. पण सध्यांच्या काळांत राजकारणाकडे लक्ष न देणें हाच मोह ठरतो.

कादंबरीकाराचीं मतें कांहींहि असोत, पण राजकारण, तत्त्वज्ञान, विज्ञान यांविषयीं त्याच्या ज्या कल्पना असतील, त्या जर कादंबरींतील पात्रांनीं आपल्या स्वभावांत मुरविल्या, तर त्यांना त्या कादंबरींत स्थान खचित आहे. बखरी किंवा बातमी-पत्रें यांसारख्या कादंबऱ्या सोडल्या, तर खऱ्या कादंबऱ्यांमध्यें पात्रांच्या मस्तकांत व हृदयांतच मुख्य घटना घडत असते. वस्तुस्थिति व कल्पना या आपल्या प्रतिभेनें पचवून मगच कादंबरीकार त्यांना आपल्या कादंबरींत संक्रांत करतो.

कादंबरीच्या या प्रक्रियेकडे पाहिलें म्हणजे मला ऑस्ट्रेलियांतील पांढऱ्या मुंग्यांची आठवण होते. त्यांना जें अन्न मिळतें, तें पचविण्याची ताकद त्यांच्या अवयवांत नसते. त्यामुळें त्या सर्वांवर उपासमारीनें मरण्याची पाळी आली असती. परंतु त्यांच्यामध्येंच कांहीं मुंग्या विशेष वाकबगार असतात. त्या धान्य गोळा करतात, निवडतात, खातात व पचवितात, एवढेंच नव्हे तर, आपल्या पोटांतील अन्नावर इतरांना जगवितात. त्या मुंग्यांच्या कांहीं जातींतील वाकबगार प्राणी घराबाहेर कधींच पडत नाहींत. पण त्या आपल्या पोटांना धान्याचें कोठार बनवितात व भुकेलेल्या मुंग्यांना जगवितात. अशा भूमिकेंतील लेखकानें बाहेरून येईल तें तें स्वीकारण्याचें नाकारलें पाहिजे.

खिडकी बंद करून टाकणें म्हणजे जगाचा वेडेपणा असाध्य आहे असें मानणें व आपली जबाबदारी टाळणें होय. खिडकीचें दार किलकिलें ठेवणें आणि दुःखद घटना आपल्या दृष्टीपासून दडविणें म्हणजे एक प्रकारें त्यांचा राजीखुषीनें स्वीकार करणेंच होय. तसा स्वीकार करणें म्हणजे त्या परिस्थितीला संमति देणें होय—तिच्यांत सहभागी होण्यासारखेंच तें ठरतें. या अर्थानें सर्व कला म्हणजे, प्रकट वा प्रच्छन्न रीतीनें, प्रचारच होय. मात्र जाणून-बुजून जो प्रचाराच्या मार्गें लागला, तो कलेच्या सिंहासनावरून पदच्युत झाला असेंच म्हटलें पाहिजे आणि सर्व प्रश्न लीलेनें सोडविणाऱ्या यक्ष-भूमींत त्यानें प्रवेश केला असें म्हटलें पाहिजे.

कलाकार म्हणजे कांहीं पुढारी नाहीं. त्याचें कार्य प्रश्न मांडणें, सोडविणें नव्हे. अभिव्यक्ति करणें हें कलेचें कार्य, प्रचार हें नव्हे. यीट्स् या कवीनें असें म्हटलें आहे कीं, "बाहेरच्या लोकांशीं आमचीं जीं भांडणें होतात, त्यांतून आम्ही पोवाडे रचतों. पण आमचीं आपापसांत जीं भांडणें होतात त्यांतून आम्ही काव्य

रचतों." समाजाला शिकविणें, दीक्षा देणें व त्याच्या जखमा भरून काढणें हें काम कलावंताचें नव्हे—इतरांचें आहे. पण त्या इतरांना असाध्य असणाऱ्या विशेष साधनांनीं कलावंतानें सत्याचें यथार्थ दर्शन घडविलें पाहिजे व समाजाचें दुःख निवारण करण्यासाठीं भावनात्मक प्रेरणा निर्माण केली पाहिजे.

या दृष्टीनें, लेखकावर एक निश्चित सामाजिक जबाबदारी येऊन पडते. जेव्हां तो लेखक एखादी कादंबरी लिहावयास घेतो, तेव्हां जहाजाच्या कप्तानासारखी त्याची स्थिति असते. त्या कप्तानाच्या खिशांत पुढील प्रवासाचा नकाशा सीलबंद करून ठेवलेला असतो. भर समुद्रांत जहाज आलें, म्हणजे तो कप्तान खिशांतील प्रवासाचा हुकूम काढून पहातो. पण तो अदृश्य शाईंत लिहिलेला आहे असें त्याला आढळतें. त्याला तो हुकूम वाचतां येत नाहीं, तरी त्याला आपल्या कर्तव्याची जाणीव असते. कारण तो एका युद्ध-नौकेचा कर्णधार असतो—क्रीडा-नौकेचा नव्हे. त्याचें अंतःकरण जबाबदारीच्या जाणिवेनें भरून आलेलें असतें. लेखकाच्या कार्याची महनीयता अशीच आहे—आणि तीच त्याची भावी आपत्तीहि पण होऊन बसलेली आहे.

वाचकाला नेहमीं पडणारें कोडें

"माझें वय २२ वर्षांचें. सैन्यांत भरती होण्यापूर्वी मी रेडिओ-तंत्रज्ञ होतों. आतां येथें मला कधींमधीं वाचनासाठीं कांहीं पुस्तकें खरेदी करावयाची इच्छा होते. त्यासाठीं कोणत्या नियतकालिकांतील अभिप्राय मला मार्गदर्शक होतील? मी दरमहा एक पुस्तक विकत घेऊं शकतों व त्यासाठीं आठ शिलिंग बाजूस काढून ठेवतों. आमच्या छावणींत पुस्तकांचा भोक्ता दुसरा कोणी नाहीं. निरनिराळ्या नियतकालिकांतील अभिप्राय मला नीटसे कळत नाहींत. ते माझ्या डोक्यावरून जातात. म्हणून आपल्याला ही तसदी देत आहें."

अशा आशयाचें एक पत्र मला आलें आहे. तें वाचून मला धक्काच बसला. गेलीं तीन वर्षें मी सैनिकांना व्याख्यानें देत हिंडत आहें. त्या वेळीं अशा पत्रलेखकासारखीं शेंकडों माणसें मला भेटलीं आहेत. या पत्र-लेखकाला माझें उत्तर असें आहे—

प्रिय मित्र,

मी तुमचें पत्र जसजसें वाचूं लागलों, तसतशी तुमची शारीरिक आकृति मजपुढें उभी राहूं लागली. मीं तुम्हांला प्रत्यक्ष कधींहि पाहिलें नाहीं. तरी शनिवारीं दुपारीं, सुट्टीच्या वेळीं, एखाद्या ग्रंथालयांत किंवा पुस्तकाच्या दुकानांत, एखादें जुनें पुस्तक तुम्ही धुंडाळीत आहां, असें दृश्य माझ्या डोळ्यापुढें दिसूं लागलें. राष्ट्रसंघावरील एखादें पुस्तक तेथें सांपडतें का, हें तुमचे डोळे न्याहाळूं लागले. मात्र मजूर पक्षाचें नांव, आंबलेल्या बासुंदीप्रमाणें, तुम्हांला नकोसें वाटूं लागलें. तुम्ही रोजनिशी ठेवलेली असेल आणि तिच्यांत आपल्या अनुभवांची नोंद मधूनमधून तुम्ही करीत असाल. कदाचित् आपल्या लष्करी जीवनावर एखादी लघुकथा लिहिण्याचेंहि तुमच्या मनांत असेल. 'कर्झन तटबंदी' आणि 'जर्मनांचें पुनःशिक्षण' या विषयावर आधीं काळजीपूर्वक तयार केलेले प्रश्न तुम्ही एकाद्या सभेमध्यें विचारीत असाल. 'समाजवादी ग्रंथ-मंडळाचे' तुम्ही सभासद कांहीं वर्षांपूर्वी होतां ना? त्यांतील बहुतेक पुस्तकें स्टॅलिन-हिटलर-करारानीं असल्यामुळें आणि बाकीचीं शिळीं झाल्यामुळें तुम्ही तें मंडळ सोडलें असेल. नृत्य-समारंभांत तुम्ही एखाद्या गंभीर मुलीची निवड

लंडनच्या "ट्रिब्यूनच्या" १९४४ चे एप्रिलचे अंकांत हा लेख प्रथम प्रसिद्ध झाला.

करीत असाल. पण ती बहुतेक अशक्त व अस्थिपंजर असेल. श्रीमंत लोकांचा तुम्ही मत्सर करीत नाहीं, पण दारिद्र्याचा तुम्हाला तीव्र तिटकारा आहे. तुमच्या दृष्टीनें 'वर्ग–युद्ध' हा एक पोकळ शब्द आहे. पण "छावणी" हा अद्‌भुत शब्द आहे. तुमच्या सर्व विचारांचें व भावनांचें सार म्हणजे विफलतेची प्रचंड रास.

प्रथम तुमच्या प्रश्नाचें उत्तर देतों. त्याचें छोटें उत्तर असें कीं, कादंबरी-साठीं, 'हेरल्ड' मधील व गंभीर विषयासाठीं 'ऑब्झर्व्हर' मधील अभिप्राय वाचा. विस्तृत अभिप्रायासाठीं 'लिसनर' घ्या. या वृत्तपत्रांतील लेखकांचीं मतें कधींच चुकत नाहींत असें नाहीं, पण सामान्यतः तीं स्वतंत्र व विचारपूर्ण असतात आणि मुद्दा सोडून भरकटलेलीं नसतात.

आतां तुमच्या प्रश्नाचें विस्तृत उत्तर देतों. प्रथम मला हें सांगितलें पाहिजे कीं, इतर देशांच्या मानानें या देशांतील टीकाकारांचा दर्जा अगदींच कांहीं वाईट नाहीं. रशियामध्यें वाङ्मयावर जें मत–प्रदर्शन होतें, तें प्रायः तेथील सरकारी प्रवक्त्यांकडून. तेथील वाङ्मयीन वादांनाहि प्रतिक्रांतीचा वास येतो कीं काय हें सरकार डोळ्यांत तेल घालून पहातें. रशियांत गाईडचा दौरा चालू असतांना त्याच्या पुस्तकावर वाईट अभिप्राय दिला असता, तर तो लेखक राज्यद्रोही ठरला असता. उलट, गाईड हा रशियाचा विरोधक बनल्यावर त्याच्यासंबंधीं चांगलें मत छापलें, तर त्या लेखकाला व संपादकाला आत्महत्त्याच करावी लागेल. मॉस्को येथील एका थोर लेखकानें मला एकदां सांगितलें, 'आम्हांला जे लेखक उपयोगीं पडतील असें वाटतें, त्यांचा लौकिक आम्ही वाढवितों; आणि जे लेखक आम्हाला उपद्रवकारक वाटतात, त्यांचा आम्ही निकाल लावतों. कलात्मक परीक्षण हें मध्यमवर्गीय पूर्वग्रहांचें प्रदर्शन होय.'

जर्मनीबद्दल तर बोलावयासच नको. तेथें रशियापेक्षांहि वाईट स्थिति आहे. साहित्यावरील टीका हीसुद्धां वंश व पक्ष यांच्या दृष्टिकोनांतून केली जाते. त्यामुळें कैक भल्याभल्या लेखकांच्या पुस्तकांना तेथें बंदी आहे. हेन हा यहुदी म्हणून, टॉमस मॅन उदारमतवादी म्हणून आणि सायलोन हा समाजवादी म्हणून सगळे एकाच मापानें मोजले जावयाचे.

फ्रान्समधील वृत्तपत्रांनीं ग्रंथ-परीक्षणाला कधींच फारसें महत्त्व दिलें नाहीं. इंग्लंडमधील पत्रांनीं मात्र साहित्याला बरीच जागा दिलेली असते. आणि त्याकडे संपादकांचें लक्षहि बरेंच असतें. पूर्वी साहित्याच्या राजकारणांतहि कारस्थानें व लांचलुचपत जारी असे. वार्षिक बक्षिसें हीं गटबाजीच्या लढतींमधून वांटलीं

जात असत. तेथें पुस्तकाचा खप होण्याचें मुख्य साधन म्हणजे प्रकाशकांचे धडाडीचे प्रयत्न. या प्रयत्नांत कधीं कधीं अभिप्राय-लेखकाला तोबरा देण्याच्या खटाटोपांचाहि समावेश होई.

माझें पहिलें पुस्तक फ्रान्समध्यें प्रसिद्ध झालें, तो प्रसंग मला आठवतो. माझ्या प्रकाशकानें मला एक सबंध दिवस आपल्या कचेरींत बसवून घेतलें. आणि संपादक, टीकाकार, प्रतिष्ठित लोक—अशांना भेट म्हणून गौरवपूर्वक पाठविण्याच्या सुमारें तीनशें प्रतींवर मला सह्या करावयास लावलें. यांत समाजाच्या वेगवेगळ्या थरांमधील महत्त्वाचे लोक होते. सुदैवानें हा प्रकार या देशांत नाहीं. मात्र कांहीं प्रकाशक ग्रंथपरीक्षकांना मेजवान्या देतात. तसेंच टीकेचें वादळ शमविण्यासाठीं, जाहिरातीच्या तेलाचा तवंग वृत्तपत्राच्या समुद्रावर पसरला जातो. कैक लेखक टीकाकारांशीं मैत्री जोडतात व गट बांधतात. पण हें सर्व माफक मर्यादा सोडून होत नाहीं. एकंदरींत, युद्धपूर्व युरोपमधील कोणत्याहि देशापेक्षां, इंग्लंडमधील टीका अधिक सभ्य व प्रामाणिक असते.

परंतु ही एक बाजू झाली. कादंबरीच्या परीक्षणांतून सहल करून आल्यानंतर, मला तुमची तक्रार योग्य वाटते. कोणत्या पुस्तकाची निवड करावी हें ठरविण्याच्या कामीं हे अभिप्राय मदत करण्याऐवजीं गोंधळ उत्पन्न करतात. याचें मुख्य कारण, माझ्या मतें, हें आहे कीं, बरेचसे धंदेवाईक अभिप्राय-लेखक, कांहीं कालानंतर, आपलीं परीक्षण-मूल्यें विसरून जातात. अर्थात्, साहित्याचें मोजमाप करण्याची पक्की फूटपट्टी कोठेंच नसते. भावनेची उष्णता मोजणारें उष्णतामापक यंत्र अजून निघावयाचें आहे. पण टीकाकारानें पुस्तकाच्या महत्त्वाच्या मानानें अभिप्राय लिहिण्याचें प्रमाण साधावें अशी अपेक्षा असते.

'संडे टाईम्सच्या' ता. ९ एप्रिल १९४४ च्या अंकांत तीन कादंबऱ्यांवर अभिप्राय आलेले आहेत. पण त्या सर्वांचा शेवट एका सुरांत केलेला आहे.

"या पुस्तकांत एकहि ओळ कंटाळवाणी नाहीं."

"हें पुस्तक फारच चांगलें आहे."

"फारच सुंदर, अत्यंत आशादायक."

दुसऱ्या एका आठवड्यांत पांच अभिप्रायांचीं भरतवाक्यें पुढीलप्रमाणें होतीं—

"या लेखिकेचा परिचय होणें किती आनंदाचें!"

"या कादंबरींत फारच सुंदर चित्रण आहे."

"चित्तवेधक कथा सहानुभूतीनें सांगितली आहे."

"भाषा अगदीं सोपी आणि आनंददायक."

"यांतील संवाद किती सुगम व नैसर्गिक आहेत !"

अशा एक-छापी, एक-रंगी अभिप्रायांतून तुम्ही आटवड्याला दोन शिलिंग खर्च करून कोणतें पुस्तक घेऊं शकणार ? या टीकाकारांनीं अभिप्रायाचे कांहीं सांचेच बनविले आहेत. एक प्रास्ताविक वाक्य, ३।४ ओळींत कथानकाचें स्वरूप, सौम्य टीकेचा एखादा शब्द आणि वरच्याप्रमाणें मधुर शेवट—शेवटीं तीन फुल्या मारल्या कीं अभिप्राय संपला ! कीं लगेच दुसऱ्या अभिप्रायाला सुरुवात. उद्यां एखाद्या नवख्या लेखकाची कादंबरी आली आणि Crime and Punishment ही जगप्रसिद्ध कादंबरीहि अभिप्रायास आली, तरी त्या दोन्ही एकाच मापानें मोजल्या जाणार. या ताजव्यामध्यें एक कण व एक मण—या दोहोंचें वजन सारखेंच भरतें. बहुतेक सर्व दैनिकांच्या व साप्ताहिकांच्या पुस्तक-परीक्षणांत हा औचित्याचा व प्रमाणबद्धतेचा अभाव दिसून येतो.

कांहीं उच्च दर्जाच्या साप्ताहिकांतील ग्रंथ-परीक्षणें कळण्यांस कठीण असतात. त्यांत अभिजात ग्रंथकारांचे जे संदर्भ उल्लेखिलेले असतात, ते तुम्हां वाचकांना न कळण्यासारखे असतात, कारण ते ग्रंथकार तुम्ही वाचलेले नसतात. त्यामुळें तुमची अवस्था, अभ्यास न करतां शाळेंत गेलेल्या मुलासारखी, किंवा निमंत्रण नसतांना मेजवानीस गेलेल्या पाहुण्यासारखी होते.

प्रगतिशील बुद्धिजीवि वर्ग व सुशिक्षित कामगार-वर्ग यांच्यामध्यें जी भिंत उभी राहाते ती यामुळेंच. १९२०–३० च्या काळांत साम्यवादी लेखकानें 'जनतेसाठीं' म्हणून लेखन केलें, पण तें फोल ठरलें. त्यांनीं उच्चवर्गीयांची कुचेष्टा केली; पण ती त्यांची स्वतःचीच कुचेष्टा ठरली. दोन वर्गांतील ही भिंत आपण जमीनदोस्तच केली पाहिजे—तिच्यावरून उडी मारून जाण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पण तें राजकीय कार्य होय—वाङ्मयीन नव्हे. मला वाटतें समाजवादाचें तेंच प्रमुख व अंतिम कार्य होय.

उच्चवर्ग व नीच वर्ग यासंबंधींची ही सारी बडबड म्हणजे सत्यस्थिति झांकण्यासाठीं सोडलेला धुराचा लोट होय. खरी स्थिति अशी असते कीं, या टीकाकारांच्या पालकांना त्यांच्या वाचनासाठीं, शिक्षणासाठीं, चिंतनासाठीं, सुमारें १६ वर्षें पैसा खर्च करणें शक्य झालेलें असतें. पण तुम्ही फक्त ९ वर्षें शाळेंत जाऊं शकतां—आणि ती शाळाहि निराळी असते. चिंतनासाठीं पुरेसें स्वास्थ्यहि तुम्हांला मिळत नाहीं. तुम्ही व तो, किंवा तुम्ही व मी—यांच्यामध्यें जी भिंत उभी आहे, ती ही ! एकाद्या सभेंत जेव्हां आपण एकत्र येतों, खांद्याला खांदा लावून बसतों-उठतों, तेव्हां ही भिंत नाहींशी झाल्यासारखें वाटतें. पण जेव्हां

जात असत. तेथें पुस्तकाचा खप होण्याचें मुख्य साधन म्हणजे प्रकाशकांचे धडाडीचे प्रयत्न. या प्रयत्नांत कधीं कधीं अभिप्राय-लेखकाला तोबरा देण्याच्या खटाटोपांचाहि समावेश होई.

माझें पहिलें पुस्तक फ्रान्समध्यें प्रसिद्ध झालें, तो प्रसंग मला आठवतो. माझ्या प्रकाशकानें मला एक सबंध दिवस आपल्या कचेरींत बसवून घेतलें. आणि संपादक, टीकाकार, प्रतिष्ठित लोक—अशांना भेट म्हणून गौरवपूर्वक पाठविण्याच्या सुमारें तीनशें प्रतींवर मला सह्या करावयास लावलें. यांत समाजाच्या वेगवेगळ्या थरांमधील महत्त्वाचे लोक होते. सुदैवानें हा प्रकार या देशांत नाहीं. मात्र कांहीं प्रकाशक ग्रंथपरीक्षकांना मेजवान्या देतात. तसेंच टीकेचें वादळ शमविण्यासाठीं, जाहिरातीच्या तेलाचा तवंग वृत्तपत्राच्या समुद्रावर पसरला जातो. कैक लेखक टीकाकारांशीं मैत्री जोडतात व गट बांधतात. पण हें सर्व माफक मर्यादा सोडून होत नाहीं. एकंदरींत, युद्धपूर्व युरोपमधील कोणत्याहि देशापेक्षां, इंग्लंडमधील टीका अधिक सभ्य व प्रामाणिक असते.

परंतु ही एक बाजू झाली. कादंबरीच्या परीक्षणांतून सहल करून आल्यानंतर, मला तुमची तक्रार योग्य वाटते. कोणत्या पुस्तकाची निवड करावी हें ठरविण्याच्या कामीं हे अभिप्राय मदत करण्याऐवजीं गोंधळ उत्पन्न करतात. याचें मुख्य कारण, माझ्या मतें, हें आहे कीं, बरेचसे धंदेवाईक अभिप्राय-लेखक, कांहीं कालानंतर, आपलीं परीक्षण-मूल्यें विसरून जातात. अर्थात्, साहित्याचें मोजमाप करण्याची पक्की फूटपट्टी कोठेंच नसते. भावनेची उष्णता मोजणारें उष्णतामापक यंत्र अजून निघावयाचें आहे. पण टीकाकारानें पुस्तकाच्या महत्त्वाच्या मानानें अभिप्राय लिहिण्याचें प्रमाण साधावें अशी अपेक्षा असते.

'संडे टाईम्सच्या' ता. ९ एप्रिल १९४४ च्या अंकांत तीन कादंबऱ्यांवर अभिप्राय आलेले आहेत. पण त्या सर्वांचा शेवट एका सुरांत केलेला आहे.

"या पुस्तकांत एकहि ओळ कंटाळवाणी नाहीं."

"हें पुस्तक फारच चांगलें आहे."

"फारच सुंदर, अत्यंत आशादायक."

दुसऱ्या एका आठवड्यांत पांच अभिप्रायांचीं भरतवाक्यें पुढीलप्रमाणें होतीं—

"या लेखिकेचा परिचय होणें किती आनंदाचें!"

"या कादंबरींत फारच सुंदर चित्रण आहे."

"चित्तवेधक कथा सहानुभूतीनें सांगितली आहे."

"भाषा अगदीं सोपी आणि आनंददायक."

"यांतील संवाद किती सुगम व नैसर्गिक आहेत!"

अशा एक-छापी, एक-रंगी अभिप्रायांतून तुम्ही आठवड्याला दोन शिलिंग खर्च करून कोणतें पुस्तक घेऊं शकणार? या टीकाकारांनीं अभिप्रायाचे कांहीं सांचेच बनविले आहेत. एक प्रास्ताविक वाक्य, ३।४ ओळींत कथानकाचें स्वरूप, सौम्य टीकेचा एखादा शब्द आणि वरच्याप्रमाणें मधुर शेवट—शेवटीं तीन फुल्या मारल्या कीं अभिप्राय संपला! कीं लगेच दुसऱ्या अभिप्रायाला सुरुवात. उद्यां एखाद्या नवख्या लेखकाची कादंबरी आली आणि Crime and Punishment ही जगप्रसिद्ध कादंबरीहि अभिप्रायास आली, तरी त्या दोन्ही एकाच मापानें मोजल्या जाणार. या ताजव्यामध्यें एक कण व एक मण—या दोहोंचें वजन सारखेंच भरतें. बहुतेक सर्व दैनिकांच्या व साप्ताहिकांच्या पुस्तक-परीक्षणांत हा औचित्याचा व प्रमाणबद्धतेचा अभाव दिसून येतो.

कांहीं उच्च दर्जाच्या साप्ताहिकांतील ग्रंथ-परीक्षणें कळण्यांस कठीण असतात. त्यांत अभिजात ग्रंथकारांचे जे संदर्भ उल्लेखिलेले असतात, ते तुम्हां वाचकांना न कळण्यासारखे असतात, कारण ते ग्रंथकार तुम्ही वाचलेले नसतात. त्यामुळें तुमची अवस्था, अभ्यास न करतां शाळेंत गेलेल्या मुलासारखी, किंवा निमंत्रण नसतांना मेजवानीस गेलेल्या पाहुण्यासारखी होते.

प्रगतिशील बुद्धिजीवि वर्ग व सुशिक्षित कामगार-वर्ग यांच्यामध्यें जी भिंत उभी राहाते ती यामुळेंच. १९२०–३० च्या काळांत साम्यवादी लेखकानें 'जनतेसाठीं' म्हणून लेखन केलें, पण तें फोल ठरलें. त्यांनीं उच्चवर्गीयांची कुचेष्टा केली; पण ती त्यांची स्वतःचीच कुचेष्टा ठरली. दोन वर्गांतील ही भिंत आपण जमीनदोस्तच केली पाहिजे—तिच्यावरून उडी मारून जाण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पण तें राजकीय कार्य होय—वाङ्मयीन नव्हे. मला वाटतें समाजवादाचें तेंच प्रमुख व अंतिम कार्य होय.

उच्चवर्ग व नीच वर्ग यासंबंधींची ही सारी बडबड म्हणजे सत्यस्थिति झांकण्यासाठीं सोडलेला धुराचा लोट होय. खरी स्थिति अशी असते कीं, या टीकाकारांच्या पालकांना त्यांच्या वाचनासाठीं, शिक्षणासाठीं, चिंतनासाठीं, सुमारें १६ वर्षें पैसा खर्च करणें शक्य झालेलें असतें. पण तुम्ही फक्त ९ वर्षें शाळेंत जाऊं शकतां—आणि ती शाळाहि निराळी असते. चिंतनासाठीं पुरेसें स्वास्थ्यहि तुम्हांला मिळत नाहीं. तुम्ही व तो, किंवा तुम्ही व मी—यांच्यामध्यें जी भिंत उभी आहे, ती ही! एकाद्या सभेंत जेव्हां आपण एकत्र येतों, खांद्याला खांदा लावून बसतों-उठतों, तेव्हां ही भिंत नाहींशी झाल्यासारखें वाटतें. पण जेव्हां

आपण आपापल्या नेहमींच्या उद्योगास लागतों, तेव्हां ती भिंत पुनः उभी राहाते. हा दोष ना तुमचा, ना माझा. तुमच्या बाबतींत मी स्वतःला अपराधी मानलें —किंवा माझ्या बाबतींत तुम्ही स्वतःला अपराधी मानलें—तरी त्यानें कांहींएक फरक होणार नाहीं.

मी तुमची वैफल्याची भावना जाणूं शकतों. तिच्या मुळाशीं असणाऱ्या समाज-रचनेचा मी तिटकारा करतों. पण म्हणून तुमच्या उच्चवर्गावरील मोहिमेंत मी भाग घेईन असें मात्र नव्हे. तो फॅसिस्टांचा मार्ग झाला. आमचा मार्ग ती भिंत नाहींशी करणें हाच. ती भिंत आहे तोंपर्यंत लोकशाही पोकळच ठरणार.

शेवटीं, तुमच्या मुख्य प्रश्नाकडे मी वळतों. वाचनाचा आनंद लुटण्यासाठीं, पांडित्यप्रचुर अभिप्राय वाचण्याचा त्रास घेतला पाहिजे असें तुम्हाला कोणीं सांगितलें ? मला तर हा साफ चुकीचा मार्ग वाटतो. नेहमींची म्हण बदलून मी असें म्हणेन कीं, 'द्राक्षें आंबट आहेत म्हणूनच तुम्ही तीं खाण्याची स्वतःवर सक्ती करीत आहां.' माझा तुम्हाला सल्ला असा कीं, वाचन ही एक मौजेची गोष्ट माना. दांतओंठ खाऊन साधावयाची ती शिकार नव्हे.

मी माझा एक अनुभव सांगूं का? मी फ्रान्समध्यें दीर्घकाळ राहिलों आहें आणि मला मद्यपानाचा फार शोक आहे. माझे कांहीं फ्रेंच लेखक-मित्र मद्याचा नुसता वास व चव घेऊन तें मद्य कोणत्या प्रदेशांत, कोणत्या वर्षीं तयार झालें असेल हें सांगूं शकत. मेजवानीच्या वेळीं त्यांच्या याच गप्पा-सप्पा चालत. त्यांचें बोलणें मला कळत नसे—त्यांत मी भाग घेऊं शकत नसें. त्यामुळें मी वेगळा पडलों—लज्जित होऊन चडफडत बसलों. मी त्यांच्याबरोबर, दांतओंठ खात, मद्यप्राशन करण्याचा निकराचा प्रयत्न केला, पण काय उपयोग? जेथें दारू फारशी कोणी पीतच नाहीं, अशा प्रदेशांत माझ्या आयुष्याचीं पहिलीं वीस वर्षें गेलेलीं—द्राक्षांच्या मळ्यांत नव्हे. एके दिवशीं रात्रीं, मेजवानीच्या वेळीं, सारीं खाद्यपेयें मी चुकीच्या पद्धतीनें खाल्लीं. त्यामुळें माझें शरीर ताठरलें. तेव्हांपासून मीं मौजेकरितांच मद्यपान करण्याचें ठरविलें. त्यासाठीं चांगली दारू कोणती व वाईट दारू कोणती, जुनी कोणती व ताजी कोणती, एवढें ज्ञान मला आहे आणि तेवढें ज्ञान या दिव्य पेयाच्या बाबतींत पुरें झालें.

माझ्या म्हणण्याचा भलता अर्थ घेऊं नका. माझ्यापेक्षां अधिक चोखंदळ माणसाला माझ्यापेक्षां मद्यपानाचा आनंद अधिक अनुभवितां येईल हें मी कबूल करतों. हाच नियम साहित्य-संगीत-कलांनाहि लागू आहे. आमचें ध्येय असें

आहे कीं, प्रत्येक माणसाला आपल्या आवडीच्या क्षेत्रांत तो उच्च दर्जा प्राप्त करून घेण्याची संधि मिळावी—द्राक्षाच्या मळ्यांतच सर्वजण वाढावेत. पण तोंपर्यंत आपल्या प्राप्त परिस्थितीचा आपण जास्तींत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे.

म्हणून प्रिय मित्रा, मौजेसाठीं वाच—टीकाकार काय म्हणतात याची चिंता मुळींच करूं नकोस. कोणत्याहि सार्वजनिक वाचनालयांत किंवा पुस्तकाच्या दुकानांत जा, कोणतेंहि पुस्तक उघड. त्याचें एखादें पान वाच म्हणजे लगेच, तें पुस्तक आपण वाचण्यासारखें आहे कीं नाहीं, हें तुझें तुला कळून येईल. उगाच पुस्तकवाचनाची बळजोरी स्वतःवर करूं नकोस. तो प्रयत्न फोल ठरेल. रेडियो बंद करून टाकावा आणि वाचीत पडून राहावें, इतकें एकचित्त ज्या पुस्तकावर तूं करूं शकशील, तेंच पुस्तक तुला वाचण्याला योग्य आहे असें खुशाल समज.

कोणतीहि कादंबरी स्वतःला चित्ताकर्षक वाटली तरच वाचावी. साऱ्या थोर थोर कादंबऱ्या विशिष्ट वाचक-वर्गाला, आयुष्याच्या विशिष्ट कालांत, आकर्षक वाटत असतात. योग्य वेळीं योग्य पुस्तक तुमच्या हातीं पडलें, तर तुम्ही तें दूर ठेवूं शकणार नाहीं. पण भलत्या वेळीं तें आलें, तर तें फुकट जाईल. जें कादंबरी-विषयीं, तेंच निबंध, इतिहास, तत्त्वज्ञान यांविषयींहि. जर त्या पुस्तकांचा तुमच्या स्वतःच्या हिताशीं, प्रश्नांशीं, शंकांशीं, कांहीं संबंध नसेल, तर तें खुशाल दूर सारा. पण कधींहि, केव्हांहि, वाचावयाचेंच म्हणून, दांतओंठ खाऊन, कांहींहि वाचूं नका.

कारण साहित्य व कला यांचें ध्येय अखेरीस काय आहे? सर्व जग भावनेनें भारून टाकणें आणि त्याच्या कृतीमध्यें अर्थ निर्माण करणें, आपलें स्वतःचें व आपल्या परिस्थितीचें ज्ञान विस्तृत व सखोल करणें हेंच तें ध्येय नव्हे काय? तें साध्य करणें तुमच्या आटोक्यांतील खास आहे.

आणि मी कांहीं निवृत्ति-मार्गाचा उपदेश करीत नाहीं. वैफल्याची व चिडीची भावना मनांत निर्माण होणें हा तुमचा हक्क आहे—पण राजकीय क्षेत्रांत, चीड हा गरिबांचा आधार आहे. चीड नसती तर गरीब लोक अजून गुलामींतच राहिले असते. पण आपल्या चिडीचा परिणाम काय होतो हें नीट पहा. त्या चिडीचा दुरुपयोग करण्यास दुसरे लोक टपून बसले आहेतच. त्या कामीं नाझींना यश आलें—आणि तसेंच इतर पुष्कळ लोकांनाहि. त्यांच्या जाळ्यांत सांपडूं नका. तुमचा खरा शत्रु धनिकवर्ग हा आहे—बुद्धिजीवि उच्च-वर्ग नव्हे.

एक विक्षिप्त वल्ली

'लोकांनीं विश्वास ठेवावा असें तत्त्व महान असत्यांत अंतर्भूत असतें,' असें एका विक्षिप्त व्यक्तीनें लिहून ठेवलें आहे. असत्याची ही महानता दोन प्रकारची—प्रमाणाची व प्रभावाची. असत्याला मोठेपणाचें वैभव प्राप्त झालें कीं, लोक त्याची आपोआप पूजा—अर्चा करूं लागतात. यांतूनच विक्षिप्त लोकांचें गूढ—गुंजन सुरू होतें; आणि त्यामुळें त्यांना भलताच अधिकार प्राप्त होतो.

या विक्षिप्त व्यक्तीनें आपल्या तारुण्यांत भाग्याचे पुष्कळ दरवाजे ठोठावलेले असतात, पण ते उघडले गेले नाहींत. चित्रकार होण्याचा त्यानें प्रयत्न केला, पण त्याचीं सूर्यास्तार्चीं चित्रें कोणी विकत घेईना. एका इमारतीच्या बांधकामांत तो काम करूं लागला, पण इतर कामगार त्याच्याशीं बंधुभावानें वागेनात. कारण ते पीत दारू; व हा पीत असे दूध—आणि ते भलतींसलतीं भाषणेंहि करीत. नंतर हा लष्करांत शिरला. पण तेथेंहि त्याचा दर्जा पहिल्या श्रेणीच्या वर गेला नाहीं. नंतर तो 'मुक्ति-सेनेंत' दाखल झाला—पुलाखालीं राहूं लागला—समाजांतील बेवारशी, भटक्या लोकांबरोबर हिंडूं लागला. अशींच कैक वर्षें गेलीं. त्यामुळें त्याला समाजाचा भयंकर उबग येऊं लागला. अर्थात् समाजांतील घाणीलाच तो मूळ द्रव्य मानूं लागला. ही त्याची चूक झाली पण त्या चुकीचा त्याला फायदाच झाला.

त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, ज्या मानवांचा समाज बनतो, त्या मानवांचे संकलित विचार-विकार म्हणजे त्या समाजाचे विचार-विकार नव्हेत, तर मानवांच्या विचार-विकारांचा 'लघुतम साधारण विभाज्य' म्हणजे समाजाचें मन. निरनिराळे लोक एकत्र आल्यानें त्यांच्या बौद्धिक शक्तींची वाढ होण्याऐवजीं त्यांमध्यें गोंधळ मात्र उत्पन्न होतो. प्रकाशांत प्रकाश मिसळला म्हणजे अंधार निर्माण व्हावा, तसा हा प्रकार. भावनांचीं आंदोलनें मात्र विजेच्या प्रवाहाप्रमाणें दुसऱ्या प्रवाहानें वाढत जातात.

समाजाच्या खालच्या थरांत उतरल्यामुळें, त्या विक्षिप्त व्यक्तीला स्वतःच्या जीवनाचा शोध लागतो—सामाजिक जीवनाचा 'लघुतम साधारण विभाज्य' त्याला गवसतो. आपल्या दैवाचें कुरूप उघडण्याला त्याला ही जणूं अचूक किल्लीच सांपडते. या किल्लीची जादू प्रथम त्याच्यावरच होते. त्याचें निराश मन स्फूर्तीनें थरारतें. पूर्वी त्याचा चेहरा जो दुर्मुखलेला असे, तोच आतां जिवंत वाटूं

लागतो. त्याच्या डोळ्यांत दिवे लखलखूं लागतात. त्याच्या नाकाखालीं व कपाळावर असलेले काळे डाग पाहून पूर्वी लोक नाक मुरडीत; पण आतां ते डाग म्हणजे नरमेध करणाऱ्या रानटी लोकांनीं धार्मिक नृत्याच्या वेळीं कोरलेलीं भडक चिन्हें आहेत, असें लोकांना वाटूं लागतें. त्याचा आवाज पूर्वीहून अधिक कर्कश बनला; पण त्यांतून आतां जादूचे मंत्र निघत आहेत असें लोक मानूं लागले. मंत्राचे तेच तेच शब्द उच्चारले म्हणजे ढोलगें बडविल्यासारखा आवाज होतो. म्हणून तो विक्षिप्त माणूस स्वतःला 'ढोलगेवाला' म्हणवून घेत असे.

प्रथम तो लहानलहान सभांमध्यें बोलूं लागला. लोकांची बुद्धि भारून टाकणारीं आणि त्यांची भावना भडकविणारीं भाषणें तो करूं लागला. त्याचा परिणाम झाला. त्या वेळीं त्याच्या देशाचा पराभव झालेला होता. त्यामुळें लोकांचीं मनें निराश झालेलीं होतीं. त्यांच्या उत्साहाला दुसरीकडे वाट करून देणें अवश्य होतें. तें काम या वल्लीनें पार पाडलें. त्यानें एक ऐतिहासिक कार्य बजाविलें. त्याची किल्ली त्या परिस्थितीला लागू पडली.

इतिहास म्हणजे अशा किल्ल्याकुलुपांचा खेळ आहे. व्यक्तिनिष्ठ प्रयत्न हे किल्ल्यांसारखे होत, आणि वस्तुनिष्ठ समाजरचना ही कुलुपासारखी असते. इतिहासाची व्यापक रूपरेखा आधीं निश्चित झालेली असली, तरी त्यांत अनिश्चित असा कांहीं भाग असतो. कोणत्या कुलुपाला कोणती किल्ली लागेल हा एक नशिबाचा खेळ असतो. वेलिंग्टनसारखे किती तरी शूर सेनापति केवळ सेवानिवृत्त सुभेदार म्हणून मरण पावले असतील. याच्या उलटहि घडलें असेल. आमचा हा विक्षिप्त माणूस योग्य वेळीं ठार झाला असता, तर हें महायुद्ध दुरावलें असतें–कदाचित् कायमचें टळलें असतें.

पण आहे ही परिस्थिति अशी आहे. नशिबाची अज्ञात दरी झांकण्यासाठीं माणसांना उघड्या डोळ्यांनीं मरावें लागतें. समाजाचा 'लघुतम साधारण विभाज्य' हा इतका मोठा झाला पाहिजे कीं, तो अशा विक्षिप्त बुवाबाजीच्या आटोक्यापलीकडे गेलेला असावा. बुवाबाजी व लोकशाही यांच्यांतील मूलभूत फरक आहे तो हाच.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलांक
अनुक्रम 22.6.3.0 विः
क्रमांक 9903 नोंः दिः 3.11.2150

रिचर्ड हिलारी याच्या स्मरणार्थ

सैनिक मृत्यूला कां कवटाळतात ?

मृत मित्राबद्दल लिहिणें म्हणजे काळावर मात करूं पहाणेंच होय. दूर दूर जाणाऱ्या आणि शेवटीं अंधुक स्मृतींत लुप्त होणाऱ्या एका आकृतीचा पाठलाग करणें, तिला पकडणें व घट्ट धरून ठेवणें, यांसारखेंच हें लेखन ठरतें. कारण मृत माणसें मानी असतात, त्यांच्याशीं खेळीमेळीनें वागणें कठीण. आपल्याबरोबर असलेला एकादा सैनिक लष्करांतील कमिशन मिळवून मोठा अधिकारी झाला म्हणजे त्याच्याशीं वागणें जसें कठीण, तसेंच हें. त्याच्या विचित्र मौनांमुळें आपल्या चित्तवृत्ति चेपल्या जातात. शर्यत सुरू होण्यापूर्वीच तुम्ही ती हरतां. तसा मित्र पुनः मिळणें अशक्यच. त्याच्या स्मृतीभोंवतीं दंतकथेचें धुकें जमूं लागलें आहे, त्याच्या गंमतीच्या बारीकबारीक गोष्टी गोठून त्यांना आटवणीचा आकार येऊं लागला आहे, आणि त्याच्या चरित्रांतील सामान्य घटनाहि तुमच्या स्मरणगुहेंत पाषाणमूर्तीप्रमाणें उभ्या राहूं लागल्या आहेत.

युद्ध-कालांत तर ही प्रक्रिया त्वरित गतीनें होते—मृत माणसें सत्वर अंतर्धान पावतात, आणि त्यांच्या दंतकथा वेगानें प्रसार पावतात. हिलारीसंबंधीं अशी एक दंतकथा आतांच प्रचलित झाली आहे, आणि ती लवकरच वाढत-फुगत जाईल यांत शंका नाहीं. शेवटीं त्याचें नांव या महायुद्धाचें एक प्रतीक होऊन बसेल. याला आळा घालतां येणेंच शक्य नाहीं. स्फटिकाप्रमाणेंच दंतकथा वाढत असतात. भूमींतील परमाणु एकत्र येऊन स्फटिकाचा आकार जसा धारण करतात, त्याप्रमाणें समाजाच्या मनांतील विखुरलेल्या सुप्त भावना दंतकथांच्या रूपानें प्रकट होतात.

समाजाच्या या सुप्त भावनांशीं ज्याचें निकटचें नातें असेल तो वीर-पुरुष बनतो आणि त्याच्याभोंवतीं दंतकथांचें जाळें गुंफलें जातें. हिलारीचें जीवन व

लंडनमधील "होरायझन्च्या" १९४३ एप्रिलच्या अंकांत हा लेख प्रथम प्रसिद्ध झाला.

रिचर्ड हिलारी १९ वर्षें वयाचा असतांना, १९३९ सालीं, विमान-दळांत सैनिक म्हणून दाखल झाला. त्याचें विमान गोळी लागून खालीं पडलें आणि त्याचें शरीर भाजलें, तरीसुद्धां प्रत्यक्ष युद्धकार्यांत पुनः भाग घेण्याचा त्यानें हट्ट धरला. ता. ८ जानेवारी १९४३ रोजीं, रात्रीच्या वेळीं, त्याच्या विमानाला अपघात झाला, व त्यांत तो ठार झाला. त्या वेळीं तो २३ वर्षांचा होता.

मरण–हीं दोन्हीहि प्रतीकात्मक होतीं. पण कशाचें प्रतीक? त्याला तें माहीत नव्हतें. तें माहीत व्हावें अशी त्याला इच्छा मात्र फार होती. "युद्धांत आपल्या-जवळचा मनुष्य ठार झाल्यानंतर मागें राहिलेल्या सैनिकाची जबाबदारी कोणती?" असा प्रश्न त्यानें एका पत्रांत केला आहे.

मृत्यूपूर्वी दोन वर्षें, हिलारी याच प्रश्नाचें उत्तर शोधीत होता. आपण मरणार हें त्याला माहीत होतें. पण कां मरणार, हें त्याला माहीत नव्हतें. ज्याचा शेवट निश्चितपणें मृत्यूमध्यें आहे, असाच मार्ग त्यानें जाणून–बुजून पत्करला होता. तो एका पत्रांत म्हणतो, "मित्रा, तूं म्हणतोस श्रद्धा ठेव, पण श्रद्धा कशावर?"

"सारें कांहीं ठीक होईल, यावर." हें तुझें उत्तर.

पण "ठीक" याचा अर्थ काय? कांहीं चमत्कार घडेल आणि माझ्या हौसेचें काम मला मिळेल असें का तुला म्हणावयाचें आहे? तसें असेल, तर मला तें मुळींच मान्य नाहीं. तशी श्रद्धा ठेवणें वाईट आहे–हानिकारक आहे. पहिल्या विमान–अपघातानंतर पुनः मी विमान–दळांत परत आलों, ही गोष्ट मी चांगली केली, यावर श्रद्धा ठेव असें जर तूं म्हणशील तर ती योग्य आहे. पण आतां मला मृत्यु येणार नाहीं यावर श्रद्धा ठेव म्हणशील, तर छे:, तेंहि मला अमान्य आहे. या घटनांचा क्रमप्राप्त शेवट मृत्यु हाच आहे. कांहीं तास मीं विमानांतून उड्डान केलें म्हणजे माझी सहजप्रवृत्ति मला सांगेल, 'आतां तूं जगणार.' पण माझी बुद्धि मला बजावील, 'तूं जगणार नाहींस.' "अखेर बुद्धीचेंच म्हणणें खरें होईल."

हें जरा विचित्रच नाहीं का? सामान्यतः आपली सहजप्रवृत्ति आपल्याला संकटाचे इषारे देते व घाबरवून सोडते, आणि बुद्धि मात्र आपल्याला धीर देत असते. पण हिलारीच्या बाबतींत उलट घडलें. तो म्हणतो, "हा अविचार आहे," असें बुद्धि आपल्याला सांगते, पण आपण सहजप्रवृत्तीचेंच ऐकतों. "तूं जगशील" असें त्याची सहजप्रवृत्ति त्याला जेव्हां सांगते, तेव्हां तो तिच्यावर विश्वास ठेवीत नाही. पण जेव्हां ती प्रवृत्ति त्याला मृत्यूचा इषारा देते, तेव्हां तो तिच्यावर विश्वास ठेवतो. येथें कोण कोणाला फसवितो? वर वर पहातां सहजप्रवृत्ति माणसाला फसवीत आहे असें दिसतें. ती त्याला मृत्यूच्या सांपळ्यांत भुलवून नेत आहे असें वाटतें; पण बारकाईनें पाहिलें तर आपल्याला असें दिसतें कीं, तो माणूसच, उघड्या डोळ्यांनीं, मिस्किलपणें हंसत, स्वतःला त्या पिंजऱ्याकडे नेऊं देतो. "अमेरिकन चित्रपटांतील दरोडेखोर नायक तुरुंगांत स्वेच्छेनें चालत जातो, आणि तुरुंगाचे दरवाजे अखेरचे बंद झाल्याचें ऐकतो, तशी माझी

अवस्था झाली आहे.'' असें वर्णन हिलारीनें एका पत्रांत केलें आहे.

ही सहज-प्रवृत्ति म्हणजे एक विचित्र शक्ति आहे, असें आपल्याला दिसून येतें. या प्रवृत्तीनें सुनावलेली शिक्षा तो स्वीकारतो, पण तिनें दिलेलें समाधान मात्र तो रागानें–वैतागानें झिडकारून टाकतो, आणि शेवटीं, नम्रपणानें तेंहि स्वीकारतो. या शक्तीला शास्त्रीय नांव आपण अद्याप दिलेलें नाहीं. पण स्फटिकांच्या परमाणूंना विशिष्ट आकारांत एकत्र आणणाऱ्या शक्तीसारखीच कांहींशी ती दिसते खरी.

२

हिलारीच्या पत्रामध्यें त्या काळच्या अपेक्षा व आकांक्षा स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. त्या त्याच्या रक्तांत मिसळल्या होत्या. तो त्यांचा प्रतीक बनला होता. पण कशाचें प्रतीक ? दुसऱ्या एका वैमानिकानें शत्रूचीं ३२ विमानें पाडलीं आणि हिलारीनें तर फक्त ५ च. त्याला कांहीं पदकहि मिळालें नव्हतें. 'दि लास्ट एनिमी' हें त्याचें पुस्तक त्याच्या पिढीमध्यें मोठें आशादायक गणलें जाईल. पण केवळ आशाच–सिद्धि नव्हे. त्यानें कोणती मनोवृत्ति, कोणती कल्पना, कोणती आशा व्यक्त केली ? त्यालाहि तें माहीत नव्हतें. या अस्पष्ट–अंधुक क्षेत्रांत वाजवी गोष्ट वावग्या कारणासाठीं करावी लागते. त्याचा विश्वास आपल्या सहज–प्रवृत्तीवर होता. ती प्रवृत्ति अचूक कशी आहे हें दाखविण्याचा त्यानें वारंवार प्रयत्न केला. पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. तें आलें असतें तर ती प्रवृत्ति मेली असती आणि हा जगला असता. पण त्यालाच आपल्या मृत्यु-लेखाचा शोध करीत मृत्यु पत्करावा लागला.

''पहिल्या महायुद्धांत जे प्रकार घडले, त्यामुळें नव्हे, पण ते घडले तरीहि दुसरें महायुद्ध हें आम्हांला लढण्याजोगें वाटलें.'' असें हिलारी म्हणतो. हें कांहीं पुरेसें समर्थन नव्हे. पण आपणां सर्वांनाच थोडेंफार असें वाटतें कीं, आपण हें युद्ध कोणत्या तरी खास कारणासाठीं लढत नसून कोणतेंहि कारण नसतांना लढत आहोंत. हिलारीच्या तोंडावर इतक्या जखमा झाल्या होत्या कीं, त्यांवर शस्त्रक्रिया करून, तुकड्यांमागें तुकडे लावले गेले. त्यामुळें त्याचा चेहरा नवाच दिसूं लागला. एखाद्या फाटलेल्या कोटाला ठिगळांमागून ठिगळें लावावींत, त्याप्रमाणें त्याच्या मूळच्या कातडीपेक्षां नवे तुकडेच जास्त होते. अशा वेळीं त्यानें पुढील पत्र लिहिलें आहे:—

रुग्णालयात

एका खाटेवर

क्रोधग्रस्त

मानवजात आकंठ दुष्टतेनें ग्रासलेली आहे. तिच्यासाठीं लढण्यास जो सिद्ध झाला, त्यानें प्रथम ही खूणगांठ आपल्या मनाशीं बांधली पाहिजे. मानवांच्या सेवेपासून तुम्हांला कांहींहि मिळणार नाहीं. आपण सद्गुणी राहिलों हें समाधान हेंच सद्गुणाचें बक्षीस. तें पुरेसें नाहीं असें तुम्हांला वाटत असेल, तर 'काय ही मानवी स्वभावाची मौज!' असें म्हणून तुम्ही गंमत पहात राहिलें पाहिजे. नाहीं तर चांग भले!'

हें पत्र ता. १९–४–१९४२ चें आहे. त्यानंतर सहा आठवड्यांनीं, हातावर आणखी एक शस्त्रक्रिया झाल्यावर, ता. ५–६–१९४२ च्या पत्रांत तो निराळ्या दृष्टीनें तेंच मनोगत व्यक्त करतो, तें असें :—

"विमान-दळाचा विशेष गुण कोणता? त्याची छाननी करणें मला कठीण वाटतें. या दळाचे सैनिकांना इतर सैनिकांपेक्षां अगदीं वेगळे बनविणारा तो गुण असावा असें मला वाटतें. तो कांहीं दैवी गुण असावा असें म्हणणें हें छांदिष्टपणाचें व खोटेपणाचें ठरेल. पण त्याहून निराळें वर्णन मी करूं शकत नाहीं. प्रत्येक लढाऊ वैमानिकाचे अंगीं अतिशय लीनता व अतिशय आत्मविश्वास हे गुण असतात. या गुणांच्या संयोगापासून जें ज्ञान होतें—अस्पष्टसें ज्ञान होतें म्हणा—तोच विमानदळाचा विशेष गुण म्हणतां येईल. याचा अर्थ शेवटीं असाहि असेल कीं, कोणत्याहि संघटनेपेक्षां स्वतंत्र मानवप्राणी हा अज्ञाताच्या जवळ जाऊं शकतो—आणि विमानदळांतील संघटना ही अन्य दळापेक्षां, मानव प्राण्याला अधिक स्वातंत्र्य देते. याचें ज्ञान वैमानिकांना असतें काय? असलेंच तर अजाणतां असेल. शांततेच्या काळांत असा दिवस उगवेल काय कीं, जेव्हां ते वैमानिक भीतिग्रमाणेंच इतरहि विकार जिंकूं शकतील?"

हिलारी आपला संशयवाद लपवून ठेवीत असे. आपल्या मनाच्या दारावर त्या कुत्र्याचा पहाराच जणुं त्यानें ठेवला होता. तें संशयवादाचें कुत्रें जोरजोरानें भुंके, पण तें चावत नसे. त्याच्या पाठीमागें दरवाजा उघडा असे; आणि घर मोकळें असे. पुनः हिलारी जेव्हां विमानावर आला, तेव्हां त्याच्या हातांत ब्रेक चालविण्याचीहि शक्ति नव्हती. त्याला कमरेला पट्टे बांधण्याचीहि ताकद नव्हती. त्याच्या जखमी डोळ्यांवर कृत्रिम पापण्या बसविलेल्या होत्या. त्यामुळें त्याला नकाशा नीट वाचतां येत नव्हता. त्याचें डोकें भयंकर दुखे. तुफानांत विमान

नेतांना त्याच्या जळालेल्या हातावरील कातडें उडून जाई. आणि त्यांत तीं रात्रीचीं उड्डानें !...मृत्युस्थानेंच तीं !

पण खरोखर तो विमानावर परत कां गेला ?

तो अहंकार होता काय ? "छे, मी परत येणार नाहीं अशी मला खात्री होती." असें हिलारी लिहितो. मृत्युहि पत्करावयास लावणारी ही ऊर्मि कोणती ? तिचें नांव काय ? तो एका पत्रांत लिहितो, "एखादा मुसाफीर अंधाऱ्या बोगद्यांतून जात असतो. त्याला दूरवर प्रकाशाचा ठिपका दिसला तरी तो आनंदानें आरोळी ठोकतो. पण पुनः त्याला शंका वाटते—हें मृगजळ तर नसेल ? पण नाहीं. तो धैर्यानें पुढें जातो अणि प्रकाशांत पाऊल पडलें म्हणजे तो आनंदाश्रु ढाळूं लागतो व आपलें अंतःकरण खुलें करतो. अशा मुसाफिरासारखी माझी अवस्था आहे." असें प्रेम—पत्र लिहिणारा तरुण हा कोडग्या—कठोर वृत्तीचा कसा असेल ?

एखाद्या ध्येयाची अतिरिक्त आसक्ति हें याचें कारण असेल काय ? हिलारी लिहितो, "मातृभूमीच्या सेवेसाठीं," "जगांत लोकशाही नांदावी म्हणून," मी समरांगणावर उभा ठाकलों असें मी म्हणूं शकत नाहीं. माझ्या स्वतःच्या विकासासाठींच मीं हें कार्य अंगावर घेतलें." हें खरें असेल का ? का हा विनय असेल ? का हा अहंकाराचाच उलटा प्रकार असेल ? का आपल्या कमीपणाचें अधिक वर्णन करण्याचा इंग्रजांचा हा गुण असेल ?

अशा चिकित्सेच्या चिठ्ठ्या हिलारीच्या जीवनावर आपण किती लावणार ? त्यामुळें जगाच्या प्रवासाला निघालेल्या मुसाफिराच्या ट्रंकेवर चिकटविलेल्या विविध चिठ्ठ्यांचीच आठवण होते. वर्तमानपत्रांतील टोकळेबाज भविष्याप्रमाणें, वरील प्रत्येक वर्णनांत कांहीं ना कांहीं सत्य असतेंच व तें कोणाला ना कोणाला तरी लागू पडतें. पण त्यांत पूर्ण सत्य नसतें. आपलीं वर्णनें सुकून जातात व आपल्या चिठ्ठ्या उड्डून जातात. खालीं उरतो फक्त तो माणूस—आपला घात करूं पहाणाऱ्या अज्ञात शक्तीशीं सामना देण्यास तो उभा असतो. त्याचें भ्रमाशीं युद्ध चाललेलें असतें. त्याची बुद्धि त्याच्या नशिबाशीं झुंज खेळत असते. त्यांत संहार त्याचाच होतो.

कल्पनांच्या जाळ्यांत तो कसा गुरफटला आहे पहा. पळून जावें—जीवंत रहावें ! अवघ्या बावीस वर्षांचें वय ना त्याचें ! तो ता. २६ जानेवारी १९४२ च्या पत्रांत लिहितो,

"जिवलगा, माझ्या मनाचा उथळपणा पाहून तूं आपल्या भुंवया आकुंचित

करूं नकोस, अशी माझी प्रार्थना आहे. अरे, तें वरवर दिसतें तसें नाहीं रे. संभ्रान्त अंतःकरणाचे प्रक्षुब्ध पडसाद आहेत ते—विनोदाच्या आवरणाखालीं ते झाकले आहेत इतकेंच.

मी जर वेव्हर्ली निकोल्स असतों आणि माझ्या पायांत मोहक बूट असते व समोर फुलें नाचत असतीं, तर मी स्वच्छंदानें बाहेर पडलों असतों–आनंदानें फुलांत नाचलों असतों—आणि जीवनाचा आनंद लुटला असता. पण या तिन्ही गोष्टी मजजवळ नाहींत. म्हणून मी दारूच्या पेल्यावरच संतोष मानून रहात आहें व मख्ख मुद्रेनें वावरत आहें. त्यामुळें इतरांना वाटतें, मी माझ्या जीवनावर मनांतून अगदीं खूष आहें—मोठमोठे मनोरे रचीत आहें."

कांहीं झालें तरी हिलारी अवघ्या २२ वर्षांचा होता. त्याहून दुप्पट वर्षांच्या आयुष्याचा चेक त्याच्या खिशांत होता. पण आतां सुटका होणार नव्हती. ज्या अनामिक शक्तीनें त्याला विनाशाकडे नेलें, तिचें नामकरण करण्याच्या खटाटोपांत तो होता. 'दि मिंट' या पुस्तकाचा त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्याच्या लेखकाला पूर्वी कधींहि अनुभवास न आलेला मित्रभाव व बंधुभाव विमान–दळांत प्रवेश केल्यावर त्याला लाभला. "त्याच प्रेरणेनें मीहि पुनः विमानावर आलों." असें अखेरच्या एका पत्रांत हिलारी लिहितो. म्हणजे त्याचा हेतु मैत्रीचें प्रेम अनुभवावें हा होता तर !

ता. ३ डिसेंबर १९४२ च्या पत्रांत तो आपल्या एकटेपणाबद्दल व विफलतेबद्दल कुरकुर करीत आहे. तो लिहितो,

"अगदीं एकटे-एकटे असण्याचाच हा सारा परिणाम कदाचित् असेल. एकटेपणाची मला आवड आहे, पण येथला एकांतवास म्हणजे मानवी संपर्काचा संपूर्ण अभावच. किती भयाण वाटतो तो मला ! कडू गोळी गिळण्यासारखेंच आहे तें. हीं माणसें नव्हेत—नुसतीं यंत्रें आहेत. 'लढाऊ दळांत' माणसें होतीं —त्यांच्याशीं बोलतां येत असे—त्यांचेवर प्रेम करतां येत असे... माझें तुझ्यावर इतकें प्रेम आहे कीं, कधीं कधीं मला वाटतें, या विरहामुळें माझें अंतःकरण फुटून जाईल. जिव्हाळा, माणुसकी, विनोद, बुद्धि—येथें ज्या ज्या गुणांचा अभाव आहे, त्या सर्वांचा सागर तूं आहेस."

अर्थात्, या भयाण–ओसाड जीवनांतहि कांहीं हर्षाचे क्षण आहेत. एकट्यानें विमान नेऊन आणलें, या त्याच्या बहादुरीबद्दल त्याचे तरुण दोस्त वैमानिक जेव्हां त्याचें अभिनंदन करतात, तेव्हां त्याचें हृदय आनंदानें उचंबळून येतें:—

"कांहीं झालें तरी तीं माणसेंच आहेत. त्यांच्या प्रेमाचा जुना जिव्हाळा मला

नव्यानें प्रतीत होत आहे. त्या रसाचा घोट मी घेत आहें–त्याचा अंमल माझ्या मनावर चढत आहे.

हें एक वर्तमानपत्र हातांत आलें आहे. काय आहे त्यांत? बीवरीज् रिपोर्ट. युद्धोत्तर परिस्थितीचा विचार करतो आहे तो. पण आम्हांला काय पर्वा आहे युद्धोत्तर कालाची? तोंवर आम्ही मृत झालेलों असूं. आज काय चाललें आहे, हें पाहून त्यांतच मला रमलें पाहिजे.

आम्ही भोजन-गृहाकडे जातों—शेकोटीपाशीं गोळा होतों. दारू–आणखी दारू–आम्ही मागवितों—आम्ही पितों. गप्पा छाटतों. काळ जातो. कसा? दुःखांत? हो, दुःखांत—पण अल्प—अत्यंत अल्प दुःखांत. कारण उद्यां पुनः मला कामाला सिद्ध व्हायचें आहे ना!"

पण मैत्रीचे व सुखाचे असे क्षण थोडेच असतात—आणि जे असतात, तेहि कृत्रिम स्वरूपाचे; वरवरचे. लगेच त्याच्या चित्तावर एकांतवासाची छाया पसरते. आतां त्याला अवघे दहाच दिवस जगावयाचें आहे.

हे दहा दिवस संपले कीं मृगजळामागें चाललेली त्याची ही सारी धावपळ थांबेल. पण तो परत विमान-दळांत कां आला? मैत्रीचें सौख्य अनुभविण्यासाठीं, हें खरें का? आणि ती मैत्री कोणाशीं? त्याच्याबरोबरचे सारे वैमानिक नष्ट झाले होते. उरला होता तो एकटाच— ब्रिटनच्या स्वातंत्र्य–संग्रामांत लढणारा पदवीधर वैमानिक!

विमान-तळावर नवेनवे वैमानिक येत आहेत. हिलारी अवघा २३ वर्षांचा; पण तो त्या नव्यानव्या वैमानिकांमध्यें 'जुनापुराणा' दिसूं लागला—गेल्या पिढीचा अवशेष भासूं लागला. एकापाठोपाठ ते इहलोक सोडून चालते झाले. त्याविषयीं हिलारीनें आपल्या पुस्तकांत एक वाक्य लिहिलें आहे. तें वाक्य स्मशान-भूमींतील थडग्यांच्या रुक्ष रांगेसारखें वाटतें. "ज्या ज्या वेळीं ते वैमानिक आपल्या विमानांत चढले व संग्रामास सिद्ध झाले, तेव्हां ते आपल्या दिवंगत सहकाऱ्यांना उपजत भावनेनें आदरांजलि वाहात आहेत असें वाटे." हें तें वाक्य—'दि लास्ट एनिमी' मध्यें आलेलें आहे.

हिलारी हा एकटाच भूतलावर उरला होता. दिवंगत मित्रांना आदरांजलि वाहण्याचें काम त्याला करावयाचें होतें. जो मागें राहिला, त्याचे डोक्यावर ऋण. हिलारी विमान–दळांत पुनः आला, तो सजीव माणसांशीं मैत्री जोडण्यासाठीं–पण तो जमा झाला दिवंगत मित्रांच्या संघटनेंत.

आपल्या हेतूची मीमांसा करण्याचा त्याचा हा प्रयत्न पूर्वीच्या प्रयत्नाइतकाच

सत्यास धरून आहे–पण पूर्ण सत्य त्यांत आहे असें मात्र नाहीं. पूर्ण व अंतिम सत्याचा पट या सर्व धाग्यांनीं विणूनच कदाचित् तयार होत असेल. कांहीं उपपत्ति आपण हातीं घेतों––आणि टाकून देतों. पण या सर्व उपपत्तींच्या धाग्यापेक्षां पूर्ण सत्य हें मोठें आहे. त्याचा एक विशिष्ट आकार आहे व त्याचा त्या धाग्यांना पत्ता नाहीं.

तो एका पत्रांत लिहितो, "तीन वर्षांनंतर मी पुनः विमानावर आलों, पण येथें सारें थंड आहे–उजाड आहे. मानवी प्रेमाचा वासहि नाहीं. म्हणून पहिल्या दोन दिवशीं रात्रीं मी माझ्या तंबूंत जाऊन एकाद्या लहान मुलाप्रमाणें रडलों. तीं माणसें नाहींत–यंत्रें आहेत." त्याच्याबरोबरचे सैनिक एकामागून एक ठार झाले होते. त्यांना आदरांजलि वाहाण्याचा एकच मार्ग त्याला दिसत होता–आणि तो म्हणजे आपण स्वतः मरून जाणें. अशा विविध विचारांचा संकलित परिणाम होऊन त्यानें, उघड्या डोळ्यांनीं, मृत्यूकडे धांव घेतली.

कांहीं माणसांना आपले नेते हे दैवतें आहेत असें पहाण्यांत आनंद वाटतो. त्यांना हिलारीचीं अखेरचीं पत्रें वाचतांना धक्काच बसेल. पण दुसरे कांहीं लोक असे असतात कीं, त्यांना आपल्या नेत्यांचें विच्छेदन करून त्यांचा अंशान् अंश सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं पहाणें आवडतें. त्यांना हिलारीचीं तीं पत्रें वाचून संतोष वाटेल. 'आपले दिवस आतां भरले आहेत' अशी जाणीव असलेल्या माणसाचीं तीं पत्रें वाचण्याला खरोखर भयंकर आहेत. आरशांत स्वतःचें प्रतिबिंब पाहूनच तीं त्यानें लिहिलीं आहेत असें वाटतें. त्यांत हिलारीनें लिहिलें आहे—

"दिवसभर रडूनरडून माझे डोळे सुजले आहेत. माझ्या खोलींत, एकांतांत, मी तासभर लहान मुलाप्रमाणें रडत होतों. कां? भीतीनें? अद्याप मी विमान कसें तें पाहिलें नाहीं. रात्र मला भीतिदायक जाईल कीं काय हें मला अजून माहीत नाहीं. येथील वातावरणामुळेंच ही भीति निर्माण झाली आहे काय? पुष्कळ अंशीं तसेंच असेल, हें मी जाणतों. पण कदाचित्, विमान–दळांत जें व्यंग उल्लेखिलें जातें, तें "नीतिधैर्याचा अभाव" हेंहि माझ्या ठायीं असेल. तसें असेल, तर माझें मलाच नवल वाटतें. माणसाचा धीर का एकदा सुटला म्हणजे असें होतहि असेल. तथापि मला कशाचेंहि स्पष्ट असें भय वाटत नाहीं. फक्त मी दुःखी आहें––सांगतां येणार नाहीं, इतका दुःखी आहें."

हें दुःख मुख्यतः शारीरिक कारणांनींच उद्भवलेलें आहे. हिलारी लिहितो—

"मी कांहींसा स्वार्थीच आहें. त्यामुळें माझ्यापुढें मुख्य प्रश्न हाच आहे कीं, येथील अत्यंत तीव्र अशा थंडीचा गारठा माझी हातातोंडाची भाजलेली चामडी

निर्जीव करून टाकील कीं काय? आणि त्याहिपेक्षां अधिक भीति ही कीं, माझ्या अंतरात्म्यांतच तो गारठा शिरून माझें सर्वांग गोठून टाकील कीं काय? माझ्या अंतर्मनांत दडलेलें भय येथील वातावरणानें वर उचलून आणलें असेंच मला वाटतें. या ठिकाणीं, रात्रींच्या वेळीं, थंडीच्या कडाक्यांत मी मरणार हें तें भय माझ्या मनाला ग्रासून टाकीत आहे." (ता. २।१२।१९४२ चें पत्र)

अर्थात् त्यानें धीर सोडला नव्हता. विमान-तळावर कोणालाहि त्याच्या मनोवेदनांची कल्पना येऊं शकली नाहीं. त्याची तेथील लोकांत मोठी चहा आहे. आपलें दग्ध मुख व हात धारण करून आणि आपल्या कृत्रिम ओठावर सतत पोरकट ऐट ठेवून, ही स्वारी जेव्हां रुबाबानें पावलें टाकीत विमान-तळाकडे जाते, तेव्हां लोक त्याला 'एक गमत्या प्राणी' म्हणूनच संबोधतात. आणि तेथील नित्याचा दिनक्रम म्हणजे मद्यपान, नृत्यसमारंभ, विमान-अपघात इत्यादि. तो त्याचे अंगवळणीं पडून गेला. कांहीं क्षण अत्यंत निराशेचे, तर कांहीं हर्षाचे. एका पत्रांत तो लिहितो—

"आज पुष्कळच बरें वाटत आहे. कारण प्रत्यक्ष विमान-प्रवास करून मी आलों आहें... थंडीनें दांत कुडकुडत आहेत—म्हणून पायीं चालावें लागतें. नाहीं तर विमान-दळावर बसून प्रशांत स्तब्धतेकडे टक लावून बसण्याजोगा हा क्षण आहे. सर्वत्र स्तब्धता पसरली आहे. उडणारीं व उतरणारीं विमानें काय करतील, तेवढाच यंत्रांचा आवाज. त्यामुळें ती स्तब्धता सखोलच भासते.

मानसशास्त्रदृष्ट्या हें किती चमत्कारिक आहे कीं, माझा घात करण्याची संधि पहाणाऱ्या त्या अजस्र पोलादी विमानांत मी पाऊल ठेवलें कीं, माझी सारी भीति पळून जाते आणि माझ्या चित्तांत शांति अवतरते." (ता. १-१२-१९४२ चें पत्र)

अत्यंत अस्वस्थतेचे असेहि कांहीं कांहीं क्षण येऊन जातात. मृत्युपूर्वी एकच आठवडा, हिलारीनें विमानतळावर एक नृत्य-समारंभ पाहिला. त्याविषयीं तो लिहितो,

"मला झोंपावयाचें आहे; पण दारूचे पेले झोकणारे लोक पहात मी थांबलों आहें. रात्रींचे अडीच वाजले, तरी मी तेथेंच आहें. कां? कुणास ठाऊक. चुकल्याचुकल्यासारखें वाटणें—ही भावना अगदीं तरुण मुलांत किंवा मध्यम वयाच्या स्त्रियांत दिसून येते. पण मी ती भावना केव्हांच जिंकली आहे. तरी तेथें थांबलों."

दिवंगत सहकाऱ्यांशीं इमान राखण्यासाठीं आपण मेलेंच पाहिजे, या विचारानें हिलारीचें मन व्यापलेलें होतें. शिवाय, लेखक म्हणून त्याचे ठायीं स्वतःचीच नाडी-परीक्षा करण्याची जिज्ञासा होती-आपल्या मनोव्यथेचें चित्रण कागदावर

करण्याची ऊर्मिहि होती. त्यामुळें त्याचें मन आत्मनिरीक्षण व आत्मवंचना, शरणागति व बंडखोरपणा, औद्धत्य व विनय, तेविशीचें वय व अनंतत्व–या द्वंद्वामध्यें हेलकावे खा–खाऊन फुटून जात होतें.

दुसऱ्या एका पत्रांत तो लिहितो, "आपल्या जीवनाच्या दोन अवस्था आहेत– एक दुःखी जीवन व दुसरें क्षुद्र जीवन. अशी तात्त्विक मीमांसा कोस्टर करतो." क्षुद्र जीवनाच्या पातळींवरून मनुष्य जेव्हां दुःखी जीवनाच्या पातळींवर उडी मारतो, तेव्हां तो वीर–पुरुष बनतो. त्यांतूनच इतिहास निर्माण होतो. ज्वालामुखींतून लाव्हा रस वाहूं लागतो आणि त्यामुळें, गोट्या खेळणारीं शाळेंतील मुलें प्रस्तराच्या मूर्ति बनतात. तसाच युद्धांचा परिणाम मानवावर होतो.

यशस्वी लेखकाचीं बीजें हिलारीचे अंगीं होतीं. वैमानिक लेखकांमध्यें त्याचें एक विशिष्ट स्थान आहे. 'दि लास्ट एनिमी' या त्याच्या पुस्तकांत ती झांक खास दिसून येते. पहिल्या पुस्तकांत क्वचित्च दिसून येणारी लेखनाची सफाई त्याच्या पुस्तकांत तळपते. पहिल्या प्रतीचें निवेदन–कौशल्य त्याच्या लेखणींत आहे. अचूकपणा, सुस्पष्टपणा, तेजस्वीपणा, अर्थगांभीर्य, चटकदारपणा—इत्यादि निवेदनाचे सारे गुण त्याच्याजवळ होते. त्या पुस्तकांतील दोन प्रकरणें वगळलीं, तर या युद्धांतील हें सर्वोत्तम निवेदन आहे असेंच मी म्हणेन.

आणि त्या दोन प्रकरणांवरूनच हें सिद्ध होतें कीं, तो केवळ एक निवेदक नव्हता. तेथें तो नैतिक मूल्यांची भवति–न–भवति करीत आहे. तेथें त्याची सारी सफाई, सारा ओघ, लुप्त झाला आहे—त्याचे ते गुण त्याला सोडून गेले आहेत. त्याची भाषा सपाट बनली आहे; त्याचे विचार सपक बनले आहेत. भावना उचंबळून आल्यामुळें तो गुदमरून गेला आहे आणि म्हणून धापा टाकीत बोलत आहे, असा भास आपल्याला होतो. तो आपल्या ग्रंथांत लिहितोः–

"पीटरप्रभृति माझ्या सहकाऱ्यांविषयीं मी लिहीन–त्यांच्यासाठीं मी लिहीन–त्यांच्या सांगातीं राहून मी लिहीन. ते माझ्याजवळ रहातील. आणि त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाला उद्देशून मी हें पुस्तक लिहीत आहें? मानवता हाच कोणत्याहि पुस्तकाचा वाचकवर्ग होय. तीच मानवता कीं, जिचा मी पीटर्सपाशीं तिटकारा केला होता, धिक्कार केला होता."

अशा भावनांच्या आवेगांत लिहिलेलीं हीं दोन प्रकरणें बाकीच्या वस्तुगत निवेदनानें भरलेल्या सफाईदार प्रकरणांशीं तोलून पहावीं. एकाच पुस्तकाचे हे दोन विभाग लिहिणारा लेखक भिन्न भिन्न असावा असें वाटूं लागतें. आपण पाहिलेल्या, विमानाच्या पहिल्या प्राणघातक अपघाताची आठवण हिलारी कशी लिहितो पहा—

"एका तंबूंत शस्त्र-विद्येवर व्याख्यान झालें होतें. तें ऐकल्यानंतर, आमच्या कानीं अत्यंत उंचावरून, सूक्ष्म व आर्त अशी किंकाळी आली. आकाशांतून वेगानें खालीं कोसळणाऱ्या विमानाचा तो आवाज होता. सेनाधिकारी खालीं बसला व सिगारेट ओढण्याची तयारी करूं लागला. सिगारचा कागद त्यानें काढला आणि बोटानें त्याची त्यानें नळी बनविली. मग तंबाखूचा डबा त्यानें उघडला आणि त्या कागदावर थोडी तंबाखू पसरली. कागदाच्या कडेवरून आपली जीभ फिरवून त्यानें कागदाची गुंडाळी केली. त्यानें ती सिगार आपल्या तोंडांत ठेवली, तेव्हां आम्ही विमान पडल्याचा आवाज ऐकला. हा अपघात आमच्यापासून एका मैलावर घडला असावा. सिगारला काडी शिलगावून तो अधिकारी म्हणाला, "असा अपघात पूर्वी आम्ही पाहिला, त्याची आठवण मला आतां होते. साफ-सफाईच्या पथकांत मी होतों. तो देखावा कांहीं चांगला नव्हता."

नंतर आम्हांला कळलें कीं, विमानांतील माणूस युद्धकालांत फार उंचावर जाण्याची परीक्षा देत होता.—तो बहुधा मूर्च्छित पडला असावा. त्याचे अवशेष फारसे सांपडले नाहींत. आम्ही शव-पेटिका वाळूनें भरली आणि त्याची उत्तरक्रिया थाटानें केली."

असे दुःखाचे प्रसंग मजेनें सांगितल्याचीं उदाहरणें हिलारीच्या पुस्तकांत सर्वत्र विखुरलेलीं आहेत. दोन-तीन पानें उलटलीं कीं असे शोककारक प्रसंग भपकेबाज भाषेंत वर्णिलेले आढळतात. ही कला हिलारीला कशी साध्य झाली? दुःखी जीवन व क्षुद्र जीवन या जीवनाच्या दोन्ही अवस्था छेदून तो गेला होता. हें याचें बीज होय. या दोन्ही अवस्थांचें पूर्ण मीलन त्याचेमध्यें पुढेंमागें झालें असतें, तर तो पूर्ण यशस्वी लेखक ठरला असता.

पण आतां हिलारीच्या नांवानें, वाङ्मयाच्या इतिहासांत केवळ रिकामी जागाच सोडली जाईल. तिचा अर्थ काय हें आपण थोडेफार सांगूं शकतों. 'मध्यमवर्गीय' कादंबऱ्या दिवसेंदिवस सपक व निःसत्त्व बनत चालल्या आहेत. कारण ज्या युगांतून त्या जन्मास आल्या, तें युगच आतां समाप्त होत आहे. सुसंस्कृत मध्यमवर्गांतील भूतदयावादी लेखकांचा नवा वर्ग उदयास येत आहे.

हिलारीनें एक किरकोळ पुस्तक, पत्रांचा एक संग्रह व दोन लघुकथा-एवढेंच लेखन केलें. पण त्यांत जिवंतपणा आहे. वैमानिक, क्रांतिकारक, साहसी तरुण अशा लेखकांचा नवा वर्ग निर्माण होत आहे. कोणतेंहि पुस्तक नुसत्या गुणानें मोठें असून भागत नाहीं, तर तें आकारानेंहि मोठें असावें लागतें तरच तें दीर्घकाल स्मरणांत राहातें, असें थामस मॅन म्हणतो. दुर्दैवानें हें सत्य आहे, पण

तरी हिलारीचें हें किरकोळ पुस्तक वाचकाच्या स्मृतीच्या तळाशीं जाऊन बसेल इतकें वजनदार आहे. नाहीं तर दुसरीं खंडोगणती वजनाचीं पुस्तकें वाचकाच्या स्मृतीवर नुसतीं तरंगत राहातात.

हिलारीचें जीवन व मृत्यु हें कशाचें प्रतीक? या आपल्या आरंभींच्या प्रश्नाचें उत्तर अजून द्यावयाचेंच आहे. त्याच्या पिढीच्या व वर्गाच्या आकांक्षा व निष्ठा कोणत्या होत्या, यांवर तें उत्तर अवलंबून आहे. त्यानें आपल्या पुस्तकांत याची मीमांसा अशी केली आहे, "विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्यें आत्मनाशाचें बीज अधिक स्पष्टपणें दिसूं लागलें होतें. हे विद्यार्थी ज्या मध्यमवर्गांतून आले व विद्या-वैभवाला चढले, त्या मध्यम वर्गाचा ते तिटकारा करूं लागले-त्यावर ते हल्ला करूं लागले. पण त्यांना कामगार-वर्गाचे पुढारी 'ध्येयवादी, मध्यमवर्गी, बुद्धिजीवि,' अशीं नांवें ठेवूं लागले. आपल्या लोकांचा ते तिटकारा करूं लागले, पण ज्या लोकांमध्यें मिसळण्याची त्यांना इच्छा होती, ते त्या विद्यार्थ्यांचा तिटकारा करूं लागले. अशा पेंचांत तरुण पिढी सांपडली होती."

परंतु हिलारीच्या मनोवृत्तिविषयीं व तत्कालीन परिस्थितिविषयीं वेगळी कल्पना देणारें एक पत्र उपलब्ध आहे. तें ट्रिनिटी कॉलेजाच्या उपप्रमुखानें, हिलारीच्या निधनानंतर, त्याच्या पित्याला सांत्वनार्थ लिहिलेलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे—

"नंतरची डिक्‌ची भव्य व मोहक मूर्ति आली. पहिल्या वर्षाचे शेवटीं त्यानें जो पराक्रम केला, तो आमच्या संस्थेच्या इतिहासांत कायमचा नोंदला जाईल. त्याचा वर्ग हा आमच्या संस्थेंत उत्कृष्ट होता; आणि डिक् हा त्या वर्गांत उत्कृष्ट होता. नदींत नौकांच्या शर्यतीमध्यें त्यानें जी बहादुरी दाखविली, तिला तर तोडच नाहीं. त्याच्या नेतृत्वानें आमच्या विद्यालयाला जी प्रतिष्ठा प्राप्त झाली, ती १९३९ सालींहि त्याच्या अदम्य धैर्यामुळें व कौशल्यामुळें टिकून राहिली. आणि नंतर हें भीषण युद्ध आलें..."

ऑडेन, ईशरवुड्, स्पेंडर अशा साहित्यश्रेष्ठांची विभूति-पूजा करण्याची प्रवृत्ति त्यावेळच्या कॉलेज-विद्यार्थ्यांत जशी होती, तशीच तिला पूरक ठरणारी ही पराक्रमाची प्रवृत्तिहि दिसून येत होती. नौका-क्रीडेंतील बहादुरी नसती, तर ब्रिटनचा स्वातंत्र्य-संग्राम झाला नसता; आणि ऑडेनची भक्ति नसती, तर 'दि लास्ट एनिमी' हें पुस्तक लिहून झालें नसतें. ही तरुण मंडळी आपल्या परंपरेवर किती त्वेषानें तुटून पडली हें पाहिलें म्हणजे त्या परंपरेची त्यांचेवर पकड किती घट्ट होती हें कळून येतें.

माणसावर परंपरेचा परिणाम दोन प्रकारांनीं घडून येतोः—एक, संहारक व दुसरा शुद्धिकारक. बहुसंख्य लोकांवर पहिला परिणाम घडून येतो; हिलरी दुसऱ्या अल्पसंख्य वर्गांत मोडतो. आपल्यावर ऑक्स्फर्डच्या शिक्षणाचा परिणाम काय झाला, हें तो थोडक्यांत सांगतो, तें पुढीलप्रमाणें—

"मी तेथें खूप वाचन केलें. त्यापेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे मद्यपान किती करावें, स्त्रियांशीं अदबीनें कसें वागावें, कोणाच्या डोळ्यांत न खुपतां किंवा स्वतः गोंधळून न जातां, दुसऱ्या लोकांशीं आपण कसें वर्तन ठेवावें—या चालीरीतींचें शिक्षण मला तेथें मिळालें. त्यामुळें माझ्या ठायीं थोडाफार आत्मविश्वास उत्पन्न झाला. तो शिक्षणाच्या दुसऱ्या कोणत्याहि पद्धतीनें मला प्राप्त झाला नसता."

लेडी फॉर्टेस्क्यू या महिलेनें हिलारीच्या प्रशंसेचे चार शब्द लिहून ठेवले आहेत. ते अद्याप प्रसिद्ध झालेले नाहींत. ती महिला म्हणते, "हिलारीचें शेवटचें विमानोड्डान मीं पाहिलें. शांत वृत्तीनें मी तें धांवतें विमान पहात होतें. आकाशांत ससाण्याप्रमाणें विमानें भिरट्या घालीत होतीं. हिलारीनें आपलें 'स्पिट्फायर' चालविलें होतें—पंचमहाभूतांच्या संकटांची तमा न बाळगतां व शत्रूच्या विघ्नांची पर्वा न करतां, त्यानें मोठ्या शौर्यानें, आम्हांला—आणि इंग्लंडला—सुरक्षित ठेवण्यासाठीं, मृत्यूच्या मुखांत उडी घेतली."

आतां उलट, हिलारी स्वतः आपल्या पुस्तकांत काय म्हणतो पहा—

"ता. ३ सप्टेंबर १९३९ रोजीं ऑक्स्फर्डची जी तरुण पिढी युद्धावर गेली, ती 'कुचकामी' आहे असें वृत्तपत्रें म्हणत असत. त्यामुळें आम्ही खट्टू होत नव्हतों. वरवर पहातां, आम्ही स्वार्थपरायण व अहंकारी होतों—पण अहंकार बाळगण्याजोगें दिव्यत्व आमच्यांत नव्हतें. तें महायुद्धानें आम्हांला मिळवून दिलें. त्यांत मोठ्या पराक्रमाची गरज नव्हती. आम्ही शिस्तबद्ध नसलों, तरी हिटलरच्या ध्येयवेड्या तरुणाला तोडीस तोड होतों, हें जगाला पटवून देण्यास आम्हांला ही संधिच मिळाली."

आपलें मन शुद्ध व निरहंकारी राखण्यासाठीं कोण ही तळमळ! आपल्या पायांतील बूट स्वच्छ ठेवून कांहीं सैनिक प्राण सोडतात, तर आपलें अंतःकरण स्वच्छ ठेवून कांहीं सैनिक मृत्यु पतकरतात. पहिल्या कोटींतील सैनिकांचें जगणें—मरणें हें उद्गारचिन्हांनीं भरलेलें असतें, तर हिलारीसारख्याचा जीवन-क्रम प्रश्न—चिन्हांनीं गजबजलेला असतो. त्या जीवनाचा उद्देश काय असतो, याची कल्पना त्याच्या लेखनांतील अभावित व अकृत्रिम उद्गारांवरून कांहींशी करतां येते.

तो आपल्या मित्राला म्हणतो, "सध्यांच्या युगांत राष्ट्रप्रेम हें पांचटपणाचें गणलें

जातें, ईशप्रेम जुनेंपुराणें समजलें जातें आणि मानवताप्रेम भाबुक मानलें जातें. अशा काळीं या तिन्ही प्रेमांसाठीं, तूं बलिदान करण्यास सिद्ध झाला आहेस." खुद्द हिलारीच्या मृत्यूची मीमांसाहि याच तीन कारणांनीं करतां येण्यासारखी नाहीं काय ? जेव्हां जग हें एक प्रश्नचिन्ह होऊन बसतें, आणि त्यांतील सर्व तत्त्वज्ञानें निरर्थक वाटूं लागतात, तेव्हां भावनाप्रधान तरुणाच्या मनाला ईश्वराची ओढ इतकी लागते कीं, ज्योतीवर झडप घेणाऱ्या पतंगाप्रमाणें, तो मृत्यूवर झेप घेतो –त्यांत त्याचे पंख जळाले, तरी पुनः तो तिकडेच उडी मारतो. अर्थात् मानवाच्या अनेक सहजप्रवृत्तींपैकीं ही एक आहे आणि तिची व्यवस्थित उपपत्ति लावतां येत नाहीं.

रिचर्ड हिलारी याचें शरीर तीनदां जळालें. पहिल्या वेळेस त्याला दवाखान्यांत आणून, नव्या पट्ट्या लावून, त्याचा चेहरा नवा बनविण्यांत आला. दुसऱ्या खेपेस त्याच्या शरिराचे पार कोळसे झाले. पण त्याची इच्छा होती कीं, आपलें दहन व्हावें. म्हणून त्याला, ता. १२ जानेवारी १९४३ रोजीं, तिसऱ्यांदा जाळण्यांत आलें–कोळशाची राख झाली, आणि ती राख समुद्रावर विखुरली गेली.

येथें मानवाची कथा संपली–आणि त्याची दंतकथा सुरू झाली. ध्येयाच्या शोधार्थ धर्म-युद्ध करणाऱ्या तरुणाची ही जीवनकथा आहे. हें ध्येय ख्रिस्ताचें असेल कीं त्याच्या विरोधकाचें,–हें सांगणें कठीण आहे.

बुद्धिजीवी वर्ग

कळण्यास सोपे पण व्याख्या करण्यास अवघड–असे जे शब्द असतात, त्यांपैकीं "बुद्धिजीवी" हा एक आहे. तार्किक दृष्ट्या तो अस्पष्ट आहे, पण भावनात्मक दृष्ट्या स्पष्ट आहे. याच्या सभोंवतीं पुष्कळ अर्थांचीं वलयें फिरत आहेत; आणि स्थल–कालानुरूप तीं एकमेकांवर आपटतहि आहेत. उदाहरणार्थ, दिवाणखान्यांत बसून कल्पनेचीं चित्रें रंगविणारा धंदेवाईक मध्यम-वर्ग, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांतील रशियामधील विद्यार्थी व उच्चवर्ग यांच्या क्रांतिकारक संघटना, नेपोलियननंतरच्या काळांतील जर्मनीमधील विद्यापीठाचे देशाभिमानी विद्यार्थी इ. इ.–हे सर्व "बुद्धिजीवीच" मानले जातात. त्यांचे कपडे निराळे, केश-रचना निराळी, खाणें-पिणेंहि निराळें. या वर्गाची कक्षा नेहमीं बदलत असते. या वर्गाच्या त्या त्या काळच्या प्रतिनिधींचे गटवारीनें व वर्गवारीनें पोट-विभाग पडतात. त्यांच्या आजूबाजूच्या अलबत्या-गलबत्यांमुळें व बाजारबुणग्यांमुळें ती कक्षाहि झांकली जाते. यांतून अचूक व नक्की अर्थ मिळावा म्हणून ऑक्सफर्ड डिक्शनरी पहाणें चांगलें. तिच्या १९३४ च्या आवृत्तींत असें लिहिलें आहे—

"बुद्धिजीवी" = स्वतंत्र विचाराची इच्छा धरणारा, राष्ट्राचा–विशेषतः रशियाचा–एक विभाग.

१९३६ च्या आवृत्तीमध्यें, त्यावेळच्या बदललेल्या परिस्थितीप्रमाणें, या शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणें दिलेला आहे–"समाजांतील सुशिक्षित वर्ग–लोकमत तयार करण्यास पात्र असा हा समजला जातो."

हा दुसर अर्थ अवास्तव आशावादी ठरला आहे. म्हणून आपण पहिल्या योग्य अर्थावरच विसंबून राहाणें चांगलें. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर, या वर्गाचें व्यवच्छेदक लक्षण म्हणजे–"विचार–स्वातंत्र्याची आकांक्षा धरणारा" हेंच होय.

ही आकांक्षा राष्ट्राच्या एकाच विभागांत निर्माण कशी होते? आपल्या या वर्ग-बद्ध जगांत, सरदारां-कामगारांच्या संतानांची सहजगत्या घडून आलेली ही एकजूट खासच नसते. विशिष्ट कालाचा व स्थलाचा "बुद्धिजीवी" वर्ग हा समाजाच्या प्रायः एकजिनसी अशा थरांतूनच आलेला असतो. त्याचे मोकळे सुटलेले धागे–दोरे हे फक्त वर वर दिसतात. केवळ "बुद्धि असणें" हें लक्षण "बुद्धिजीवी"

हा लेख लंडन येथील 'होरायझन्' च्या १९४४ मार्चच्या अंकांत प्रथम प्रसिद्ध झाला.

वर्गाचें घटक होण्यास अवश्य नाहीं व पुरेसेंहि नाहीं. हा वर्ग तयार होण्यास समाजाची विशिष्ट रचना सिद्ध व्हावी लागते. अर्वाचीन समाजाच्या दृष्टीनें अशी रचना होण्यास फ्रेंच राज्यक्रांतीपासून सुरुवात झाली आहे.

२. बुद्धिजीवी वर्ग व तिसरी दौलत

समाजांतील जी 'तिसरी दौलत', तिच्या वरच्या थरांत, विचार-स्वातंत्र्याची लालसा ही एक जिवंत राहाण्यासाठीं आवश्यक अशी गोष्ट होती—चैनीची नव्हे. सरंजामशाहीखालीं चिरडला जाणारा तरुण मध्यम वर्ग आपलें ऐतिहासिक स्थान मिळवूं पहात होता, आणि त्यासाठीं तो आपल्या विचार-स्वातंत्र्याचे सुरुंग लावून सरंजामशाहीचे बुरूज उडवून देऊं पहात होता. पहिले आधुनिक "बुद्धिजीवी" लोक म्हणजे फ्रान्समधील ज्ञानकोशकार. त्यांनीं इतिहासाच्या रंगभूमीवर प्रवेश केला, तो मूर्तिभंजक म्हणूनच. पुनर्जन्म पावून गटे पुनः अवतरला तर आपल्या काळाशीं तो सुसंगत टरणार नाहीं; पण व्हॉल्टेअर हा मात्र पुनः अवतरला तर एका पंधरवड्यांत इंग्रज जनतेंत मिसळून जाईल, आणि "न्यू स्टेट्समन्" या पत्रांतील आठवड्याचीं सारीं कोडीं सोडवील. कारण, गटे हा "पुनरुज्जीवना"च्या काळांतील शेवटचा प्रतिभावंत लेखक होता, आणि त्याची समाजांतील भूमिका एखाद्या सुबुद्ध राजाच्या दरबारांतील मानकऱ्यासारखी होती. पण व्हॉल्टेअरपासून सरंजामी मूल्यांचा धिक्कार करण्याची परंपरा सुरू झाली.

याप्रमाणें "बुद्धिजीवी" वर्गाचा आधुनिक काळांतील अर्थ असा ठरतो कीं, "सामाजिक परिस्थितीमुळें देशाचा जो भाग विचार-स्वातंत्र्याची लालसा धरतो असें नव्हे, तर विचार—स्वातंत्र्याकडे ढकलला जातो, तो "बुद्धिजीवी वर्ग." विद्यमान मूल्यें नष्ट करून त्यांच्या जागीं आपलीं नवीं मूल्यें स्थापन करण्याच्या मनोवृत्तीला हें नांव देण्यांत येतें. ही विधायक प्रवृत्ति हें या "बुद्धिजीवी वर्गाचें" दुसरें मूलभूत लक्षण होय. खरे मूर्तिभंजक लोक, एखाद्या प्रेषिताप्रमाणें, नवनिर्मितीसाठीं झटणारे असतात.

पण त्यांचीं हीं नवीं मूल्यें कोठून येतात? याची उपपत्ति मार्क्सनें फारच सोप्या भाषेंत लिहिली आहे. ती अशी—"मध्यमवर्गानें इतिहासामध्यें फार मोठें क्रांतिकार्य केलेलें आहे. त्याचीं लक्षणें म्हणजे उत्पादनांत सतत बदल, सामाजिक स्थितींत अखंड बदल, अस्थिरतेची व चळवळीची सतत भावना. प्राचीन व पूज्य अशीं मतें व ग्रह उध्वस्त केले जातात. नवीं मतें व ग्रहसुद्ध

स्थिर होण्यापूर्वीच सनातनी व जुनेपुराणे मानले जातात. जें जें घन आहे, तें तें वितळून वायुरूप बनतें, जें जें पवित्र आहे तें तें पाखंडी ठरविण्यांत येतें, आणि शेवटीं आपल्या जीवनाची खरी स्थिति व त्याचे समाजाशीं संबंध–याचें ज्ञान मागसाला शांत चित्तानें करून घेतां येतें."

"एकेका राष्ट्रांतील बौद्धिक संपत्ति ही सर्व जगाच्या मालकीची होते, राष्ट्रीयत्वाचा एकांगीपणा व कोतेपणा दिवसेंदिवस टिकूं शकत नाहीं. स्थानिक व राष्ट्रीय अशा साहित्याच्या असंख्य प्रवाहांचा संगम होऊन जागतिक वाङ्मयाचा समुद्र निर्माण होतो."

यांतील पहिला परिच्छेद उत्तम आहे. पण दुसऱ्यामध्यें अर्थकारणावरून कलेकडे उडी मारली आहे. मार्क्सवादी समाजाला तळमजला आहे व वरचा मजला आहे–पण वर जाण्यास त्या दोहोंना जोडणारा जिना नाहीं कीं पाळणा नाहीं.

भौतिक संपत्तीचें उत्पादन व बौद्धिक संपत्तीचें उत्पादन–हीं तीं दोन टोकें होत. समाजांतील जो वर्ग यशस्वी होतो, तो आपल्या उत्पादन-पद्धतीला योग्य अशा तत्त्वज्ञानाची इमारत उभी करतो. पण फ्रान्समधील ज्ञानकोश हे कांहीं तेथील "नॅशनल असेंब्लीच्या" हुकुमानें तयार झाले नाहींत. जेव्हां जेव्हां एखादा वर्ग किंवा गट आपल्या झगड्यांतून विजयी होऊन बाहेर पडतो, तेव्हां तयार कपड्याप्रमाणें, त्याला योग्य असे विचार बाहेर सिद्ध असलेले त्याला आढळतात. मार्क्स, मुसोलिनी, हिटलर व स्टॅलिन यांच्या कृत्याला तत्त्वज्ञानाची बैठक देणारे लेखक सहजच उदयास आलेले होते.

वरील उदाहरणांत पुरोगामी व प्रतिगामी–अशा उभयविध चळवळींची गल्लत झाली आहे. खरें म्हणजे या चळवळी अलगच ठेवावयास हव्यात. प्रतिगामी चळवळींना आधारासाठीं जीर्ण मूल्यें घेतां येतात. एक–दोन पिढ्यांमागचीं जुनीं–पुराणीं मूल्यें घेऊन त्यांच्या आधारावर क्रांतीचें कल्पनाचित्र काढतां येतें, आणि त्या भ्रामक क्रांतीपासून उत्साहाचे लोटहि वाहूं शकतात. त्याची साथ करण्यास "बुद्धिजीवी" वर्गाचा एक अंश तयारच असतो. तो आपलें विचार–स्वातंत्र्याचें तत्त्व सोडून देतो–किंबहुना आपल्या वर्गाचा संबंधहि तोडून टाकतो.

हें बाजूस ठेवलें तरी मूळ प्रश्न शिल्लकच राहातो. आणि तो हा कीं, इतिहासांतील प्रगतिशील व विकासशील चळवळींना जीर्ण मूल्यांचा आधार नाहीं, आणि तरीहि त्या चळवळी "मानवाचे हक्क" व "कामगारांची पहिली आंतरराष्ट्रीय संस्था" स्थापन करूं शकतात व त्यांना योग्य वेळीं, अवश्य ती विचार-संपदा आपल्यासाठीं सिद्ध असल्याचें सदैव आढळून येतें. याचें कारण

२४६२

काय ? आर्थिक प्रक्रिया आपलें तत्त्वज्ञान निर्माण करते, या सिद्धांतावर आतां माझा विश्वास नाहीं. या सिद्धांताला जुन्या मार्क्सवादानें कांहीं ऐतिहासिक आधार दिलेला नाहीं. बरें, हा योगायोगहि म्हणतां येत नाहीं. यांचा अर्थ एकच दिसतो, आणि तो म्हणजे राजकीय परिस्थिति व सांस्कृतिक विकास हीं एकाच घटनेचीं दोन स्वरूपें आहेत. ती एकच घटना कोणती, तें मात्र आम्हांला अजून कळलेलें नाहीं.

अन्य क्षेत्रांतील दोन उदाहरणें घेऊन हें माझें मत मी स्पष्ट करतों. मन व शरीर यांचे संबंध कसे आहेत ? त्यांतील कारण कोणतें व कार्य कोणतें ? कोंबडी कोणती व अंडें कोणतें ? या प्रश्नांचा निकाल वरील द्विदळ क्रांतीच्या तत्त्वानेंच तात्पुरता तरी होऊं शकतो. तुमच्या शरिरांतील आम्ल हें तुमच्या मनोवृत्तीचें कारण नाहीं कीं कार्यहि नाहीं, पण तें आम्ल व ती मनोवृत्ति–हीं दोन्ही तुमच्या एकंदर जीवन–पद्धतीचीं फळें होत.

दुसरें उदाहरण म्हणजे पदार्थ–विज्ञान व गणित या शास्त्रांच्या संबंधाचें. पदार्थ-विज्ञान-शास्त्रांतील दोन शुद्ध प्रयोगांचीं फलितें परस्परविरुद्ध आल्याचें आइन्स्टाइनला जेव्हां आढळलें, तेव्हां त्यानें आपला "सापेक्षतावाद" पुढें आणला. त्याच्या आधीं दुसऱ्या गणितशास्त्रज्ञांनीं त्या सिद्धांताची पूर्व-तयारी करून ठेवली होती. सापेक्षतावादाचीं स्वरूपें गणितशास्त्र व पदार्थ-विज्ञानशास्त्र यांच्या द्वारां अगदीं स्वतंत्रपणें प्रकट झालीं होतीं. या दोघांची युति हा एक चमत्कारच मानावा लागेल. पण शास्त्रीय विचारांचा विकास पावणें हा धर्म आहे. त्याचीं भिन्न भिन्न रूपें हीं पृथक्पणें आधीं वावरत असतात.

प्रगतिशील मध्यमवर्ग व "तिसरी दौलत" हें कांहीं भूतदयात्मक व उदार-मतवादी तत्त्वज्ञानाचें कारण नव्हे कीं कार्यहि नव्हे. एकाच मुळाला फुटलेले ते दोन अंकुर होत. ते एकमेकांशीं संबद्ध झाले इतकेंच. एकाच वस्तूचा आकार व रंग हे जसे निगडित असतात, तशीं हीं दोन स्वरूपें असतात. या सामाजिक व बौद्धिक उत्क्रांतीची सांगड घालणें हेंच फ्रेंच ज्ञानकोशकारांचें व त्यानंतरच्या विचारवंतांचें मुख्य कार्य होय. त्यांना मूर्तिभंजनाचें व नव-धर्म-स्थापनेचें अशीं, विध्वंसक व विधायक, दोन्ही कार्यें पार पाडावयाचीं होतीं.

३. तिसऱ्या दौलतीचा अधःपात

बुद्धिजीवी वर्गाच्या विशिष्ट घटनेवर यानेंच प्रकाश पडतो. समाजाच्या विचारा-

पेक्षां त्याचा आचार अधिक निश्चल असतो. शास्त्र, कला, तंत्र, यांचें संकलित ज्ञान आणि आपलें सामुदायिक जीवन–यांमध्यें प्रचंड तफावत नेहमीं असते. आपण युद्धें करतों, प्रार्थनामंदिरांत जातों, राजाला पूजितों, घातुक अन्न सेवन करतों, निषिद्ध लैंगिक संबंध ठेवतों, आपलीं मुलें बिघडवितों, आपले संसार दुःखमय करतों, दुसऱ्यावर जुल्म करतों व दुसऱ्याचा जुल्म सोसतों–पण आपल्या शाळेंतील पुस्तकांत व कलांच्या प्रदर्शनांत आदर्श जीवनाचीं चित्रें रेखाटलेलीं असतात. तसें आचरण होण्यास कैक शतकें लोटावीं लागतात. आपण आपल्याशींच विसंगत असे वागतों. विशिष्ट कालाचे गुलाम होऊन आपण आपलें दैनंदिन जीवन कंठितों. आकाशांतील ताऱ्यांमधील अंतर जसें अजस्त्र आंकड्यांनीं मोजावें लागतें, तसेंच आपली ग्रंथशाला व शय्यागृह यांमध्यें अफाट अंतर मोजावें लागेल. तथापि तात्त्विक ज्ञान व स्वतंत्र विचार यांचें वातावरण सिद्ध असलें म्हणजे त्याचा उपयोग पुढें सामाजिक परिवर्तनाला होतो. फ्रेंच ज्ञानकोशकारांनीं निर्माण केलेल्या वातावरणाचा उपयोग जाकोबिन लोकांनीं करून घेतला.

वातावरणाचें साहाय्य घेण्याचा हा गुण विशिष्ट वर्गाचा आहे. आपला प्रत्यक्ष आचार व आपण आपल्या ज्ञानाचे बळावर ठरविलेला आदर्श आचार–या दोहोंची सांगड घालण्याचें कार्य हा वर्ग करीत असतो. सामाजिक वतनदारींत ज्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात, त्यांना विचार-स्वातंत्र्याची जोरदार ऊर्मि येणेंच कठीण. ती येणार कोठून ? त्यांना आपलीं अंगीकृत मूल्यें नष्ट करण्याचें कारण नसतें, आणि नवीं मूल्यें उभारण्याची इच्छा नसते. अज्ञात स्थितिविषयीं अस्वस्थता असली म्हणजेच ज्ञानाची लालसा उत्पन्न होते. जे स्वस्थ व सुखी असतात, त्यांना जिज्ञासा क्वचितच असते.

उलट, जे दीन-दलित असतात, त्यांना विचार–स्वातंत्र्याचा पाठलाग करण्यास संधि नसते व सामर्थ्यहि नसतें. विद्यमान मूल्यांचा स्वीकार किंवा अव्हेर ते अवशपणें करतात.

"बुद्धिजीवी वर्ग" म्हणजे मध्यम वर्ग, असा घोटाळा करूं नये. संवेदन-क्षमता, जिज्ञासुपणा, प्रगतीची वाटचाल–या सर्व वृत्ति विशिष्ट प्रकारच्या विफलतेंतून निर्माण होतात. ही विफलता फार जास्त असतां कामा नये व फार कमीहि असतां कामा नये. सौम्यसें दुःख, चित्ताची किंचित् अस्वस्थता–यांतून जिज्ञासा निर्माण होते. परंपरागत मूल्यें पत्करलेल्या उच्च वर्गांत विफलतेची भावना नसते. पण खालच्या वर्गांत ती असते, ती इतकी कीं, त्यामुळें तो वर्ग खुळापांगळा बनतो, किंवा विफलतेचे आंचके देत बसतो.

ही विफलता विशिष्ट प्रकारची असली पाहिजे. एकादा असंतुष्ट लेखक किंवा कलाकार हा बंड करून उठतो, तेव्हां त्याचें कारण समाजानें त्याच्या विकासाची संधि हिरावून घेऊन त्याला खड्ड्यांत लोटलेलें असतें हें नव्हे, तर त्याला आपल्या गुणांचा विकास करण्यास पुष्कळ वाव असला तरी परिस्थितीपुढें आपण दुबळे आहोंत आणि प्राप्त स्थितीपुढें आपण मान वांकविली पाहिजे असें त्याला वाटूं लागतें हें होय. आत्मसंतुष्ट माणसाला 'विचार करणें' ही चैनीची गोष्ट वाटते, तर वैफल्यानें ग्रासलेल्या माणसाला विचाराची आवश्यकता वाटते. जोंपर्यंत विचार व परंपरा, तात्त्विक सिद्धांत व व्यावहारिक आचार यांमध्यें खोल दरी पसरली आहे, तोंपर्यंत आपली बुद्धि ही तिटकारा व आकांक्षा या भिन्न कारणांनीं नियंत्रित केली जाईल.

हें सारें वर्णन बहुसंख्य मध्यम वर्गाला यापुढें लागू करतां येणार नाहीं. जोंपर्यंत त्यांचे ठिकाणीं जाकोबिनांची क्रांतिकारक वृत्ति होती, तोंपर्यंत तें वर्णन त्यांना लागू होतें. पण पुढें तो वर्ग सनातनी बनला. त्याच्या विफलतेच्या भावना चेंगरल्या गेल्या. त्याला नवीं मूल्यें निर्मिण्याची आकांक्षा राहिली नाहीं—तो जुन्या मूल्यांच्याच शिखरावर चढून बसण्याची आकांक्षा धरूं लागला.

४. बुद्धिजीवी वर्ग व चौथी दौलत

राज्यांतील तिसरी दौलत असलेला मध्यम वर्ग हळुहळू आपली प्रगतिशील वृत्ति गमावून प्रथम स्थिर व नंतर प्रतिगामी बनूं लागला. तेव्हां त्याच्यापासून "बुद्धिजीवी वर्ग" अधिकाधिक दूर जाऊं लागला, आणि आपल्या विध्वंसक व विधायक कार्याला उपयोगीं पडतील असे सामर्थ्यवान् मित्र शोधूं लागला. या शोधाचें उत्तम उदाहरण म्हणजे १९ व्या शतकांतील रशिया. "जेव्हां जेव्हां क्रांतिकारक व बुद्धिवादी कार्यकर्ते राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता सांगत किंवा शेतकऱ्यांची दुर्दशा निवेदन करीत, अथवा, समाजवादाचें भावी चित्र रंगवीत, त्या त्या वेळीं, आपल्या स्वतःच्या दुर्दशेनेंच त्यांचें अंतःकरण उचंबळून येई; आणि त्यांची ही दुर्दशा मुख्यतः भौतिक स्वरूपाची नसे, तर मानसिक असे." असें "कम्युनिस्ट इंटरनॅशनल" मध्यें लिहिलें आहे.

रशियांतील "बुद्धिजीवी वर्गाची" ही मानसिक दुर्दशा म्हणजे कुंठित, निश्चल व मर्यादित असें दैनदिन जीवन आणि तत्त्वज्ञान व विचार-संपदा यांचें संकलित स्वरूप यांमधील विरोधांतून जन्मास आलेली होती. १९ व्या

शतकांतील रशियनांना पाश्चात्य युरोपियन संस्कृतीमध्यें जें तत्त्वज्ञान व विचार सांपडत ते म्हणजे ब्रिटिश लोकशाही, फ्रेंच साहित्य, जर्मन तत्त्वज्ञान. त्या रशियनांना पाश्चात्य राष्ट्रें म्हणजे ज्ञानाचें माहेरघर वाटत. इतिहासांतील योग असा विलक्षण कीं, दोन महायुद्धांनंतरच्या काळांत, पाश्चात्य राष्ट्रांतील "बुद्धिजीवी वर्ग" रशियांतील साम्यवादानें मंत्र-मुग्ध होऊन गेला. त्याला आपली भांडवलशाही ऱ्हास होत असलेली दिसत होती, आणि साम्यवाद हेंच एक मानवाचें आशास्थान आहे असें भासत होतें.

१९ व्या शतकांतील रशियामध्यें मजूर-संघ नव्हते, सहकारी पतपेढ्या नव्हत्या व मजुरांची चळवळहि नव्हती. शेतावरील गुलामीची पद्धत १८६२ सालीं रद्द झाली होती. त्या आळशी, झोपाळू व प्रचंड देशामध्यें सरंजामशाहींतून भांडवलशाहीकडे हळुहळू संक्रमण झालें नाहीं. मी तेथील शेतकऱ्यांशीं बोललों आहें. त्यांना दररोज आपल्या डोक्यावर फिरणारें विमान माहीत होतें, पण आगगाडी किंवा मोटारगाडी त्यांनीं कधींच पाहिली नव्हती. कांहीं जण मोटारींत बसून गेलेले होते, पण बायसिकल नांवाची वस्तु असते यावर त्यांचा विश्वास नव्हता.

अशा लोकांत ज्ञानाचा प्रसार करणें हें "बुद्धिजीवी पंडितांना" नंदनवनांत प्रवेश करण्याइतकेंच आनंददायक वाटलें. त्यांच्यापैकीं जे लोक प्रथम शेतकऱ्यासारखा पोशाख करून, "बहुजनसमाजांत" मिसळण्यासाठीं गेले आणि नवीन संदेशाचा प्रचार करूं लागले, तेव्हां त्यांना मोकळें रान सांपडलें. मजूर-संघ किंवा मजूर-पुढारी 'प्रतिस्पर्धी' म्हणून त्यांच्यापुढें उभा राहिला नाहीं, आणि "तुमचें सोंग उतरून मॉस्कोला परत जा." असें सांगणाराहि कोणी भेटला नाहीं. रशियन शेतकरी निर्विकार राहिला. त्यानें त्या प्रचारकांच्या हांकेला ओ दिली नाहीं, तरी सुधारणेच्या मोहिमेवर निघालेले "बुद्धिजीवी" प्रचारक निराश बनले नाहींत. कारण त्यांना कोणीच प्रतिस्पर्धी नव्हता. त्यांनीं आपले पवित्रे बदलले. जनतेला आवाहन करण्याऐवजीं दहशतवादाला त्यांनीं प्रारंभ केला; आणि दहशतवादाकडून ते कारखान्यांतील कामगारांमध्यें, बिगर-शेतीच्या शेतकऱ्यांमध्यें, सैनिकांमध्यें काम करण्यास निघाले. ते भांडले, फुटले, वेगळे झाले; पण त्या सर्व अवस्थांत त्यांनीं आपलें ऐतिहासिक अपूर्व कार्य पुढें चालविलें. जुन्याचा विध्वंस करून नव्याची उभारणी करण्याची इच्छा ते तृप्त करूं लागले. त्यांच्या "श्रद्धेनें पर्वत हलविले." कारण तेथें हलविण्यासारखे अनगड पर्वत होते.

याच्या उलट, पाश्चात्य राष्ट्रांतील "बुद्धिजीवी वर्गाला" अशी पडीत जमीन नांगरण्यास मिळाली नाहीं. त्यांच्या आकांक्षा जाणणारे सच्चे सोबतीहि त्यांना मिळाले नाहींत. मार्क्सवादी तत्त्वाप्रमाणें "बुद्धिजीवी वर्गानें" कामगारवर्गाशीं मिसळून त्याचे सल्लागार बनावयाचें. तसें होण्याला जरूर तें धैर्य किंवा पात्रता "बुद्धिजीवी वर्गाच्या" अंगीं नव्हती, असें म्हणण्यास पुरावा नाहीं. १८४८ सालीं विद्यार्थी व कामगार हे वर्ग रणांगणावर खांद्याला खांदा लावून लढले. फ्रान्स-मध्येंहि १८७१ च्या क्रांतिकालांत तेंच दृश्य दिसलें, आणि गेल्या महायुद्धानंतर जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया, आणि स्पेनमधील "आंतरराष्ट्रीय पथकें" यांच्या क्रांतिकारक चळवळींमध्येंहि त्यांनीं उत्तम कामगिरी बजावली.

परंतु १९ व्या शतकाच्या मध्यापासून पुढें, मध्यवर्ती व पाश्चात्य युरोपमधील कामगारांनीं, आपल्या स्वतःच्या संघटना, पक्ष, मजूर-संघ, झपाट्यानें उभारले आणि आपले स्वतःचे पुढारी निर्माण केले. विशेष म्हणजे दृढ निश्चयाचे व करोल शिस्तीचे नोकरहि निर्माण केले. हें युग झपाट्यानें क्रांति करणारें आहे. त्यांत राज्याची "तिसरी दौलत" संपुष्टांत आली आणि, त्याहिपेक्षां झटपट "चौथी दौलत" खुंटली. "दुसऱ्या इंटरनॅशनल'च्या ज्या शाखांनीं ऐहिक सुखाचे चार तुकडे मिळविले व राजकीय सत्तेची सांवली राज्यकर्त्यांपासून हिरावून घेतली, त्यांचा ध्येयवाद लवकरच पांगुळला. पाश्चात्य राष्ट्रांतील "बुद्धीजीवी वर्गाचे" घटक हे पार्लमेंटमध्यें मजूर पक्षाचे सभासद म्हणून जाऊं शकले, साम्यवादी वृत्तपत्राचे संपादक बनूं शकले, संध्याकाळच्या बौद्धिक वर्गाचे प्राध्यापक बनूं शकले, परंतु आपल्या विचार-स्वातंत्र्याची तरफ लावून हलविण्याजोगा पर्वतच तेथें नव्हता. १९ व्या शतकाच्या अखेरीस पाश्चात्य राष्ट्रांत, "बुद्धिजीवी वर्गाला" मध्यम वर्गाचा अवशेष किंवा कामगार-वर्गाचा शिक्षक—यांपैकीं एक होऊन राहाण्याची पाळी आली. या भिन्न भूमिकांना अनुसरूनच त्यांचे गट किंवा तट पडले. शॉ व व्हॉल्टेअर यांच्यामधील फरक स्पष्टच आहे.

पहिल्या महायुद्धानें जगाला जो हादरा बसला, त्यामुळें नव-निर्मितीला वाव मिळाला. साऱ्या कल्पनांमध्यें मूलगामी बदल झाला. मग ती कल्पना सापेक्षता-वादाची असो किंवा क्वॉंटम् सिद्धांताची असो; मनोविश्लेषणाची असो किंवा अतिवास्तववादी असो; विमान-विद्या असो किंवा बिनतारी संदेश-वाहन असो. पूर्णपणें नवीन, कोरें करकरीत असें जग ग्रंथालयांत निर्माण झालें होतें; आणि त्यांतून निघणारे प्रकाशाचे किरण पाहून "बुद्धिजीवी वर्ग" वेडा झाला. आपल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

दररोजच्या जुन्या-पुराण्या, धूळ-धुरळा बसलेल्या परंपरांचा व आचार-विचारांचा त्याला वीट आला. नवनिर्मितीला केवढी सुवर्ण-संधि !

पण तिचा फायदा घ्यायला सहकारी आहेत कोठें ? त्या वीस वर्षांत युरोपांतील ध्येयवादी तरुणांच्या कार्याचीं सारीं सूत्रें एकट्या "तिसऱ्या इंटरनॅशनलच्या" हातीं होतीं. त्या संस्थेनें युरोपमधील क्रांतीचा जो नकाशा तयार केला होता, तो रशियाच्या परिस्थितीवर आधारलेला होता. शें. ८० टक्के लोक निरक्षर; आणि ग्रामीण जनता व नागरी जनता यांचें प्रमाण १०:१–ही रशियाची परिस्थिति युरोपियन क्रांतीसाठीं गृहीत धरलेली होती.

त्या संस्थेकडे अर्ध्या आशिया खंडाची हुकूमशाही आलेली होती. तिचा अंमल युरोपमध्यें पसरण्यासाठीं बुद्धिवादी लोकांची गरज नव्हती, तर डोळे मिटून आज्ञा ऐकणाऱ्या निष्ठुर नोकरवर्गाची गरज होती. त्यांच्यामध्यें पाश्चात्य "बुद्धिजीवी वर्गाचें" जे थोडे सभासद घेतले गेले, त्यांचा विचार-स्वातंत्र्याचा हक्क प्रथम गेला, आणि नंतर विचार-स्वातंत्र्याची इच्छाहि मावळली. ते पक्षाचे कट्टर सेवक बनले, आणि त्यांच्यापैकीं जे थोर लोक होते, त्यांचा शोचनीय अंत झाला. जर्मनीमध्यें क्रांति आटोक्यांत आलेली दिसत होती. पण तेथील क्रांतिकारक "बुद्धिजीवी वर्गाचा" शेवट फारच शोचनीय झाला. लक्झेंबर्गचा खून झाला. पॉल लेव्हीची कम्युनिस्ट पक्षांतून हकालपट्टी झाली व नंतर त्यानें आत्महत्त्या केली. रूथ फिशर हिचीहि तशीच हकालपट्टी झाली आणि शेवटीं तिचा अंत अज्ञातवासांत झाला. टॉलरनें न्यूयॉर्कमध्यें स्वतःला गळफांस लावला. म्यूसॅम याची नाझीच्या लष्करी तुरुंगांत कत्तल झाली. आणखी कित्येक जर्मन क्रांतिकारकांचीहि अशीच वाट लागली.

परंतु या क्रांति-कार्यांत पाश्चात्य "बुद्धिजीवी वर्गाचा" समूह कधींच समाविष्ट करण्यांत आला नाहीं. त्याची गरजच क्रांति-नेत्यांना वाटली नाहीं. हे पाश्चात्य बुद्धिजीवी लोक क्रांतीचे सह-प्रवासी म्हणून राहिले. एखाद्या चौचाकी गाडीला पांचवें चाक जोडावें, तसें. या संक्रमण-कालांतील बुद्धिजीवी वर्ग वेजबाबदार होता; कारण त्याला जबाबदारीच्या जागेवरून काढून टाकण्यांत आलें होतें. ते पोकळ अंधारांत, सांदीकोपऱ्यांत कुडकुडत पडले, आणि मध्यम वर्गाचे मोडके अवशेष बनले. यांत दोष कोणाचाच नाहीं. कारण ते आरसा होते–प्रकाश नव्हते.

मी कोणाला अपराधी ठरवीत नाहीं किंवा कोणाच्या अपराधावर सारवा-सारवहि करीत नाहीं. "बुद्धिजीवी वर्ग" हा समाज–पुरुषाचा एक अवयव आहे–अत्यंत संवेदनक्षम अवयव आहे. जेव्हां शरीर रोगी बनतें, तेव्हां त्याची

कातडीहि खराब होते. "बुद्धिजीवी वर्गाचा" अधःपात हा समाजाच्या रोगटपणाचें एक चिन्ह होय. प्रशासक वर्ग भ्रष्ट झाला किंवा कामगार वर्ग निद्रिस्त राहिला तर तें जसें समाजाच्या रोगटपणाचें चिन्ह आहे—तसेंच हेंहि आहे. "बुद्धिजीवी वर्गाची" एकीकडे हेटाळणी करायची आणि त्याचें कृति-स्वातंत्र्य हिरावून व्यावयाचें आणि दुसरीकडे त्याच्या डोक्यावर अपयशाचें खापर फोडायचें हा एक मूर्खपणा तरी आहे किंवा कांहीं डावपेंच तरी आहे. नाझीवादानें जेव्हां युरोप खंडांतील "बुद्धिजीवी वर्ग" उध्वस्त केला, तेव्हां आपण काय करीत आहोंत, याची त्याला पूर्ण जाणीव होती.

५. बुद्धिजीवी वर्ग व मति-विभ्रम

बहुसंख्य जनता आपला आचार व विचार परंपरागत पद्धतीनें चालवीत असते. जो कोणी आपले आचार-विचार स्वतंत्रपणें ठरवितो, त्याला सहजपणेंच अशा समाजाचा विरोधक मानण्यांत येतें. अल्पसंख्य गटांत असणें हीच स्थिति मति-विभ्रमाला पुरेशी आहे. स्वतंत्र बुद्धीचा माणूस व विक्षिप्त माणूस यांमध्यें अंतर एका पायरीचेंच असतें. तें अंतर तोडण्यास विरोधी समाजाचें दडपण कारण होतें.

एखाद्या नृत्य-समारंभांत एक माणूस खोकला कीं, प्रत्येकजण खोकूं लागतो आणि प्रत्येकाला आपला घसा खवखवत आहे असें वाटूं लागतें. समाजांतील ही अनुकरण-बुद्धि ही एक मोठी शक्ति आहे. तिला विरोध करणें म्हणजे आपल्या सामाजिक परिस्थितीविरुद्ध बंड करणें होय. याचा परिणाम मज्जातंतूचा बिघाड होण्यांत व गुन्हेगारीची भावना निर्माण होण्यांत दिसून येतो. तत्त्वतः एखादा माणूस हजारदां बरोबर असेल, पण तरीहि आपल्या अंतर्मनांत दडून बसलेल्या वाईट परंपरेला विरोध केला कीं, "आपण अपराधी आहोंत," अशी भावना निर्माण होते. समाजाशीं भांडणें म्हणजे आपल्या मनांतील सामाजिक कल्पनांशींच भांडणें होय. त्यामुळें आपलें व्यक्तित्व दुभंगतें. सर्वज्ञता व न्यूनगंड, भित्रेपणा व उद्धटपणा, इत्यादि मानसिक विकृति दिसूं लागतात. मेंदूचा तोल बिघडल्याचीं हीं सारीं उदाहरणें आहेत. बुद्धिजीवी वर्गाला वरच्या वर्गांचा आधार नसेल तर तो आपल्या कोत्या जगांत फिरत राहातो व बौद्धिक मंथन करीत बसतो. गेल्या दहा वर्षांत बुद्धिजीवी वर्ग हेंच करीत आला. अशा वेळीं विचार-स्वातंत्र्याचें ध्येय उराशीं न बाळगणारा असा बाजार-बुणग्यांचा

कळप गोळा होऊं लागतो, आणि तो खऱ्या विचारवंतांच्या सैन्याला हळुहळू खाऊन टाकतो.

खऱ्या विचारवंतांनाहि मति–विभ्रमाचा विकार जडतो. अविवेकी समाजांत विवेकपूर्ण योजनाहि सफल होऊं शकत नाहींत. उदाहरणार्थ, विवाह–संस्था घ्या. तिच्यामुळें समाजांत किती दुःख पसरलें आहे ! म्हणून "अनिर्बंध मैत्री," "परस्पर–संमतीनें विवाह"–इत्यादि प्रयोग चालू आहेत. पण त्या सर्वांचा शेवट शोचनीय होत आहे. "अनिर्बंध प्रेम" या शब्दांना भलता अर्थ आला आहे. बाह्य व आंतरिक परिस्थितीचें दडपण प्रचंड आहे. त्यामुळें नैसर्गिक प्रवृत्ति नियंत्रित होतात. लेखनांतहि त्याचें प्रतिबिंब दिसून येतें. एखादा लेखक, "जें सहज व नैसर्गिक, तें तसेंच दाखवावयाचें." अशी प्रतिज्ञा करून लिहावयास बसतो, पण थोड्याच वेळांत त्याच्या कपाळावरून घामाच्या धारा वाहूं लागतात, त्याचे डोळे गरगरां फिरूं लागतात, आणि त्याच्या टांकाचें निब मोडूं लागतें. कारण त्याला सहज व नैसर्गिक लिहिणें जमत नाहीं.

परिस्थितीनें माणसाचें वर्तन जसें नियंत्रित होतें, तसेंच कलेचें स्वरूपहि. या परिस्थितीला कोणी आव्हान देऊं शकेल; पण त्यासाठीं त्याला किंमत द्यावी लागेल. आणि ती किंमत म्हणजे मानसिक विकृति. दुसऱ्याला श्रीमंत करण्यासाठीं आपण प्राप्तीवरील कर भरावा, त्याप्रमाणें बुद्धिजीवी वर्गाला ही अपराधीपणाची भावना सोसावी लागते. शस्त्रास्त्रांच्या कारखानदारांचें मन पूर्ण स्वच्छ असूं शकेल; पण शांततावादी माणसाच्या डोळ्यांत अपराधीपणाची भावना तरळत नाहीं, असें उदाहरण मला तरी आढळलें नाहीं.

"हे बुद्धिजीवी लोक विक्षिप्तच असतात." अशीं नांवें ठेवणारीं माणसें, खाणीमध्यें काम करणारांना क्षयरोग होण्याचा संभव आहे, असेंहि पुकारतील. ते त्या उद्योगाचे अपरिहार्य व आनुषंगिक परिणाम आहेत, हें ध्यानांत घेतलें म्हणजे, त्याबद्दल लज्जा किंवा तिटकारा वाटणार नाहीं.

६. बुद्धिजीवी वर्ग व भवितव्य

युरोप-खंडांतील जुना, उदारमतवादी व समाजवादी वर्ग आतां शिल्लक राहिलेला नाहीं. "संस्कृति हा शब्द माझ्या कानीं पडला कीं, मी माझें पिस्तुल उडवितों." अशा अर्थाचें कवन जर्मनीच्या राजकवीनें केलें होतें. तें साकार करण्यांत नाझीवादाला यश मिळालें. तें कसें मिळालें हें आपल्याला सांगतां

येत नाहीं. कदाचित् तेथें नवा बुद्धिजीवी वर्ग भूमिगत राहून काम करीत असेल—बर्फाखालीं बीजाला नवा अंकुर फुटत असेल. वर्तमानपत्रांतील लेख, नभोवाणीवरील भाषणें—इत्यादि सारें ऐकूनहि आपल्याला ब्रिटिश खाडी-पलीकडील लोकांची मनःस्थिति, मंगळावरील लोकांइतकीच, माहीत असते. युरोपांतील लोक आपल्या भूत-वर्तमान-भविष्याबद्दल काय कल्पितात—बोलतात—इच्छितात—याचें आपल्याला कांहींच ज्ञान नाहीं. फ्रान्समधून जें साहित्य येतें, तें मोठेंसें आशादायक नसतें. तरीहि माझा असा विश्वास आहे कीं, फ्रान्स, इटाली, बाल्कन्स, ऑस्ट्रिया, नॉर्वे—या देशांत एकादी नवी चळवळ शिजत असावी. आयुष्याकडे पहाण्याचा असा नवा दृष्टिकोन निर्माण होत असावा कीं, त्यामुळें आपण सारे मागील पिढींतील ठरूं, आणि "ऐतिहासिक पुरुष" म्हणून मिळावयाचा, तेवढाच काय तो मान आपल्याला मिळेल.

अर्थात् हें सारें भविष्य आहे आणि तेंहि १०—२०—३० वर्षांनंतरचें. ऐतिहासिक दृष्ट्या कोणत्या मार्गानें आपण जात आहोंत याची आपल्याला थोडी-फार कल्पना असते, पण त्या मार्गावरील वळणा-वांकणांचा आपणाला कांहींच पत्ता नसतो. शेवटीं व्यवस्थापक सरकारांचा (Managerial superstates) काळ येणार असला, तर बुद्धिजीवी वर्गाला उच्च अधिकारपदें खास मिळतील. रशिया-मध्यें गेल्या वीस वर्षांत हें मोठ्या प्रमाणावर घडलें आहे; आणि जर्मनीहि गेल्या दहा वर्षांत त्याच मार्गानें चालत आहे. रशियांतील प्रकाशन-संस्था, नाट्य-गृहें, बांधकामाचीं मंडळें, संशोधनाच्या प्रयोगशाळा, विद्यापीठें व वैद्यकीय संस्था—हीं सर्व सरकारी मालकीचीं आहेत. तेथील लेखक, नट, शिल्पशास्त्रज्ञ, विज्ञान-शास्त्रज्ञ-हे सारे वस्तुतः सरकारी नोकरच आहेत. तेथील वाङ्मयीन चळवळीहि पक्षाच्या परिषदांनीं व सरकारी प्रवक्त्यांनीं आंखून दिलेल्या मार्गांनीं चालतात. काव्य, नाटक, स्थापत्य, चित्रपट, इतिहास-संशोधन, तत्त्वज्ञान हें सारें, कमी-अधिक प्रमाणांत, सरकारी नियंत्रणाखालींच आहे. त्यामुळें रशियांतील तात्त्विक व कलात्मक चळवळींची प्रगति, "दहिने रुक्—आहे रुक्—जैसे थे!" अशा फौजेंतील हुकुमांप्रमाणें, सरकारी तालावर होत असते. जर्मनीमधील सांस्कृतिक कार्यहि याच नमुन्याचें.

अशी हुकमे-हुकूम स्थिति इंग्लंडसारख्या देशांत पुढेंमागें येणें कठीण असलें, तरी अगदीं अशक्य नाहीं. निरनिराळ्या मार्गांनीं एकाच मुक्कामाला पोंचणें शक्य आहे. चालू महायुद्धांत इंग्लंडमध्यें सर्व राष्ट्राचें लष्करीकरण झालें, ही त्या नोकरशाही सरकारची 'रंगीत तालीम'च नव्हे काय? गेल्या दोन वर्षांत

इंग्लंडमधील बहुतेक बुद्धिजीवी लोक हंगामी सरकारी नोकर म्हणून, माहिती-खात्यांत, प्रसिद्धि-खात्यांत किंवा ब्रिटिश नभोवाणीवर घेतले गेले. तूर्त तरी "नोकरी" व "लेखन" हे भिन्न ठेवलेले आहेत. पण त्या लेखनाची अवस्था दिवसेंदिवस क्षयरोग्यासारखी होत आहे. त्या दोघांचें मीलन होण्याची शक्यता आहे. मग बुद्धिजीवी वर्गाच्या सर्व शक्ति एकाच दिशेनें—नोकरीच्याच मार्गानें वाहूं लागतील. कांहीं थोडे लोक नवा मार्ग आंखतील—बरेचजण त्यांच्या पाठोपाठ जातील, आणि त्या सर्वांना असें वाटेल कीं, आपण आपल्या वैयक्तिक प्रेरणेनुसार वागत आहों. पण खरोखर पहातां, नव्या सरकारनें निर्माण केलेल्या समाजरचनेनुसारच ते वागत असतील.

हें संकट फार मोठें आहे. कारण प्रतारणा हीहि निष्ठेसारखीच भासूं लागते आणि मग मन पूर्ण स्वच्छ राहतें. ज्यांना आपली बौद्धिक निष्ठा प्रामाणिकपणें पाळावयाची असते, त्यांच्या कपाळीं दुःखें ठेवलेलीं. तीं टाकून, सरकारी कामें हुषारीनें करण्याचें समाधान व सुख मिळविण्याचा मोह मोठा आहे. क्रांतिकारक चळवळीचा नाश झाल्यामुळें बुद्धिजीवी वर्ग बचावाच्या भूमिकेंत आहे. यापुढें त्याला "भाडवलशाही का क्रांति?" हा प्रश्न पडणार नसून "लोकशाही व मानवता याचीं कांहीं थोडीं मूल्यें वांचवितां येतील का त्या सर्वांचा सत्यानाश पहावा लागेल?" हा प्रश्न त्याच्यापुढें कांहीं वर्षें दत्त म्हणून उभा राहील. ही दुरवस्था टाळण्यासाठीं, बुद्धिजीवी वर्गानें आपलें "विचार—स्वातंत्र्याचें निशाण" घट्ट धरून ठेवलें पाहिजे.

हें निशाण सध्यां तरी फारसें लोकप्रिय नाहीं. त्याच्या कापडावर हुतात्म्यांचे रक्तबिंदु साडलेले आहेत व त्याजवळच इतरांच्या तुच्छतेची थुंकीहि पडलेली आहे. यामुळें एका अर्थानें तें असामान्य आहे.

जगाचा गाळ

आपल्या जुन्या शाळेंतील वार्ता व गप्पा आपल्या कानीं अधूनमधून पडाव्यात, त्याप्रमाणें माझ्या पूर्वीच्या 'लष्करी तुरुंगां'—(Concentration Camp) तील बातम्या व वदंता वेळोवेळीं माझ्या कानावर पडतात. युरोपखंडांतील ती एक विशेष गाजलेली 'छावणी' होती. तेथें राहून जे लोक बाहेर जिवंत आले, त्यांच्यामध्यें शाळा-सोबत्यांच्या प्रेमाचें नातें निर्माण झालेलें आहे. त्या प्रेमाचीं बाह्य चिन्हें म्हणजे कोणाच्या शरिरावर जखमा आहेत, तर कोणाच्या पोटांत काळपुळी निघाली आहे, नाहीं तर, निदान चितेचा हृद्रोग तरी पाठीशीं लागलेला आहे. आतां त्या छावणींतून ज्या बातम्या ऐकूं येतात त्या कोणत्या म्हणाल, तर "छावणींत कुजत पडलेला 'अ' हा आतां ग्लासगोमध्यें दंत-वैद्याचें दुकान थाटून बसला आहे." अशा स्वरूपाच्या नसतात; पण "घोट्यांत बंदुकीची गोळी लागलेला 'अ' यानें, ३४ नंबरच्या खोलीसमोरील संडासांत स्वतःला गळफांस लावून आत्महत्या केली." अशा स्वरूपाच्या त्या बातम्या असतात.

मला अगदीं अलीकडे कळलेल्या बारीकसारीक बातम्या एका इंग्रज गृहस्थानें आणलेल्या होत्या. तो थोड्याच आठवड्यांपूर्वी या देशांत आलेला आहे. फ्रान्सचा पाडाव होण्याच्या वेळीं, त्याला माझ्या जुन्या 'लष्करी तुरुंगां'त ठेवण्यांत आलें होतें. मी त्या छावणींतून बाहेर पडल्यावर पांच महिन्यांनीं हा इंग्रज माणूस तेथें डांबला गेला. तो त्या छावणींत एक वर्षभर होता. त्या छावणींत माझे जे मित्र अद्याप जिवंत आहेत, त्यांची हालहवाल या इंग्रज गृहस्थानें आणली. एका रोगाच्या सांथींत तेथील संडासांत जी दुर्गंधि सुटली होती, झोंपडींतील ओलसर गवताचा जो वास मारीत होता आणि तेथेंच वर्षानुवर्षं कुजणाऱ्या-सडणाऱ्या माणसांची जी घाण येत होती, त्या सर्वांची मला पुनः आठवण झाली. ती वखवखलेली भूक, ती कडाक्याची थंडी, ती उग्र धास्ती-सारें सारें कांहीं माझ्या डोळ्यापुढें उभें राहिलें. छावणींतील छळामुळें बंदिवानांना वेड लागे, त्याच्या आदले दिवशीं त्यांच्या डोळ्यांत दिसणारा भाव मला आठवला आणि तसाच आठवला, बंदिवानाला हातकड्या घालतांना फ्रेंच शिपायाच्या डोळ्यांत उमटलेला भाव.

आमची छावणी फार गाजलेली होती, असें मीं म्हटलें आहे. तिचें नांव

हा लेख लंडनच्या 'इव्हनिंग स्टॅंडर्ड'मध्यें १९४२ च्या जूनमध्यें प्रथम प्रसिद्ध झाला.

ली व्हर्नेट' असें आहे. तेथील शिस्त मोठी कडक असे. इतर छावण्यांतील कैद्यांना शिक्षा म्हणून या छावणींत पाठविलें जाई. 'पिरीनीज्' डोंगराच्या उत्तरेकडे उभारलेली ही जणुं कांहीं 'यम-पुरीच' होती. ती प्रथम उभारली गेली स्पॅनिश युद्धाच्या वेळीं. या दुसऱ्या महायुद्धाची नांदी म्हणजे हें स्पेनचें युद्ध. त्यांत लोकसत्ताक स्पेनचे जे सैनिक पराभूत होत, त्यांना फ्रान्सचा पाहुणचार देण्यासाठीं ही छावणी उघडण्यांत आली. आरंभीं त्या छावणींत केवळ खंदक होते—थंडीनें गोठलेल्या जमिनींत ते खंदक खणलेले होते. त्यांत पराभूत स्पॅनिश सैनिकांना फेंकले जाई. आंतील जखमी सैनिक मरून जात आणि धडधाकट असतील ते आजारी पडत.

छावणींतील पहिलें बांधकाम म्हणजे कांटेरी तारांचें कुंपण—आणि त्याच्या-जवळच एक स्मशान-भूमि! त्या स्मशान-भूमींत पहिल्या रांगेमध्यें जे लांकडी 'क्रॉस' आहेत, त्यांतील बहुतेकांवर नांवें आहेत स्पॅनिश सैनिकांचीं. हीं नांवें कांहीं कोणीं तेथें खोदलेलीं नाहींत—तर कोणा जोसनें किंवा डीगोनें अथवा जीसस्नें आपल्या खिशांतील चाकूनें लांकडावर ओरखडलेलीं आहेत: "तुम्हांला जिवंत जाळावें असें फॅसिस्ट सरकाराला वाटत होतें, पण फ्रेंचांनीं तुम्हांला शांततेनें गोठून-गारठून मरण्यास सुभा दिली आहे."

नंतर कांहीं लांकडी झोंपड्या बांधण्यांत आल्या. प्रत्येक झोंपडींत २०० माणसें राहावयाचीं होतीं. प्रत्येकाच्या वांट्याला २१ इंच रुंद जागा येई. पण जेव्हां या झोपड्यांचें बांधकाम पुरें झालें, तेव्हां त्यांतील सर्व कैद्यांना तेथून उठविण्यांत आलें. कारण एका 'चौकशी-मंडळानें' पहाणी करून असें ठरविलें कीं, ही जागा मानवी जीवांना वस्ती करण्यास योग्य नाहीं. त्यामुळें कांहीं महिने तेथें उंदीर आणि ढेकूण यांच्याशिवाय दुसरें कोणीच वावरत नव्हतें. पण एकाएकीं महायुद्ध भडकलें. आणि मग काय? सर्व युरोपखंडांतून आलेल्या माणसांच्या चित्रविचित्र जमावानें ती सर्व छावणी भरून गेली. 'जगाचा गाळ' अशी पदवी त्या माणसांना फ्रेंच वृत्तपत्रांनीं औदार्यानें बहाल केली.

त्या छावणींत आलेलीं हीं माणसें कोण होतीं? "जागतिक पथकांतील" कांहीं माणसें त्यांत होतीं, तर कांहीं माणसें फॅसिझमच्या राजवटीखालीं आलेल्या नाना देशांतून राजकीय कारणासाठीं हद्दपार झालेलीं होतीं. युद्धाच्या प्रारंभा-पासून जे फ्रेंच लोक बॉने-लावा धोरणाचे पुरस्कर्ते होते, त्यांनीं हिटलरविरोधी लोकांची गठडी वळण्याचें ठरविलें. युद्धांतील तें आपलें आद्य कर्तव्य होय, असें त्यांनीं मानलें. आपलें हें धोरण जनतेला रुचकर वाटावें, म्हणून या

"गाळामध्यें" सुमारें शें. २० अट्टल गुन्हेगार ठेवण्यांत आले.

पण उरलेले शें. ८० लोक जरी त्या उकिरड्यावर फेकले गेले होते, तरी ते हिटलरचे कट्टे विरोधक १९३० सालापूर्वीपासून होते. त्यांनीं मुसोलिनीच्या राजवटींतील हाल भोगले होते. बुखारेस्ट, डाचाव इत्यादि ठिकाणच्या यम-यातना त्यांनीं भोगल्या होत्या. व्हिएन्ना व प्राग येथें त्यांनीं नाझी-विरोधी पत्रकें गुप्तपणें छापलीं होतीं आणि स्पेनमधील युद्धाच्या नांदींतहि त्यांनीं शौर्यानें भाग घेतला होता. अशा लोकांपैकींच मी एक होतों. म्हणून त्या "लष्करी तुरुंगांत" माझी रवानगी झालेली होती. तेथें जडलेल्या स्नेहसंबंधांचा मला अभिमान वाटतो.

तेथून माझी मुक्तता १९४० च्या जानेवारींत झाली. त्यानंतर तेथें काय घडत होतें, याच्या पुसट पुसट बातम्या माझ्या कानीं येत. पण अधिकृत वृत्त असें मला पहिल्यानेंच मिळालें, तें या तरुण इंग्रज गृहस्थाकडून. त्या 'लष्करी तुरुंगांतून' मी बाहेर पडल्यानंतर पांच महिन्यांनीं त्याला तेथें ठेवण्यांत आलें होतें. त्याचे नातलग अजून फ्रान्समध्यें आहेत. म्हणून मी त्याला "मर्डोक" या टोपण नांवानेंच संबोधीन. पॅरिस शहर जर्मनांनीं काबीज केल्यावर थोड्याच दिवसांत या इंग्रज तरुणाला पकडण्यांत आलें होतें व व्हीम्सजवळील एका लष्करी तुरुंगांत डांबण्यांत आलें होतें. त्या तुरुंगांतून त्यानें पळ काढला आणि जर्मनांच्या ताब्यांत न गेलेल्या फ्रेंच मुलखांत प्रवेश केला. परंतु विनापरवाना हद्द ओलांडल्याच्या गुन्ह्यासाठीं फ्रेंच सरकारच्या पोलिसांनीं त्याला पकडलें व 'संशयित असामी' म्हणून व्हर्नेटच्या तुरुंगांत पाठविलें. तेथें १९४० सालांतील जुलै महिन्याच्या प्रारंभीं तो हातकड्यांच्या साज-शृंगारासह जाऊन दाखल झाला.

व्हर्नेटच्या 'लष्करी तुरुंगांत' जो वार्षिक कार्यक्रम असे, तोच त्याच्या वांट्यास आला होता. तो ठरीव कार्यक्रम त्यानें मला निवेदन केला. तीन महिन्यांतच त्याचें वजन १५० पौंडांवरून १२० पौंडांवर घसरलें. सहा महिन्यांनंतर त्याला विषमज्वरानें पछाडलें. पण त्यांतून तो बचावला. दहा दहा वर्षें बंदिवासांत कंठावीं लागल्यामुळें ज्या कैद्यांची शक्ति नाहींशी होऊन गेलेली असे, ते अशा विषमज्वराला बळी पडून प्राणास मुकत.

बारा महिने झाले; आणि हा इंग्रज तरुण तेथील दीर्घकालीन यातनांना कंटाळला, व अल्पकालीन यातना सोसण्याचें त्यानें ठरविलें. त्यानें अन्न-सत्याग्रह पुकारला, आणि वीस दिवसांत तो यशस्वीहि झाला. मार्सेलस येथें जो वकील होता, त्यानें या अन्न-सत्याग्रहाचा गवगवा केला. त्यामुळें त्याला यश लाभलें. हें

यश अपवादात्मकच होय. नाहीं तर तेथील सर्वसामान्य कैद्याचें लक्षणच हें कीं, त्याची काळजी वाहाणारा कोणी वकील नसावयाचा कीं त्याचा पासपोर्टहि नसावयाचा. तो जगला काय आणि मेला काय—त्याची पर्वा कोणालाच नसे.

मर्डोकनें त्या 'लष्करी तुरुंगांत' प्रवेश केला, तेव्हां शस्त्र-संधीच्या तहाच्या अटी हवेवर तरंगत होत्या. त्या तहांतील १९ व्या भयंकर कलमाची वार्ताहि सर्वत्र पसरलेली होती. या कलमांत अशी योजना होती कीं, जर्मनींत जन्मलेल्या ज्या बंदिवानांची मागणी जर्मन अधिकारी करतील त्यांना जर्मन सरकारच्या ताब्यांत द्यावें. याचा अर्थ असा कीं, जे नाझी-विरोधी कैदी असतील, त्यांना गेस्टापो या जर्मन सैनिकांच्या हवालीं करावें.

असें असूनहि, जेव्हां शस्त्रसंधीच्या अटी प्रसिद्ध झाल्या, तेव्हां आमच्या 'लष्करी तुरुंगांत' कांहीं घबराट उत्पन्न झाला नाहीं. तेथील सारे कैदी एकत्र जमले आणि कमांडरकडे गेले. 'जर्मन लोक येण्यापूर्वीं आमच्यांतील थोड्या टळक व्यक्तींना मोकळे सोडा.' अशी विनंती त्यांनीं कमांडरला केली. त्यानें नकार दिला. त्याला आपल्या कामाचा कदाचित् तिटकारा वाटत असेलहि; पण त्याला महिना दहा पौंड पगार मिळत होता ना ? त्यावर तो पाणी कसें सोडील ? नंतर बंदिवानांच्या शिष्टमंडळानें अशी मागणी केली कीं, गेस्टापो सैनिक येण्यापूर्वीं तुरुंगाच्या कचेरींतील कागदपत्र नष्ट करावेत. हें कमांडरनें मान्य केलें. पण जेव्हां जर्मन सरकारचें कमिशन तेथें आलें, तेव्हां सर्व कैद्यांची यादी सायसंगीन तयार होती.

नाझींचें पहिलें कमिशन त्या तुरुंगांत जुलै महिन्यांत येऊन दाखल झालें, आणि तेथील दुःखद दृश्यांना हंसरा मुखवटा चढविण्यांत आला. कमिशन येण्यापूर्वीं दोन दिवस, कमांडरच्या हुकुमानें, साफसफाईसाठीं जोराची धांवपळ सुरू झाली. झोंपड्या निर्जन्तुक करून स्वच्छ ठेवण्यांत आल्या. तसेच संडासहि. गवती छपर बदलण्यांत आलें. कमिशन दाखल होतांच, छावणींतील सर्व कैद्यांना कवायतीच्या मैदानावर तपासणीसाठीं रांगेनें उभें करण्यांत आलें. त्यांत गैरहजर होते फक्त तेच कीं, ज्यांनीं आत्महत्या करण्यासाठीं स्वतःस गळफांस लावून घेतला होता किंवा आपल्या शिरा वेळींच तोडून टाकल्या होत्या. तेथें कैदी तासन् तास उभे होते. राष्ट्रवारीनें त्यांचे गट पाडलेले होते. सर्वजण अंग धुऊन व केंस विंचरून आलेले होते. त्यांचे कान, नखें—सारें कांहीं स्वच्छ ! सर्वजण लष्करी शिस्तींत उभे—! जणुं कांहीं खाटिकाची वाट पहाणारीं कोंकरेंच !

कमिशनमध्यें सोळा तरतरीत जर्मन अधिकारी निरनिराळ्या गणवेषांत होते. त्यांत गेस्टापो सैनिकहि होते. गुरांच्या बाजारांत खाटिक लोक जनावरांवर जशी नजर

फिरवितात, तशी त्या अधिकाऱ्यांनीं त्या कैद्यांची कवायत पाहिली. त्यांच्याबरोबर आलेले फ्रेंच सैनिक व अधिकारी सस्मित मुद्रेनें चमकत होते.

आपल्या हक्काचा "पौंडभर मांसाचा तुकडा" घेण्यासाठीं जर्मन अधिकारी घाई करीत नव्हते हें विशेष. पुढील कांहीं महिन्यांमध्यें, राजकीय दृष्ट्या महत्वाचे असणारे कैदी तेथून हलविण्यांत आले; पण ते तिघांतिघांच्या, पांचापांचांच्या छोट्या-छोट्या गटानें, आणि अशा कैद्यांची संख्या तिसाच्या आंतच होती. त्यांमध्यें जर्मन कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे कांहीं सभासद होते. नाझींच्या अत्याचारांचीं निळीं पुस्तकें प्रसिद्ध करणारे कांहींजण होते. जर्मनीचा प्रचार-पटु गोबेल्स याच्या तोडीला तोड असा रशियाचा जो प्रकाशनाधिकारी म्युझेनबर्ग, त्याचा चिटणीसहि या कैद्यांत होता. तो माझा जीवश्चकंठश्च मित्र होता. म्युझेनबर्ग हा अरण्यांत फांशीं गेल्याचें पुढें आढळून आलें. पण त्यानें आत्महत्त्या केली कीं त्याला ठार मारण्यांत आलें हें सिद्ध झालेलें नाहीं.

या बंदिवानांना आपल्या ताब्यांत घेण्याची नाझींना मोठीशी उत्कंठा होती असें दिसलें नाहीं. अव्वल दर्जाचे पुढारी तेवढे त्यांना हवे होते. बाकीचे त्यांच्या खिजगणतींत नव्हते. कदाचित् नाझींना असें वाटत असावें कीं, आतां सारा युरोप आपल्या मुठींत आला आहे; आतां हे भिकारडे आपल्याला काय उपद्रव देणार? मजूर मिळविण्यामागें ते लागले होते. खाणी, गिरण्या, तटबंदी इत्यादि कामांवर मजुरांची भरती करण्यासाठीं ली व्हर्नेट येथें स्वतंत्र कचेरीच उघडलेली होती. सीगफ्रीड तटबंदी उभारणारा टॉड याच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन हें मजूर-भरतीचें काम करीत होतें. हा टॉड नुकताच मरण पावला. मजुरांची चणचण त्यांना इतकी तीव्रतेनें भासत होती कीं, कोणी कोणत्याहि राजकीय पक्षाचा असो, त्याला ते नोंदवून घेत. मात्र तो उमेदवार आर्य-वंशाचा असला पाहिजे; आणि वैद्यकीय दृष्ट्या लायक व काम करण्यास राजी असला पाहिजे. रोजीं तेरा शिलिंग अशा लठ्ठ पगाराचें आश्वासन त्यांना देण्यांत येई.

एक हजाराहून अधिक हताश माणसांनीं टॉड कमिशनकडे आपलीं नावें नोंदविलीं. त्यांतील बहुतेक जण गुन्हेगारच होते—कोणत्याहि राजकीय पक्षाशीं संबंध असणारे नव्हते. "जागतिक पथकांतील" सर्वच्या सर्व सभासदांनीं नांवें देण्याचें नाकारलें. त्या वेळीं पुढील संवाद झाल्याचें माझ्या कानीं आलें आहे.

कमिशन—"तुला जर्मनीस परत जाण्याची इच्छा आहे का?"

बंदिवान—"अलबत्! आनंदानें मी जर्मनीस परत जाईन. पण—थेलमन् तेथील अध्यक्ष झाला तर."

थेलमन् हा जर्मन कम्युनिस्ट पक्षाचा नेता. तो १९३२ सालापासून तुरुंगांत आहे. आश्चर्य असें कीं, या मुलाखतीनंतर त्याला कांहींच करण्यांत आलें नाहीं.

दुसऱ्या सुमारें एक हजार बंदिवानांना फ्रेंच अधिकाऱ्यांनीं, बळजबरीनें जहाजांत बसवून, उत्तर आफ्रिकेंत पाठविलें. सहारा मैदानांतील रेल्वेच्या कामावर जे गुलाम काम करीत आहेत, त्यांमध्यें त्यांना गोंवण्यांत आलें. अशा हद्दपारीची धास्ती छावणींतील बंदिवानांना जितकी वाटे, तितकीच जर्मनीस रवानगी होण्याचीहि वाटे. हद्दपारीसाठीं कैद्यांची निवड होई, ती स्वैरपणें केलेली दिसे. कोणाची पाळी केव्हां येईल हें कोणासच माहीत नसे.

पत्रांची तपासणी कडक असली तरी त्या "लष्करी तुरुंगांत" आफ्रिकेहून पत्रें येत, आणि तेथील गुलामांच्या छळाची कहाणी त्यावरून कळून येई. मोरोक्को येथील गुलाम चिलटांसारखे पटापट मरत. कारण तेथें खाणें थोडें, काम फार आणि हवा प्राणघातक—त्यांतच रोगाची सांथ पसरलेली. अशा हद्दपार कैद्यांबरोबर बंदरापर्यंत गेलेला एक फ्रेंच सैनिक मर्डोकला असें सांगत होता कीं, "आम्हीं त्या सर्व बंदिवानांना हातकड्या घातलेल्या होत्या. पण ते शांत राहात नसत. धांवत्या आगगाडींतून एकानें खिडकींतून उडी मारण्याचा प्रयत्न केला. मी त्याची विजार वेळींच घट्ट पकडली. तथापि जहाजावर चढवीपर्यंत सह बंदिवानांनीं आमच्या हातांवर तुरी दिल्याच. कैद्यांना जहाजावर चढविल्यानंतर आम्हीं त्यांना एके ठिकाणीं कोंडून घातलें; व मशिनगन्चा पहारा चालू केला. मग मात्र त्यांनीं आम्हांला कांहीं त्रास दिला नाहीं." मर्डोक जेव्हां बंधमुक्त झाला, तेव्हां त्याला मार्सेलसला नेऊन सोडतांना एका फ्रेंच सैनिकानें हा आपला पराक्रम फुशारकीनें त्याला निवेदन केला.

गेस्टापोच्या जबड्यांत लोटलें जाणें किंवा सहारा वाळवंटांत हद्दपार होणें—ही भीति रात्रंदिवस, आठवड्यांमागून आठवडे, महिन्यामागून महिने, त्या 'लष्करी तुरुंगांतील' बंदिवानांना सतत भेडसावीत होती. त्यांना भविष्यकाळाची कांहींच आशा नव्हती; आणि भूतकाळांत वर्षानुवर्षे लपून—छपून, पारध होण्याचें भय बाळगीत, त्यांनीं आयुष्य काढलेलें असल्यामुळें त्यांना भूतकाळ पुसटपुसट दिसत होता. आणि तरीहि दहा—बारा माणसांपेक्षां अधिकांना वेड लागलें नाहीं; आणि विसांहून जास्त माणसांनीं आत्महत्या केली नाहीं. बाकीच्या कैद्यांनीं आपलें मनोधैर्य टिकवून धरलें. एवढेंच नव्हे तर, कोणाचा विश्वास बसणार नाहीं पण, तुरुंगाचे अधिकाऱ्याविरुद्ध त्यांनीं रक्तशून्य क्रांतीचा झेंडा उभारला—आणि त्यांत ते फत्तेहि झाले.

त्या "लष्करी तुरुंगांतून" मी निघाल्यानंतर, तेथें दुसऱ्या छावणींतून "जागतिक पथकाचे" सुमारें सातशें सैनिक ठेवण्यांत आले होते. सर्व बंदिवानांचे ते आधारस्तंभ होते. त्यांनींच तुरुंगाधिकाऱ्याविरुद्ध बंडाचा बावटा उभारला. "ते तेथें नसते तर आम्ही सारे केव्हांच मरून गेलों असतों." असें मला माझ्या बातमीदारानें सांगितलें.

१९४० च्या अखेरीस असंतोष धुमसूं लागला. त्यावेळीं तुरुंगांतील अन्न-टंचाई इतकी विकोपास गेली कीं, कैद्यांना प्रत्यक्ष उपासमारच सोसावी लागली. नऊ औंस वजनाची रोटी, सकाळीं अर्धा पिंट काळी कॉफी व दिवसभरांत एक पिंट रस्सा एवढेंच त्यांना खावयास मिळे. हें जें कांहीं अल्पस्वल्प अन्न छावणी-पर्यंत येई, त्यांतील बराचसा भाग तुरुंगाधिकारी चोरीत; किंवा काळ्या बाजारांत विकला जाई. त्यांतील कांहीं भाग श्रीमंत कैद्यांना भलभलत्या किंमतीस खाणावळीणबाई विकी. या बाईची एका लेफ्टनंटशीं खूप लगट होती आणि नफ्यांत दोघांची भागीदारी असे. कैद्यांच्या रश्श्यांतील बटाटे व मुळे चोरले जात आणि त्यांच्याऐवजीं सडलेले शलगम त्यांत घालीत. १९४० सालच्या डिसेंबर महिन्यांतील एके दिवशीं कैद्यांनीं एकजूट केली आणि सारे शलगम त्यांनीं खंदकांत पुरले; व ते एकसुरांत ओरडूं लागले, 'आम्ही भुकेले आहों;' 'आमच्या हक्कांना मान द्या.' हा ओरडा कित्येक तास चालू होता.

अखेर कमांडरची स्वारी तारेच्या कुंपणाच्या आंत आली. त्याच्या पाठीशीं भरलेल्या बंदुकी घेतलेल्या सैनिकांची पलटण खडी होती. कमांडर गरजला, "मी तीन आंकडे मोजीन. त्याच्या आंत तुम्ही येथून निघून गेलें पाहिजे."

१, २, ३—असे आंकडे कमांडरनें मोजले. पण काय? तेथून कोणीच हललें नाहीं. कमांडर गांगरला. त्यानें गोळ्या झाडण्याचा हुकूम दिला असता, तर हव्या तितक्या कैद्यांचे मुडदे त्यानें पाडले असते. पण त्याच्या पलटणींतील निम्मे सैनिकहि मारले गेले असते—आणि त्याचा परिणाम कदाचित् तो नोकरीला मुकण्यांत झाला असता. "काय करावें?" या संभ्रमांत कमांडर पडला असतांनाच एक सैनिक अदबशीर आवाजांत म्हणाला, "साहेब, आपण पुनः आंकडे मोजा ना!"

कमांडर आपल्या तुकडीसह मुकाट्यानें तेथून निघून गेला.

बंदिवानांचा हा पहिला विजय! तें सडलेलें शलगम फेकून देण्यांत आलें. धान्य वांटण्याच्या वेळीं त्याचें वजन तपासून पाहाण्यासाठीं कैद्यांचें 'प्रतिनिधि-मंडळ' नेमण्यांत आलें.

दोन महिन्यांनंतर, दोन बराकींच्या प्रतिनिधींना, आपल्याला कमी अन्न

मिळाल्याचें आढळून आलें. म्हणून त्यांनीं तें घेण्याचें नाकारलें. नंतर मोठा गुंतागुंतीचा लढा सुरू झाला. त्या दोन बराकींतील बंदिवानांनीं अन्न-सत्याग्रह सुरू केला आणि त्यांच्या पाठोपाठ त्या तुरुंगांतील निम्या कैद्यांनीं त्यांचें अनुकरण केलें. हा सत्याग्रह चालू असतांना कैद्यांनीं नमुनेदार शिस्त पाळली आणि हिंसेचें एकहि कृत्य केलें नाहीं. एकाहि क्षोभकारक प्रसंगास ते बळीं पडले नाहींत. शिपायांनीं हल्ले चढविले तरी त्यांनीं त्यांचा प्रतिकार केला नाहीं. त्या सत्याग्रह्यांचें शस्त्र एकच—आणि तें म्हणजे स्वतःला अन्न नाकारून क्लेश सहन करणें. ते तासन्‌तास आपल्या दोनच घोषणा करीत होते—"आम्ही उपाशी आहोंत." व "आमच्या हक्कांना मान द्या." याचा परिणाम काय झाला?

जवळच्या खेड्यापाड्यांतील सैनिकांची पलटण गोळा करून कमांडरनें, आगाऊ सूचना न देतां, छावणीवर अकस्मात् हल्ला केला. त्यांना बंदिवान कांहींहि प्रतिकार करीत नव्हते. तरीसुद्धां त्या सैनिकांनीं आपल्या बंदुकींच्या दस्त्यांनीं त्या सत्याग्रह्यांना बडवून काढलें—आणि कोणते तरी कैदी, मनमानेल त्या रीतीनें पकडून, त्यांना फरफटत नेलें. अशा कैद्यांची संख्या एकशेंसहा होती. त्यांना स्थानिक तुरुंगांत डांबण्यांत आलें आणि रात्रभर बडविण्यांत आलें. नंतर मोठ्या तुरुंगांत त्यांची रवानगी झाली.

अशा प्रकारें आपला दरारा बसलेला पाहून कमांडरनें सत्याग्रह्यांच्या प्रतिनिधींशीं वाटाघाटी सुरू केल्या. त्यांत कमांडरनें बंदिवानांच्या सर्व मागण्या मान्य केल्या. या कमांडरनें ता. ६ फेब्रुवारी १९३४ रोजीं लोकसमुदायावर बेगुमान गोळीबार केला होता. अशा अधिकाऱ्यावर बंदिवानांनीं केवळ आत्म-बलाच्या जोरावर जो हा विजय मिळविला, त्याची मातब्बरी केवढी !

मर्डोक बंधमुक्त झाला, तेव्हां त्या तुरुंगांत दोन हजार कैदी उरलेले होते. कांहीं स्विस्, डच, बेल्जियन् कैदी आपापल्या देशीं पाठविण्यांत आले होते. एक हजाराहून अधिक कैदी टॉड-कमिशनच्या योजनेप्रमाणें जर्मनींत गुलामांप्रमाणें राबत होते. सुमारें आठशें जणांना आफ्रिकेंत हद्दपार करण्यांत आलें होतें. पण या सर्व वेळीं नवे नवे कैदी आणले जातच होते. त्यांतील बहुतेक जण फ्रान्सच्या संग्रामांत लढण्यासाठीं परदेशांतून आलेले होते. त्यांतील कांहींच्या शरिरांवर युद्धांतील जखमा होत्या, तर कांहींच्या अंगावर अलौकिक पराक्रम केल्याबद्दल पदकें चमकत होतीं. आतां मात्र त्यांना त्या तुरुंगांत रखडावें लागत होतें. तेथें दोन चिनी माणसेंहि आलेलीं होतीं. एक अबिसीनियन टोळीवालाहि तेथें होता. तो १९३५ सालीं इटालीच्या तुरुंगांतून पळून जाऊन मार्सेलस येथें राहिला होता.

पण त्याला "फासिस्ट-विरोधी" म्हणून पोलिसांनीं पकडलें होतें. व्हर्नेटच्या दवाखान्यांत तो क्षयानें मरण पावला.

जे खरेखुरे पंचमस्तंभी होते, त्यांतील तिघे—चौघेजणच त्या तुरुंगांत थोडा काळ राहिले. लिऑंडेग्रेल हा बेल्जियन पुढारी सतरा नंबरच्या कोटडींत कांहीं दिवस डांबलेला होता. आपला प्राण घेतला जाईल अशी त्याला भीति वाटत होती. पण त्याला सैनिकांनीं हातदेखील लावला नाहीं. तो जणुं कांहीं पारदर्शक कांच आहे, अशाच भावनेनें पोलिस त्याच्याकडे पाहात. शस्त्र-संधीवर सह्या होण्यापूर्वीच त्याची मुक्तता झाली होती. त्याच्या मुक्ततेची शुभवार्ता कमांडरनें स्वतः त्याला जाऊन सांगितली.

मात्र माझ्या जुन्या दोस्तांना नेण्यासाठीं एकहि मोटारगाडी आली नाहीं. त्यांच्यापैकीं जे तेथून बाहेर पडले, ते रुग्णशय्येवरूनच. मेरिओ हा एकच असा माणूस होता कीं, जो मोरोक्कोला हद्दपार झाला असतांनाहि, सुखरूप बंधमुक्त झाला. हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. तो आतां मेक्सिकोमध्यें आहे; आणि व्हर्नेट येथें लिहावयास घेतलेलें वेनेडेट्टो क्रोचेवरील पुस्तक पूर्ण करीत आहे. त्या "लष्करी तुरुंगांत" कोणी आपला दमा व निराशा सांगातीं घेऊन काळ कंठीत आहे; तर कोणी एकोणीस वर्षांचा मुलगा पत्रकें वांटण्याच्या गुन्ह्यासाठीं शिक्षांमागून शिक्षा भोगीत आहे. बारा कैद्यांनीं नोव्हेंबर महिन्यांत तुरुंगांतून पोबारा करण्याचा व्यूह रचला. त्यांच्यावर गोळ्या झाडण्यांत आल्या. कांहीं ज्यूहि तेथें आहेत.

मर्डोकनें तो तुरुंग सोडल्यानंतर मला अगदीं ताजी बातमी मिळाली, ती म्हणजे एका जागतिक भूतदयावादी संस्थेच्या गुप्त अहवालांतून.

"ली व्हर्नेट येथें रोगाची सांथ पसरली आहे. १९४१ सालच्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांत दररोज सरासरीनें दोन-तीन कैदी मरण पावत आहेत, कांहीं कैदी केवळ भुकेनें अन्न-अन्न करून प्राण सोडीत आहेत, तर कांहीं कैदी आरोग्याची हेळसांड झाल्यामुळें मरत आहेत. अगदीं शेवटची घटका आली म्हणजे त्यांना दवाखान्यांत टाकलें जातें. तेथें ते मोठ्या संख्येनं प्राण सोडतात."

हा १९४२ सालचा जूनचा महिना. आतां तेथें माझे किती सहकारी जीवंत असतील कोण जाणे! त्या कांटेरी तारांच्या कुंपणांतून ते बंदिवान, जवळच्या स्मशानभूमींत दिवसादिवसाला लांकडी क्रॉसच्या ज्या रांगांमागून रांगा उगवत आहेत, त्यांकडे टक लावून पाहात असतील. त्या स्मशानभूमींत मानवी कवट्यांचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शनच उघडलें आहे! इतिहास-कालांतील "धर्मयुद्धा"नंतर असे

थडग्यांचे जमाव क्वचितच दिसले असतील. आणि हेहि धर्मयोद्धेच नव्हेत का?

अस्तंगत होणाऱ्या युरोप-खंडाला अभिमानास्पद वाटावेत असे हे वीर मानवाच्या प्रतिष्ठेसाठीं झगडण्यांत अग्रसर होते. कोणी सांगावें, उद्यांचे इतिहासकार त्यांच्या कृत्यांचें संशोधन करतील, "जागतिक पथकाच्या" पराक्रमाची गाथा गातील आणि त्या माझ्या जुन्या 'लष्करी तुरुंगांतील' हकीकतींना वाचा फोडतील, तेव्हां ते त्या बंदिवानांच्या कपाळावरील

'जगाचा गाळ'

ही चिठ्ठी फाडून टाकतील, आणि तिच्या जागीं नवी चिठ्ठी डकवितील—

'जगाचा गाभा!'

अविश्वसनीय अत्याचार?

मला एक स्वप्न पडतें–नियमित वेळीं तें पुनः पुनः पडतें. तें स्वप्न असें कीं, चोहोंकडे अंधार पसरलेला आहे, आणि एका अरण्यांत–किंवा झाडींत–माझा खून होत आहे. दहा यार्डांच्या अंतरावर एक रस्ता आहे, आणि त्यावर माणसांची सारखी रहदारी चालू आहे. मी मदतीसाठीं किंचाळत आहें; पण त्याकडे कोणीच लक्ष देत नाहीं. माणसांची गर्दी रस्त्यावरून हसत–खिदळत व गप्पा छाटीत तशीच चाललेली आहे.

अशाच स्वरूपाचीं स्वप्नें पुष्कळ माणसांना पडतात, हें मला माहीत आहे. प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार त्यांत थोडाफार फरक असेल इतकेंच. या स्वप्नाची चिकित्सा मी पुष्कळ तज्ज्ञांकडून करून घेतली आहे. प्रचंड हिंसा व प्रत्यक्ष मृत्यु यांच्याशीं सामना देण्याचा प्रसंग आला म्हणजे कोणाहि व्यक्तीला एकाकी–पणाची भावना वाटूं लागते, पण त्या अनुभवांतील विचित्र भय दुसऱ्याला निवेदन करतां येत नाहीं. या संमिश्र मनोवृत्तीचें प्रतिबिंब म्हणजे वरील प्रकारचें स्वप्न. जर्मनीनें चालविलेल्या अत्याचारांचा आपण जो गवगवा करतों, तो किती कुचकामी आहे याचें प्रत्यंतर म्हणजे हें स्वप्न, असें मी मानतों.

कारण, अखेरीस, रस्त्यावरून हसत–खिदळत जाणारा जमाव कोणता? तर तुम्हीच. आमच्यापैकीं जे थोडे लोक त्या संकटांतून निसटलेले असतात, त्यांना त्या अत्याचारांच्या आठवणी भंडावून सोडतात, आणि म्हणून आम्ही नभोवाणी-वर किंकाळ्या फोडीत असतों–वृत्तपत्रांतून व जाहीर सभांतून, नाट्यगृहांतून व सिनेमागृहांतून आरडाओरड करीत असतों. आमचा आवाज तुमच्या कानापर्यंत वारंवार जाऊन पोहोंचतो, पण एक मिनिटभरच. कारण त्यावेळीं तुमच्या चेहेऱ्या-वर मला मूक विस्मय दिसून येतो, आणि तुमच्या डोळ्यांमध्यें अस्पष्ट उत्कंठा मला आढळते. तें दृश्य पाहिलें म्हणजे मी माझ्या मनाला सांगतों, "आतां तूं त्यांना पकडलें आहेस–आतां तूं त्यांना पकडून ठेव–घट्ट पकडून ठेव. म्हणजे ते जागृत राहातील." पण छेः! त्यांची जागृति क्षणापुरतीच. पावसांत भिजलेलीं चिमुकलीं गुबगुबीत कुत्रीं आपलें अंग झाडून पाणी झटकतात, त्याप्रमाणें तुम्ही लोक अंग झाडून जर्मन अत्याचारांच्या बातम्या मनाबाहेर फेकून देतां. तुमच्या

हा लेख 'न्यूयॉर्क टाईम्स मॅगॅझिन्' मध्यें १९४४ च्या जानेवारींत प्रथम प्रसिद्ध झाला.

मनाभोवतीं अशी एक तटबंदी उभी राहाते कीं, तिच्यामुळें आमच्या साऱ्या किंकाळ्या नि किंचाळ्या तुम्हांला ऐकूंच येत नाहींत. मग तुम्ही पहिल्यासारखे पुनः मजेनें हसत–बोलत रस्त्यानें चालूं लागतां.

गेलीं सुमारें दहा वर्षें आम्ही अशा किंकाळ्या फोडीत आहोंत. जर्मन पार्लमेंटला ज्या रात्रीं आग लागली, तेव्हांपासून आमची ही आरडाओरड चालू आहे. आम्ही पुकारा केला, "या ज्वाळा तुम्ही तात्रडतोब विझविल्या नाहींत तर त्या सर्व जगभर पसरतील." तेव्हां तुम्हांला वाटलें, आम्ही घाबरट आहोंत–वेडे आहोंत. आतां आम्हांला वेड लागलें आहे तें म्हणजे, युरोपमधील समस्त ज्यू लोकांची जी कत्तल होत आहे, ती जगाच्या कानावर घालण्याचें. कढत वाफेचे फवारे सोडून किंवा सबंध जमावाला विजेचे धक्के देऊन अथवा जीवंत जाळून आतांपर्यंत तीस लाख ज्यू लोकांना ठार करण्यांत आलें. लिखित इतिहासामध्यें ही सार्वजनिक कत्तल सर्वांत मोठी ठरेल. अशी कत्तल दिवसा–दिवसाला, नव्हे—तासा-तासाला चालू आहे–तुमच्या घड्याळाची टिक् टिक् जितक्या नियमितपणें चालू असते तशीच.

हें लिहीत असतांना, माझ्यापुढें, माझ्या टेबलावर, कांहीं छायाचित्रें आहेत. माझ्या लेखनांत तीव्र भावना व कडवटपणा आहे, याचें कारण तीं छायाचित्रें. तीं चित्रें पोलंडमधून चोरून बाहेर आणतांना कांहीं लोकांना प्राणास मुकावें लागलें–त्यांना त्यांचें महत्त्वच तितकें वाटलें. त्या अत्याचारांच्या घटना पत्रकांतून, पुस्तिकांतून, वृत्तपत्रांतून, मासिकांतून–आणि नाना साधनांनीं प्रकाशांत आणलेल्या आहेत.

पण परवांच एका सुप्रसिद्ध अमेरिकन पत्रकाराशीं माझी भेट झाली. त्यानें मला सांगितलें, "नाझींच्या अत्याचारांवर तुमचा विश्वास आहे काय?" असा प्रश्न करून आम्ही नुकतीच लोकमताची चांचणी घेतली, तेव्हां दहांपैकीं नऊ अमेरिकन नागरिकांनीं उत्तर दिलें, "हा सारा खोटा प्रचार आहे–त्यांतील एका शब्दावरहि आमचा विश्वास नाहीं." माझा स्वतःचाहि अनुभव असाच आहे. येथील सैनिकांपुढें तीन वर्षें मी व्याख्यानें देत आहें. त्यांचीहि वृत्ति अशीच असल्याचें मला आढळून आलें. जर्मनीच्या "लष्करी तुरुंगावर" त्यांचा विश्वास नाहीं, आणि तसाच ग्रीसमध्यें मुलें उपासमारीनें मरत आहेत, फ्रान्समध्यें ओलीस असलेले लोक ठार करण्यांत येत आहेत, पोलंडमध्यें थडग्यांचे थवेच्या थवे उठत आहेत–या साऱ्या सत्य घटनांवरहि त्यांचा विश्वास नाहीं. लिडिस, ट्रेब्लिंका किंवा बेलझेक यांचीं नांवेंहि त्यांनीं ऐकलेलीं नाहींत. त्यांची खात्री तुम्ही एक

तास बोलून पटवूं शकाल. पण त्यानंतर ते आपलें अंग झाडतात आणि त्यांच्या मनाभोंवतीं संरक्षणाची भिंत उभी राहाते. "सब झूट है" अशी भावना त्यांच्या मनांत एका आठवड्यांत पुनः घर करून राहाते. विजेच्या धक्क्यानें आलेली चेतना तात्पुरती ठरावी, तशी त्यांची अवस्था असते.

याच विचारानें मला आणि माझ्यासारख्या लोकांना पछाडलें आहे. याचा अर्थ उघड आहे कीं, आमच्या मनांत हा रोगट गंडच निर्माण झालेला आहे; आणि इतर लोक मात्र निकोप व नैसर्गिक मनःस्थितींत आहेत. पण वेड्या लोकांचें मुख्य लक्षण हें असतें कीं, त्यांचा सत्याशीं संबंध सुटतो, आणि ते कोणत्या तरी कल्पित जगांत वावरत असतात. म्हणून मला वाटतें, वस्तुस्थिति याच्या उलट असावी. म्हणजे आरडाओरड करणारे जे आम्ही लोक, तेच सत्य स्थिति जाणणारे व त्याप्रमाणें वागणारे बहुतकरून असूं, आणि सत्याशीं सामना देण्याचें धैर्य तुमच्या अंगीं नसल्यामुळें तुम्ही आपल्या डोळ्यांवर झांपडें ओढून घेतां आणि वेड्यासारखे झिंगत जातां. असें जर नसतें, तर हें युद्ध टळलेंच असतें, आणि तुमच्या स्वप्नाळू डोळ्यांसमोर जे लोक मारले गेले, ते आज जीवंत राहिले असते.

'बहुतकरून' असा शब्द मीं वर मुद्दामच योजला आहे. कारण मीं जें लिहिलें, तें अर्धं सत्यहि असूं शकेल. कारण जगाच्या इतिहासांत सर्व काळीं असे आरडाओरड करणारे लोक निघालेले आहेत—प्रेषित, प्रचारक, गुरु व ध्येयवेडे असे लोक आपल्या समकालीन समाजाच्या अज्ञानाबद्दल व वेडेपणाबद्दल अशीच ओरड करीत आले आहेत. आणि तरीहि परिस्थितीचा बनाव जवळ-जवळ आहे तसाच राहिलेला आहे. अरण्यांत ओरडणाऱ्यांनीं ओरडावें आणि रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांनीं हसत-बोलत जावें—असें सतत घडत आलें आहे. रस्त्यावरील त्या जमावाला कान आहेत पण ते ऐकत नाहींत; डोळे आहेत पण पाहात नाहींत. यावरून याच्या मुळाशीं समाजाच्या अज्ञानापेक्षां दुसरीं कांहीं कारणें असलीं पाहिजेत हें दिसून येतें.

आरडाओरड करणाऱ्यांचाच हा दोष कदाचित् असेल काय ? क्वचित् प्रसंगीं असेलहि, पण सत्याचा गाभा तो आहे असें मात्र मला मुळींच वाटत नाहीं. अमॉस, होस्का, जेरेमिया, हे काय चांगले प्रचारक नव्हते ? पण आपल्या समाजाला जागृत करण्यांत व हलविण्यांत ते यशस्वी झाले नाहींत. कॅसॅन्ड्राची भविष्यवाणी भिंती फोडून आंत घुसत असे असें म्हणतात, आणि तरीहि ट्रॉयचें युद्ध झालेंच, आणि ही परंपरा योग्य प्रमाणांत आपल्यापर्यंत येऊन

पोहोंचलेली आहे. ब्रिटिश नभोवाणीवरील प्रचार योग्य असाच असतो, असें मी मानतों. कारण जवळ जवळ तीन वर्षें पराभवाच्या वार्ता देऊनहि त्यांना या राष्ट्राचें मनोधैर्य टिकवून धरावयाचें होतें, त्यांत त्यांनीं यश मिळविलें. पण त्याच वेळीं हेंहि कबूल केलें पाहिजे कीं, सर्व परिस्थितीची पूर्ण जाणीव करून देऊन सांप्रतच्या काळाची भव्यता व भयानकता आपल्या लोकांचे मनावर ठसविण्याचे कामीं त्यांना अपयश आलें. ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय.

नभोवाणीच्या इतर कार्यक्रमांप्रमाणेंच युद्ध-वार्ताचाहि कार्यक्रम ठराविक चाकोरींतून चालू होता. फरक इतकाच कीं, या वार्ता "मरू-मारू"च्या होत्या. या ॲंग्लो-सॅक्सन वंशामध्येंच कल्पकतेचा अभाव असल्याची समजूत दृढ होत आहे. हे इंग्रज लोक केवळ रोकड्या व्यवहारदृष्टीनें पाहाणारे आहेत, असा सर्वांचा ग्रह झालेला आहे. लॅटिन वंशाच्या भावना-प्राधान्याच्या हें उलट आहे. इंग्रजांची ही व्यावहारिक दृष्टि आणीबाणीच्या वेळीं फार उपयोगी पडते, अशी तिची प्रशंसा केली जाते. पण दोन आणीबाणींच्या काळामध्यें काय घडतें, किंबहुना त्याच व्यवहारवादी व कल्पकताशून्य दृष्टीमुळेंच आणीबाणीचे प्रसंग वारंवार ओढवतात, याचा विचार कोणी करीत नाहीं.

परिस्थितीची संपूर्ण जाणीव नसणें हा कांहीं खास इंग्रजांचाच गुण नव्हे. पण इतर लोक तो आपला दोष मानतात, तर इंग्रज लोक प्रायः तें आपलें भूषण म्हणून मिरवितात. हा स्वभावांतील फरक नव्हे. हा मनोवृत्तीचाच प्रश्न आहे. मनाची घडणच तशी असते. या गोष्टीचा पुरेसा विचार समाज-शास्त्रज्ञांनीं किंवा राज-नीति-विशारदांनीं केलेला दिसत नाहीं.

आपण म्हणतों, "यावर माझा विश्वास आहे किंवा यावर माझा विश्वास नाहीं, हें मला माहीत आहे किंवा हें मला माहीत नाहीं." काळा व पांढरा या रंगां-इतकींच अगदीं विभिन्न मतें आपण धारण करतों. पण खरोखर पाहातां, "माहीत असणें" किंवा "विश्वास असणें" यांच्या तीव्रतेचें प्रमाण वेगवेगळें असूं शकतें. रोमन गुलामांना बंडास प्रवृत्त करणारा स्पार्टाकस् नांवाचा एक माणूस होता हें मला माहीत आहे, पण कोणे एके काळीं तो अस्तित्वांत होता, हें माझें ज्ञान लेनिनविषयक माहितीपेक्षां पुष्कळच पुसट आहे. आकाशांतील तारकापुंज मी दुर्बिणींतून पाहूं शकतों आणि त्यांच्या अंतराचे आंकडेहि सांगूं शकतों; पण माझ्या टेबलावरील दौतीपेक्षां त्यांचें अस्तित्व मला किती तरी पुसट–अस्पष्ट भासतें. ज्ञानाचें साकल्य स्थलकालाच्या अंतरामुळें सहजच उणावतें. त्याचप्रमाणें प्रचंड-पणानेंहि बुद्धि गांगरते व सत्य हरपतें. १७ हा आंकडा एखाद्या मित्रासारखा

माझ्या दाट ओळखीचा झालेला आहे. पण ५० कोटी हा केवळ मला पोकळ आवाज वाटतो. मोटारीखालीं एखादें कुत्रें चेंगरलें तर आपल्या भावना भडकतात, पण तीस लाख ज्यूंची कत्तल पोलंडमध्यें झाली, या वार्तेनें आपल्या मनांत सौम्यशी अस्वस्थता मात्र उत्पन्न होते. केवळ आंकडे हृदयाला पाझर फोडीत नाहींत—तपशीलवार, सांगोपांग वर्णन तें काम करूं शकतें. सर्व घटनांचें साकल्यानें ज्ञान करून घेण्यास आपण असमर्थ असतों—सत्याचे बारीक बारीक पुंज तेवढे आपण ग्रहण करूं शकतों.

ज्ञान व विश्वास यांच्या सखोलपणाच्या या पायऱ्या आहेत. पण जेव्हां आपण सान्ताच्या राज्यांतून उड्डाण करून स्थलकालांतील अनन्तत्वाकडे धांव घेतों—म्हणजे अद्वैताच्या प्रांतांत प्रवेश करतों, तेव्हां प्रश्न प्रमाणांचा नसून प्रकारांचा असतो. ती जातच निराळी असते. अद्वैताचें दर्शन होतांच जाणीव गळून पडते, आणि आपलें तें "ज्ञान" व तो "विश्वास" हे केवळ जिव्हेचे खेळ होऊन बसतात. उदाहरणार्थ, मृत्यु ही अद्वैताच्या कोटींतील वस्तु होय. त्यावर आपला विश्वास म्हणजे केवळ जिव्हेचा खेळ होय. सरासरीनें माणसाचें आयुर्मान ६५ वर्षांचें आहे, हें मी जाणतों. म्हणून मी यापुढें २७ वर्षांहून अधिक जगण्याची अपेक्षा धरणें समंजसपणाचें होणार नाहीं. पण समजा, उद्यां मला असें निश्चित कळलें कीं, ता. ३० नोव्हेंबर १९७० रोजीं पहाटे ५ वाजतां मी मरणार आहें, तर या ज्ञानानें माझें सारें जीवन विषमय होऊन जाईल. उरलेले दिवसन् दिवस आणि तासन् तास मी मोजीत–आणि पुनःपुनः मोजीत–बसेन. एखादें मिनिट वायां गेलें तर मी चडफडेन. याचाच अर्थ मला एक प्रकारचा बुद्धिभ्रंश होईल. सर्वसामान्य माणसापेक्षां अधिक काळ जगण्याची मला आशा आहे असा याचा अर्थ नव्हे. ही माझी मृत्यूची घटिका दहा वर्षांनंतरची धरली, तरी बुद्धिभ्रंशाची हीच प्रक्रिया कायम राहील.

याप्रमाणें आपण सर्वजण दुभंगलेल्या जाणिवेंत राहात असतों. एक जाणीव दुःखाची असते तर दुसरी सर्वसामान्य असते. या दोन्ही अवस्थांतील अनुभव परस्परांपासून भिन्न असतात. त्यांची भाषा, त्यांचें वातावरण–हें सर्व वेगळें असतें.—धर्मग्रंथांतील प्रौढ भाषा व बाजारी ग्राम्य भाषा यांच्याइतकें अंतर त्या दोहोंत असतें.

मानवाच्या ज्ञानाची ही मर्यादा लक्षांत घेतली म्हणजे प्रचारानें किती ज्ञान-प्रसार करतां येईल याची कल्पना आपोआप येते. लोक सिनेमाला जातात. नाझींनीं केलेल्या छळांचे, सामुदायिक कत्तलींचे, गुप्त कटांचे व आत्मबलिदानाचे

चित्रपट ते पाहातात—पाहातात आणि दुःखाचे निःश्वास टाकतात, आपलें मस्तक हलवितात, कांहींजण तर ढसढसा रडूंहि लागतात. पण आपल्या नित्याच्या जीवनाशीं ते त्याचा कांहींहि संबंध जोडीत नाहींत. "ती कला आहे, तें कल्पना-वैभव आहे, त्या उदात्त गोष्टी आहेत, ती धर्मग्रंथाची भाषा आहे, तें सारें आपल्या सत्यसृष्टीला चिकटतच नाहीं." असें ते मानतात. "जेकिल व हाईड" यांच्या पद्धतीचें दुटप्पी जीवन जगणाऱ्या समाजांतच आपण राहातों, आणि साधु-सैतानाचीं हीं सोंगें आपण प्रचंड प्रमाणावर सजवितों.

मात्र सर्वकाळीं अशा प्रमाणावर ही विसंगति मानवी जीवनांत दिसून येतेच असें नाहीं. इतिहासामध्यें असे कांहीं कालखंड व आंदोलनें आहेत कीं, जेव्हां समाजाचे कांहीं विशिष्ट वर्ग मानसिक एकरूपतेच्या उच्च पातळीवर चढतात. उदाहरणार्थ, अथेन्समध्यें, 'पुनरुज्जीवनाच्या' प्रारंभकालीं, रशियन राज्यक्रांतीच्या सुरवातीच्या वर्षीं, असा मानसिक एकजीवपणा दिसून आला. इतिहासांतील कांहीं काळांत लोक डोळे चोळून जागे झालेले दिसतात; आणि त्यांची एकात्मतेची जाणीव विस्तार पावलेली दिसते. त्यांचें क्षणिक जीवन व विश्वात्मक जीवन एकरूप होण्याच्या वेतास आलेलें दिसतें. "समकालीन" याचा विशाल व पूर्ण अर्थ त्यांच्या जीवनांतून प्रकट होत असतो.

आणि इतिहासामध्यें विघटनेचे व विस्कळितपणाचेहि कांहीं कालखंड येत असतात. रोमन साम्राज्याचा भव्य अधःपात आणि वायझन्टायन्चा विनाश झाला, तेव्हांहि मानवाची ज्ञान-शक्ति जितकी भंगलेली नव्हती, तितकी ती आज भग्न झालेली स्पष्ट दिसत आहे. सर्व समाजालाच ग्रासून टाकणारा हा एक सर्वत्र पसरलेला रोग आहे. मानवी मनानें इतकी विकलावस्था पूर्वी कधींच गांठली नव्हती. दळणवळणाचीं साधनें जसजशीं वाढत आहेत, तसतसें आपलें ज्ञान आकुंचित होत आहे असें वाटतें. सारें जग, पूर्वी कधीं नव्हतें, इतकें आतां आपल्याला मोकळें झालें आहे—आणि तरीहि आपण बंदिवानाप्रमाणें वावरत आहोंत. प्रत्येकजण आपल्या खासगी जीवनाच्या चिमण्या पिंजऱ्यांत अडकलेला आहे; पण इकडे घड्याळाची टिक्‌टिक् चालूच आहे. अशा स्थितींत किंकाळ्या फोडीत असणारे लोक, किंकाळ्या फोडफोडून, आपलें तोंड गोरेंमोरें करून घेण्याशिवाय दुसरें काय करणार?

मला एक माणूस माहीत आहे. त्यानें या देशांत व्याख्यानांचा दौरा काढला होता. सरासरीनें एका आठवड्यांत दहा व्याख्यानें तो देई. तो लंडनमधील एक सुप्रसिद्ध प्रकाशक आहे. व्याख्यानास सुरवात करण्यापूर्वी तो आपल्याला एका

खोलींत कोंडून घेई, आपले डोळे मिटून घेई, आणि वीस मिनिटेंपर्यंत अशी सांगोपांग कल्पना करी कीं, पोलंडमध्यें ज्या लोकांची कत्तल झाली, त्यांच्यापैकींच आपण एकजण आहों. एके दिवशीं, आगगाडींतील क्लोराईड वायूनें पोलंडमधील लोक कसे गुदमरले याचा अनुभव घेण्याचा त्यानें प्रयत्न केला; तर दुसऱ्या एके दिवशीं २०० बंदिवानांबरोबर स्वतःचें थडगें खणण्याचें व नंतर मशिनगनपुढें उभें राहाण्याचें दिव्य त्यानें कल्पनेनें अनुभविलें. नंतर तो व्यासपीठाकडे चालत जात असे व भाषण करीत असे. असें पुरें एक वर्षभर चाललें, आणि नंतर मेंदूचा ताण असह्य झाल्यामुळें तो खालीं कोसळला. त्याचें आपल्या श्रोतृवर्गावर विलक्षण वजन असे. आणि त्यानें चांगली लोक-सेवा केली. मानवी जीवनांतील दूरदूर असणाऱ्या अवस्था इंचभर तरी जवळ आणण्यांत त्यानें बरेचसें यश मिळविलें.

मला वाटतें, सर्वांनीं हें उदाहरण घेण्यासारखें आहे. दररोज सकाळीं वृत्तपत्रें वाचल्यानंतर, डोळे मिटून, दोन मिनिटें जरी आपण हा कार्यक्रम केला, तर शरीराच्या उठाबशा काढण्यापेक्षां किंवा प्राणायाम करण्यापेक्षां तें आज अधिक अगत्याचें आहे—प्रार्थनामंदिरांत जाण्यापेक्षांहि तें अधिक महत्वाचें ठरेल. जोंपर्यंत अरण्यांत किंकाळ्या फोडणारे अभागी जीव आहेत, आणि रस्त्यावरून हंसतखिदळत जाणारे लोक आहेत, आणि त्या दोहोंमध्यें कल्पित स्वप्नाचा अडसर आहे, तोंपर्यंत ही संस्कृति फसवी व खोटीच राहील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 220.36. वि: ...1.निबंध-
क्रमांक ....9903.... नों: दि: 2.11.1945

गंजलेल्या चिलखतांतील शिलेदार

१

"लोकशाहीसाठीं मरेपर्यंत लढण्याची श्रद्धा माणसाला कशी प्राप्त होते?" या विषयावर, स्वानुभवाचे बळावर, लेख लिहिण्यास या पत्राचे संपादकांनीं मला सांगितलें आहे. या प्रश्नांतच उलट बाजूनें त्याचें उत्तर आहे, असें मला वाटतें. बॅडॅजोझच्या लढाईपासून जे जे लोक मृत्यु पावतांना मी पाहिले, किंवा रणांगणावर, रुग्णालयांत, कारागृहांत आणि लष्करी तुरुंगांत मृत्यूला सामोरे जातांना दिसले, त्यांनीं आपल्या जीविताचा त्याग लोकशाहीच्या अमूर्त कल्पनेसाठीं केलेला दिसला नाहीं. आणि खरोखर, आज जे लोक युद्ध-भूमीवर प्रत्यक्ष रणाखणी करीत आहेत, त्यांच्यापैकीं कितीजणांना इंग्लंडांतील "मजूर-संघ" व जर्मनींतील "कामगारांची आघाडी" यांतील फरक सांगतां येईल याची मला शंका वाटते. राजकीय घटनेंतील गुंतागुंतीच्या प्रश्नाबद्दल तर बोलावयासच नको.

या युद्धांतील एक महान वीर-कथा पाहा. ज्या चिमुकल्या ग्रीक सैन्याचें नांव पूर्वी कोणी कधीं ऐकलें नव्हतें, त्यानें मुसोलिनीच्या पिसाट पलटणींचा धुव्वा उडविला. जसा कांहीं तो चमत्कारच घडून आला. पण हे ग्रीक सैनिक इतके जिवावर उदार होऊन लढले, ते कोणासाठीं? मेटाक्सस या दिवंगत फॅसिस्ट हुकूमशहासाठीं! या हुकूमशहाची राजवट इतकी जुलुमी, क्षुद्र व मूर्खपणाची होती कीं, प्लेटोचा "लोकशाही" हा ग्रंथ तेथें आक्षेपार्ह ठरविण्यांत आला होता.

तसाच दुसरा ताजा चमत्कार म्हणजे स्टॅलिनग्रॅडचा बचाव! रशियांतील स्त्री-पुरुषांकडे आपण नम्रतेनें, कृतज्ञतेनें व कौतुकानें पाहातों. त्यांच्यापासून आम्हांला दूर ठेवण्याचा प्रयत्न जे करतात, ते हिटलरचाच खेळ खेळतात. पण जे लोक रशियांत लोकशाही नांदत आहे असें म्हणतात, ते अत्यंत धूर्त असले पाहिजेत, किंवा भोळेभाबडे मूर्ख तरी असले पाहिजेत.

२

हें सारें मी जें लिहीत आहें, तें कोणाची टर उडविण्याच्या पोकळ हौशीसाठीं

हा लेख "न्यूयॉर्क टाईम्स मॅगॅझिन्"च्या जानेवारी १९४३च्या अंकांत प्रथम प्रसिद्ध झाला

नव्हे. माझ्या म्हणण्याचा इत्यर्थ हाच कीं, हें महायुद्ध आरंभीं वाटलें होतें त्यापेक्षां अधिक गुंतागुंतीचें होत चाललें आहे, आणि आपण आपलें लक्ष खऱ्याखुऱ्या जनसमुदायावर केंद्रित केलें पाहिजे—हत्यारांनीं चकाकणाऱ्या सैनिकांवर किंवा प्रचारी पत्रकांत रंगविलेल्या पलटणींवर नव्हे. खराखुरा "जनसमुदाय" असा जो मी म्हटला, त्याचे दोन भाग पडतात. एक म्हणजे नाझी व फासिस्ट यांच्या राजवटीचा साक्षात् अनुभव घेतलेले लोक व दुसरे, तसा अनुभव नसलेले लोक.

यांतील पहिल्या भागांतील लोक म्हणजे युरोपखंडांतील जनता. तिला आपण कोणाशीं झुंजत आहोंत याचें नक्की ज्ञान आहे—रोग्याला आपल्या वेदनांचें असतें तसें. पण त्यांना त्यावरील तोडगा माहीत आहे काय? रोगाचा अनुभव आला म्हणजे डॉक्टराची दृष्टीहि येते काय? युरोपखंडाच्या काळ्याकुट्ट विभागांतून जे लोक नुकतेच मुक्त होऊन आले, त्यांच्याशीं तुम्ही क्षणभर बोललात, तरी त्यांना तसा तोडगा सांपडलेला नाहीं असेंच तुम्हांला कळून येईल.

झेक, पोल, फ्रेंच, डच, वेल्जियन इत्यादि लोकांच्या दृष्टीनें हें महायुद्ध म्हणजे अक्षरशः जीवंत राहाण्यासाठीं चाललेली धडपड आहे. ते "फॅसिझम्" या अमूर्त तत्त्वज्ञानाचा तिटकारा करीत नाहींत. पण ज्या हाडामांसाच्या जर्मन सैनिकानें आपल्या घरादारांची राखरांगोळी केली, आणि आतेष्टांचीं मुंडकीं उडविलीं, त्याचा द्वेष ते करतात. "लोकशाही" या अमूर्त कल्पनेसाठीं ते लढत नाहींत. तर, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रत्यक्ष ध्येयासाठीं ते झुंजतात. "युरोपखंडाचें संघ-राज्य" असें तुम्हीं त्यांना कांहीं बोलूं लागलांत, म्हणजे ते चकित मुद्रेनें तुमचेकडे पाहातात. हिटलरनें आपल्यावर जे अनेक अनर्थ ओढवून घेतले त्यांतील प्रमुख म्हणजे त्यानें चुकीच्या मार्गानें युरोपचें एकीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें राष्ट्रीयत्वाच्या व देशाभिमानाच्या भावना पुनः अशा कांहीं उसळल्या कीं, युरोपच्या विकासाचें घड्याळ ५० वर्षें मागें पडलें. तुम्हांला आवडो वा न आवडो, पण बळी पडलेल्या युरोपिअन लोकांच्या कल्पनेंत "सवाई व्हर्साय"चा तह खेळत आहे, आणि "राष्ट्रीय सार्वभौमत्व" ही आजच्या घटकेची उच्च घोषणा आहे.

अँग्लो-सॅक्सन देशांतील सर्वसामान्य लोकांना फासिस्ट अत्याचारांचा साक्षात् अनुभव नाहीं. त्यांना लोकशाही शब्दाचा खरा अर्थ फारच थोडा कळतो. राज्य-घटनेंतील मूलभूत स्वातंत्र्याची जाणीव नसतांनाहि ते त्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतात. श्वासोच्छ्वास करतांना ते हवा घेतात, पण त्या हवेचीं घटकद्रव्यें त्यांना माहीत नसतात; तसेंच हें आहे.

आणि या घटनेचा आपण विचार केला तर आपल्या हें लक्षांत येईल कीं, उदारमतवादी युगाला अभिमानास्पद यश मिळवून देणारीच ही घटना आहे. सभ्य गृहस्थाच्या अंगांतील उत्कृष्ट कपड्याचें लक्षण कोणतें? तर तो कोणाच्या लक्षांत येतां कामा नये. तसेंच लोकशाही कारभार सुयंत्र चालल्याचें लक्षणहि खरोखर तेंच आहे. लॉचनेसचा राक्षस ब्रिटनमधील सर्वसामान्य जनतेला जितक्या प्रमाणांत खरा वाटतो, जवळ जवळ तितक्याच प्रमाणांत तिला जर्मनीचे गेस्टापो सैनिक व लष्करी तुरुंग सत्य भासतात. कल्पना-शक्तीचा हा अभाव हें समाजाच्या निकोप प्रकृतीचेंच लक्षण आहे. पण त्यामुळेंच जर्मन अत्याचारांचा होणारा गवगवा फोल ठरतो. मीं त्या कामीं थोडेफार हातपाय हलविले आहेत. जेव्हां जेव्हां फॅसिस्टांच्या 'लष्करी तुरुंगा' विषयीं मीं आपल्या सैनिकांपुढें व्याख्यानें दिलीं आहेत, तेव्हां माझ्या मनांत अशी भावना स्पष्ट असे कीं, जोंवर श्रोतृ-समाजावर माझी छाप आहे, तोंवर ते माझ्यावर विश्वास ठेवतात. पण मी तेथून निघून गेलों मात्र कीं, त्यांचा माझ्यावरील सारा विश्वास उडून जातो. रात्रीं झोपेंत कोणी राक्षस आपला गळा दाबीत आहे, या स्वप्नावरील विश्वास रात्र संपतांच नाहींसा होतो, आणि मग माणूस मजेंत गात सुटतो,— "कोण भितो त्या दुष्ट लांडग्याला?" तसाच कांहींसा हा प्रकार आहे.

फॅसिझमचा बागुलबुवा म्हणजे काय आहे, याची अगदीं पुसट कल्पनासुद्धां या देशांतील बहुसंख्य जनतेला अद्यापि आलेली नाहीं. उलट, जर्मनीचें आक्रमण व जर्मनीचें विमानदळ म्हणजे काय, याची सुस्पष्ट कल्पना जनतेला आहे. १९१४ च्या महायुद्धांतील जर्मनीच्या अत्याचारांची स्मृति त्यांना असल्यामुळें त्यांचे विचार त्या दिशेनें धांवतात आणि कॉव्हेन्ट्रीवरील जर्मनीच्या विद्युत्पातानें तर "जर्मन" व "नाझी" यांमधील भेद व्यर्थ आहे हेंहि ते ओळखतात. 'न्यू स्टेट्स्मन्' व 'नेशन' या वृत्तपत्रांमधून लवकरच जर्मन वीरांच्या शौर्याचीं स्तुति-स्तोत्रें गायलीं जातील, आणि जसजसा युद्धांतील जय आपल्या दृष्टीच्या टप्प्यांत येत जाईल, तसतसें या युद्धाचें स्वरूप अधिकाधिक स्पष्ट होत जाईल. हुजूर पक्ष नेहमीं म्हणतो त्याप्रमाणें, हें महायुद्ध राष्ट्रीय विमोचनाचें आहे— १९ व्या शतकांतील कांहीं पुराण तत्त्वांच्या संरक्षणार्थ लढलेलें आहे, अशी जाणीव जनतेला हळु हळु होत जाईल. पण मी व माझे पुरोगामी साथी असें मानतों कीं, हें महायुद्ध म्हणजे स्पेन देशांतल्यासारखेंच एक क्रांतिकारक यादवी युद्ध होय.

हें आमचें मत जनतेला पटत नाहीं, याचें कारण हुजूर पक्ष आमच्यापेक्षां

अधिक हुषार आहे किंवा मि. ॲटलीपेक्षां मि. चर्चिल अधिक "वजनदार" आहे असें नव्हे. याचें कारण इतकेंच आहे कीं, सर्व वर्गांतील बहुसंख्य सर्वसामान्य लोक अजून १९ व्या शतकाच्या परिभाषेंत विचार करीत असतात—२० व्या शतकाच्या नव्हे. त्यांना युद्ध म्हटलें कीं, शूर-वीरांच्या कथाच तेवढ्या आठवतात—"जागतिक पथकाच्या" मर्दुमकीचें महत्व त्यांना कळत नाहीं. "जें आमचेजवळ आहे, तें आम्ही आमच्या ताब्यांत ठेवणार आहोंत." अशा आशयाचें सुप्रसिद्ध भाषण केल्यानंतर मि. चर्चिलच्या धोरणास शें. ९१ टक्के ब्रिटिश जनतेनें पाठिंबा दिल्याचें गेल्या धांवत्या मत-चांचणींत दिसून आलें. आपण मोकळ्या मनानें विचार करूं या. आपल्या शस्त्रांनीं विजय मिळविला म्हणून आपण हुरळून जातों. पण त्याबरोबरच आपले उद्देश पराभूत झाले, याचीहि जाणीव आपण ठेवली पाहिजे.

३

हें झालें बहुसंख्य बिगरराजकीय लोकांसंबंधीं. पण संयुक्त, बंधुभावानें निगडित व समाजवादी युरोप निर्माण करण्याचें ध्येय ज्यांनीं मनीं धरलें व त्यासाठीं जे झटले, त्या आमच्यासारख्या जागृत अल्पसंख्याकांचें काय? आमची आतां जवळजवळ वेड्यापिरांत गणना होऊं लागली आहे हें कबूल केलें पाहिजे. व्यक्तिशः मी तर, माझ्या व माझ्या दोस्तांच्या कण्हण्या—विव्हळण्याला विटलोंच आहें. पण तसें करून कसें चालेल? वस्तुस्थितीशीं सामना हा दिलाच पाहिजे, आणि आपण कोठें उभे आहोंत हें पाहिलेंच पाहिजे.

आंतरराष्ट्रीय महान् आंदोलनें फसलीं आहेत. १९१४ चें महायुद्ध टाळतां न आल्यामुळें "सेकंड इंटरनॅशनल" पराभूत झाली, आणि १९३३ सालीं, हिटलरचें सत्तारोहण टाळतां न आल्यामुळें "थर्ड इंटरनॅशनल" अपयश पावली—ती केवळ रशियाच्या परराष्ट्र-कचेरीची एक शाखा बनली. या रीतीनें नाझींच्या संकटामुळें पुराणमतवादी व पुरोगामी शक्ति संरक्षणासाठीं एकत्र आल्या असतांना, त्यांचें नेतृत्व प्रारंभापासून पुराणमतवादी लोकांकडेच होतें. शरणागतीच्या शिलेदारांनींच आम्हांला युद्धाच्या खाईंत लोटलें—ध्येयवादी झुंझारांनीं नव्हे. ध्येयवादी वीरांचें धोरण हजार पटींनें रास्त असलें, तरी त्यांचा पराभव इतक्या वेळां झाला होता कीं, त्यांचेवर विश्वास ठेवावयास जनता तयार नव्हती. शरणागतीच्या शिलेदारांनींहि भूतकाळांत मोठमोठ्या चुका केलेल्या

आहेत, नाहीं असें नाहीं, पण जनतेमधील निष्क्रियतेची स्वाभाविक वृत्ति हीच त्यांच्या पाठीशीं महान् शक्ति होती.

याचा परिणाम असा झाला कीं, हें युद्ध सुरुवातीपासून लढलें गेलें, तें संरक्षक धोरणानें—केवळ युद्धशास्त्रांतच नव्हे, तर ध्येयवादांतहि. १९ व्या शतकांतील पुराण तत्त्वांवर नव्या तत्त्वज्ञानानें निर्दय आक्रमण केलें, म्हणून त्यापासून आपल्या जुन्या तत्त्वांचें संरक्षण करण्यासाठीं आपण लढत होतों—आणि लढत आहों. आणि अलीकडे दोस्त राष्ट्रांनीं युद्ध-भूमीवर आक्रमक धोरणावर झेप घेतली असली, तरी त्यांची तत्त्व-प्रणाली पुराणमतवादी व संरक्षणवादीच आहे—आणि तशी ती असल्याचा डांगोरा पूर्वीपेक्षां मोठ्या प्रमाणांत पिटला जात आहे. अमेरिकेंतील निवडणुकांसारख्या ताज्या घटनांवरून हेंच सिद्ध होतें कीं, एकंदर वारे हुजूर पक्षाच्या दिशेनेंच वाहात आहेत—आणि जसजसा जय जवळ जवळ येत आहे, तसतसे ते वारे जोरजोरानें वाहात आहेत. जनतेला याची फारशी फिकीर वाटते असें दिसत नाहीं. तिला क्रिप्सच्या अपयशापेक्षां आठव्या तुकडीच्या प्रगतीचेंच कौतुक अधिक.

अशा रीतीनें, एकदम कांहीं अकल्पित घडलें नाहीं, तर आपला भावी विजय हा पुराण तत्त्वांचा विजय ठरेल, आणि त्यानंतरची शांतताहि तशीच राहील. त्यामुळें युरोपमधील अल्पसंख्याकांच्या प्रश्नांचा कायमचा उलगडा होणार नाहीं. भांडवलशाही समाजरचनेमध्यें जो अंगभूत दोष आहे, तो दूर करण्याची कांहींच तजवीज होणार नाहीं. मानव वंशाच्या उत्कर्षाची पुढील पायरी, असें स्वरूप या विजयाचें राहाणार नाहीं. मात्र या विजयानें युरोप खंडांतील लोकांना तात्पुरतें समाधान प्रचंड प्रमाणांत मिळेल, ज्यांच्या आयुष्याची दोरी तुटली आहे असें वाटत होतें, अशा लाखों माणसांना जीवदान मिळेल, आणि स्वतंत्रता, सभ्यता, व सुरक्षितता यांचा लाभ कांहीं ना कांहीं प्रमाणांत होईल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हिटलर-पूर्वकालीन समाजरचनेची किंचित् सुधारलेली नवी आवृत्ति निवेल. इतिहास-पुरुषानें आपल्या भीषण शैलीनें लिहिलेला १९ व्या शतकाचा तो 'ताजा कलम' २० व्या शतकाच्या पूर्वार्धाला जोडला जाईल. आणि काळाची ही विसंगत जोडणी, चांगल्या कसबी कारागिराप्रमाणें करतां आली, तर तिच्यामुळें युरोपला सुमारें २० वर्षांचा काळ स्वास्थ्याचा लाभेल आणि पुढील भयंकर युद्ध टळण्याचा संभव निर्माण होईल, अशी मला आशा वाटते—विश्वासहि वाटतो.

याचा अर्थ असा कीं, हें महायुद्ध म्हणजे शेवटचा प्रलयकाल नव्हे, ही

जाणीव आपल्याला होऊं लागली आहे. अंधार व प्रकाश यांच्या शक्तींचा हा अंतिम संग्राम नव्हे, तर नव्या जगाच्या प्रसूति-वेदनांचा हा प्रारंभ आहे. आणि आपल्याला आरंभीं कल्पना होती त्यापेक्षां अधिक काळ त्या वेदना भोगाव्या लागणार आहेत, याची जाणीव आपल्याला हळु हळु होऊं लागली आहे. या मध्यंतरींच्या स्वास्थ्याच्या काळाचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करून घेणें हेंच आपलें यापुढील कर्तव्य होय. आणि त्याचेंच आनुषंगिक कर्तव्य हें कीं, आपलें राष्ट्र सुरक्षित राहिलें व १९ व्या शतकांतील आपली तत्त्व-संपदा शाबूत राहिली, आणि आपल्या खिडकीखालीं गेस्टापो सैनिकाचा पहारा नाहीं, याबद्दल स्तुति दररोज सकाळीं आपण उठल्याबरोबर केली पाहिजे. दोन वर्षांपूर्वी फ्रान्स कोसळला, तेव्हां असा काळ पुढें येईल असें कोणास वाटलें होतें? मला तरी खास वाटलें नव्हतें.

ज्यांना तुम्ही "पुरोगामी बुद्धिमान वर्ग" म्हणतां, त्याच्या अनुयायाला माझें हें वरील लिहिणें मिळमिळीत वाटेल हें मी जाणतों आणि त्यामुळें माझे मित्र मला नांवें ठेवतील व धोंडे मारतील, हीहि जाणीव मला आहे. त्यांनाहि कळत न कळत लवकरच ही जाणीव होईल कीं, आम्ही राजकीय अंतराळांत लोंबकळत आहोंत—आमचें आघाडीचें सैन्य पुरवठ्याच्या ठाण्यापासून अलग झालें आहे.

आमची "प्रगतीच्या संग्रामाची" कल्पना कांहीं वेगळींच होती. समाजांतील निरनिराळे वर्ग सुस्पष्ट व सुव्यवस्थित आघाड्यांवर लढत आहेत आणि समाजवादी पक्ष खंदकांत राहून युद्ध करीत आहे, अशी जी आमची जुनी कल्पना होती ती मावळली; आणि समाजांतून फुटून निघणाऱ्या धावत्या घटकांच्या वाहात्या चळवळीच्या भोंवऱ्यांत आम्ही सांपडलों आहों. कामगारवर्गांतील मोठा विभाग फॅसिस्टांच्या तुकड्यांत सामील होत आहे, हुजूर-पक्षांतील तरुण व जहाल मंडळी "ट्रेड युनियनच्या" पुरोगामी पथकांत दाखल होत आहेत, नोकर-वर्ग व चालक-वर्ग समाजांतील मोक्याच्या जागा काबीज करीत आहेत—आणि आम्ही मात्र अनाथ भूमीवर उभे आहोंत.—गंजलेल्या चिलखतांतील शिलेदाराप्रमाणें आमचे डोळे दिपून गेलेले आहेत, आणि आमच्या हातांत मार्क्स व एंजल्स यांच्या वचनांची मार्गदर्शक गाथा आहे. गेल्या शतकांत हीच सामाजिक गाथा विश्वासु व खंबीर वाटाड्या म्हणून मानली गेली. पण हाय! आतां उलट्यापालट्या झालेल्या या रण-भूमीवर तिचा काय उपयोग?

तरीदेखील, या चित्राची दुसरी एक आशादायक बाजू आहे. "स्वतंत्रता, समता, बंधुता," हे शब्द कोरलेल्या ढाली हातांत घेऊन व गंजलेलें चिलखत

अंगावर चढवून हे शिलेदार गेलीं पंधरा वर्षें लढाईंत हरत आलेले आहेत. शांघाय, आद्दिस अबाबा, माद्रिद, व्हिएन्ना, प्राग—शोचनीय पराभवांची केवढी ही मालिका! त्यामुळें पराभवाच्या वातावरणांत सदैव राहाण्याची, नव्या साक्षात्कारांत सतत रमण्याची, आम्हांला संवयच जडून गेली. पराभवाचे मोठमोठे घुटके घेणें हें एक भयंकर व्यसन आहे. त्यामुळें पराभव खाण्याचें व्यसनच जडतें.

आतां मात्र आम्हांवर विजयश्री प्रसन्न होणार, अशीं चिन्हें पहिल्यांदाच दिसत आहेत. अर्थात् आम्ही भाविलेल्या विजयाहून हा विजय अगदीं भिन्न असेल, पण त्यामुळें एक महान क्रांति होईल—ती म्हणजे आमची पराभवाची संवय सुटेल आणि एकदां का जयाची संवय जडली आणि आम्ही आमचीं शस्त्रास्त्रें अद्ययावत् ठेवलीं, म्हणजे मग आम्ही किती मजल मारूं हें कोण सांगूं शकेल?

निराशावाद्यांची संघटना

प्रस्तुतच्या महायुद्धांत आपण अर्ध–सत्याच्या नांवावर संपूर्ण असत्याशीं लढत आहोंत. सध्यांच्या परिस्थितीचें वर्णन नाना रीतींनीं केलें जातें, त्यांत हें वर्णन सौम्यच होय. तें आपण तात्पुरतें स्वीकारलें, तर वर्तमानकाळांतील गोंधळ पुष्कळसा कमी होईल व भविष्यकालांतील निराशा पुष्कळशी कमी होईल.

"संपूर्ण असत्य" कोणतें? तर नाझींची नवी समाजरचना! कारण त्या समाजरचनेमुळें मानवजातीचें वैशिष्ट्यच नष्ट होतें, "बळी तो कान पिळी" या न्यायाच्या घोषणेमुळें "मानवी कायदा" हा "जंगलचा कायदा" बनतो. "सर्व महत्व काय तें वंशांत सांठविलेलें आहे." या मंत्रामुळें समाजशास्त्राला प्राणिशास्त्राची अवकळा प्राप्त होते. माणूस हा पशू आहे असें मानणाऱ्या या तत्त्वज्ञानाशीं कोणतीहि तडजोड करणें अशक्य. तें तत्त्वज्ञान बिनशर्त शरणच आलें पाहिजे.

उलट, आपण अर्ध-सत्याच्या वातावरणांत वावरत असतों. वंशाभिमानाशीं आपण युद्ध पुकारतों, आणि तरीहि अँग्लो-सॅक्सन देशांत वर्ण-वैषम्य नष्ट झालेलें नाहीं. आपण लोकशाहीसाठीं संग्राम चालवितों; आणि तरीहि आपला सर्वांत बलाढ्य दोस्त हा एक हुकूमशहा आहे, आणि त्याच्या राज्यांत "चार स्वातंत्र्यांपैकीं" दोहोंचा पत्ता नाहीं. परंतु सध्यांच्या वातावरणाचा प्रभाव इतका दुष्ट व सर्वव्यापी आहे कीं, वरील गोष्टी नाकारतां येण्यासारख्या नसल्या तरी, त्यांचा उल्लेख केला तरी कोणाकोणाचें पित्त खवळतें.

कोणी कदाचित् असें म्हणतील, "इतके खोलांत कां शिरतां? हें बोलून चालून रणांगण आहे—प्रार्थना-मंदिर नव्हे—कीं जेथें आपल्या पाप-कृत्यांचा पाढा वाचावा." याचें उत्तर असें आहे कीं, अटलांटिक महासागराच्या दोन्ही बाजूकडील लोक, जसजसा जयाचा क्षण जवळ येत चालला आहे तसतसे, अस्वस्थ होत चालले आहेत. ही अस्वस्थतेची वृत्ति सर्वत्र पसरलेली दिसते.

डंकर्कनंतर, जेव्हां अमेरिका तटस्थ होती, व जेव्हां पूर्वेकडे हिटलर "दुसरी आघाडी" केव्हां उघडतो याची रशिया वाट पाहात होता, तेव्हां या देशांतील आपल्यापैकीं पुष्कळ जणांना असें वाटत होतें कीं, कांहीं चमत्कार घडला तरच या

हा लेख "न्यूयॉर्क टाईम्स मॅगेझिन्च्या" नोव्हेंबर १९४३ च्या अंकांत प्रथम प्रसिद्ध झाला.

अनर्थांतून आपण वांचूं. एखाद्या रोगावर भयंकर स्वरूपाची शस्त्रक्रिया व्हावयाची असतांना तो रोगी आधीं जसा देवाचा धांवा करतो, तसे आपण प्रार्थना करीत होतों, "प्रभो! या संकटांतून मी वांचलों, तर मी नवीन रीतीनें आयुष्य घालवीन —आणि तें आयुष्य किती मनोहर असेल!"

झालें! चमत्कार घडला—शस्त्रक्रिया यशस्वी झाली—रोगी दवाखान्यांतून बाहेर पडला—पण बाहेर पडल्यावर त्याला काय आढळलें? आपलें घर पूर्वीसारखेंच गलिच्छ वस्तींत उभें आहे, आपली टपाल–पेटी देणेदारांच्या बिलांनीं गच्च भरून गेली आहे, आपली गृहिणी पूर्वीइतक्याच कर्कश स्वरांत, आपले डोळे गरगरा फिरवीत, ओरडत आहे, आणि आपल्या भेसूर बाळ्यांच्या नाकांतून दिवसभर पाणी गळत आहे. अशा स्थितींत दुसऱ्या दिवसापासून त्यानें जर कुरकुरण्यास व शिव्याशाप देण्यास सुरवात केली, तर तो आपल्या दैवाशीं कृतघ्न ठरेल काय?

उत्तर आफ्रिकेंतील जोखमीची शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यापासून दोस्त राष्ट्रांच्या कुटुंबांमध्यें, बिलांची ती गर्दी, ते कर्कश आवाज आणि ते गरगरा फिरणारे डोळे दिसूं लागले. उद्यां साऱ्या जगाचें राज्य करण्यास निघालेलीं राष्ट्रें "सदिच्छा व सहकार्य" यांना भावनात्मक आवाहन करूं लागलीं, पण तें पोकळ व फोल ठरलें. कोणत्याहि सरकारला आपल्या पाठीशीं असणाऱ्या आर्थिक व सामाजिक शक्तीमध्यें क्रांति घडवून आणण्यास फारच थोडा अवसर असतो. गेलीं निदान पन्नास वर्षें, हें अधिकाधिक स्पष्ट होत आहे कीं, एखादी सामर्थ्यशाली आंतरराष्ट्रीय संघटनाच हा जागतिक गोंधळ दूर करण्याचा एकादा राजमार्ग शोधून काढील.

चालू शतकाच्या आरंभींच्या काळांत, विशेषतः दोन महायुद्धांमधील कालखंडांत, अशी मोठी आशा होती कीं, अशा स्वरूपाची जागतिक संघटना निर्माण होईल व ती राष्ट्राराष्ट्रामधील चुरस थांबवील. राष्ट्र–संघ, दुसरी व तिसरी इंटरनॅशनल आणि पुराणमतवाद्यांच्या दृष्टीनें पोप किंवा चर्च अथवा मेसनांचा भ्रातृ–संघ— अशा संस्थांवर सर्व जगांतील प्रगतिशील लोकांनीं आपल्या आशा टांगून ठेवल्या होत्या.

आपल्या कालमानाचें विशेष लक्षण हें आहे कीं, अशा सर्व जागतिक संघटना धुळीस मिळाल्या आहेत. त्याचाच प्रत्यक्ष परिणाम म्हणजे आपण अर्ध सत्यांना पूर्णसत्य समजूं लागलों आहोंत. सत्य ज्ञानाची कडू गोळी चावण्याचा, गिळण्याचा व पचविण्याचा कंटाळा जोंवर आपण दूर सारला नाहीं, तोंवर आपण कोठें उभे आहोंत व कोणीकडे वाहावत चाललों आहोंत हें जाणूं शकणार नाहीं.

माझ्यासारखे पुरोगामी लोक आज निर्वासित झाले आहेत. त्यांना स्टॅलिनचे अनुयायी "ट्रॉट्स्कीवादी" म्हणतात, ट्रॉट्स्कीवादी "साम्राज्यवादी" म्हणून संबोधतात आणि साम्राज्यवादी "लाल साम्यवादी" म्हणून त्यांना नांवें ठेवतात. आज आम्हां पुरोगामी मंडळींच्या तत्त्वज्ञानाचें दिवाळें वाजलें आहे; आणि आमची दृष्टि निराशावादी झाली आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या कॉमिन्टर्न संस्थेचें प्रेत कुजूं लागल्यावर सरकारी रीत्या पुरण्यांत आलें. रशियामध्यें परंपरेचें चक्र पुनः पूर्वीसारखें फिरू लागलें—"पितृ-भूमीचा" जयजयकार तेथें होऊं लागला. सनातन चर्च व कॅडेट स्कूल यांना पुनः चांगले दिवस आले. इंग्लंडांतील मजूरपक्षानें आपल्या तोंडावरील समाजवादाचा झिरझिरीत पडदाहि टाकून दिला आणि नाझींच्या सर्व अत्याचारांबद्दल अखिल जर्मन जनतेला सामुदायिक रीत्या जबाबदार धरण्यांत आलें. त्यामध्यें, गेल्या खुल्या निवडणुकींत नाझींच्या विरुद्ध मत-दान करणाऱ्या १ कोटी ३० लाख कामगारांचाहि समावेश झाला होता.

इंग्लंडमध्यें समाजवाद येण्याचा कधीं काळीं संभव होता, तो म्हणजे डंकर्कपासून तोब्रुकच्या पाडावापर्यंतच्या काळांत. तेथील सरकारच्या युद्धविषयक धोरणाविरुद्ध जनतेचा असंतोष कळसास पोंचलेला होता. दहा-बारा पोट-निवडणुकींत सरकारपक्षाचा पराभव झालेला होता. सरकारला देशांतील सर्व व्यक्तिगत मालमत्तेचें राष्ट्रीयीकरण करण्याची सत्ता देण्यांत आली होती. त्या वेळीं केवळ राजकीय दडपणानें "सरकारी समाववाद" (State Socialism) स्थापन झाला असता. त्यासाठीं राज्यक्रांति नको किंवा यादवी युद्धहि नको.

फ्रान्समध्यें "हिटलर कीं जनता-पक्ष?" असा प्रश्न बड्या व्यापारी वर्गापुढें उभा राहिला. तेव्हां त्यानें हिटलरच्या बाजूनें कौल दिला. पण इंग्लंडमध्यें उलट स्थिति होती. तेथील राज्यकर्ता वर्ग नाझींच्या वर्चस्वाखालीं जाण्याऐवजीं साम्यवादी इंग्लंडमध्यें राहाण्यास तयार होता. याला अपवाद असलेच तर ते थोडे होते—व तेहि कमीकमी होत होते. इंग्लंड व फ्रान्स यांच्या राज्यकर्त्यांच्या वृत्तींतील हा फरक ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. त्यावरून इंग्लंड चीजीवंत राहाण्याची पात्रता सिद्ध होते. परंतु तेथील कामगार-वर्गाला ही संधि पकडण्याइतकी राजकीय पक्वता आलेली नव्हती. डंकर्क ते सिंगापूर या प्राणसंकटांतून भांडवलशाही सुरक्षित राहिली याचें आश्चर्य विचारी हुजूर-पक्षीयांना वाटत होतें—तें आश्चर्य अद्याप ओसरलेलें नाहीं.

अशा किती तरी संधी समाजवादानें गमावल्या आहेत. त्या सांखळींतील हा

फक्त एक दुवा होय. यापूर्वी वायमार लोकसत्ताक राज्य अस्तित्वांत आलें, अमेरिकेंत व्यापार—मंदीची लाट उठली, फ्रान्स व स्पेन यांमध्यें जनता-पक्षाला विजय मिळाले. दोन महायुद्धांच्या मध्यंतरींच्या काळांत मानव-जातीच्या नव्या रचनेविषयीं किती प्रचंड अभिलाषा जन-मनांत निर्माण झालेली होती! पण ती पूर्ण करण्याचे कार्मीं केवढें भयंकर अपयश आलेलें आहे! या अपयशाचा फायदा फॅसिझमनें घेतला. पुनः पुनः समाजवादी चळवळींचा अवसान-घात झालेला आहे. इतिहास ही एक चंचल व नखरेल तरुणी आहे. तिच्या प्रियकरानें तिला वश करण्याची आलेली संधि गमावली तर त्याचें कधींहि भरून न येण्या-इतकें नुकसान होतें. मग कांहीं काळ प्रणयाराधनेचें नुसतें नाटक चालतें आणि शेवटीं ती इतिहास-बाला त्याच्या गळ्यांत मिठी मारून पडते, तेव्हां तो प्रियकर इतका वयस्क झालेला असतो कीं, त्यामुळें तो भांबावून जातो. ब्रिटनचा मार्क्सवादी पंतप्रधान मि. ॲटली याचें उदाहरण लक्षांत घ्या.

सजीव सृष्टीप्रमाणें राजकीय चळवळींचेहि कांहीं नियम असावेत असें दिसतें. त्या चळवळी वाढत जातात, आणि वाढतां वाढतां त्या पक्क दशेस पोंचताक्षणींच त्यांनीं सत्ताग्रहण केलें नाहीं, तर त्या सुकत-वटत जातात. या शतकांतील जागतिक संघटनांची परिणति अशीच झाली. राष्ट्र-संघ क्षयानें मेला. अधिकृत धर्मसंस्थांना राजकीय अर्धांगवायु झाला. सेकंड इंटरनॅशनलला रक्तदाबाचा विकार जडला; आणि थर्ड इंटरनॅशनलचें प्राणोत्क्रमण झालें.

कामगार-वर्गाच्या शक्तीची या युगांत शिल्लक राहिलेलीं प्रतीकें म्हणजे "ट्रेड युनियन्स." त्यांचें महत्व फार मोठें आहे, आणि त्यांचें प्रत्यक्ष कार्यहि प्रचंड आहे. तें कमी लेखण्याचा माझा उद्देश मुळींच नाहीं. पण त्या संस्था आर्थिक स्वास्थ्य मिळवून देणाऱ्या आहेत—सर्जनशील राजकीय शक्ति ती नव्हे!

जागतिक संघटनांचें अपयश ही कांहीं क्षणिक घटना नव्हे. गेल्या शतकांत उदार-मतवादी व समाजवादी चळवळींची जी कार्य-पद्धति होती, तिची दुर्बलता यानें सिद्ध होते. "कोणत्याहि चळवळींत चढउतार हे असावयाचेच." असें या अपयशाचें समर्थन करणें म्हणजे स्वतःची वंचना करणें होय. आपण कांहीं डोंगरा-वरील आगगाडींतून प्रवास करीत नाहीं—शेवटीं तोंड बंद असलेल्या बोळांतून आपण चाललों आहोंत. खऱ्याखुऱ्या, नव्या समाज-रचनेपासून आपण वीस वर्षांपूर्वी जितके दूर होतों, त्यापेक्षां आतां अधिक दूर आहोंत. वहातुकींचीं साधनें किती वेगानें धांवतात, त्या मानानें आपल्या भावना, आपले विचार, आपल्या कृति जागतिक दृष्टीनें व्हावयास हव्या. पण यापासूनहि आपण फार दूर आहोंत.

आपल्या साऱ्या युद्धोत्तर योजना, म्हणजे एका सत्ताकेंद्राहून दुसरीकडे जाण्यासाठीं बांधलेले तात्पुरते पूल होत. यापुढील दहावीस वर्षांचा काळ कसा तरी ओलांडून जाण्यासाठीं केलेले ते अर्धवट प्रामाणिकपणाचे, अर्धवट आस्थेचे प्रयत्न होत. दीर्घकालची योजना आंखण्याऐवजीं तात्पुरती, क्षणिक, संध्याकालीन संक्रमणावस्थेंतील, थातुरमातुर योजना रचण्यांतच आपण गुंतलों आहोंत. पण यांत एक मोठा धोका आहे, तो म्हणजे, हे कच्चे पूल एकदम कोसळतील व राष्ट्रीय नेते पुनः सर्वनाशाच्या मार्गावर आंधळ्याप्रमाणें चालूं लागतील.

हें सारें चित्र निराशावादी आहे, हें मी कबूल करतों; पण तें वस्तुस्थितीवर आधारलेलें आहे, असा मला विश्वास वाटतो. याच्या आधारावर मी जें भावी काळाविषयीं लिहीत आहें, तें माझें वैयक्तिन मत आहे; तें कोणाला चमत्कारिकहि वाटेल. पण पुष्कळ लोकांना तेंच मत मोघमपणें मान्य झालेलें असतें. त्यांना उद्देशूनच मी हें लिहीत आहें.

एखाद्या संस्कृतीचीं परंपरागत मूल्यें जेव्हां कोसळतात, तेव्हां अल्पकाळ अंदाधुंदी माजते. असे संधिकाल अल्पजीवीच असतात. सध्यांचा संधिकालहि लवकरच समाप्त होईल, आणि सर्व जगामध्यें नव्या वृत्तीचें, नव्या शक्तीचें उत्थापन होईल, असा मला भरंवसा आहे. ख्रिस्ती धर्माच्या प्रारंभकालीं किंवा 'विद्येच्या पुनरुज्जीवन'कालीं अशाच वृत्ति व शक्ति जागृत झाल्या होत्या. आतांहि त्या प्रकट होतील आणि आपल्या ऐतिहासिक युगाचा शेवट करतील. आपलें हें युग गॅलिलीओ, न्यूटन व कोलंबस यांच्यापासून सुरू झालें आहे. तें मानवजातीच्या प्रौढावस्थेचें आहे, तें शास्त्रीय सिद्धांतांचें व आंकडेबद्ध मोजमापाचें आहे, तें उपयुक्ततावादाचें आहे. आंतरिक भावनेवर बुद्धीचा वरचष्मा चालविणारें तें आहे.

या युगानें महान् यश मिळविलें आहे. तशाच त्याच्या अंतकालच्या वेदनाहि फार भयंकर आहेत. पण त्या दीर्घकाल टिकणार नाहींत. जसजसे त्या वेदनांचे झटके वाढत जातात व त्यांचें क्षेत्र विस्तृत होतें, तसतसा अंतकाल जवळ आल्याचें दिसतें. यापुढें एक किंवा दोन महायुद्धें होतील—दहाबारा नव्हे. आतां हा प्रश्न कांहीं दशकांचा आहे—शतकांचा नव्हे.

या संधि-कालानंतर जें नवें युग अवतीर्ण होईल तें कसें असेल? एक गोष्ट निश्चित आहे; ती म्हणजे हक्स्लेनें "ज्या नव्या शूर जगाची" भीति घातली होती, तसें तें असणार नाहीं. कॉलऱ्याची लस टोचली म्हणजे कॉलरा होण्याची भीति जशी नाहींशी होते, त्याचप्रमाणें हिटरलनें हुकूमशाहीचें युग जन्मास येण्याचा धोका नाहींसा करून टाकला आहे. इतिहासदृष्ट्या ही त्याची मोठीच कामगिरी

होय. या संधि–कालाच्या अखेरच्या वर्षांत हिटलरसारखेच प्रयत्न, जगाच्या दुसऱ्या भागांत केले जाणार नाहींत, असें मी म्हणत नाहीं. पण ते त्रुटित असतील—मरणोन्मुख युगाच्या अंतकालच्या वेदनांसारखे असतील.

नव्या युगांत जगाची धारणा कशी राहील, याचा सुगावा लावण्यासाठीं आपल्याला इतिहासाचीं पानें चाळलीं पाहिजेत. म्हणजे भूतकाळांत सामाजिक जागृतीचे, एखाद्या चढत्या जिन्याप्रमाणें, निरनिराळे थर दिसून येतील. धर्म–युद्धांचा काळ संपला व धर्मातीत राजकारणानें मानवी मनावर पगडा बसविला. सरंजामशाहीचें राजकारण संपुष्टांत आलें, आणि आर्थिक शक्तींना सर्वांत अधिक महत्त्व प्राप्त झालें. हा आर्थिक जीवनाचा झगडा लवकरच संपेल व नव्या नीति-मूल्यांचें नव-युग फटफटेल. मोठमोठे संग्राम शमतात, ते आपल्या क्षेत्रांत नव्हे, तर त्यापेक्षां उच्च क्षेत्रांत. "सेकंड व थर्ड इंटरनॅशनल्सची" प्रगति खुंटली याचें कारण त्या संस्था भांडवलशाहीशीं आर्थिक क्षेत्रांतच लढत राहिल्या—नैतिक पातळींवर त्या चढूं शकल्या नाहींत. आज त्या नैतिक मूल्यांची, आध्यात्मिक निष्ठांची ओढ आपल्या आंतड्यांना लागली आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या उच्च पातळीवर उभे राहून आपण पाहिलें, म्हणजे जुने तंटे क्षुद्र वाटूं लागतात. त्यांत कांहीं अर्थच नव्हता, असें दिसूं लागतें. पण याच्या उलट खालच्या क्षेत्रावर उभे राहून पुढील उच्च अवस्थेचे गुणधर्म मात्र नक्की सांगणें कठीण आहे. तसे प्रयत्न केले, तर ते गूढ-गुंजनासारखे पोकळ ठरतात. आतां आपल्याला एवढेंच सांगतां येईल कीं, या नव्या आंदोलनानें बुद्धिवाद व अध्यात्मवाद यांच्यामधील ढळलेला तोल पुनः सावरला जाईल—क्षीण वा नष्ट झालेली इच्छाशक्ति जागृत व संघटित होईल व सर्व जगावर पसरेल, परंतु अजून आपण संधि-कालांतच आहोंत.

जे लोक स्वभावतःच आशावादी आहेत, ते परिस्थितीला तोंड देऊं शकतात, आणि जुजबी भाकितें करूं शकतात. पण शेवटीं त्यांचे कपाळीं निराशाच येते. जे स्वभावतःच निराशावादी आहेत ते अर्ध-सत्यांच्या गुंगींत पडून राहातात. यापुढील १०।२० वर्षांचा संधि–काल दांतओठ खाण्याचा, त्रासाचा जाणार आहे. इतिहासाच्या लाटेंत जी पोकळी निर्माण होते, तिच्यांत आपल्याला राहावें लागेल. याचा अर्थ, आपण खालीं पडून राहून, दैववादावर विसंबून, योग्य काळाची वाट पाहात राहावें, असा आहे काय ?

माझें मत याच्या अगदीं उलट आहे. जे लोक तात्पुरते निराशावादी बनले आहेत, त्यांनीं आपली कृतिशील संघटना बांधावी,—आज नड तिचीच आहे,

असें माझें मत आहे. ते लोक जगापुढील प्रश्न चुटकीसरशीं सोडविण्याचा हेतु मनांत धरणार नाहींत. कारण त्यांना माहीत आहे कीं, लाटेच्या पोकळींत राहून हे प्रश्न सोडवितां येणार नाहींत. समाजावर शस्त्रक्रिया करण्यासाठीं, एखाद्या शस्त्रवैद्याप्रमाणें ते आपली सुरी पाजळणार नाहींत. कारण त्यांना माहीत आहे कीं, आपलीं शस्त्रें दूषित आहेत. ते आपले डोळे उघडे ठेवून व त्यांना झांपडें न लावून, जागतिक उत्थानाचीं प्रसाद-चिन्हें केव्हां दिसतात याची वाट पाहातील. आणि जेव्हां तें उत्थान जन्मास येईल, त्यावेळीं त्याचा जन्म सुखानें होण्यास हातभार लावतील. तें उत्थान त्यांच्या हयातींत जन्मास नच आलें, तरी ते निराश होणार नाहींत. एखाद्या विशिष्ट वर्गांतूनच हें नवें उत्थान निर्माण होईल, अशी अपेक्षा ते धरणार नाहींत. पण दरिद्री व पीडित वर्गांतूनच तें उदयास येईल. तोंपर्यंत या संधि-कालाच्या सहारा-वाळवंटांत हिरवळ निर्माण करणें हेंच त्यांचें प्रमुख कार्य राहील.

या हिरवळी लहान असतील वा मोठ्या असतील. केवळ मूठभर मित्रांचें तें मंडळ असेल किंवा सर्व राष्ट्रच्या राष्ट्र व्यापून टाकणारी ती संघटना असेल. इटाली, नॉर्वे, स्पेन अशीं युद्ध-क्षेत्राच्या कडेवरील राष्ट्रें त्यांत अंतर्भूत होतील. यापुढील भांडखोर राष्ट्रांच्या टक्करींत या हिरवळी शाबूत राहातील हें शक्य आहे. सामाजिक व आर्थिक प्रवाहाखालीं त्या संस्था जरी दबून गेल्या, तरी भांडखोर राष्ट्रांमध्यें सहिष्णुता व जुन्या काळची माणुसकी निर्माण करण्यास त्या समर्थ ठरतील. याचें गेल्या तीनशें वर्षांतील ठळक उदाहरण म्हणजे स्वित्झर्लंड. लढाऊ राष्ट्रांमध्येंसुद्धां अशा अंतर्गत संस्था स्थापून तेथील तप्त वातावरण शांत करण्याचें कामहि अशक्य नाहीं. पूर्वीच्या तथाकथित "तमोयुगांत," रोमन साम्राज्याचा अस्त व पुनरुज्जीवनाचा उदय यांच्यामधील संधि-कालांत, अशा हिरवळी-सारख्या संस्था निर्माण झाल्या व त्यांनीं संस्कृतीचें सातत्य राखलें. धार्मिक मठ व विद्यापीठें-यांत लढाऊ सैनिकांना पाय ठेवतां येत नसे.

अशी जगाची हिरवळ होण्याची पात्रता मोठ्या राष्ट्रांपैकीं इंग्लंडच्या अंगीं सर्वांत अधिक आहे. त्याच्या पुराण परंपरा आणि अचल समाज-व्यवस्था यांमुळें हें शक्य आहे. असे संधि-काल म्हणजे इतिहासांतील उतरणच होय. आपल्या प्रवासांत आतां आपण अशा ठिकाणीं येऊन पोहोंचलों आहों कीं, आगगाडीच्या एंजिनापेक्षां त्यांच्या ब्रेकांचेंच महत्व अधिक आहे. आतां प्रश्न प्रवासाची गति वाढविण्याचा नाहीं-तर ती नियंत्रित करण्याचा आहे. गेल्या शतकांत आपण नैतिक नियंत्रणाकडे अधिकाधिक दुर्लक्ष केलें, आणि त्यामुळें हुकूमशाही यंत्रानें आपल्या

प्रगतीचें एंजिन मोकाट धावावयास लावलें. याचा साध्या भाषेंत अर्थ असा कीं, हुकूमशहा किंवा बादशहा यांपैकीं कोणाची तरी निवड मला करावी लागेल. मी बादशहाची निवड बिनदिक्कत करीन. तो मला उपद्रव मानील; आणि आडमुठेपणानें धक्के मारील. पण शहाणा हुकूमशहा, मी विरोधी मताचा आहें असें कळतांच, सभ्यतेनें गोळी घालून मला ठार करील. दुसऱ्या कालखंडांत हा बादशहा प्रगतीचा वैरी ठरला असता, पण यापुढील दहा-वीस वर्षांत त्याची सनातनी निष्ठा, ती वरपांगी असली तरी, संघर्ष टाळण्यास उपयोगीं पडेल.

१९१७ सालीं, आमचें मनोराज्य हाताशीं आलें आहे असें वाटत होतें. आतां हा संधि-काल जितका लांबेल तितका काळ तें मनोराज्य टुरावेल. तोंपर्यंत आपण हिरवळ निर्मूं या.

"राजा मृत्यु पावला...."

१

"राजा मृत्यु पावला–राजा चिरायु होवो!"—अशी ललकारी पूर्वी फ्रेंच सरदार–दरकदार देत असत. आतां कांहीं वर्षें या ललकारींत असा फरक केला पाहिजे—"हिटलर मृत्यु पावला––फॅसिझम् चिरायु होवो!" ही ललकारी आपल्या चित्तांत चांगली ठसली पाहिजे. नाहीं तर आपल्याला विस्मय व दुःख करण्याची पाळी वारंवार येईल—सिंहाच्या जबड्यांत आपलें डोकें ठेवून निजणाऱ्या माणसासारखी आपली अवस्था होईल. फॅसिझमचा पराभव केवळ रण-भूमीवर करतां येणार नाहीं; तो पराभव जनतेच्या विचार-भूमीवर व भावना भूमीवर केला पाहिजे. कारण फॅसिझम् हें फार पुरातन अशा मनोवृत्तीचेंच एक नवें नांव आहे. जेथें जेथें "काळा आदमी", "सुवर" अशा शिव्या दिल्या जातात, जेथें जेथें नागरिकांच्या सुखी जीवनाला किंवा राजकीय ध्येयाला तुच्छ लेखलें जातें, आणि जेथें जेथें पगार-वाढ म्हटलें कीं, "साम्यवादाचें लाल संकट" म्हणून आरडाओरडा केला जातो व संप कायदेशीर रीत्या केला तरी, संपवाल्यांवर गोळ्या झाडल्या जातात; तेथें फॅसिझम् आहे––तुमच्या डोळ्यांसमोर उभा आहे. तो गेस्टापोसह सप्तरंगांत पाहाण्यासाठीं तुम्ही चित्रपटाकडे धांव घ्यावयास नको.

स्वतंत्रतेंतहि तर-तमभाव असतो. एकांतवासाच्या कोठडींत डांबलेला कैदी हा, ज्याला व्यायाम करण्याची मोकळीक आहे, अशा बंदिवानापेक्षां कमी स्वतंत्र असतो. प्रत्यक्ष कारागृहाच्या तुलनेनें कच्ची कैद ही नंदनवन ठरते. नाझी जर्मनीच्या तुलनेनें फॅसिस्ट इटाली हा स्वतंत्र देश होय; पण फ्रान्सच्या तुलनेनें तो अस्वतंत्र होय. परंतु फ्रान्समध्यें किती स्वतंत्रता होती? तेथील लोकशाहीनें स्त्रियांना मताधिकार नाकारला होता. तेथील स्त्रियांना पतीच्या उदार परवानगीशिवाय बँकेंत आपलें खातेंहि उघडण्याचा अधिकार नव्हता. ही परिस्थिति अमेरिकन लोकांना साहजिकच अत्यंत रानटी वाटते; आणि आपण जगांतील सर्वांत स्वतंत्र देशांत नांदत आहोंत, ही त्यांची सुस्त भावना दृढ होते.

"मी एक तुच्छ पाखंडी आहें. माझ्या तोंडावर तुम्ही थुंका." अशी पाटी गळ्यांत बांधून व्हिएन्नाच्या रस्त्यांवरून एका माणसाची धिंड काढण्यांत आली.

नंतर तो अमेरिकेच्या भाग्य-भूमीवर येऊन दाखल झाला. पण येथें त्याला अनुभव काय आला? हॉटेलांत त्याला कोणी घेईना. त्या हॉटेलांत केवळ गोऱ्या लोकांनाच प्रवेश! त्याला अशा वैषम्याची कांहींच कल्पना नव्हती. अमेरिकन चित्रपट त्याला फार आवडत. गेटिस्बर्ग येथें लिंकननें केलेलें भाषण त्याला फार उदात्त वाटे. पण प्रत्यक्ष व्यवहारांत अमेरिकेचेंहि स्वातंत्र्य मर्यादित आहे, हें पाहून, निराश होऊन, त्या माणसानें जीव दिला.

स्वातंत्र्य व फॅसिझम् यांच्यांतील अंतर हें केवळ कमीजास्ती प्रमाणांचेंच आहे, असें मीं म्हटलें, तर तुम्ही त्याला विरोध कराल, व मुद्रणस्वातंत्र्य, लोकनियुक्त प्रतिनिधित्व इत्यादि घटनेंतील अभिवचनें माझ्यापुढें फेंकाल. अर्थात् हें सत्य आहे. "सर्व कांहीं ठीक चाललें आहे." असें सिद्ध करण्यासाठीं जे लोक वरील युक्तिवाद करतात, त्यांच्यापेक्षां हुकूमशाही राजवटींत ज्यानें दिवस कंठले, त्याला लोकसत्ताक संस्थांची मातब्बरी विशेष वाटते. पण कायद्याचे शब्द व त्यांची अंमलबजावणी करण्याचें तत्त्व यामधील अंतर तो ओळखूं शकतो. त्याला हें माहीत असतें कीं, हिटलरचेंहि एक पार्लमेंट आहे; आणि त्याला कोणत्याहि क्षणीं उडवून लावण्याची सत्ता त्या पार्लमेंटला तत्त्वतः तरी आहे. हंगेरीमध्यें हॉर्थीच्या राजवटींत मजूरपक्ष कायदेशीर होता, आणि परवांपरवांपर्यंत तो आपलें दैनिक पत्रहि चालवीत होता. तसेंच, १९३६ सालीं रशियानें मंजूर केलेली राज्यघटना ही सर्व जगांत अत्यंत लोकशाहीप्रधान आहे, आणि तरीहि तेथें विरोधी पक्षांच्या सर्व हालचालींना बंदी आहे व एकच एक पक्ष तेथें अस्तित्वांत आहे.

याचा अर्थ इतकाच कीं, केवळ घटनान्तर्गत स्वातंत्र्यावर राजी राहून विसंबणें बरोबर नाहीं. आपल्या जीवनसरणीपेक्षां फासिस्टांची राहाणी अगदीं वेगळी आहे–ती एक भिन्न वस्तुच आहे, असें आपण मानतों. पण हुकूमशाही वृत्ति ही एखाद्या वायुसारखी आहे. कोणत्याहि आकाराच्या भांड्यांत तो वायु ठेवतां येतो. त्या वायूच्या सौम्य अवस्थेमध्यें राहाण्याची तुम्हांला एकदां का संवय झाली, म्हणजे मग त्यानें तुमचें सारें जीवन विषमय करून टाकलें, तरी तें तुम्हांला कळत नाहीं. एके दिवशीं सकाळीं आपण उठलों, आणि एकदम सर्व जग फॅसिस्ट झाल्याचें पाहूं लागलों, असें घडत नाहीं. तसें घडतें तर तें टाळणें सोपें होतें. खरें संकट हें आहे कीं, आपण आदल्या रात्रीं निजावयास गेलों, तेव्हांच जग, आपल्याला न कळत, फॅसिस्ट होत चाललें होतें.

२

हे माझे विचार कोणी भीषण भाकितें मानूं नयेत, अशी माझी इच्छा आहे. दोन महायुद्धांमधील काळांत युरोपमध्यें असे जे भविष्यवादी झाले, त्यांनीं आगाऊच सूचना दिल्या होत्या. याचें कारण ते निराशावादी होते, किंवा, "लांडगा आला रे आला" अशी उगीच आवई उठविणारे होते, अथवा "मीं नव्हतें हें सांगितलें!" अशी पुढें शेखी मिरविणारे होते, असें नव्हे. आतां त्यांचेपैकीं फारच थोडे जीवंत असतील. त्यांनीं तुम्हांला सावधानतेचा इशारा दिला, याचें कारण ते केवळ स्वप्नांत रंगणारे होते असें नव्हे, तर त्यांना सत्याचें साक्षात् दर्शन झालेलें होतें, आणि त्यासाठीं त्यांनीं आपल्या स्वतःच्या शरीरावर घणाचे घाव सोसले होते. समाजवादी लोकांनीं हिटलरविरुद्ध तुम्हांला इशारा दिला होता. फ्रेंच लोकांनीं आपल्या संरक्षणासाठीं धांवा मांडला होता. कारण परचक्र म्हणजे काय याची त्यांना पुरेपूर कल्पना होती. "बडे तिघे—चौघे—किंवा पांचजण" अशा राजकीय युति सत्तेच्या लोभानें होऊं लागल्या, तेव्हांच लहान लहान देशांनीं इशाऱ्याचें बोट उचललें. कारण त्या युतींची किंमत आपल्यालाच द्यावी लागणार, हें ते जाणून होते. वर्ण–श्रेष्ठतेविरुद्ध ज्यू लोकांनीं तुम्हांला जागे केलें होतें, कारण त्यांना हें ठाऊक होतें कीं, आपल्याला आज जे नाझी नांवें ठेवीत आहेत, ते अखेरीस दगडांनीं ठेंचठेंचून ठार करणार आहेत; आणि शिरच्छेद करणार आहेत—मग तो ज्यू कलकत्त्यांत असो, वॉर्सामध्यें असो किंवा डेट्रॉईटमध्यें असो. आणि आज ज्यांनीं फॅसिझमच्या रोग कसकसा वाढत जात आहे, आणि त्याचीं लक्षणें कोणकोणतीं आहेत हें पाहिलें आहे, ते लोक तुम्हांला असा इशारा देत आहेत कीं, या काळपुळीला सदिच्छेनेंहि तुम्ही पुटकुळी मानूं नका.

केवळ हाल भोगल्यानें शहाणपण येतें असें नाहीं, हें आम्ही जाणतों. म्हणून तुमच्या व आमच्या अनुभवांतील फरक जेव्हां आम्ही दाखवितों, तेव्हां आम्ही अहंमन्य आहोंत किंवा वडीलधारेपणाचा आव आणीत आहोंत असें समजूं नका. प्रत्येक हुतात्मा म्हणजे कांहीं साधु नसतो—पुष्कळ वेळां तो मूर्खासारखें वागतो. ज्यूंच्या खालोखाल पोलिश लोकांनीं अत्यंत खडतर यातना भोगल्या. शत्रूनें कसाऱ्याप्रमाणें त्यांची कत्तल उडविली, व दोस्तांनीं त्यांचा विश्वासघात केला. पण आतां तेच आपली स्थिति कशी शोचनीय करून घेत आहेत पाहा. शहाणपण शिकण्याची लायकीच त्यांचे अंगीं नाहीं असें वाटूं लागतें. पण त्यापेक्षां असें

म्हणणें योग्य होईल कीं, इतिहास हा एक खराब शिक्षक आहे—तो प्रथम शिष्याला शिक्षा देतो आणि त्या शिक्षेचें कारण शोधून काढण्याची जबाबदारी त्या शिष्यावरच टाकतो. केवळ पोलिश लोक हे कांहीं वाह्यात् विद्यार्थी होते असें नाहीं. उध्वस्त झालेल्या युरोपखंडाच्या बहुतेक भागांत देशाभिमानाची व आंधळ्या सूडाची भावना वाढीस लागली आहे. पराजित व विमुक्त—अशा दोन्ही देशांमध्यें, प्रकट वा प्रच्छन्न रीतीनें, प्रतिकाराच्या संघटनांमध्यें आपापसांत मारामाऱ्या चालल्या आहेत.

ज्यांनीं प्रत्यक्ष हाल भोगले व जे त्या हालांपासून सामान्यतः दूर राहिले, अशा लोकांमध्यें फरक हा असतोच. युरोपमधील क्रोडो लोकांना दुष्काळ, जुलूम व अपमान यांच्या यातना भोगाव्या लागल्या. त्यांच्यांतील थोड्या लोकांना कां होईना, नवी जाणीव आली. एकदोन गोष्टी ते नव्यानें शिकले. खंक झालेल्या युरोपखंडाचें, ते अल्पसंख्य लोक म्हणजे मोठें धन आहे—बलवान आशास्थान आहे. या किंवा त्या पक्षामध्यें किंवा गटामध्यें ते आहेत असें समजूं नका. मात्र त्यांची संख्या पुरोगामी गटांत अधिक आहे. "लघुतम साधारण" अनुभव असलेल्या त्या स्वतंत्र व्यक्ती आहेत. त्यांचेवर कांहीं काळ जुने पक्ष, अथवा पूर्व–पश्चिमेकडील नवे संबंध यांची छाप पडणें शक्य आहे.

अजून ते अल्पसंख्य आहेत म्हणून कांहीं बिघडत नाहीं. इतिहासामध्यें जी कांहीं प्रगति झालेली आहे, ती नेहमीं अशा जागृत अल्पसंख्याकांनींच केली आहे. आपल्या ज्ञानाचें कलम सुस्त समाजावर करून, त्याला त्याचें कल्याण कशांत आहे हें शिकविण्यांत जेव्हां हे अल्पसंख्य यशस्वी होतात, तेव्हांच समाजाची प्रगति होते. अशा अल्पसंख्यांकाशिवाय, फ्रान्समधील क्रान्तीचे वेळीं बॅस्टाईलचा तुरुंग फोडला गेला नसता; आणि अमेरिका ही एक "संयुक्त राष्ट्र" कधींच झाली नसती. इतिहासापासून धडे घेऊन त्यांचा अर्थ जे नीट समजतात, तेच चांगले शिष्य!

असे अल्पसंख्य समाज प्रत्येक देशांत असतात—जसे अमेरिकेंत, तसेच नॉर्वे-फ्रान्समध्येंहि! आणि म्हणूनच हाल व अनुभव भोगणारे व न भोगणारे यांच्यामध्यें फरक पडतो. हाल न भोगणाऱ्यांमध्यें सुबुद्ध वर्ग लहान असतो—तुटक असतो. ते पुढील घटनांचीं भविष्यें करतात, तीं आपल्या ध्येयवादानें,—अनुभवानें नव्हे. ते कंटशोष करून ओरडतील पण त्यांना समाजाकडून प्रतिसाद मिळणार नाहीं. कारण त्यांच्यासारखे हाल व अनुभव समाजाला आलेले नसतात, आणि त्यामुळें समाजाचें मन त्यांच्या पद्धतीशीं सुसंवादी राहात नाहीं. सामाजिक

मनाला ध्येयवादी माणसाच्या कल्पनाशक्तीचें देणें मिळालेलें नसतें, आणि म्हणून "हे लोक असे खवळून कां उठत आहेत?" असें समाज-मन म्हणत राहातें.

समाजाकडून जाब मिळाला नाहीं म्हणजे त्याचा परिणाम त्या भविष्यवादी बुद्धिवंतावर विपरीत होतो. तो अधिकच तुटकपणें राहूं लागतो—अधिकच कडवट बोलूं लागतो—आणि त्यामुळें पुनः सर्वसामान्य माणसाच्या विचारांपासून दुरावतो. अठराव्या शतकांत फ्रान्समधील शेतकऱ्यांचीं मनें हालअपेष्टांनीं व उपासमारीनें तयार झालीं नसतीं, तर डँटन व सेंट जस्ट यांना आपली सारी हयात जुन्या पुस्तकांचें संपादन करण्यांतच घालवावी लागली असती.

अर्थात् युरोपखंडांतील परिस्थिति व वातावरण भिन्न आहे. तेथील लोकांचा नवखेपणा ओसरलेला आहे. अमेरिकन सैनिकाप्रमाणें वा अधिकाऱ्याप्रमाणें युरोपिअन माणसाभोंवतीं अज्ञानाची जंगी तटबंदी उभारलेली नाहीं. फ्रान्स किंवा बेल्जियम यांतील खेड्यांमध्यें अमेरिकन रणगाडे गेले म्हणजे तेथील लोक त्यांचेभोंवतीं कसे गोळा होतात आणि चॉकोलेटच्या तुकड्यासाठीं हात कसे पसरतात, किंवा रणगाड्यांवर फुलें कशीं उधळतात, याचीं चित्रें तुम्हीं पाहिलीं आहेत ना? रणगाड्यांतील अमेरिकन मुलांपेक्षां रणगाड्याबाहेरील खेडूत एका शतकानें वडील आहेत असें त्यावरून दिसतें. ते हंसले तरी तें वडीलपण तुम्हांला त्यांच्या डोळ्यांत दिसेल. एखादी तरुण छोकरी ड्रायव्हरचें चुंबन घेते, तरी तिच्यावरहि त्या वडिलकीच्या अनुभवाचा पोक्तपणा पसरलेला असतो. अनुभवांतून त्यांचीं जीवनें जन्मास आलेलीं असतात.

त्या खेडुतांमध्यें जे जागृत अल्पसंख्य असतात, त्यांच्यावर आमची आशा खिळलेली असते. ते अल्पसंख्य बुद्धिजीवी वर्गांतून आलेले व समाजापासून दुरावलेले असे नसतात; तर प्रतिकारात्मक चळवळींतून आलेले ते भावनाशील व कृति-शील वीर असतात. त्यांची संख्या त्या मानानें मोठी असते. त्यांचे समाजाशीं संबंध जिव्हाळ्याचे असतात. कालांतरानें कां होईना, त्यांचे शब्द समाजानें ऐकून घेण्याचा संभव असतो. कारण त्या समाजाच्या भावनाहि त्याच असतात; आणि त्यामुळें छायाचित्रांतील त्यांचे चेहेरे रणगाड्यांतील अमेरिकन मुलांपेक्षां अधिक पोक्त दिसतात.

त्यांच्या हालअपेष्टांना राजकीय दृष्ट्या तत्काळ वाचा फुटली नाहीं, तरी त्यांचे अवशेष शिल्लक राहतील, आणि योग्य वेळीं परिस्थितीचें कवच फोडून बाहेर पडतील. ते चुका व प्रमाद करतील; पण त्या चुका व ते प्रमाद पूर्वीसारखेच असणार नाहींत. कदाचित् त्या चुका त्यांनीं स्वतः केलेल्या नसतील—बाहेरून

त्यांचेवर लादलेल्या असतील. आपली सत्ता वाढविण्यासाठीं मोठमोठ्या राष्ट्रांमध्यें जे तंटेबखेडे गूढ रीतीनें चाललेले असतात, त्यामुळें राष्ट्रा-राष्ट्रांमध्यें फूट पडते. पोलिश लोकांना जगांतील सारें ज्ञान प्राप्त झालें असतें, तरी सरतेशेवटीं त्यांचे कपाळीं तीच दुर्दशा आली असती. तसेच ग्रीक किंवा फ्रेंच पक्षोपपक्षांमध्यें भांडणें चालू असल्याचें ऐकलें म्हणजे तुम्ही ऐदीपणानें असें म्हणूं नका, "हे लोक पूर्वीइतकेच मूर्ख राहिले आहेत—त्यांनीं भोगलेल्या दुःखामुळें त्यांच्या-मध्यें कांहींच फरक पडलेला नाहीं." फरक निश्चित पडलेला आहे; व त्याचें फळ योग्य वेळीं खचित दिसून येईल—मात्र या राजकीय झोंबाझोंबींतून त्यांना वाट मिळाली पाहिजे. तशी वाट त्यांना पूर्वी मिळाली नाहीं. ती आतांहि न मिळेल, तर त्यांना कांहीं काळ माथेफिरू होण्याला एक सबब सांपडेल.

पण तुम्हांला अशी सबब कांहींच नाहीं. दोन बड्या राष्ट्रांच्या चिमटींत तुम्ही सांपडलेले नाहीं; आणि तीं शेजारी राष्ट्रें अलिप्तपणानें किंवा दमदाटीनें तुमचें भवितव्य घडवीत नाहींत. व्हेनेझुएला प्रमाणें स्वारी होण्याचें भय तुम्हांला कित्येक शतकें नाहीं. त्याचप्रमाणें तुमच्यामध्येंच "राष्ट्रीय क्रांतिकारक प्रश्न" या नांवानें चळवळ सुरू करून तिला पैशाचा पुरवठा देण्यास कॅनडाचें सरकार आतां पुनः पुढें येणार नाहीं. तुमचें राष्ट्र सर्व जगांत अत्यंत संपन्न आहे. तुम्ही एका पिढींत दोनदां युरोपच्या पश्चिम भागाला गुलामगिरींतून सोडविलें आहे. पहिल्या खेपेस तुम्ही स्वतःला व फ्रान्समध्यें पतन पावलेल्या आपल्या देशबांधवांना आपल्या त्यागाच्या नैतिक श्रेयापासून वंचित केलें. या खेपेसहि तुम्ही तसेंच श्रेय गमावणार काय? असा प्रश्न युरोपचे लोक स्वतःलाच करीत आहेत.

३

स्वातंत्र्य हें कमी-अधिक प्रमाणांत असतें. त्यामुळें तें हळुहळु व गुपचूपपणें ओसरत गेलें, तर अननुभवी लोकांना ती स्वातंत्र्य-हानि झाल्याचा पत्ताहि नसतो. हें आपल्या सर्व पाश्चात्य संस्कृतीलाहि लागू आहे. इतिहासामध्यें रोमच्या विनाशासारखे जे महान अनर्थ घडतात, ते एका क्षणांत कडाडत व प्रचंड उत्पातानें होत नाहींत. परंतु बर्फमय उतरणीवरून हळु हळु घसरत यावें, तसे ते नकळत होतात आणि ही प्रक्रिया शतकानुशतकें—निदान दशकानुदशकें—चालू राहाते.

खरोखर मानवी स्वभावाचा हा एक विलक्षण नियम आहे कीं, त्याला महान

अनर्थ हे क्षुद्र व शांत अशा घटनांसारखे भासतात. क्षय हा केवढा महान रोग! पण त्याचीं पहिलीं लक्षणें कांहीं डांग्या खोकल्याइतकींहि भयानक नसतात. मज्जातंतूचा भंग झाला, म्हणजे मनुष्य किती क्षुब्ध होतो! पण त्याला जर कांहीं दुर्धर मानसिक रोग झाले, तर त्याचीं चिन्हें अगदीं मामुली असतात. एकाद्या युद्धांत विश्रांतीचा काळ जेव्हां येतो, तेव्हां आकाश व शेतें किती प्रशांत व प्रसन्न दिसतात, हें कोणताहि सैनिक सांगूं शकेल. एकाद्या रोगी ज्या कल्पना व जीं स्वप्नें क्षुल्लक व साधीं मानतो, तींच त्याच्या मानसिक संघर्षाला कारण झालेलीं असतात, हें कोणताहि मानस-शास्त्रज्ञ सांगेल. इतकें कशाला, आपणच आपल्या रोजनिशींतील मजकूर एक वर्षानें वाचूं लागलों, तर असें आढळून येईल कीं, त्यांत ज्या घटना आपण किरकोळ मानल्या त्यांचाच पगडा आपल्या आयुष्यावर विलक्षण बसला. तें पाहून आपल्याला किती विस्मय वाटेल ! कैक आत्मवृत्तांतहि असेंच दिसून येतें.

हा प्रकार मोठा चमत्कारिक वाटतो हें खरें, पण त्याचीं कारणें उघड आहेत. आपल्या आयुष्यांत ज्या महान दुःखदायक घटनांचीं वादळें माजतात, तीं क्षुल्लक जलबिंदुसारखीं आहेत, असें मानण्याची मानवी मनाची प्रवृत्ति असते; आणि त्या प्रवृत्तीच्या आधारावरच तें मन आपला तोल राखूं शकतें. ती प्रवृत्ति नसेल तर अगदीं लहान वयांतच आपलीं डोकीं फिरून जातील. संकटाला लघु लेखण्याची ही एक चांगली युक्ति आहे, पण तिच्यांत कांहीं दोषहि आहेत. त्या युक्तीमुळें आपत्कालीं आपली विवेक-शक्ति शाबूत राहाते. पण जेव्हां सर्व कांहीं ठीक चालल्याचें दिसतें, तेव्हां आपण आपल्याशींच संतुष्ट राहातों व कोडगे बनतों. लघु लेखण्याची इंग्रज लोकांची संवय अशाच प्रवृत्तींतून निघालेली आहे. व्हिक्टोरियन युगामध्यें इंग्लंड हें सत्ता व समाधान यांचा बालेकिल्ला बनलें, तेव्हांपासून ही आत्म-संतुष्ट वृत्ति तेथें रुजली आहे.

या संरक्षक वृत्तीला छिद्रें पाडण्याचें काम संकटांचा अनुभव करीत असतो. सर्व नीति-शास्त्राचें सारहि हेंच आहे. 'महान संकटाला लघु लेखण्याची प्रवृत्ति आपखुषीनें सोडून द्या.' हीच नीति-शास्त्राची शिकवण आहे. पण ती अंगीं मुरणें हें महा कठीण कर्म आहे. म्हणूनच तर शांततेच्या मोहिमेपेक्षां युद्धाची मोहीम सुरू करणें हें अधिक सोपें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 22036... विः ...निबंध...
क्रमांक ...2203... नोंः दिः ...24.2.2145

भ्रमाची मीमांसा

न्यूटननें "प्रिन्सिपिया" हा एकच ग्रंथ लिहिला असें नव्हे, तर त्यानें नरकाचें वर्णन करणारी एक पुस्तिकाहि लिहिली आहे. ज्या सत्य घटना आपल्याला समजून घेतां येण्यासारख्या आहेत–किंबहुना, ज्या आपण समजावून घेतल्याहि आहेत, त्यांच्याशीं विसंगत असणाऱ्या समजुती आपण आजमितीलाहि आपल्या उराशीं बाळगून आहोंत. आपल्या मस्तकांत अशा समजुतींचा उष्ण प्रवाह व विवेकाचा हिम प्रवाह–दोन्हीहि जवळ जवळ वाहात आहेत. पण त्या दोघांचे एकमेकांवर कांहीं परिणाम घडूं नयेत असाच नियम आहे. त्यामुळें उष्ण प्रवाह थिजत नाहीं व हिम-प्रवाह वितळत नाहीं. मानवी मन निदान दोन अवस्थांमध्यें विभागलेलें असतें. तें मूलतः द्विधा असतें. त्यामुळें एखादा खगोल-शास्त्रज्ञ आपल्या यंत्रावर विश्वास ठेवतो व त्याबरोबरच ख्रिस्ती धर्मग्रंथांतील वर्णनावरहि विश्वास ठेवतो. एकादा सैनिक श्रद्धाळु असतो. एकादा कम्युनिस्ट "कोट्यधीश कामगार" असण्याची शक्यता मान्य करतो. एकादा मानसशास्त्रज्ञ लग्न करतो. एकादा कर्मविपाकवादी आपल्या विरोधकाला शिव्याशाप देतो. रानटी माणसाला हें माहीत असतें कीं, आपली देवाची मूर्ति ही एका लाकडाच्या तुकड्यावर कोरलेली आहे, पण तरीसुद्धां त्याची अशी श्रद्धा असते कीं, हाच देव पाऊस पाडतो. दिवसेंदिवस आपल्या श्रद्धा व समजुती हळु हळु सुसंस्कृत होत आहेत हें जरी खरें, तरी आपल्या मनाचें मूलभूत स्वरूप जें द्विदळ आहे, तें कायमच आहे.

ही द्विविध मनोवृत्ति विशिष्ट मज्जातंतुमुळें उत्पन्न होते असें मानण्यास जागा आहे. आपल्या मेंदूमध्यें भावनांचें एक स्थान आहे व विवेकाचें दुसरें स्थान आहे, असें प्रगत मानसशास्त्रावरून दिसून येतें. त्यामुळें एकाच परिस्थितींत मनाच्या परस्पर-विरोधी दोन वृत्ति प्रकट झाल्याचें, जनावरावरील प्रयोगांत, दिसून आलें आहे. गेल्या युद्धांत सैनिकांच्या मेंदूला इजा झाली असतांना त्यांची तपासणी केल्यावरहि हेंच आढळून आलें. विवेक-शून्य समजुतींचीं मुळें भावनेमध्यें रुजलेलीं असतात, त्यामुळें त्या समजुती खऱ्या वाटूं लागतात, आणि त्याचा परिणाम आशायुक्त किंवा भीतियुक्त चिंतनांत होतो. माकडें किंवा लहान मुलें अथवा रानटी माणसें यांचे विचार अशाच दिशेनें चालतात. आणि आपणहि २४ पैकीं २३ तास अशाच पद्धतीनें विचार करतों. कोणत्याहि परिस्थितीचा

निर्विकारपणें व बुद्धिवादानें विचार करणें ही संवय नवी आहे. ती इतकी दुबळी आहे कीं, भावनेच्या वारीकशा फुंकरीनेंहि ती उडून जाते आणि बुद्धिवादी विचाराची जागा भावना बळकावून बसते.

शरीर-शास्त्र व मानस-शास्त्र यांच्या गेल्या ५० वर्षांतील प्रगतीवरून असा एक सिद्धांत प्रस्थापित होतो कीं, मानवाचें मन सर्वसामान्य परिस्थितींत विवेका-प्रमाणें चालत नाहीं, तर भावनेप्रमाणें चालतें. प्राथमिक अवस्थेंतील मनुष्याचें मन तर तर्कशास्त्राच्या पलीकडेच असतें. परंपरेनें सांचत आलेल्या व सिद्ध झालेल्या समजुती तें प्रमाण म्हणून स्वीकारतें. आजहि मानवी मन त्याच अवस्थेंत प्रायः आहे, असें फ्रॉईडसारखे मानस–शास्त्रवेत्ते सांगतात, आणि ऑगडेन व रिचर्ड्स् यांसारखे व्युत्पत्ति–शास्त्रज्ञहि तेंच सांगतात.

या संशोधनाचा परिणाम राजकारणावर फारसा झालेला दिसत नाहीं. दुसरी, तिसरी व चौथी जागतिक संघटना अपेशी कां झाल्या? सर्व जगांत समाजवाद स्थापन करणें अशक्य कां झालें? याचें अंतिम कारण म्हणजे मानवी मनावरील भावनेचा पगडा त्यांनीं लक्षांत घेतला नाहीं हें होय. "मानवी मन हें मोठें विवेकी आहे, आणि संध्याकाळचे वर्ग भरवून, पुस्तकें छापून, पत्रकें फैलावून, आपण युक्तिवादानें त्या मनाला जिंकलें कीं तें आपलें हित कशांत आहे तें ओळखूं लागेल व त्याप्रमाणें वागूं लागेल." असा विश्वास समाजवादी प्रचारकांना वाटत होता. त्यांनीं मानवाचें अंतर्मन, मेंदूचा अर्धा भाग, त्यांतील स्वप्न–भूमि, त्यांतील भावना यांजकडे लक्षच दिलें नाहीं. पण शें. ९० भाग तोच असतो. यामुळें फॅसिझमच्या घटनेचें स्वरूप कसें आहे, हें समाजवादी लोकांना मुळींच कळलें नाहीं—आणि म्हणून त्याचा प्रतिकार करणें अजिबात जमलें नाहीं. त्यामुळें आज खोल दरीच्या टोंकावर उभे असूनहि, समाजवादी लोक, स्वतःच्या मनाला फसवीत, पोकळ आशेच्या राज्यांत नांदत आहेत. फॅसिझमदेखील भ्रमावर व विवेक–शून्यतेवर आधारलेला असला, तरी शास्त्रीय सत्यापासून तितकाच दूर आहे. तो विवेकाला अगदीं गौणत्व देतो. त्याचें समाजशास्त्र चुकीच्या वंश–सिद्धांतावर उभारलेलें आहे. त्याचें राजकीय अर्थशास्त्र प्राथमिक व भोळसर आहे. त्याची समाज-व्यवस्था प्रगतिशून्य आहे.

इतिहासाकडे पाहाण्याचे दोन दृष्टिकोन आहेत. एक मार्क्सवादी लोकांचा, व दुसरा फॅसिस्ट लोकांचा. त्या दोघांचा समन्वय शास्त्रशुद्ध रीतीनें केला फक्त बर्नहॅमनें. पण त्याचा धिक्कार पुरोगामी पक्षानें ताबडतोब केला.

९४६२

२

समाजवादी पक्षाच्या विचारसरणींतील हा मूलगामी दोष होय–तो त्याच्या पुढाऱ्यांच्या वैयक्तिक दोषांचें फळ नव्हे. त्याचीं मुळें अधिक खोलवर गेलेलीं आहेत.

१८ व्या शतकाचे अखेरीपर्यंत क्रांतिकारक चळवळींना धर्माचें अधिष्ठान असे–निदान धर्माचें दृढ बंधन असे. त्यामुळें सुखी जीवनाची बुद्धिवादी लालसा तृप्त होई आणि त्याबरोबरच ब्रह्म-साक्षात्काराची श्रद्धाशील तळमळहि शांत होई. त्या चळवळी भावनेनें ओतप्रोत भरलेल्या असत. त्यांमध्यें मूलगामी बदल फ्रेंच राज्यक्रांतीनें घडवून आणला.

युरोपांत धर्मसुधारणेचें जें आंदोलन झालें, त्यानें उपाध्याय–वर्गाच्या भ्रष्टतेवर घाव घातला; पण देवाच्या नांवानें. त्या आंदोलनाचें स्वरूप ऐहिक सुधारणेचें होतें; आणि म्हणून त्यानें देवाला हात लावला नाहीं. पण फ्रेंच राज्यक्रांतीचा हल्ला केवळ उपाध्याय–वर्गावर नव्हे, तर देवावरहि उघड उघड होता. देवा-ऐवजीं बुद्धि–देवता स्थापन करण्याचे प्रयत्न फसले. पण दुसरीं तत्वें मान्यता पावलीं. "स्वतंत्रता, समता व बंधुता" या केवळ पोकळ घोषणा नव्हत्या. तीं साक्षात् दैवतें होतीं. तसेंच तें तिरंगी निशाण. चर्चचा उपयोग "मानवी हक्कांचा" नवा मंत्र प्रसृत करण्याला होऊं लागला. अमेरिकेच्या "स्वातंत्र्याचे जाहीर-नाम्यांत" असे शब्द आहेत,—"सर्व मानव समान म्हणून निर्मिलेले आहेत, हा सिद्धांत स्वयंसिद्ध असल्याचें आम्ही मानतों." स्वयंसिद्ध याचा अर्थ तर्काच्या व बुद्धिवादाच्या प्रांतापलीकडे, आपोआप स्फुरलेलें असा आहे.

या नव्या देवतांचें भावपूर्ण आवाहन अल्पकालीन ठरलें. तें एका शतकांतच क्षीण झालें. याच्या उलट ख्रिस्ती धर्माचा भ्रम जवळ जवळ दोन हजार वर्षें टिकून राहिला. याचीं कारणें उघड आहेत. ख्रिस्ती धर्माच्या दंतकथा व धर्मविधि यांच्या पाठीशीं अश्म–युगापासूनची प्राचीन परंपरा उभी होती. त्याचीं पाळेंमुळें मानवाच्या अंतर्मनांत खोलवर रुजलेलीं होतीं. पण १७८९ मध्यें अमेरिकेच्या जाहीरनाम्यानें जीं तत्वें घोषित केलीं, तीं जागृत बुद्धि-वादांतून जन्मास आलेलीं होतीं. त्यांनीं जगांतील विचारांची पोकळी कांहीं काळ भरून काढली. मानवी मनाला ज्यांची ओढ असते, अशीं पूजास्थानें तीं बनलीं. परंतु तीं कांहीं सगुण साकार दैवतें बनूं शकलीं नाहींत—मानवाची आध्यात्मिक भूक भागवूं शकलीं नाहींत. जगाची अपूर्णता व विफलता आणि

त्यामुळें मानवी मनाला प्राप्त होणारी भयग्रस्तता यांची भावना नाहींशी करण्यासाठीं हीं तत्वें गूढ-गुंजनाचें वातावरण निर्माण करूं शकलीं नाहींत. तीं मानवी मनाच्या गाभाऱ्यांत शिरलीं नव्हतीं. त्यांचें स्वरूप ऐहिक होतें. देव हे नेहमीं आकाशांत राहातात व संध्याकालांत संचरतात. पुरोगामी पक्षामध्यें जो कांहीं गूढ ध्येयवाद असेल, तोहि ज्ञानाच्या झगझगीत प्रकाशांतच दिसणारा होता.

१९ व्या शतकाच्या मध्यानंतर, १८४८ सालानंतर, नव्या ध्येयवादाचें श्रद्धाशील स्वरूप नष्ट झालें. फ्रेंच राज्यक्रांतीचे उद्‌गाते देवदूत मानले गेले नाहींत, तर वेडे मानले गेले. अस्तंगत होणाऱ्या ख्रिस्ती धर्माची जागा भरून काढणारें व लोकांच्या भावनेला अदम्य आकर्षण करणारें नवें तत्त्वज्ञान पुढें आलें नाहीं.

आधुनिक समाजवादाचे संस्थापक असें मानीत होते कीं, अशा आकर्षणाची गरजच नाहीं. त्यांच्या मतें धर्म हा लोकांना अफूसारखा आहे. तो काढून त्याचे-ऐवजीं बुद्धिवादाचें अन्न लोकांना दिलें पाहिजे. सर्व विज्ञानांची झपाट्यानें प्रगति होत होती, व डार्विनचा विकासवाद द्रुतगतीनें पुढें येत होता. त्यामुळें सर्वसामान्य लोकांना असा विश्वास वाटूं लागला होता कीं, बुद्धिवादाचे निर्णय अचूक असतात. त्याचप्रमाणें पारदर्शक अणुपरमाणूंचें बनलेलें स्वच्छ, सतेज व स्फटिकमय विश्व निर्माण होईल आणि त्यांत संध्याकाळचा अंधुक प्रकाश व रात्रीचा अंधार राहाणार नाहीं. सारे भ्रम व साऱ्या दंतकथा लोपून जातील, अशी आशा मानवाला वाटूं लागली होती.

अशा वातावरणांत मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद जन्मास आला. त्यावेळीं बुद्धिवाद व भावना यांचें नातें स्वार व घोडा यासारखें आहे असें मानलें जात होतें. बुद्धिवाद हा स्वार आणि आपल्या अंतःकरणांतील—"मानवांतील पशु"—हा घोडा. आतां आपण इतक्या उत्साहानें हा विश्वास ठेवीत नाहीं. मानवी शरीर असलेला घोडा आपल्या पुराणांत वर्णिलेला आहे ना? तसें नातें बुद्धि व भावना यांचें आतां आपण मानतों. पण मध्यंतरींच्या काळांत समाजवादी लोक घोड्याला—म्हणजे भावनेला—चाबूक मारीत, व स्वाराशीं—म्हणजे बुद्धिवादाशीं—युक्तिवाद करीत.

याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. फ्रान्समधील बॅस्टाईल तुरुंग उध्वस्त झाल्यापासून दीडशें वर्षें आंदोलनामागून आंदोलनें उठलीं, पण तीं विराम पावलीं. जॅकोबिनिझम्, उपयुक्ततावाद, प्रथम व द्वितीय इंटरनॅशनल, ओव्हेनिझम्, ट्रेड युनियन, अराजकवाद, फेबिनिझम्, राष्ट्रसंघ, वायमार प्रजासत्ताक, तृतीय

इंटरनॅशनल—हीं सारीं आंदोलनें म्हणजे नवविचारांच्या भूमींतून अंकुरलेले एकाच वृक्षाचे कोंब होते; पण ते दहा वीस वर्षांतच वाळून-वठून गेले.

हीं आंदोलनें वांझ ठरलीं, तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांचा प्रचंड परिणाम घडून आला, इतका कीं, त्याला इतिहासांत तोड नाहीं. या आंदोलनांनीं प्रत्यक्ष लाभ कांहींच झाला नाहीं, असें म्हणून कांहीं टीकाकार नाक मुरडतात व मान हलवितात. पण त्यांनीं मार्क्सच्या 'कॅपिटल' ग्रंथांतील कांहीं भाग वाचावा. म्हणजे गेल्या शतकाच्या प्रारंभीं इंग्लंडमधील गिरण्यांत मजुरी करणाऱ्या मुलांची काय दुर्दशा होती, स्पिटहेड येथें बंड कसें झालें वगैरे हृदय-द्रावक घटना कळून येतील गेल्या १५० वर्षांतील पाखंडी चळवळींमुळें सर्वसामान्य मानवाची जितकी रोकडी सुधारणा झाली, तितकी ख्रिस्ती धर्मानें १५०० वर्षांत घडवून आणली नाहीं.

मात्र हें सर्व भौतिक प्रगतीला लागू आहे. त्या आंदोलनांनीं लोकांची मानसिक क्रांति किती केली हा प्रश्न निराळा आहे. त्यांच्या मूळ उद्देशाशीं ताडून पाहातां सुधारणेची प्रत्येक चळवळ अपयशी ठरलेली आहे. त्या चळवळींना जें मर्यादित यश आलें, तेंच कांहीं त्यांनीं साध्य म्हणून आपल्या डोळ्यापुढें ठेवलेलें नव्हतें. प्रत्येक आंदोलनाच्या प्रवर्तकांनीं आपण सुवर्ण-युग सुरू करणार, असें अभिवचन मोठ्या उत्साहानें दिलें होतें. पण भूलोकावर स्वर्ग निर्माण करण्याची त्यांची कल्पना धुळीस मिळाली. त्यांना जें कांहीं थोडें-बहुत यश लाभलें तें केवळ आनुषंगिक होतें. एकाद्या लक्षाधीशाचें दिवाळें निघावें आणि तशांत तो मृत्यु पावावा म्हणजे मग त्याचे वहिवाटदार त्याची थोडीफार मालमत्ता शाबूत ठेवूं शकतात, तसें स्वरूप या आनुषंगिक लाभाचें होतें. याप्रमाणें पुरोगामी पक्षाचें भौतिक क्षेत्रांतील पाऊल हळूहळू पण समाजसुधारणेच्या दृष्टीनें निश्चितपणें पुढें पडत होतें, परंतु सामाजिक मनोवृत्तीवर त्यांचा संकलित परिणाम जर कोणता झाला असेल, तर तो म्हणजे वैफल्याची व भ्रम-निरासाची भावना वाढीस लागली हा होय.

भौतिक सृष्टीपेक्षां उच्च अशा वस्तूवरील श्रद्धा नाहींशी झाली. तिची जागा भरून काढणारें कोणतेंच तत्त्व नीतिशास्त्राच्या बंदिस्त चौकटींत नव्हतें. प्रगति भ्रामक ठरली; कारण तिचीं पाळेंमुळें भविष्यकाळांत असतात—भूतकाळांत नव्हे. पुरोगामी पक्ष भावनेच्या दृष्टीनें हळुहळू उन्मळून पडूं लागला. त्याचा सारा जीवन-रस शोषला गेला. ब्रिटिश लेबरपक्ष व जर्मन सोशल डेमोक्रॅट पक्ष—हे जेव्हां सत्तारूढ झाले, तेव्हां ते चिपाडासारखे निःसत्व झाले होते. समाजाच्या अंतर्मनाशीं त्यांचा कांहींच संबंध नव्हता. त्यांचें नीतिशास्त्र केवळ बुद्धिवादी सिद्धांतावर

उभे राहिलें होतें. फ्रेंच राज्यक्रांतीच्या परंपरेंतील जर कोणता अवशेष राहिलेला असेल, तर तो म्हणजे व्हॉल्टेअरप्रमाणें तिखट भाषेंत वादविवाद करणें एवढाच.

कम्युनिस्ट लेखकांच्या एका परिषदेंत, नव्यानें निर्माण होणाऱ्या शूर-वीर जगाबद्दल कडाक्याची चर्चा कित्येक तास झाली. नंतर एकानें अधीरतेनें विचारलें, "पण या जगांत ट्राम-गाडीखालीं सांपडलेल्या माणसाचें काय होणार?" सारे लोक त्याचेकडे टकमका पाहूं लागले. त्यानेंहि तो प्रश्न धसास लावला नाहीं. पण तो प्रश्न धसास लावणारा "आंतला आवाज" आपल्या सर्वांच्या अंतःकरणांत आहे. आत्म्याच्या अमरत्वावरील आपला विश्वास उध्वस्त झाला आहे. मृत्यु-नंतरहि मनुष्य जगूं शकतो, आणि त्या जीवावर दुसऱ्या कशाहिपेक्षां आपलें प्रेम किंवा द्वेष अधिक तीव्र असतो, हें आपण विसरूनच गेलों आहोंत. श्रद्धेवरील या आघातामुळें आपल्याला जी जखम झाली आहे, ती अजून भरून आलेली नाहीं.

युद्धभूमीवर मारलें जाणें किंवा शास्त्रीय संशोधन करतांना मृत्यु पावणें या नुकसानीची थोडीफार भरपाई होते. पण ट्रामखालीं चेंगरून मरणाऱ्या माणसाचें काय? नदींत बुडून मरणाऱ्या बालकाचें काय? पूर्वीच्या माणसाजवळ या प्रश्नांना उत्तरें होतीं. आपल्याला वरवर पाहातां जे अपघात भासतात, त्या या विश्व-रचनेंतील नियमबद्ध घटना असतात, असें तो मानी. त्याच्या दृष्टीनें दैव आंधळें नव्हतें. भूकंप, ज्वालामुखी, जल-प्रलय, रोगराई—हे सर्व ईश्वरी योजनेचे अंश आहेत, आणि ईश्वर तुमची काळजी घेत आहे, अशी श्रद्धा पूर्वी असे. नरमांस-भक्षक, उत्तरध्रुवनिवासी, हिंदु व ख्रिश्चन—या सर्वांजवळ वरील गूढ प्रश्नाचें उत्तर आहे. हा प्रश्न सर्व प्रश्नांमध्यें श्रेष्ठ आहे. तो दाबण्याचा, लपविण्याचा किंवा हेटाळून डावलण्याचा कोणी कितीहि प्रयत्न केला, तरी आपल्या सर्व कृतींचें नियमन करणारा तो आहे. त्या कम्युनिस्ट लेखकांच्या परिषदेंत, त्या पृच्छकाला दीर्घकालच्या स्तब्धतेनंतर, एकच उत्तर मिळालें, आणि तें म्हणजे "दळणवळणाचीं साधनें पूर्णपणें समाजवादी सत्तेच्या ताब्यांत आलीं, म्हणजे अपघातच होणार नाहींत."

३

पहिलें महायुद्ध समाप्त झाल्यानंतर जगांत सांचलेल्या विफलतेच्या भावनेचा एकदम उद्रेक झाला. सर्व युरोपखंडांत अतींद्रियावरील विश्वासाची, श्रद्धेच्या लालसेची एक लाटच पसरली. दाबलेल्या भावना उफाळून आल्या. विचारशक्तीनें

सूड उगविला. निरनिराळ्या परिस्थितींत, निरनिराळ्या रूपांनीं, हें वादळ विजेच्या वेगानें धावूं लागलें. ज्या राष्ट्रांना युद्धांत जय मिळाला होता, तेथें ही गति जरा मंदावली. पण कांहीं राष्ट्रांमध्यें चैनीच्या, विलासाच्या, रंगेलपणाच्या दिशेनें हें वादळ उठलें. श्रद्धेवरील पुनर्विश्वासाच्या या लाटेचे ऐतिहासिक दृष्ट्या दोन परिणाम दिसून आले. ते म्हणजे फॅसिझम व रशियांतील भ्रम.

येथें मला हें स्पष्ट केलें पाहिजे कीं, "रशियांतील भ्रम" हे शब्द मी तेथील विकासाला उद्देशून लिहिलेले नाहींत; तर त्या रशियाच्या विकासाचे युरोपांतील पुरोगामी पक्षांवर जे मानसिक परिणाम झाले, ते मला अभिप्रेत आहेत. मी यापुढें असें सिद्ध करून दाखविणार आहें कीं, इतर भ्रामक समजुतींप्रमाणें या रशियांतील भ्रमानेंहि मानवी मनाच्या कांहीं खोल व गूढ आकांक्षा तृप्त केल्या. त्यामुळें त्याचें ऐतिहासिक कार्य सिद्धीस गेलें असें मात्र नाहीं. येशू ख्रिस्त व त्याचे अंतेवासी यांच्याविषयीं ऐतिहासिक दृष्ट्या संशोधन होऊन कितीहि नवें ज्ञान बाहेर पडलें तरी, ख्रिस्ती धर्माविषयींच्या भ्रामक समजुती अबाधितच राहतात; तसाच हा प्रकार.

४

फॅसिझम व रशियन तत्त्वज्ञान—हीं दोन्हीहि मानवाच्या केवळ बुद्धीला व्यापणारीं नाहींत. बुद्धीबरोबरच भावनेचीहि तृप्ति करून, मानवी जीवनाचा साकल्यानें विचार करण्यास तीं तत्त्वज्ञानें समर्थ आहेत. फॅसिस्ट तत्त्वज्ञानाचा सारा कारभार उघडा–त्याला आडपडदा कांहींच नाहीं. फॅसिस्ट नेते जनतेच्या घशांत अफूच्या गोळ्या उघडपणें कोंबतात. वंशाचा व राष्ट्राचा अभिमान, सर्वश्रेष्ठ पुरुषांची कल्पना, दैवतांची अद्भुत शक्ति, ज्यूंची दुष्ट वृत्ति–या सर्वांचा पद्धतशीर उपयोग राष्ट्रसेवेसाठीं करून घेतला जातो. मानवाच्या सुप्त भावनांच्या तारा अचूक छेडण्यांतच हिटलरची निम्मी प्रतिभा कामीं येई; आणि बाकीची निम्मी प्रतिभा अर्थशास्त्र, शिल्पशास्त्र, युद्धशास्त्र, प्रचारशास्त्र यांमध्यें आधुनिक विचार ओतण्यांत खर्च होई. जुन्यापुराण्या श्रद्धांचें नव्या-करकरीत स्वरूपांत पुनरुज्जीवन करणें हेंच फॅसिझमचें रहस्य आहे. नाझींच्या कर्तृत्वाची इमारत गगनचुंबी आहे. जमिनींतील ऊन पाण्याच्या झऱ्यांतून त्या इमारतींत पाण्याचे नळ नेले आहेत.

याच्या उलट, समाजवादी चळवळीला पाण्याचा पुरवठा छपरावरील टाकींतून

होणारा आहे, आणि ती टाकी केव्हांतरी पावसाच्या पाण्यानें भरेल अशी आशा आहे. रशियन राज्यक्रांतीनें असा पाऊस आणला, एवढेंच नव्हे तर, उष्ण प्रदेशांत धोधो पर्जन्य–वर्षाव सुरू केला. त्यामुळें, तोंपर्यंत कोरडे ठणठणीत असणारे पाण्याचे नळ एकदम उसळत्या व खळखळणाऱ्या पाण्यानें वाहूं लागले.

पहिलीं कांहीं वर्षें रशियांतील सत्यस्थिति व भ्रम हे पुष्कळसे एकरूप होते. त्या पराक्रमी युगांत दंतकथा आपोआपच पसरल्या. त्या धुराच्या लोटामागें खरा अग्नि धगधगत होता.

आणि केवढा प्रचंड तो अग्नि! जनतेनें सत्ता काबीज केली होती. पृथ्वीचा सहावा हिस्सा जनतेच्या सत्तेखालीं आला होता. खाजगी मालकी, नफ्याची लालसा, लैंगिक निर्बंध, सामाजिक रूढी—या सर्वांचा एका तडाख्यानें धुव्वा उडविला होता. आतां यापुढें राव नि रंक, स्वामी नि सेवक, अधिकारी नि नागरिक—असे कोणतेच भेदभाव रहावयाचे नव्हते. यापुढें पत्नीवर पतीची, मुलांवर आई–बापांची, शिष्यांवर शिक्षकांची, सत्ता चालणार नव्हती. 'दशाज्ञां'-प्रमाणें, रशियन सरकारच्या अपूर्व हुकुमामागें एक विलक्षण शक्ति उभी होती. त्यांतील शब्दांतून मेघगर्जना ऐकूं येत होती. ते शब्द ज्यांनीं ज्यांनीं ऐकले, त्यांना त्यांना वाटलें, "आपल्या मनांवरील जुनाट कवच फुटून–गळून पडत आहे. संशयवाद, विफलतावाद, बुद्धीची शरणागति या सर्वांवरील कवचें उडून जात आहेत. अननुभूत अशा भावनांचे लोट वाहात आहेत. आपल्या अंतः-करणांतून कशाचा तरी उद्रेक होत आहे. त्याची जाणीव आपल्याला पूर्वी नव्हती; इतकी ती भावना, ती आशा मनांत खोल दडलेली होती."

अशी क्रांति येणार आहे, असें पुरोगामी पुढारी वर्षानुवर्ष, एका शतकाहून अधिक काळ, डांगोरा पिटून सांगत होते. पण जेव्हां ती क्रांति प्रत्यक्ष अवतीर्ण झाली, तेव्हां खेड्यांतील एकाद्या भटजीइतकेच तेहि विस्मयचकित झाले. एकाद्या रिकाम्या प्रार्थना-मंदिरांत आपलें साप्ताहिक प्रवचन झोडून बाहेर पडलेल्या पाद्र्याचे कानांवर नभोवाणीवरून "स्वर्गींचें राज्य आलें!" अशी घोषणा आदळली, म्हणजे त्याचें मस्तक जसें सुन्न होऊन जाईल, तशी अवस्था समाज-वादी क्रांतीची ललकारी देणाऱ्या पुरोगामी पुढाऱ्यांची झाली.

एखाद्या प्रेषितानें भविष्य करावें आणि तें खरें यावें, तसें पुरोगामी पुढाऱ्यांचे बाबतींत घडलें. शेतकरी-कामकऱ्यांचें राज्य, कामगारवर्गाची हुकूमशाही, अपहार-कर्त्यांचा अपहार–हे सर्व शालेय पुस्तकांतील ठरीव शब्द आतां जीवंत झाले, रसरशीत झाले. आपण हें पाहिलेंच आहे कीं, पुरोगामी पक्षाचे सिद्धांत

भूतकाळांतून निघालेले नव्हते, तर कल्पनेच्या अवस्थेंतील भविष्यकाळांतून. तें भविष्य आतां कल्पनासृष्टींतून सत्यसृष्टींत उतरलें होतें. मनोराज्य हें जीवंत लोकांचें खरें राज्य बनलें होतें. आणि आपल्यापासून त्याचें भौगोलिक अंतर बरेंच असल्यामुळें, आपल्या कल्पनाशक्तीलाहि भरपूर वाव मिळत होता. आपण दूर राहात असल्यामुळें आपण आपल्या कल्पनेंत हवे ते रंग भरूं शकत होतों. प्रगति, न्याय व समाजवाद हीं केवळ स्वप्नें राहिलीं नव्हतीं. आतां पूर्वीच्या अनाथ व विस्कळित चळवळीला एक नेता, एक निशाण व एक मातृभूमि लाभलेली होती.

स्वातंत्र्याचीं युद्धें खेळणाऱ्या झुंझार वीरांचा तो महान संग्राम होता. त्यामुळें एक शतकभर उपाशी राहिलेला व राज्यलक्ष्मीचा स्पर्श कधींच न झालेला युरोपांतील जो पुरोगामी पक्ष, त्याच्या सर्व अतृप्त भावना एकदम संतुष्ट झाल्या. अशा प्रकारें रशियांत भ्रम-मूलक तत्त्वज्ञानाचा जन्म झाला—किंवा पुनर्जन्म झाला. कारण मानवजाति निर्माण झाली तेव्हांच्या आदिमानवाचें तत्त्वज्ञानच रशियांत पुनर्जन्म पावलें. पूर्वीच्या कालांत "सुवर्ण-युग," "स्वर्गाचें राज्य," "नंदनवन"—इत्यादि आमिषें दाखविलीं जात. तशींच आमिषें दाखवून रशियन तत्त्वज्ञानानें विफल जीवनाची व गूढ मृत्यूची भरपाई करण्याचा प्रयत्न केला. साम्यवादी चळवळींत भाग घेणारे आमच्यासारखे जे लोक विद्यमान आहेत, त्यांना हें माहीत आहे कीं, रशियन तत्त्वज्ञानानें अशीं आमिषें दाखवून मानवी उणिवांची भरपाई पुरेपूर केली. मात्र तीं रशियनांच्या वांट्यास आलीं नाहींत, तर रशियाबाहेर जे रशियाचे पूजक होते त्यांना तीं प्राप्त झालीं.

आदिमानवाचा हा जो नवा अवतार प्रकट झाला, त्याचें मुख्य लक्षण हें कीं, आकांक्षांची पूर्तता होण्यापूर्वीं भीषण उत्पात घडून आले. शांततेच्या मार्गांनीं समाजवादाकडे संक्रमण करण्याची सुधारणावादी कल्पना कट्टे कम्युनिस्ट झटकन् झिडकारून टाकतात ती यामुळेंच. नव्या अवताराचा प्रसाद मिळण्यापूर्वीं क्रान्तीचा साक्षात्कार होणेंच अवश्य.

साम्यवादाचा वणवा लष्करी आक्रमणानें विझविण्याचे प्रयत्न पाश्चात्य राष्ट्रांनीं दबकत दबकत केले. त्यामुळें साम्यवादाच्या भक्तांचा उत्साह वृद्धिंगत झाला आणि रशियाच्या मुखाभोंवतीं हौतात्म्याचें तेजोवलय झळकूं लागलें. पुढें रशिया हा युरोपांतील सर्वांत श्रेष्ठ असा लष्करी देश झाला, आणि त्यानें पोलंड व बाल्टिक संस्थानें अर्धीअधिक खाऊन टाकलीं, तरी त्याचें हें हौतात्म्याचें तेजोवलय मात्र शिल्लकच राहिलें. समाजवादी रशिया हाच स्वतः जनतेची अफू बनला.

५

रशियन राज्यक्रांतीच्या पाठोपाठ युरोपखंडांत क्रान्तीची लाट पसरली. पण तिला जर्मनी, इटाली, हंगेरी, बाल्कन्स् या देशांत पराभव खावे लागले. या शतकाच्या पहिल्या चरणापासूनच युरोपमध्यें लवकर क्रांति होण्याची आशा सोडून द्यावी लागली. तोंपर्यंत क्रांतीच्या फाळाचें टोंक म्हणजे रशिया होता. आतां क्रांतीची चळवळ ही रशियाची सांवली बनली. चीनपासून स्पेनपर्यंत क्रांतिकारकांचे एकसारखे पराभव होत गेले. आत्महत्या करणाऱ्या पथकांचेंच नशीब त्यांच्या वांट्यास आलें.

सर्व जगांतील कामगारशाहीचें कल्याण पाहण्याऐवजीं रशियाचें हित सांभाळलें जाऊं लागलें. 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल' ही संस्था तर रशियाच्या परराष्ट्र–कचेरीची एक शाखाच बनली. युरोप–खंडांतील विविध राष्ट्रांमध्यें कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणांत अकस्मात् बदल झाले. याचें कारण रशियाचें धोरण बदलत गेलें.

"एका राष्ट्रापुरता समाजवाद" अशा घोषणेचा मुलामा या परिस्थितीला देण्यांत आला. रशिया म्हणजे कामगार–वर्गाचें माहेरघर. त्याच्या रक्षणासाठीं युरोपांतील क्रान्तिकारक चळवळींचा बळी दिला तरी हरकत नाहीं. रशियाचा बालेकिल्ला मजबूत झाला, म्हणजे त्यांतून बाहेर पडणारे योद्धे सर्व जगाला मुक्त करतील अशी भावना निर्माण करण्यांत आली. युरोपांतील क्रान्तिकारकांचा आजचा त्याग म्हणजे उद्यांच्या महान् लाभाचें बीजारोपणच! अशीं आश्वासनें प्रेषिताच्या भाषेंत दिलीं जाऊं लागलीं. युरोपांतील कामगारवर्गाच्या कार्यांतून रशियानें आपलें अंग काढून घेतलें, खुद्द रशियांत मक्केच्या यात्रेकरूंशिवाय कोणास प्रवेश करण्यास मनाई झाली–अशा घटनांमुळें रशिया सत्यसृष्टीपासून दूर दूर जात चालला; आणि त्याच्या भ्रमजालांत कल्पनेचे निरनिराळे रंग भरूं लागले.

६

युरोपमधील पुरोगामी पक्षाशीं रशियानें हें जें वर्तन ठेवलें, त्याचे भयंकर परिणाम इतिहासाच्या पानावर नोंदलेले आहेत. सर्व युरोपमध्यें कम्युनिस्ट पक्षांनीं नकळत फॅसिझम्चें सुईणपण केलें. पुढारी किंवा अनुयायी यांपैकीं ज्यांना या धोरणाचा निषेध करण्याचें ज्ञान आणि धैर्य होतें, त्यांची पक्षांतून–किंवा इहलोकांतूनहि–हकालपट्टी करण्यांत आली. कांहींना पोलिसांचे हवालीं करण्यांत आलें. रशियन हुकूमशाहीचें स्वरूप कसें होतें हें कॉमिन्टर्न संस्थेच्या घटने-

वरूनच ध्यानांत येण्यासारखें आहे. आशियांतील प्रायः अडाणी असणाऱ्या जनतेला ज्या रीतीनें रशियानें वागविलें, त्याच रीतीनें त्यानें युरोपमधील कामगारांशीं व बुद्धिजीवी वर्गांशीं वर्तन ठेवलें, आणि पाश्चात्य लोकांची परिस्थिति व मनःस्थिति यांजकडे पूर्ण कानाडोळा केला. ट्रॉट्स्कीपासून बॉर्केनॉपर्यंत अनेक टीकाकारांनीं हें विशद केलें आहे. पण त्यांचें विश्लेषण केवळ राजकीय क्षेत्रापुरतें होतें. रशियाबाहेरील बहुतेक सर्व कम्युनिस्टांनीं आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीं या परिस्थितीपुढें मान कां तुकविली याची मानसशास्त्रीय मीमांसा मात्र कोणी केलेली नाहीं.

रशियांत पक्षाचें "शुद्धीकरण" सतत चालू होतें. कालचे लोकनेते बहिष्कृत केले जात होते. अनुयायांच्या मतांचा पगडा पक्षाच्या धोरणावर अजिबात बसत नव्हता. शत्रूशीं आलटून-पालटून दोस्तीचे करार केल्यानें हजारों माणसांचा चुराडा होत होता. शब्दांचा जो मूळ अर्थ असेल त्याचा नेमका विपर्यास व्हावा, अशा रीतीनें घोषणांना मुरड घालण्यांत आली. कालपर्यंत जें सत्य होतें, त्याचा सावेश इनकार करण्यांत आला. सारें वातावरण निंदा-नालस्तीनें भरून गेलें. हें सर्व करोडो पाश्चात्यांनीं, स्वेच्छेनें, स्वतःचीच शिस्त पाळून, गेस्टापो सैनिकांची दहशत नसतांना, सुखासुखीं कसें स्वीकारलें असेल ?

आपली चिकित्सक प्रवृत्ति दुसऱ्याकडे बिनशर्त गहाण ठेवण्याचें कारण बुद्धीच्या क्षेत्रापलीकडचें आहे. हा एक विकृत मनोगंडच आहे, असें म्हणतां येईल. पण मनाचा असा एक नियम आहे कीं, ख्रिस्ती धर्म असो किंवा रशियन समाजवाद असो, कोणत्याहि दंतकथेवर, भ्रामक समजुतीवर जो खरी श्रद्धा ठेवतो, तो एखाद्या नास्तिकापेक्षां किंवा ट्रॉट्स्कीच्या अनुयायांपेक्षां अधिक सुखी असतो–अधिक समतोल असतो. माणसाच्या मनांत ज्या प्राचीन श्रद्धा बद्धमूल झालेल्या आहेत, त्यांचा संशयाशीं खटका उडाला म्हणजे विकृत मनोगंड निर्माण होतो. या संशयाला दूर ठेवण्यासाठीं एक संरक्षक फळी उभारली जाते. "नास्तिक व पाखंडी लोकांशीं संबंध ठेवूं नका. ट्रॉट्स्कीचें वाङ्मय वाचूं नका." असे निर्बंध घालण्यांत येतात. त्यामुळें असहिष्णुतेची वृत्ति फैलावते, आणि मग भलीं-भलीं माणसेंहि इतकीं बेभान व अत्याचारी बनतात कीं, त्याचें नवलच वाटावें.

दुसरी एक अंतर्गत संरक्षक फळी नकळत उभारलेली असते. आपलीं जीं लाडकीं श्रद्धास्थानें असतील, त्यांच्याभोवतीं आपलें मन जादूचें वलय निर्माण करतें. त्या वलयाचे आंत जे युक्तिवाद शिरतात, त्यांचा विचार खऱ्या बुद्धिवादानें केलाच जात नाहीं. भ्रामक बुद्धिवादानें त्या विचारांतील विसंगति व मूर्खपणा

सहज पचविला जातो. मनुष्याच्या मनोवृत्ति जितक्या अधिक सुसंस्कृत, तितका त्याचा हा भ्रामक बुद्धिवाद अधिक सूक्ष्म. "हा सिद्धान्त तार्किक दृष्ट्या बरोबर असेल पण विरोध-विकासाच्या दृष्टीनें खोटा आहे." असे कांहीं ठोकळेबाज सिद्धांत ठोकून देऊन तर्कदुष्ट विचारांचें समर्थन केलें जातें.

रशियाचें इंद्रजाल व सत्यस्थिति यामधील अंतर जसजसें वाढत गेलें, तसतशी तर्कदुष्ट विचारांची विसंगति वाढत गेली. ती इतकी कीं, रिबेनट्रॉपला क्रांति-चिन्हाच्या पदवीनें अलंकृत केलें गेलें, तरी तें रशियन तत्त्वज्ञानाशीं सुसंगतच वाटूं लागलें. कुबेराला कामगार व टेबलाला डबकें म्हणण्याइतकेंच हें सुसंगत होतें. गेल्या दहा वर्षांतील "डेली वर्कर" पत्राचे अग्रलेख वाचले, म्हणजे कोणाच्याहि बुद्धीला घेरीच येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रमांक 220326 दिः 1/6/09
क्रमांक 2203 नोंः दिः 7/4/50

अशा परिस्थितींत, रशियन इंद्रजालांत गुरफटलेल्या माणसाशीं, खाजगी किंवा जाहीर चर्चा करणें, हें प्रायः फोलच ठरे. चर्चेचा प्रारंभच मुळीं वस्तुस्थितीला सोडून होई, आणि युक्तिवाद केले जात, ते त्यांच्या गुणांमुळें नव्हे, तर ते रशियन विचार–पद्धतीशीं जुळते असतील तरच केले जात, आणि जुळते नसतील तर ते त्या पद्धतींत कसे बसतील याचा विचार करूनच केले जात. एकादें लहान मूल आपल्या हातांत कोणतीहि वस्तु पडली कीं, तिच्याकडे एकाच दृष्टीनें पाहातें—"ती आपल्याला खातां येईल कीं नाहीं?" तसाच हा वरील दृष्टिकोन होय. समजा, "ट्रॉट्स्कीनें लाल सैन्याची उभारणी केली." असें विधान तुम्ही केलें, तर तें ऐतिहासिक सत्य असलें, तरी त्याज्यच मानलें जाईल, व त्यासाठीं तुम्हांला योग्य तें शासनहि भोगावें लागेल. रशियाचा टीकाकार वाद-विवादांत आपला तोल एकादे वेळेस सोडील, पण रशियाचा प्रचारक, एकाद्या धर्मोपदेशकाप्रमाणें किंवा माथेफिरूप्रमाणें, शांत स्वरानें व हास्य मुद्रेनें बोलत राहील व आपण इतरांपेक्षां श्रेष्ठ आहों असा आविर्भाव करीत राहील.

अशा टीकाकाराच्या वाटेंत अनेक अडचणी असतात. प्रतिगामी वृत्तीचे लोक त्याच्या मताला पुष्टि देत असतात. कारण त्या प्रतिगामी लोकांना रशियन साम्यवाद नकोसा असतो. तसेच साम्यवादाचे कट्टे उपासक दुसऱ्या टोंकाला जाऊन त्याचे विरोधक बनतात. फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचे पूर्वीचे सभासद लावा व डोरियो यांचीं उदाहरणें सर्वांपुढें आहेतच.

८

रशियन सिद्धांताभोवतीं जादूचें जें वलय आहे, त्याचा प्रभाव केवळ कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांवरच होतो असें नव्हे, तर समाजवादी, उदारमतवादी, प्रगतिशील बुद्धिवादी, सुसंस्कृत पाद्री—या सर्वांवर पुसट पुसट पण होतो. दोन महायुद्धांच्या मध्यंतरींच्या वीस वर्षांत, पुरोगामी पक्षाला सतत पराभव सोसावे लागले—विश्वास-घात सहन करावे लागले. राष्ट्रामागून राष्ट्रें बेकारी, चलनवाढ, फॅसिझम यांच्या लाटांमध्यें गडप होऊं लागलीं, तेव्हां ज्याच्यासाठीं जगावें—व ज्याच्यासाठीं मरावें असें एकच राष्ट्र होतें, आणि तें म्हणजे रशिया. निराशेच्या समुद्रांत तेंच एक आशा-द्वीप होतें. श्रांत व निभ्रान्त लोकांना भविष्यकाळाची आशा फक्त रशियांतच दिसत होती. वर वर पाहातां रशियाचे अभिमानी लोक मोठे चिकित्सक दिसत. पण अंतर्यामीं ते सर्व रशियाच्या इंद्रजालांतच गुरफटलेले होते. ते रशियावर हवें तसें तोंडसुख घेत. परंतु त्यांची रशियावरील श्रद्धा व आशा अणुमात्र उणावलेली नव्हती. त्यांच्या चित्तांत असा एक भक्कम व अचल विश्वास होता, "कांहीं झालें तरी रशिया हाच एक जगाचा तरणोपाय आहे—अंतिम आशा आहे—भवितव्य घडविणारा आहे." वायदेबाजार करणारे सुबुद्ध व्यापारीसुद्धां "व्यापार-मंदीच्या लाटेंतहि कांहीं चांगलें असेल." असें मानतात—मृत्युशय्येवर पडलेला नास्तिकहि अंतिम धर्म-विधि करतो, तसाच हा प्रकार. सनातन धर्मांवरील श्रद्धेइतकीच हीहि श्रद्धा अविवेकी असते आणि तरीहि ती मोठ्या दक्षतेनें जोपासली जाते.

९

बद्धमूल श्रद्धांचें समर्थन करण्यासाठीं असे विवेक-शून्य युक्तिवाद केले जातात. एवढेंच नव्हे तर, ते करतांना कम्युनिस्ट लोक "भांडवलशाही मनोवृत्ति," "वर्ग-युद्धापासून च्युति" अशा शब्दांचे आहेर देतात. रशियामध्यें मनोविश्लेषणाला सरकारी रीत्या बंदी आहे. तेथें "वर्गीय जाणीव" म्हणजेच मानसशास्त्र. जशी उत्पादनाची पद्धति तशी मानवाची मनोवृत्ति, हें त्या मानसशास्त्राचें सूत्र. त्याची शास्त्रीय चिकित्सा कधींहि झालेली नाहीं. पण काल्पनिक विश्वासाचें समर्थन काल्पनिक युक्तिवादानें केलें जातें. ख्रिस्ती धर्माचे बाबतींत असेंच घडलें. श्रद्धा व सत्य यांची फारकत जसजशी वाढत जाते, तसतसे अनुयायीहि दुरावत जातात आणि सत्यावर अधिष्ठित असलेल्या नव्या तत्त्वज्ञानाकडे ओढले जातात. त्या तत्त्वज्ञानांत जुन्याइतकेंच भावनेचें आकर्षण मात्र पाहिजे.

रशियाविषयीं भ्रम व सत्य

मागच्या निबंधांत रशियाविषयींच्या भ्रमाची मानसशास्त्रीय मीमांसा केली, प्रस्तुत निबंधांत तेथील सत्यस्थितीचें विवेचन करावयाचें आहे. तेथील समाजवादी रचना खरोखर समाजवादी आहे कीं नाहीं याचें संशोधन करणें हा या निबंधाचा हेतु आहे. अशा संशोधनाला विघ्नांच्या वादळांतून पार पडावें लागतें. उत्तर ध्रुवावर स्वारी, किंवा मॉस्कोमध्यें भूगर्भांतील बांधकाम—यांच्या प्रचाराचेच नगारे इतके वाजतात कीं, ऐकणाऱ्याचे कान बधिरच व्हावेत. पण त्यांचा समाजवादाशीं काय संबंध ? पण तो संबंध आहे असें भासविलें जातें. अगदीं अलीकडे प्रचाराचे असे जे नगारे वाजले, त्यांचा सारांश पुढें देत आहें.

(१) 'रशियन जनतेनें—विशेषतः स्टॅलिनग्रॅडच्या योद्ध्यांनीं—जर्मनीचा पराभव केला. कारण आपण "कशासाठीं लढत आहों" याची जाणीव रशियनांना होती. रशियाचे विजय म्हणजे स्टॅलिनची राज्यव्यवस्था सर्वोत्कृष्ट असल्याचे पुरावेच ! त्याच्या टीकाकारांना हें चोख उत्तर होतें.' असला युक्तिवाद उथळ ठरला म्हणजे प्रचारक थोडे अधिक खोलांत जात; ते पुढील पद्धतीनें:—

(२) सत्य घटनांचा इनकार करणें, किंवा त्यावर आच्छादन घालणें. कालांतरानें त्या घटनांचें सत्य मान्य केलें जातें. उदाहरणार्थ, १९३२—३३ चा दुष्काळ.

(३) सत्याचें गुप्त व जाहीर स्वरूप. रशियन सरकारचीं जीं विधानें पाश्चात्य लोकांना अत्यंत वेडगळपणाचीं वाटतात, तीं खास रशियन लोकांसाठीं होतीं, असें समर्थन केलें जातें. आणि त्याचें कारण असें दिलें जातें कीं, रशियन जनता मागासलेली आहे. उदा. झिनोव्हिएव्ह हा ब्रिटिश गुप्त पोलीस खात्याचा दूत होता.

(४) तत्त्वज्ञान व व्यवहार यांतील फरक. रशियन राजवटीमध्यें, संपवाल्यांना फांशीची शिक्षा सांगितली गेली. अशा प्रतिगामी योजनांचें समर्थन, "तात्पुरती योजना" म्हणून केलें जातें.

(५) साध्यावरून साधनांचे गुणावगुण ठरतात. भांडवलशाही राष्ट्रानें जीं साधनें वापरलीं असतांना तिरस्कारार्ह वाटतात, तींच रशियन राजवटींत आपोआप आदरार्ह बनतात. उदा. स्टॅलिन-हिटलर करार.

(६) सिद्धांतांची अचलता. रशियांतील नोकरशाहीनें केलेल्या चुका व गुन्हेसुद्धां कांहीं कांहीं वेळां रशियन सरकारला कबूल करावे लागले. तेव्हां "हीं क्षणिक लक्षणें आहेत." अशी सारवासारव करण्यांत आली. उत्पादनाच्या

साधनांचें राष्ट्रीयीकरण व नफेबाजीच्या हेतूचें उच्चाटन या अचल सिद्धांतामुळें रशियन सरकारची एकसारखी प्रगति होत आहे—आणि तें राष्ट्र समाजवादी आहे —व म्हणून सर्व जगांतील प्रगतिशील जनतेच्या आदराचें स्थान आहे.

रशियाचे प्रचारक वरील सहा युक्तिवादांपैकीं कोणत्या ना कोणत्या युक्तिवादानें रशियाच्या प्रत्येक कृत्याचें समर्थन करीत असतात. या युक्तिवादांची चिकित्सा आतां आपल्याला विस्तारानें करावयाची आहे.

२

युद्धकालांतील मनःस्थितीमुळें, क्रमांक १ चा युक्तिवाद, मूळचा तर्कदृष्ट्या दुर्बल असला, तरी भावनेच्या दृष्टीनें अत्यंत प्रभावी ठरला. राजकीय दृष्ट्या अडाणी असलेल्या लोकांवरच हा प्रभाव पडला असें नव्हे. रशियाच्या 'लाल सैन्या'च्या प्रचंड विजयामुळें युरोपांतील जनतेमध्यें अदम्य उत्साहाची लाट पसरली, आणि रशियाच्या टीकाकारांचीं तोंडें गप्प झालीं.

रशियन लोकांच्या शूर वृत्तीला किंवा रण-कौशल्याला कमी लेखणें चुकीचें आहे. जर्मन सैन्याचा रशियानें केलेला पराभव हा "चमत्कार" नसला, तरी युद्ध-शास्त्रांतील पहिल्या दर्जाचा पराक्रम होय यांत शंका नाहीं. रशियाची लोकसंख्या जर्मनीच्या दुप्पट आहे. रशियाची औद्योगिक समृद्धि जर्मनीच्या तोडीची आहे. रशियाचा विस्तीर्ण भू-प्रदेश व त्याची विलक्षण थंड हवा—कोणाहि आक्रमकाला प्रतिकार करण्याचे कामीं रशियास साहाय्यभूत ठरतात. तेव्हां वरवर पाहातां असें दिसतें कीं, रशियनांच्या मदतीला ब्रिटिश साम्राज्य किंवा अमेरिका नसती, तरी रशियाचा पराभव जर्मनीला करतां आला नसता.

रशियन सैनिकांचा काटकपणा व दैववादी स्वभाव प्रसिद्धच आहे. १८१५ सालीं त्यांनीं नेपोलियनला धूळ चारली. १९१४ सालीं, रशियाची औद्योगिक पात्रता जर्मनीच्या $\frac{1}{6}$ पेक्षां कमी होती. ब्रुसिलाव्ह येथील सुप्रसिद्ध लढाईंत, रशियाच्या पहिल्या पलटणीजवळ हातांत बंदुका व पायांत बूट होते, दुसऱ्या पलटणीनें हल्ला केला तेव्हां त्यांचेजवळ केवळ बूट होते, आणि तिसऱ्या पलटणीजवळ तर ना बंदूक ना बूट!—आपल्या गारद झालेल्या सहकाऱ्यांचे बूट व बंदुका त्यांनीं उचलल्या, आणि तरीहि ते चार वर्षें लढत राहिले—प्रथम झारसाठीं, नंतर केरेन्स्कीसाठीं व शेवटीं बोल्शेविकांसाठीं. जर्मनीप्रमाणेंच रशियांतहि क्रांतीचा उदय झाला, तो लष्कर व पुरवठा नाहींसा झाल्यानंतरच.

रशियन सरकारचा प्रचार असें जाहीर करतो कीं, १९४४ सालीं रशियन फौजांनीं जो विजय संपादन केला, तो स्टॅलिनच्या तत्त्वज्ञानाचा व समाजपद्धतीचा श्रेष्ठपणा सिद्ध करणारा आहे. यावर प्रश्न असा कीं, १८१५ सालीं रशियानें नेपोलियनवर जो जय मिळविला, तो झारच्या राज्यपद्धतीचा श्रेष्ठपणा ठरविणारा होता काय? आणि त्यामुळें फ्रेंच राज्यक्रांतीच्या तत्त्वज्ञानापेक्षां रशियांतील सरंजामशाही सरस ठरते काय? हेंच उदाहरण जपानला लावतां येईल. तेथील आत्मघाती सैनिकांच्या राष्ट्र-निष्ठेची सर दुसऱ्या कोणत्याहि सैनिकाला येणार नाहीं. सालामावचा बचाव त्यांनीं इतक्या शर्थीनें केला कीं, त्यांच्यांतील एक माणूस जीवंत असेपर्यंत तो लढा चालला. हे बहुतेक सारे लढवय्ये स्टॅलिनग्रॅडच्या वीराप्रमाणेंच शेतकरी–कामकरी होते. पण याचा अर्थ जपानमधील मिकाडोची राजवट ही पृथ्वीतलावर सर्वांत सुधारलेली आहे असें कोण मानील? जर्मन सैन्यहि विलक्षण शौर्यानें लढलें, हें कोणीच नाकारीत नाहीं. पण त्याचा अर्थ नाझीवाद चांगला आहे व गेस्टापोच्या क्रौर्याचा धिक्कार करणारे लोक केवळ निंदाखोर आहेत असा कोण करील? चिनी जनता सुमारें दहा वर्षें सतत, एकाकी, आपल्याहून वरचढ असणाऱ्या आक्रमक जपानशीं झुंज खेळत होती, पण म्हणून काय पाश्चात्य कामगार–वर्गांनीं चिनी समाजरचनेचें अनुकरण करावें?

या विचार-सरणींतील तर्क-दोष उघड आहे. तरीसुद्धां रशियाच्या भ्रामक प्रचाराचा लोकांच्या भावनेवर इतका जबरदस्त परिणाम झालेला आहे कीं, शहाणेसुतें लोकहि डोळे मिटून म्हणतात, "आपण ज्याच्यासाठीं लढत आहोंत त्या ध्येयवादाची जाणीव असल्यामुळें रशियन सैनिक चांगले लढतात." पण जर्मन–जपानी वगैरे सैनिकांना "आपण कशासाठीं लढतों," हें माहीत नसलें, तरीहि ते चांगले झुंजतात. जर्मन सैनिकाच्या पराक्रमावरून नाझीवादाची इष्टता ठरत नाहीं; आणि रशियन सैनिकाच्या पराक्रमावरून स्टॅलिनवादाची योग्यता सिद्ध होत नाहीं. मग "स्टॅलिनवाद चांगलाच आहे आणि नाझीवाद वाईटच आहे." असें गृहीत कृत्यच धरावें लागेल. परंतु त्याचा अर्थ प्रमेयालाच सिद्धान्त मानणें असा होईल.

जगाच्या इतिहासांत असें दिसून आलें आहे कीं, सैन्याचें बळ अनेक कारणांवर अवलंबून असतें, आणि त्यांतील युद्धाचें ध्येय हें एक दुय्यम दर्जाचें कारण असतें. युद्धाचा हेतु उदात्त असो वा रानटी असो, प्रगतिशील असो वा प्रतिगामी असो, लोक सारख्याच उत्साहानें लढले आहेत आणि लढतां लढतां मेले आहेत. कांहीं कांहीं वेळां तर युद्धाच्या कारणांचा वैयक्तिक हिताशीं

काडीमात्र संबंध नसतो—किंबहुना विरोध असतो. क्वचित् तर लोक आपली गुलामगिरी कायम टिकविण्यासाठींहि लढतात. भावनेचें बळ व युद्धाचा ध्येयवाद यांचें प्रत्यक्ष नातें जोडणें तर्कदृष्ट्या चुकीचें आहे.

परक्याचा द्वेष हें एक भावनेला जबरदस्त आकर्षण असतें. प्राचीन काळापासून अर्वाचीन देशाभिमानापर्यंत यार्ची स्वरूपें दिसतात. बॉर्सा येथील समाजवादी कामगार १९२० सालीं रशियाच्या क्रांतिकारक सैन्याशीं सामना देण्यास उभे राहिले व पॅलेस्टाईनच्या अरबांनीं पाहुण्या ज्यू लोकांवर शस्त्र धरलें. वास्तविक ज्यूंच्या आगमनामुळें पॅलेस्टाईनचा आर्थिक फायदा प्रचंड प्रमाणावर होत होता.

चालू महायुद्धांतहि, जेथें जेथें राष्ट्रवाद व सामाजिक ध्येयवाद यांचा संघर्ष आला, तेथें राष्ट्रवादाचाच जय झाला. ग्रीसमधील फॅसिस्ट लोक आपल्यावर चालून येणाऱ्या इटालियन फॅसिस्टांशीं लढले. इंग्लंडसारखें लोकशाही राष्ट्र फॅसिस्ट स्पेनशीं चुंबाचुंबी करूं लागलें. जपानी सरंजामशाहीनें रशियन समाजवादाशीं हातमिळवणी केली. याचा अर्थ असा कीं, कोणत्याहि राष्ट्राचें राजकीय तत्त्वज्ञान शून्य असतें तरीहि, युध्यमान राष्ट्रांची गटवारी, आज आहे तशीच, झाली असती. उदात्त तत्त्वज्ञानाचे पोकळ नगारे कितीहि वाजले, तरी सत्य हें आहे कीं, युद्ध राष्ट्राराष्ट्रांतील आहे—केवळ राष्ट्रीय हितबुद्धीनें चाललेलें आहे—शत्रूपासून संरक्षण करण्यासाठीं, किंवा नवें राज्य जिंकण्यासाठीं चाललेलें आहे, आणि त्यांत देशाभिमानामुळें उसळणारा भावनात्मक उत्साह ओतप्रोत भरलेला आहे.

पुरोगामी पक्षाच्या दृष्टीनें हें महायुद्ध अत्यंत बलशाली अशा फॅसिस्ट सरकारशीं होतें, आणि म्हणून तें लढण्याच्या योग्यतेचें होतें. परंतु दोस्त राष्ट्रें व राजकीय दृष्ट्या उदासीन असणारी बहुसंख्य जनता यांनीं या युद्धाच्या तात्त्विक कारणांची पर्वा केली नाहीं. त्यांनीं पर्वा केली फक्त आपलें राष्ट्र वचावण्याची—आणि गेल्या शतकांतील परंपरागत मूल्यांच्या संरक्षणाची.

'हें सर्व विवेचन भांडवलशाही राष्ट्रांना लागू आहे—रशियाला नाहीं.' असें कम्युनिस्ट मानतात. पण असा भेद करण्याला आधार काय? रशियन सैनिक जगदुद्धाराच्या घोषणा करीत असले तरी, त्यांच्या भावनेचें बळ त्या घोषणांमध्यें नव्हतें, तर तें आपल्या राष्ट्रावरील राक्षसी परचक्र निवारण्याच्या त्यांच्या मूलभूत इच्छेमध्यें होतें. रशियांतील सरकारी प्रचारांतून हा ध्येयवादहि पुढें गळून पडला व क्रान्तीपूर्वीचीं परंपरागत प्रतीकें शिरोधार्य मानलीं गेलीं. जगदैक्याचें गीत लुप्त झालें; व त्याचे जागीं राष्ट्र-गीत म्हटलें जाऊं लागलें. लष्कराच्या क्रान्तिनिष्ठ शपथेची जागा नव्या राष्ट्रीय शपथेनें घेतली. लष्करांतील सारी समानता रद्द

करण्यांत आली. क्रांतीच्या कालीं असलेली शिस्त हरपली; व तिच्या स्थानीं हुकूमशाही शिस्त सुरू झाली. फ्रेंच राज्य-क्रांतीच्या नेत्यांशीं युद्ध करणाऱ्या जुन्या झारशाहींतील सेनापतींना "राष्ट्रीय विभूतींचें" स्थान पुनः देण्यांत आलें. जुनें चर्चहि पुनर्जन्म पावलें व ईश्वराच्या आशीर्वादाची खैरात करूं लागलें.

याप्रमाणें क्रमांक १ च्या युक्तिवादाचा निर्णय असा कीं, कोणत्याहि राष्ट्राच्या लष्करी सामर्थ्यावरून त्याच्या राज्यशासनाचा पुढारलेपणा किंवा मागासलेपणा ठरत नाहीं. तें सामर्थ्य मुख्यतः परंपरागत भावनेंतून निर्माण झालेलें असतें, आणि रशियानेंहि अशा परंपरागत सामर्थ्याला पोषक ठरणारींच ध्येयवाक्यें अंगीकारलीं. इतर सनातनी राष्ट्रांपेक्षां निराळीं अशीं जीं ध्येयवाक्यें रशियाचीं होतीं, तीं नेमकीं त्यानें दूर सारलीं. याचा अर्थ इतकाच कीं, जे रशियन सैनिक "देव, देश व सरकार" यांच्यासाठीं पूर्वी उत्तम रीतीनें लढत होते, ते अजून त्याच तत्त्वासाठीं तसे लढत आहेत.

या सर्व विवेचनामुळें रशिया समाजवादी असणें शक्य नाहीं, असाच निष्कर्ष कांहीं निघत नाहीं. तो तसा आहे असेंहि सिद्ध होण्याची शक्यता आहे. पण त्यासाठीं दुसरे भरीव पुरावे दिले पाहिजेत. रशियानें एकट्यानें प्रचंड संगर केले; यावरून आपण इतकेंच म्हणूं शकूं कीं, तें जर समाजवादी राष्ट्र असेल, तर त्यानें आपलें तें स्वरूप आपल्या सैनिकांपासून, नागरिकांपासून व तसेंच बाहेरच्या जगापासूनहि मोठ्या दक्षतेनें लपवून ठेवलें.

—३—

रशियांत समाजवादाचा केवळ आभास आहे, हें पुष्कळ रशियन भगतांना मुळींच माहीत नसतें. त्याबाबत त्यांचें घोर अज्ञान आहे. उदाहरणार्थ, "तेथें संप करण्याचा कामगारांचा हक्क रद्द झालेला आहे, आणि जो कोणी संप करील—किंवा संपास चिथावणी देईल—त्याला तेथें फांशीची शिक्षा ठेवण्यांत आलेली आहे. तसेंच तेथील मतदारांपुढें सरकारनें नेमलेल्या उमेदवारांची एकच यादी ठेवली जाते, आणि तिला "होय" किंवा "नाहीं" एवढें म्हणण्याइतकेंच स्वातंत्र्य त्या मतदारांना आहे." असें या भगतांना कोणी सांगितलें, तर त्यांच्यांतील दहापैकीं नऊ जणांना मोठा धक्का बसतो. ते त्यावर मुळीं विश्वासच ठेवीत नाहींत. रशियन परिस्थितीविषयीं इतकें अज्ञान असण्याचें एक कारण म्हणजे, तेथील खरीखुरी माहिती मिळणेंच कठीण झालें आहे. आणि दुसरें कारण म्हणजे, रशियाविषयींच्या

आपल्या साऱ्या आशा भग्न होतील ही सुप्त भीति. लोक रशियाला जितकें अधिक चढवून डोक्यावर घेतात, तितकें ते सत्य जाणण्यास नाखूष असतात. डोळे मिटून विश्वास ठेवावयाला सत्य ज्ञानाची गरजच काय? प्रत्येकजण बायबल वाचतो; पण त्यांतील विधानांची सत्यासत्यता पारखून पाहातो कोण?

पुरोगामी पक्ष स्वतःची वंचना करून घेण्यास इतका नकळत राजी असल्यावर, रशियाच्या प्रचारानें इतिहासांत अतुल्य असे पराक्रम करून दाखवावेत, यांत नवल काय? ते पराक्रम करण्याचे मुख्य मार्ग दोन. (अ) सत्यस्थिति दडपून टाकणें. (ब) असत्याचा प्रचार करणें. या दोहोंचा विचार आपण पृथक्पणें करूं.

सत्याचा अपलाप

रशियांत परदेशी वृत्तपत्रांना मनाई होती—आणि आहे. जर्मनींत नाझींनीं केलें नसेल इतकें मुद्रण-नियंत्रण रशियांत चालू आहे. मॉस्कोमध्यें, प्रत्येक शहरामध्यें, सकाळीं दोन वृत्तपत्रें निघतात. एक सरकारचें मुखपत्र व दुसरें पक्षाचें मुखपत्र. सर्व देशांत दररोज सकाळीं, सर्व सरकारी पत्रांत एकच अग्रलेख प्रसिद्ध होतो. मॉस्को येथील "इस्वेस्तिया" पत्राचा अग्रलेख तारेनें व नभोवाणीनें त्या पत्रांना पाठविला जातो. तसेंच, मॉस्को येथील "प्रवदा" पत्राचा अग्रलेख साऱ्या देशांतील पक्षीय पत्रांत प्रसिद्ध होतो. स्वदेशांतील व जगांतील बातम्या सरकारच्या "तास एजन्सी" मार्फत अशाच दिल्या जातात. स्थानिक बातम्या येतात, त्याहि सरकारी अधिकाऱ्यांनीं दिलेल्याच.

रशियासारख्या विस्तीर्ण राष्ट्रांत वृत्तसंस्थेचें असें केंद्रीकरण व नियंत्रण झाल्यामुळें तेथील बहुसंख्य जनतेला परदेशांतील घडामोडींचें ज्ञान तर नसतेंच, पण आपल्या शेजारापलीकडील घटनाहि तिला माहीत नसतात. ही यंत्रणा कशी चालते याचा एक नमुना पाहा.

युक्रेनची राजधानी खारकोव्ह. तेथें १९३२-३३ सालच्या हिंवाळ्यांत मी राहिलों होतों. त्यावेळीं थंडीचा कडाका अगदीं अनर्थकारक होता. सामुदायिक शेतीचा प्रयोग प्रथमच सुरु झाला होता, म्हणून शेतकऱ्यांनीं स्वतःची गुरें मारलीं होतीं, व स्वतःचीं पिकें जाळलीं किंवा लपविलीं होतीं. ते त्यावेळीं उपासमारीनें व विषमज्वरानें मरूं लागले होते. एकट्या युक्रेन प्रांतांत वीस लाख लोक मृत्यु पावल्याचा अंदाज आहे. खेड्यांतून प्रवास करणें, हें अत्यंत दुःखदायक होतें. सुजलेल्या हातापायांचे शेतकरी भिक्षा मागण्यासाठीं स्टेशनावर रांगेनें उभे

होते, बायका आपलीं भेसूर बालकें गाडीच्या खिडकीपाशीं उंच धरून भीक मागत होत्या. त्या बालकांचीं भलीमोठीं डोकीं लटलटा कांपत होतीं, त्यांच्या हाता-पायाच्या काड्या झाल्या होत्या, व त्यांचीं पोटें फुगलीं होतीं.

एक भाकरीचा तुकडा दिला कीं, तेथें त्याच्या मोबदल्यांत, नक्षीचा हातरुमाल, राष्ट्रीय पोशाख व चादरी मिळूं शकत. पायमोजे किंवा बूट यांची एक जोडी दिली म्हणजे पक्षाचा सभासद नसलेली कोणतीहि तरुणी विदेशी माणसाला वश होत असे. खारकोव्ह येथील माझ्या हॉटेलांतील खोलीच्या खिडकींतून मला सर्व दिवसभर प्रेतयात्रा चाललेल्या दिसत. त्या शहरांतील विजेचा पुरवठा बंद झालेला होता, आणि म्हणून रस्त्यावर कोठें उजेड नव्हता. ट्रामची वाहातूक दिवसांतून फक्त एक तास होई—आणि तीहि कामगारांना कारखान्यांवर नेण्या-आणण्यासाठीं. सरपण किंवा पेट्रोल यांचाहि खडखडाट होता. आणि थंडी तर तेथील लोकांनाहि असह्य वाटण्यासारखी होती. शून्याखालीं ३० अंश. सर्व जीवनच गोठून गेल्यासारखें वाटत होतें. सर्व कारभार कोसळण्याच्या बेतांत आला होता.

अशा परिस्थितीमुळें जुने बोल्शेव्हिक सैनिक स्टॅलिनविरुद्ध उभे राहिले, आणि निराशेनें, दबकत दबकत, कट करूं लागले. स्टॅलिननें नंतर जे खटले भरले व "शुद्धीकरण" आरंभिलें, त्याचे मुख्य बळी म्हणजे हेच लोक. १९३२-३३ मधील हा अनर्थ कमीअधिक प्रमाणांत आतां रशियन लोकहि मान्य करीत आहेत. पण त्यावेळीं, त्या भीषण परिस्थितीला किंचित्हि स्पर्श करण्यास तेथील वृत्तपत्रांना मुभा नव्हती. तेथील वृत्तपत्रांत रोज सकाळीं सरकारच्या पंचवार्षिक योजनांना अपेक्षेपेक्षांहि अधिक फळें कशीं आलीं, याचीं सुरस वर्णनें येत. त्याचप्रमाणें कारखान्यांतील उत्पादनवाढ, कामगारांना बक्षिसें, नवे प्रचंड उद्योगधंदे इत्यादि बातम्यांची रेलचेल असे. त्यांत जीं छायाचित्रें येत, तीं सदैव हातांत निशाण घेतलेल्या व मुक्तहास्य करणाऱ्या युवकवर्गाचीं किंवा युझबेकिस्तान-मधील म्हातारा माणूस सारखा हंसत आहे, आणि सारखा अक्षर-ओळख करून घेत आहे, अशा प्रसंगांचीं येत. स्थानिक दुष्काळ किंवा रोगराई, अनेक खेड्यांचा संहार यासंबंधीं मात्र चकार शब्द येत नसे. खारकोव्हमध्यें विजेचा प्रवाह चालू नाहीं, हें तेथील वृत्तपत्रांत एकदांहि छापलें गेलें नाहीं. त्यामुळें वाचकाला आपण एखाद्या कल्पनारम्य स्वप्नसृष्टींतून संचार करीत आहों असें वाटे. आपण दररोज जें जीवन जगतों, त्याच्याशीं काडीमात्र संबंध नसलेल्या निराळ्याच जगाची वार्ता हीं वृत्तपत्रें सांगत आहेत, असें वाचकाला वाटे.

जी स्थिति वृत्तपत्रांची, तीच नभोवाणीची.

या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, खारकोव्ह येथें काय चाललें आहे, याची कल्पना मॉस्कोंतील बहुसंख्य लोकांना नसे. आणि आगगाडीनें बारा दिवसांचा प्रवास करून जेथें जातां येतें, अशा ताशकेंट, आर्चएंजल् किंवा व्हॅडिव्होस्टॉक अशा ठिकाणांची तर गंधवार्ताहि नसे. आगगाडीचा प्रवास हा खास सरकारी अधिकाऱ्यांसाठीं राखून ठेवलेला असे, आणि ते कांहीं इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत नसत. त्या अफाट प्रदेशावर स्तब्धतेचें दाट आवरण पडलेलें होतें. मूठभर भगतांशिवाय दुसऱ्या कोणालाहि सर्व परिस्थितीचें संपूर्ण ज्ञान मिळणें शक्य नव्हतें.

जगापासून रशियाचा संबंध तोडणारा स्तब्धतेचा दुसरा एक खंदक होता. परदेशांतील बातमीदार व शिष्टमंडळें हीं सर्व मॉस्कोमध्येंच केंद्रित केलेलीं असत, आणि त्या राजधानींत, अन्न व सरपण यापासून तों औद्योगिक उत्पादन, दांतांचे ब्रश, ओष्ठरंग, संततिनियमनाचीं साधनें वगैरे चैनीच्या वस्तूंपर्यंत लयलूट असे. सर्व देशांत मात्र या वस्तूंची कल्पनासुद्धां नसे. मॉस्कोतील जीवनमान हें रशियन जीवनमानाचें प्रातिनिधिक मुळींच नसे. मॉस्कोंतील सर्वसामान्य नागरिकाला आपल्या देशाच्या दूरच्या प्रदेशांमध्यें काय चाललें आहे याचें ज्ञान नसे, मग परदेशांहून आलेल्या पाहुण्याचें हें अज्ञान अपार असावें यांत नवल काय? त्यांचा प्रवास सरकारी अधिकाऱ्यांनीं आंखलेल्या चाकोरींतून होई. ते अधिकारी, त्यांचे वाटाडे, दुभाषे, ड्रायव्हर व दोस्त अशीं सारीं कामें करीत. त्यांचे संबंध येत फक्त सरकारी अधिकाऱ्यांशीं. रशियांतील सर्वसामान्य नागरिकानें परदेशी पाहुण्याशीं कांहीं संबंध ठेवला, तर हेरगिरी किंवा राजद्रोह केल्याचा आरोप येण्याची भीति!

आधीं खरी माहिती मिळणेंच कठीण. आणि एखाद्या चलाख पत्र-पंडितानें ती मिळविली तर रशियाबाहेर ती पाठविणें त्याहून कठीण. नियंत्रकानें नाकारलेली बातमी चोरून पाठविली तर बातमीदाराला हद्दपार केलें जातें. आणि अशी शिक्षा कोणता बातमीदार किंवा वृत्तपत्र–चालक, विशेष प्रसंग असल्याशिवाय, पत्करील? मग बातमीदार सत्याशीं कांहीं तडजोड करून आपलें काम पार पाडीत. ते खोट्या बातम्या पाठवीत नसत. पण केवळ सरकारी बातम्यांमध्येंच, कांहीं विशेषणें पेरून, आपली टीका सूचकपणें प्रकट करून, त्या बातम्या ते पाठवीत. दोन ओळींमधील कोऱ्या जागेंत वाचण्याची संवय असणाऱ्या वाचकांना सत्याचें ओझरतें दर्शन होई. अशा सत्यापलापावर व अर्धवट असत्यावर रशियाच्या प्रचाराची इमारत उभारलेली असे.

प्रत्यक्ष प्रचार

परराष्ट्रांत प्रचार करण्याचे कामीं रशिया परस्पर–पोषक अशा दोन युक्त्या वापरतो. पहिली युक्ति म्हणजे आंकड्यांची इमारत उभी करणें व मानवी मूल्यांना बगल देणें. आणि दुसरी युक्ति म्हणजे एकाद्या क्षुल्लक घटनेला महत्त्व देऊन तिनें सारें वातावरण व्यापून टाकणें.

आंकड्यांच्या चमत्कृतिजनक खेळानें अमेरिकनांचीं मनें जिंकलीं जातात. उत्पादन, शिक्षण, बांधकाम, वाहातूक, पगारवाढ इत्यादि बाबतींत आंकड्यांची अशी फैर झाडली जाते कीं, तिच्या आवाजांत व धुराच्या लोटांत रशियांतील मानवाचें दैनंदिन जीवन पार लोपून जातें.

रशियामध्यें औद्योगिक क्रांति झाली हें कोण नाकारील ? तशी क्रांति १८ व्या व १९ व्या शतकात, इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, व जपान या देशांतहि झाली. फरक इतकाच कीं, रशियांत आधीं कामगार–क्रांति झाली आणि मग औद्योगिक क्रांति घडून आली. म्हणून रेल्वे किंवा कारखाने हे "समाजवादी राज्यपद्धतीचीं फळें" होत, असा प्रचार रशियाला करतां येतो. खुद्द लेनिननेंहि पूर्वी असें म्हटलें होतें कीं, "सोव्हिएट अधिक विद्युत् म्हणजे समाजवाद." लेनिनच्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, ज्या देशांत औद्योगिक उत्कर्ष झालेला आहे आणि खेड्यांतील मागासलेल्या जनतेपेक्षां शहरांतील कारखान्याचा कामगार–वर्ग वरचढ आहे, अशा आधुनिक राष्ट्रांतच समाजवाद स्थापन होणें शक्य आहे. औद्योगीकरण ही समाजवादाची प्राथमिक अटच आहे.

या सत्याचा विपर्यास स्टॅलिनशाहींत इतका करण्यांत आला कीं, कारखाने उभारणें म्हणजेच समाजवाद स्थापणें असा समज जनतेचा झाला. नीपरचें धरण, तुर्कस्तान–सायबेरिया रेल्वे, श्वेत–समुद्राचा कालवा किंवा भूमिगत मॉस्को–इत्यादि यांत्रिक सुधारणा म्हणजे "समाजवादाचें सार! साध्य! सांगता!" आहेत आणि त्या सर्व जगांत कोणी न पाहिलेल्या अशा अद्भुत आहेत असें भासविण्यांत आलें. पण इंग्लंड–अमेरिकेंत अशा किती तरी यांत्रिक करामती सिद्ध झालेल्या आहेत. "साऱ्या जगांत भुयारी रेल्वे असणारें एकटें एक शहर म्हणजे मॉस्को!" असा विश्वास रशियांतील बहुसंख्य जनतेला वाटतो.

प्रचाराची दुसरी युक्ति म्हणजे क्षुल्लक तपशिलाला व्यापक स्वरूप देणें. नमुने-

दार कारखाने, नमुनेदार बालगृहें, नमुनेदार कामगार-मंडळें व आरोग्यकेंद्रें—हीं प्रवासी, पत्र-पंडित व फोटोग्राफर यांना दाखविलीं जातात. या सुधारणांचा फायदा शें. १ टक्का जनतेला कदाचित् होत असेल; बाकीच्या लोकांना त्याचा गंधहि नसतो. महायुद्धापूर्वी, कोणत्याहि मुशाफिराला, प्रवासाचा परवाना मिळाल्यावर, जगांतील कोणत्याहि सुधारलेल्या देशाच्या अंतर्भागापर्यंत, अनिर्बंध संचार करतां येत असे—फॅसिस्ट इटाली व नाझी जर्मनी या देशांतहि. पण रशियामध्यें मात्र केवळ सरकार-मान्य स्थानांनाच परदेशी माणूस भेट देऊं शके.

"प्रवाशांची दिशाभूल मुद्दाम करण्यासाठींच हा देखावा तुम्ही दाखवितां." असा आरोप कोणी केला, तर मात्र रशियन अधिकाऱ्यांची तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोंचे. या आरोपाचें खंडन करण्याचा सरळ व उघड मार्ग हा होता कीं, आपल्या देशांतील संचार-बंदीचे सारे निर्बंध रद्द करून रशियानें जगाला हांकारून सांगावयास हवें होतें, "या व तुम्ही प्रत्यक्ष पाहा." पण रशियाला प्रत्येक परका माणूस हा हेर किंवा विध्वंसक वाटे, आणि म्हणून असें मुक्तद्वार ठेवणें अशक्य भासे.

रशियाच्या या गुप्ततेंतील मूर्खपणा जर्मनीच्या खुल्या धोरणानें अधिकच उघड झाला. १९३३-३६ च्या काळांत जर्मनी गुप्तपणें आपलें शस्त्रबळ वाढवीत होता. तेव्हां त्याला विदेशी हेरांचें भय वाटावयास हवें होतें. पण तरीहि जर्मनांना माहीत होतें कीं, लष्करी गुपितें व राजकीय जुलुमाचीं कृत्यें हीं परदेशी पाहुण्यांच्या दृष्टीपासून लपवून ठेवण्यास नेहमींचे पोलीस समर्थ असतात. हुकूमशाही राष्ट्रांत तर हें सहज शक्य असतें.

रशिया इतक्या दक्षतेनें जें गुपित संभाळीत होता, तें लष्करी नव्हतें, तर तेथील प्रजाजनांची सर्वसामान्य राहाणी त्याला जगाच्या नजरेपासून छपवून ठेवावयाची होती हें होतें. आंकड्यांच्या आतषबाजीमागें रशियाच्या अफाट भूमीवर पसरलेला घनदाट अंधार होता. प्रचारांच्या ताशा-वाजंत्र्यांच्या आवाजात जनतेची मुस्कटदाबी झांकली जात होती. सैबेरिया किंवा मध्य आशिया इत्यादि ठिकाणीं रशियानें हद्दपार केलेले किंवा मजुरीसाठीं सक्तीनें नेलेले असंख्य लोक कोणत्या प्रकारचें दैनंदिन जीवन जगत आहेत—फार काय, मॉस्कोच्या उपनगरांत कसलें जीवन कंठलें जात आहे याची पाश्चात्य निरीक्षकाला कांहींच कल्पना नसते. आकाशाकडे दुर्बीण लावून बसलेल्या प्रेक्षकाला चंद्राची मागची काळी बाजू कशी दिसेल?

४

सत्याचीं अंतर्गत व बहिर्गत स्वरूपें

रशियांतील एक संपूर्ण पिढी सर्व जगापासून अलग ठेवण्यांत आली. रशिया व जग यांच्यामध्यें जणूं कांहीं एक नवी "चिनी भिंतच" उभारण्यांत आली. त्या भिंतीच्या सावल्या दोन्ही बाजूस पडत होत्या--भांडवलशाही देशांतील परिस्थितीचें ज्ञान रशियन जनतेला नव्हतें आणि रशियांतील परिस्थितीविषयीं भांडवलशाही राष्ट्रांतील लोकांना संपूर्ण अज्ञान होतें. रशियन जनतेला दुःखांत सुख एवढेंच होतें कीं, भांडवलशाही देशांतील जीवन आपल्यापेक्षांहि अधिक तापदायक आहे ही जाणीव तिला होती. "आपण साध्या नरकांत खितपत असलों, तर परदेशांतील जनता रौरव नरकांत पिचत आहे." असा समज रशियन लोकांचा असे. रशिया—बाहेरील देशांत लठ्ठ लठ्ठ लक्ष्मीपुत्र तासातासाला नवीं नवीं वस्त्रें परिधान करीत आहेत, मध्यम वर्ग मिस्किलपणें हंसत आहे, व अन्नान्न करणारा कामगारवर्ग गुप्त स्थानीं कट रचीत आहे—अशीं चित्रें चित्रपट, नभोवाणी, वृत्तपत्रें व वाङ्मय यांतून रशियानें रेखाटलीं. जुन्या काळांतील पऱ्यांच्या गोष्टींतील सर्व यातनांचें आगर म्हणजे भांडवलशाही जग, असें भासविण्यांत आलें.

१९३३ सालीं मी मॉस्कोमध्यें एक चित्रपट पाहिला. त्यांत एका जर्मन शास्त्रज्ञाला, एका धार्मिक मठांत, तेथील महंत फटके लगावीत आहेत व त्यांना नाझींचे "तुफानी सैनिक" मदत करीत आहेत असें दाखविलें होतें. त्या चित्रपटाला रशियांतील शिक्षणाधिकाऱ्यानें प्रस्तावना जोडली होती. हा चित्रपट खास रशियन जनतेसाठीं तयार केला होता. परदेशांत दाखविण्यासाठीं रशियानें पूर्वी उत्कृष्ट चित्रपट तयार केले होते. त्याहून निराळ्या कोटींतील हा चित्रपट होता.

असेंच दुसरें एक दृश्य माझ्या डोळ्यापुढें ठसठशीतपणें उभें आहे. युक्रेनमधील एक सुप्रसिद्ध लेखक मला सल्ला विचारण्यास आला. तो लंडनच्या पार्श्वभूमीवर एक लघुकथा लिहीत होता. त्यांत त्यानें असें दाखविलें होतें कीं, रविवारीं सकाळीं एक कामगार रस्त्यावरून चालला आहे, आणि त्याला एक पोलीस धक्के मारून दूर सारीत आहे. "अशा प्रसंगीं पोलीस कोणती भाषा वापरील? कामगाराला कोणत्या शिव्या देईल?" असा प्रश्न त्या लेखकानें मला केला. मी त्याला विचारलें, "पण तो पोलीस त्या कामगाराला दूर कां ढकलील, हाच खरा प्रश्न आहे."

"वा ! तो कामगार आहे—उंची कपडे वापरणारा श्रीमंत नाहीं, हें मी तुम्हाला सांगितलें नाहीं का ?" लेखक-मित्रानें खुलासा केला. त्याची प्रामाणिक समजूत अशी होती कीं, लंडनसारख्या भांडवलशाही शहरांत पोलीस लोक कामगारांना रविवारीं सकाळीं रस्त्यावरून हाकलतात. आणि हा लेखक रशियांतील विद्यापीठांत शिकलेला होता—आणि त्याची साहित्य-विषयक कीर्ति वाढत होती. इंग्लंडांतील 'डेली मेलच्या' वाचकाला रशियांतील बोल्शेव्हिझमची जी कल्पना, तीच रशियन जनतेला भांडवलशाही राष्ट्रांतील जीवनाची.

खुद्द रशियांतील लोकांनाहि विरोधी विचार प्रकट करतां येत नाहींत. हुकूमशाही राजवटीला आपण "कधींच चूक करीत नाहीं" असा भ्रम असतो. राजकारणांतील एकाच पक्षांत विविध मतांना वाव असूं शकतो, ही जाणीवच आपल्या जनतेला हुकूमशाही सरकार होऊं देत नाहीं. म्हणूनच मॉस्कोमध्यें स्टॅलिन-विरोधी रशियन पुढाऱ्यांवर खटले झाले. त्यांतील आरोपी हे सरकारचे प्रामाणिक विरोधक असें न दाखवितां, कृष्णकृत्यें करणारे नराधम आहेत, असें रंगविलें गेलें. "आम्ही परराष्ट्राचे पैसे घेऊन, दुष्ट हेतूनें क्रांति-विरोधी कृत्यें केलीं." अशा कबुल्या त्या विरोधी पुढाऱ्यांकडून घेतल्या गेल्या.

अशा कबुल्या कशा दिल्या गेल्या ? त्याला अनेक कारणें आहेत, आणि तीं व्यक्तिपरत्वें भिन्न आहेत. बुखारिनसारखे नेते राजकारणांत पराभव पावल्यानंतर असें मानूं लागले कीं, अशी कबुली देऊनच आपण आपल्या पक्षाची अखेरची सेवा बजावूं शकतों. वास्तविक त्यांचें व तेथील राज्यकर्त्यांचें तत्त्वज्ञान एकच होतें. पण हुकूमशाही राजवटींतील न्यायच असा—"मिळालें तर सर्व कांहीं, नाहीं तर कांहीं नाहीं." या निष्ठेमुळें बुखारिनसारख्यांना आपल्या प्राणावर तिलांजलि सोडावी लागली.

दुसरे कांहीं विरोधक असे होते कीं, ते जन्मभर झगडून दमून-थकून गेले होते. त्यांना आपल्या जीविताची आशा राहिलेली नव्हती. पण सरकारनें ओलीस ठेवून घेतलेल्या आपल्या कुटुंबांतील माणसांचा तरी सत्यानाश होऊं नये, म्हणून त्यांनीं आपल्या अपराधांच्या कबुल्या देऊन टाकल्या.

याशिवाय खालच्या दर्जाचे जे सरकार-विरोधी लोक होते, ते शारीरिक व मानसिक छळामुळें दीन झाले. अशा कबुल्यांमुळें जीवदान मिळेल असें आमिष त्यांना दाखविण्यांत आलें. तें त्यांच्या बुद्धीला पटलें नाहीं, तरी त्यांची आशा त्या आमिषाला चिकटली. शेवटीं केवळ प्रक्षोभक प्रचार करणारे लोकहि कबुल्या देणाऱ्यांत होते. कबुल्या दिल्यानें त्यांचें नुकसान कांहींच होणार नव्हतें.

निरनिराळ्या कारणांनीं दिलेल्या अशा या कबुल्यांचें एकच समर्थन जे कोणी शोधूं पाहातात, त्यांना त्या कबुल्या म्हणजे एक गहन गूढच वाटतें.

रशियामध्यें असा एक संकेतच निर्माण झाला कीं, राजकीय खटल्यांतील आरोपीनें आपल्यावर लादलेले गुन्हे आपखुषीनें व मुक्तकंठानें कबूल करावेत. एकदां हा संकेत रुजला कीं मग त्याचेपासून दूर कोण जाणार? १९४३ च्या डिसेंबरांत खारकोव्ह येथें जर्मन सेनाधिकाऱ्यांची चौकशी चालली असतांना एका आरोपीनें स्वयंप्रेरणेनें असें सांगितलें कीं, "रशियन लोकांची सामुदायिक कत्तल चालली असतांना मी एका सैनिकाच्या हातांतील बंदूक घेतली आणि कडेवर मूल घेतलेल्या एका आईला गोळी घालून ठार केलें." खारकोव्ह येथील खटल्यांचा चित्रपट घेऊन तो लंडनमध्यें जाहीर रीत्या दाखविला गेला. मॉस्कोमधील खटले काय किंवा खारकोव्हमधील खटले काय—दोन्हीहि खटले परक्या लोकांना असत्य वाटतात—आरोपी पाठ केलेलीं भाषणें म्हणत असल्याचा भास त्यांना होतो.

जर्मन सैनिकांनीं रशियामध्यें इतके पाशवी अत्याचार केले कीं, त्याची कल्पना पाश्चात्य लोकांच्या मनाला कदापि येणार नाहीं हें खरें, पण ते विशिष्ट अत्याचार त्या विशिष्ट जर्मनांनींच केले असें सिद्ध करण्याला त्यांच्या स्वतःच्या कबुलीशिवाय दुसरा पुरावा कांहींहि नाहीं. याचा अर्थ नाझींना आपल्या भीषण गुन्ह्यापासून मुक्त होतां येईल असा नव्हे. पण रशियाची न्याय-पद्धतच अशी विचित्र आहे कीं, ती आपल्या राष्ट्रीय हिताची बटीक बनली आहे, आणि म्हणून सत्याची सत्यताहि सिद्ध करण्यास असमर्थ ठरली आहे.

प्रचाराची दासी बनलेल्या न्यायपद्धतीला मूर्खपणाचीं फळें यावींत हें साहजिकच आहे. मॉस्को येथील खटल्यांचे निर्णय असे आहेत कीं, ट्रॉट्स्की हा जेव्हां रशियन सैन्याचा अधिपति म्हणून परराष्ट्रांचा पराभव करीत होता, तेव्हांहि तो परराष्ट्राचा हस्तकच होता. जे रशियन राज्यक्रांतीचे निर्माते, ते सारे ब्रिटिश, जर्मन किंवा जपानी राष्ट्रांचे हस्तक ठरूं लागले. त्यांतून सुटले फक्त जे वेळींच मेले ते—आणि खुद्द स्टॅलिन! त्यांनीं गॉर्कीला विष घातलें, यंत्रसामुग्रीचा विध्वंस केला, "हिडीस" परराष्ट्रीयांना आपला देश अंशाअंशानें विकला, राष्ट्रपिता स्टॅलिनचा खून करण्याचा घाट घातला—इत्यादि इत्यादि आरोप त्यांचेवर लादण्यांत आले. "हे आरोप रशियांतील मागासलेल्या जनतेला संतुष्ट करण्यासाठीं होते." असेंहि समर्थन रशियाचे भगत करीत असतात. पण रशियांतील जनता राजकीय दृष्ट्या मागासलेली आहे कशावरून? प्रसंगपरत्वें ती पुढारलेली किंवा मागासलेली बनते.

५

साध्य व धनें

रशियाचा परराष्ट्रमंत्री मोलोटोव्ह यानें आपल्या सरकारच्या सुप्रीम कौन्सिलपुढें ता. ३१ ऑक्टोबर १९३९ रोजीं भाषण करतांना असे उद्‌गार काढले कीं, "जर्मनीबरोबरच्या या युद्धांत आपला हेतु हिटलरशाहीचा नाश हा एकच आहे असें ब्रिटिश सरकारनें जाहीर केलें आहे. याचा अर्थ ब्रिटिश व फ्रेंच यांनीं "तात्त्विक कारणासाठीं" युद्ध पुकारलें आहे. त्यामुळें पूर्वीच्या धार्मिक युद्धाची आठवण होते. पण अशा युद्धाची गरजच नाहीं. हिटलरशाहीचें तत्त्व कोणी स्वीकारावें वा अव्हेरावें—तो केवळ राजकीय मताचा प्रश्न आहे. तत्त्वाचा विनाश शक्तीनें होत नसतो. हिटलरशाहीचा विध्वंस युद्धानें होणार नाहीं. "हिटलरशाहीच्या विनाशार्थ" व "लोकशाहीच्या संरक्षणार्थ" युद्ध पुकारणें हें अविचाराचें आहे. एवढेंच नव्हे तर, तो गुन्हाहि आहे."

अशीं भाषणें किंवा स्टॅलिन—हिटलरचा करार हीं सर्व जर्मनीला खूष करून कांहीं वेळ काढणें; व त्या वेळांत रशियाला युद्धासाठीं सज्ज करणें हा रशियन मुत्सद्यांचा एक डावपेंच होता. या युक्तिवादानें रशियाच्या कोणत्याहि प्रतिगामी धोरणाचें वा हुकुमाचें समर्थन केलें जातें.

या युक्तिवादांत एक जुनापुराणा प्रश्न गोंवलेला आहे. तो प्रश्न म्हणजे, साध्यावरून साधनांची योग्यता ठरवावयाची काय, हा होय. केवळ व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तर अशा धोरणानें रशियाचा फायदा झाला असेल. पण त्यासाठीं त्याला लांचलुचपत, भ्रष्ट कारभार आणि जगांतील कामगारवर्गाचें व क्रांतिकार्याचें नुकसान—यांची किंमत द्यावी लागली. रिबेनट्रॉपचें मॉस्कोच्या विमानतळावर स्वागत करतांना स्वस्तिकांकित निशाण फडकविणें, आणि लाल सैन्याच्या बँडनें नाझींचें राष्ट्र-गीत वाजविणें—अशीं सोंगें भांडवलशाही राष्ट्रांनीं सजविलीं असतीं, तर त्याला उघडानागडा संधिसाधुपणा म्हटलें असतें. पण किसान-कामगारांच्या पितृभूमींत असे प्रकार घडले, म्हणजे त्याचा जगावर निराळाच परिणाम होतो.

अशा प्रतारणेनें मिळालेले लाभ कितीहि असले, तरी त्यामुळें समाजवादी चळवळीचें जें नुकसान होतें, त्याला मोजमापच नाहीं. १९४० सालीं फ्रान्सचा धुव्वा उडाला. हें कांहीं केवळ मवाळ मताच्या पंचमस्तंभी लोकांचें कृत्य नव्हे, तर तेथील कम्युनिस्टांनीं असा पुकारा केला होता कीं, "हें श्रीमंत लोकांचें

युद्ध आहे—त्याच्याशीं कामगारवर्गाचा कांहींहि संबंध नाहीं." त्यामुळें फ्रेंच सैन्याचें मनोधैर्य एकदम खचलें. युद्धांतील "पहिली आघाडी"च अशी कोसळली. या हानीच्या मानानें रशियानें काय लाभ मिळविला? १९३९–१९४१ पर्यंत रशियांतील वृत्तपत्रांनीं व प्रचार-यंत्रांनीं हिटलरला राजी राखण्यासाठीं दोस्तांच्या विरुद्ध उघड भूमिका घेतली. त्यावेळची कॉमिन्टर्न संस्था, दोनच वर्षांचे अवधींत, चर्चिल— रुझव्हेल्ट यांना खूष करण्यासाठीं म्हणून, विसर्जन करण्यांत आली. आपण एकादा कुचकामी नोकर कामावरून काढतों, आणि त्याचे जागीं दुसरा नेमतों, तशी दशा जागतिक कामगार संस्थेची करणें योग्य नव्हतें. त्यामुळें सर्व जगांतील क्रोडों लोकांच्या ध्येयवादाला व स्वार्थत्यागाला जो हादरा बसला, त्याचा हिशेब जमा-खर्ची पद्धतीनें मांडतां येणार नाहीं.

हीच स्थिती रशियांतील जनतेची! समाजवादाच्या स्थापनेसाठीं जनतेला राजकीय शिक्षण देणें अवश्य आहे, आणि ती जनता मागासलेली असल्यानें तिच्यामध्यें अत्यंत सोप्या शब्दांनीं प्रचार केला पाहिजे, हें सारें खरें, पण कालच्या प्रचाराच्या पूर्ण विरुद्ध आजचा प्रचार, अशा विसंगतीचा परिणाम जनतेवर काय होईल? तो म्हणजे हा—जळजळीत प्रचाराचे पोटीं विसंगति भरलेली जनतेला दिसली, म्हणजे ती गोंधळून जाते, "राजकारण हें अगम्य आहे." असें म्हणून आपली सर्व चिकित्सकबुद्धि नेत्यांच्या चरणीं गहाण टाकते; आणि २५ वर्षांपूर्वीच्या मनःस्थितींत जाऊन पडते. सारासार–विवेक सोडल्यामुळें जनता आपल्या विरोधकांवर "पिसाळलेलीं कुत्रीं," "सैतान," "नरमांसभक्षक," "महारोगी," अशा शिव्यांची लाखोली वाहाते.

जनतेला समाजवादाची दीक्षा देण्यासाठीं विरोधकांना सार्वजनिक जागीं फांशी देण्याचे महोत्सव समारंभपूर्वक साजरे होऊं लागले. खारकोव्ह येथील खटल्यानंतर, फांशी देण्याचा समारंभ पाहाण्यासाठीं ३०।४० हजार लोकांचा जमाव जमला होता. फांशीच्या सर्व क्रियांचे चित्रपट घेण्यांत आले—अगदीं गळफांस बसण्याचे वेळीं, गुन्हेगार कसे दिसत होते, हें दाखविण्यासाठीं मोठीं चित्रें मुद्दाम घेण्यांत आलीं. हे चित्रपट सर्व रशियांत व रशियाबाहेरहि दाखविण्यांत आले. या प्रसंगाचें जें वर्णन 'टाईम्स'च्या बातमीदारानें ता. ३१ डिसेंबर १९४३ च्या अंकांत उघडउघड सहानुभूतीनें व मान्यतेनें केलें, तें सांगण्यासारखेंच आहे. तें असें.—"हा खटला म्हणजे समाजशिक्षणाचाच एक भाग होता. त्यामुळें न्यायाची लालसा तर संतुष्ट झालीच, पण त्याशिवाय, त्या फांशीच्या जागीं, फांशीनंतर तीन दिवस, तीं लोंबकळणारीं प्रेतें पाहण्यासाठीं ज्या झुंडीच्या झुंडी

लोटल्या, त्या सर्वांच्या मनांवर, फॅसिस्ट सरकार किती दुबळें आहे, व त्याचा निःपात करणें किती सोपें आहे, याचा स्पष्ट ठसा उमटला. जेव्हां त्या गुन्हेगारांचीं प्रेतें लोंबूं लागलीं, तेव्हां हजारों लोकांनीं समाधानाचा सुस्कारा टाकला. कोणी आनंदानें शिळा वाजविल्या; तर कोणी टाळ्या पिटल्या."

या वृत्तांताला 'टाइम्सनें', औपरोधिक अर्थानें नव्हे, तर सत्यार्थानें मथळा दिला होता—"समाज—शिक्षण."

♤ ♤ ♤

हीं साधनें भयंकर आहेत, म्हणून आमची तक्रार नाहीं. पण त्यांचे परिणाम कल्पनातीत होतील, समाजवादी आंदोलनाला त्यामुळें धक्का पोंचेल, आणि हजारों हजार लोकांचें बलिदान व्यर्थ ठरेल. कोणत्याहि साधनांनीं आणि कितीहि हळुहळू, रशिया समाजवादाकडे कूच करीत आहे, तोंपर्यंत हें कदाचित् क्षम्यहि मानलें जाईल. पण मुख्य प्रश्न हा आहे कीं, रशियाचें "आगेकूच" समाजवादाकडे चालू आहे, आणि हे सारे प्रकार वरवरचे बुडबुडे आहेत, हें कशावरून?

प्रवासांत वाट चुकणें स्वाभाविक आहे. पण कांहीं कालानंतर आपल्या प्रवासाची दिशा बरोबर आहे ना, हें तपासून पाहिलें पाहिजे. आंदोलनाचे नेते काय म्हणतात हें महत्वाचें नाहीं. निरनिराळ्या क्षेत्रांवर त्या आंदोलनाचे संकलित परिणाम काय होतात, हीच खरी कसोटी होय. रशियाच्या समाजरचनेचा विकास कोणत्या दिशेनें होत आहे, याची पाहणी यापुढील परिच्छेदांत केली आहे.

६

हक्काचा वारसा

"या जगांत जन्मास आलेल्या प्रत्येक मुलाला शिक्षणाची व व्यवसायाची समान संधि मिळाली पाहिजे." हें समाजवादाचें एक आद्य तत्त्व आहे. म्हणून राज्यक्रांतीनंतर लगेच, नात्यामुळें किंवा मृत्यु—पत्रामुळें अथवा विम्यामुळें संपत्तीचा वारसा दुसऱ्याला देणें रद्द ठरविण्यांत आलें.

१) तेथील सरकारनें ता. २७ एप्रिल १९१८ च्या कायद्यानें असें ठरविलें कीं, वारसापद्धति नष्ट केलेली आहे. कोणाहि माणसाचे मृत्यूनंतर त्याची स्थावर—जंगम मालमत्ता सरकारी मालकीची होईल.

(२) मृत माणसाच्या भावा-बहिणींपैकीं, किंवा पति-पत्नीपैकीं जे काम करण्यास अपात्र असतील, त्यांना या मिळकतींतून तात्पुरता तनखा देण्यांत येईल. पुढें गरजू लोकांसाठीं 'सामाजिक विमा' उतरण्याचा कायदा करण्यांत येईल.

(३)जर ही मिळकत १०,००० रुबल्सपेक्षां अधिक किंमतीची नसेल, आणि जर ती शेती किंवा शेतीचीं अवजारें, अथवा घरगुती सामान, अशीच असेल, तर तिची व्यवस्था कांहीं काल पति-पत्नी किंवा भाऊ-बहीण यांचेकडे राहील.

ता. १८ नोव्हेंबर १९१९ रोजीं आयुष्याचा, भांडवलाचा व प्राप्तीचा विमा रद्द ठरविण्यांत आला. यामुळें व वारसा पद्धति रद्द केल्यामुळें जे म्हातारे—कोतारे, अशक्त-दुबळे, अज्ञान बालक निराधार झाले, त्यांची सर्व काळजी सरकारवर सोंपविली गेली.

पण १९३६ सालीं रशियानें जी नवी राज्यघटना केली, तिनें जन्मापासूनची विषमता पुनः स्थापन केली. पुनः वारसा कायदेशीर ठरला. पुनः मृत्युपत्रानें आपली मिळकत कोणालाहि देण्याचा नागरिकाला हक्क मिळाला. पुनः मृत्यूचा विमा चालू झाला. सरकारच्या "विमा-मंडळा"कडून विमा उतरण्याविषयींच्या जाहिराती फडकूं लागल्या. विम्याची किमान रक्कम ५,००० रुबल्स ठरविण्यांत आली. विमेदार मृत्यु पावल्यास ती रक्कम त्याच्या वारसास दिली जाते.

जोंपर्यंत माता-पित्यांच्या उत्पन्नांत विषमता आहे, तोंपर्यंत जन्मापासून पूर्ण समता निर्माण होणें अशक्यच. "प्रत्येकानें आपल्या कुवतीप्रमाणें काम करावें आणि **कामाप्रमाणें** त्याला मोबदला मिळावा" ही समाजवादाची पहिली अवस्था. पण "प्रत्येकानें आपल्या कुवतीप्रमाणें काम करावें आणि त्याच्या **गरजेप्रमाणें** त्याला मोबदला मिळावा." (या गरजेंत मुलांची संख्या, विश्रांति इत्यादींचा समावेश होतो.) ही दुसरी अवस्था.

रशियाचे निर्भेळ टीकाकारसुद्धां असें म्हणणार नाहींत कीं, संपूर्ण समतावादावर एकदम झेंप घ्यावी. पण समाजवादाचें कंकण बांधलेल्या राजवटीनें विषमतेचे मुलांवरील परिणाम शक्य तितके कमी करावयास हवेत. मूल पाळण्यांत घातलें कीं, त्याला जादा अधिकार मिळाले, असें होतां कामा नये. पण रशियानें अगदीं उलटी उडी मारली. वारसा-पद्धति पुनः चालू झाली. विमा-पद्धतीला उत्तेजन देण्यांत आलें. प्रमुख व्यक्तींच्या मुलांना प्रौढपणापर्यंत सरकारांतून आर्थिक देणग्या दिल्या जाऊं लागल्या. एकच उदाहरण सांगावयाचें तर, विमानविद्या-विशारद भाई एन्. एम्. पोलिकारपोव्ह हा मृत्यु पावल्यानंतर रशियन सरकारनें त्याच्या बायकोला व मुलीला एक लाख रूबल्सची देणगी दिली, आणि त्याशिवाय

त्याच्या पत्नीला जन्मभर दरमहा एक हजार रुबल्सचें पेन्शन दिलें. खेरीज मुलीचें शिक्षण पुरें होईपर्यंत मासिक पांचशें रुबल्स देण्याचें सरकारनें ठरविलें, आणि त्याच्या बहिणीला जन्मभर दरमहा चारशें रुबल्स देण्याचें सरकारनें ठरविलें.¶

याचा अर्थ त्या वैमानिकाच्या पत्नीचे घरीं तीन माणसांना मिळून दरमहा, श्रम केल्याशिवाय, तीन हजार रुबल्सची प्राप्ति होईल, आणि शिवाय एक लाख रुबल्सचें भांडवल आधाराला आहेच. समजा, ती एखाद्या रशियन कामगाराच्या कुटुंबांत जन्माला आली असती, आणि तिचा बाप, वार्धक्यानें किंवा अपघातानें निकामी झाला असता, तर तिला दरमहा तीन हजाराऐवजीं, तीस ते पंचाहत्तर रुबल्स मिळाले असते.

शिक्षणांतील विषमता

केवळ प्रौढ कामगारांमध्येंच अशी विषमता आहे असें नव्हे, तर बालकांच्या शाळेंतहि विषमतेचें लोण पोहोंचविण्याचें निश्चित धोरण रशियन राजवटीनें आंखलेलें आहे. भांडवलशाही राष्ट्राप्रमाणें रशियांतील मुलेंहि श्रीमंत व गरीब अशा भिन्न वातावरणांत वाढतात. जेव्हां रशियाच्या राज्यघटनेनें मालमत्तेचा वारसा ठेवण्यास संमति दिली, तेव्हांच आनुवंशिक श्रीमंतीविरुद्ध उभारलेली पहिली तटबंदी कोसळली आणि उच्च शिक्षणाला फी ठेवण्यांत येऊन जेव्हां मोफत शिक्षण बंद करण्यांत आलें, तेव्हां दुसरी व भक्कम तटबंदी ढासळली.

ता. २ ऑक्टोबर १९४० रोजीं काढलेल्या हुकुमानें, रशियन सरकारनें तांत्रिक, बौद्धिक, वैद्यकीय, शेतीविषयक इत्यादि दुय्यम शिक्षणाच्या शाळांमध्यें सालिना १५० ते २०० रूबल्स फी ठेवली, व विद्यापीठांत तर ३०० ते ५०० रूबल्स ठेवली. पहिल्या सत्राची फी, हुकूम निघाल्यापासून एक महिन्याचे आंत, भरावयाची होती. त्यामुळें गरीब पालकांच्या सहा लाख विद्यार्थ्यांना, फी देतां न आल्यामुळें, शाळा सोडावी लागली.

याप्रमाणें नोकरशाही, तंत्रशाही किंवा नवा बुद्धिजीवी वर्ग अशा सधन पालकांच्या १५ वर्षांवरील मुलांनाच उच्च शिक्षण घेणें शक्य झालें. फीची पद्धति सुरू करण्यापूर्वीच उच्च शिक्षण मर्यादित करण्यांत आलें. १९३२ सालापर्यंत इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें व धंदेविषयक शाळांमध्यें कामगार किंवा त्यांचीं मुलें

¶ सोव्हिएट युद्धवार्ता २ ऑगस्ट १९४४.

यांचेसाठीं शें. ६५ जागा राखून ठेवल्या जात. त्यामुळें श्रीमंतांची गर्दी होऊन उच्च शिक्षणांतून गरिबांची हकालपट्टी होण्याला चांगलाच आळा बसला. पण ता. १९ सप्टेंबर १९३२ रोजीं निघालेल्या हुकुमानें हें "कामगार केंद्राचें" तत्त्व पर्यायानें टाकून देण्यांत आलें. उच्च शिक्षणामध्यें कामगार व त्यांचीं मुलें यांची संख्या कशी कमी होत गेली हें पुढील आंकड्यावरून कळेल.

(शेंकडा)	१९३३	१९३५	१९३८
विद्यापीठें	५०·३	४५	३३·९
दुय्यम शाळा	४१·५	३१·७	२७·१

यापेक्षां अधिक आश्चर्यकारक आंकडे औद्योगिक कॉलेजांतील आहेत. तीं कॉलेजें म्हणजे रशियांतील मोक्याचीं अधिकारपदें मिळविण्याचीं प्रवेशद्वारेंच होत. त्या कॉलेजांत १९३८ सालीं विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण पुढीलप्रमाणें होतें:—

कामगार व त्यांचीं मुलें	४३·५
शेतकरी व त्यांचीं मुलें	९·६
अधिकारी वर्ग, तज्ज्ञ व त्यांचीं मुलें	४५·४

या विषमतेचा कळस झाला, १९४० सालीं शाळांची फी चालू केली तेव्हां. त्यानंतर-अधिकारी—वर्गाच्या मुलांसाठीं खास शाळा उघडण्यांत आल्या. तसेंच, खास त्यांच्यासाठीं प्रवेशाच्या सवलती देणाऱ्या सैनिकशाळाहि निघाल्या. त्याच वेळीं, ज्या गरीब आईबापांचीं मुलें दुय्यम शाळेची फी देऊं शकत नव्हतीं, त्यांना आपलीं मुलें शाळेंतून काढून मजुरी करण्यास चार वर्षें सक्तीनें पाठवावीं लागत. त्या मुलांना सहा महिन्यांपासून दोन वर्षांपर्यंत "धंदेविषयक शिक्षण' दिलें जाई, आणि नंतर जेथें पाठविलें जाईल तेथें चार वर्षें श्रम करावे लागत. या सर्वांची फलश्रुति काय? तर सर्वसामान्यपणें किसान—कामगारांचीं मुलें किसान—कामगारच राहात, आणि उच्च श्रेणींतील मुलें आपोआपच वरच्या वर्गांतील अधिकर–पदें मिळविण्याच्या मार्गाला लागत.

अर्थात् गरिबांसाठीं तेथें शिष्यवृत्त्या आहेत, पण त्यांच्या अटी भांडवलशाही राष्ट्रांपेक्षां प्रायः अधिक जाचक असतात—$\frac{2}{3}$ शिष्यवृत्त्या "उत्तमोत्तम" गुण मिळविणाऱ्यास व बाकीच्या परीक्षेंत चांगले गुण मिळविणाऱ्यांस. शिक्षणाचा फायदा मिळविण्यासाठीं गरिबांच्या मुलांना अलौकिक बुद्धिमत्ता दाखवावी लागते; तर श्रीमंतांच्या मुलांना तो सहजगत्या मिळून जातो. याचाच अर्थ तेथें वर्गीय विषमता आहे. तिच्या चाळणींतून केवळ अलौकिक मुलेंच पुढें जाऊं शकतात.

या सर्व घटनेचे दोन परिणाम दिसून आले. पहिला, प्राप्तीच्या मानानें समाजाचे वर्ग पडले, व दुसरा, सरकारच्या सहेतुक धोरणामुळें, ही आर्थिक विषमता, पाळण्यांतील मुलापासून, पुढील पिढीला पोहोचविण्यांत आली. यामुळें वर्गीय समाज–रचनेचा नवा नमुना अस्तित्वांत आला, आणि त्यांत अधिकारी, तंत्रज्ञ व सैनिक असे भेद आनुवंशिक झाले. या समाज–रचनेचा पाया उत्पादन–साधनांची मालकी हा राहिला नाहीं, तर सरकारी अधिकारांची मालकी हा बनला. इतिहासांत शाश्वत रूपानें दिसणाऱ्या वर्गीय अधिराज्याचें वंश–वृद्धि हें जें लक्षण असे, तेंच येथेंहि रूढ होऊं लागलें.

विषमतेचें असें जाळें विणणारे कायदे म्हणजे केवळ "तात्पुरत्या योजना" किंवा "आणीबाणीचे उपाय" होत, असें त्यांचें समर्थन कसें करतां येईल, हें कळणें कठीण आहे. आनुवंशिक वारसा पुनः चालू करण्याची व्यवस्था रशियन राज्यघटनेंतच अंतर्भूत करण्यांत आली आहे, ती "तात्पुरती योजना" कशी म्हणतां येईल? तसेंच, १९३२ सालीं कामगारांसाठीं असलेल्या शिक्षणाच्या सवलती रद्द करण्यांत आल्या, त्या चर्चिल—रुझवेल्टला खूष करण्याकरितां, असें कसें म्हणतां येईल? शाळेंत फीची पद्धत सुरू झाली, म्हणून काय युद्धाची "दुसरी आघाडी" जलदीनें उघडली?

गेल्या दहा वर्षांत, रशियाच्या शिक्षण-क्षेत्रांत, प्रगतीच्या दिशेनें एक जरी कायदा केलेला असता, तरी तेथील सरकारच्या हेतुविषयीं, "संशयाचा फायदा" देतां आला असता. असा एक तरी कायदा रशियाच्या भगतांनीं मला दाखवावा, असें माझें त्यांना आव्हान आहे.

शाळेंतील वातावरण व अध्यापनाचे विषय आणि पद्धति यामध्येंहि अशीच परागति दिसून येते. रशियन शिक्षणपद्धतीमध्यें जें जें म्हणून नवीन, प्रयोगात्मक व आशादायक होतें, तें सर्व नष्ट करण्यांत आलें आहे. सह–शिक्षण नामशेष झालें. मुलांमुलींना बाराव्या वर्षापासून विभक्त करण्यांत येतें. विद्यार्थी व शिक्षक यांच्यांतील चढाओढी रद्द करण्यांत आल्या. मुलांच्या जिज्ञासेचा व प्रेरणेचा अंकुर पाहून त्याप्रमाणें शिक्षण देण्याची अमेरिकन पद्धत रशियानें क्रांतीच्या प्रारंभ-कालांत सुरू केली होती. पण ती "शास्त्रीय थोतांड" "मार्क्स–विरोधी घातक प्रवृत्ति प्रसविणारी" अशी मानून फेंकून देण्यांत आली, आणि खरीखुरी "मार्क्सवादी प्रवृत्ति" निर्माण करण्यासाठीं शिक्षण-क्षेत्रांत पुढील तत्त्वें जाहीर करण्यांत आलीं—

(१) हेडमास्तर हा शाळेचा एकमेव धनी. शिक्षकानें विद्यार्थ्यांना हुकूम

सोडण्यास कचरतां कामा नये—जरूर तेव्हां त्यांना शिक्षाहि करावी.

(२) "सक्ति किंवा शिक्षा अपायकारक असतात." हा बकवा निष्णात शिक्षकांच्या प्रत्यक्ष अनुभवानें केव्हांच खोटा ठरविलेला आहे. मुलाच्या अनुनयापेक्षां त्याला योग्य शासन करणें अधिक परिणामकारक ठरतें.

(३) अनुनयानें शिस्तीच्या शिक्षणाला खो मिळतो. ज्या शाळा राष्ट्रीय वृत्ति निर्माण करण्याकडे पुरेसें लक्ष पुरवीत नाहींत, त्यांचा परिणाम मुलांचीं मनें बिघडण्यामध्येंच होतो.

इंग्लंडमधील जुन्या पद्धतीच्या शाळांना शोभतील अशीं आणखी किती तरी तत्त्वें रशियानें आपल्या शिक्षण-पद्धतींत समाविष्ट केलेलीं आहेत.

दादर सार्वजनिक वाचनालय, दादर. स्थळप्रति.
अनुक्रम .....७..... दि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....

कंगाल व लक्षाधीश

संक्रमण–कालांत आर्थिक मिळकतींत विषमता असणें अपरिहार्य आहे आणि म्हणून ती असल्याबद्दल विद्यमान रशियन सरकारला धारेवर धरतां येत नाहीं, हा माझा विचार मीं ठांसून मांडला आहे. परंतु या विषमतेचें प्रमाण किती आहे, आणि तें वाढण्याची किंवा कमी होण्याची प्रवृत्ति किती आहे, याची शहानिशा करून टीका करणें योग्य होईल.

या सर्व प्रकरणाचा प्रारंभ म्हणजे लेनिननें आपल्या "State and Revolution" ('सत्ता व क्रांति') या ग्रंथांत घालून दिलेलें "कमाल प्राप्तीच्या" मर्यादेचें तत्त्व. तें तत्त्व असें,—"प्रजासत्ताकाच्या अध्यक्षापर्यंत कोणाहि सरकारी अधिकाऱ्याला तज्ज्ञ कामगारापेक्षां अधिक पगार मिळतां कामा नये." अधिकारी–वर्गाची शिरजोरी होऊं न देतां, कामगार–वर्गाचें सर्वाधिकारित्व कायम ठेवण्यासाठीं लेनिननें जीं तीन तत्त्वें सांगितलीं, त्यांपैकीं हें एक होतें. दुसरें तत्त्व म्हणजे कायदे करण्याची व ते अंमलांत आणण्याची—अशा दोन्ही सत्ता एकत्रित करणें; आणि तिसरें तत्त्व म्हणजे, कोणाहि सरकारी अधिकाऱ्याला, कोणत्याहि वेळीं, पदच्युत करण्याचा अधिकार मतदार—संघास असणें.

हें समतेचें तत्त्व क्रांतीच्या प्रारंभ–कालांत इतकें जारीनें अंमलांत आणलें गेलें कीं, लेनिनला यादवी युद्धाचे वेळीं, पुढील आशयाचा हुकूम सोडावा लागला—

'युद्धाच्या अंदाधुंदींत, सैन्याच्या अधिकाऱ्यांना आणि समाजाच्या जीविताचा व कल्याणाचा भार वाहाणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांना अन्न, निद्रा व शक्य तर, युद्धाचे नकाशे तयार करण्यासाठीं निवांत जागा, सर्वांआधीं देण्यांत यावी.' अशी सवलत देणें अत्यंत जरूरीचें होतें. ती "आपत्कालची योजना" होती. पण तिला अनपेक्षित असें विचित्र फळ आलें. "जबाबदार अधिकाऱ्यांना सवलती प्रथम." हें तत्त्व पुढेंहि जीवनाच्या प्रत्येक शाखेंत रूढ झालें; आणि क्रीमियामध्यें स्वतंत्र "विश्रांति-गृहें" उघडलीं गेलीं, उन्हाळ्यांतील खास "विश्रांति-स्थानें" निर्माण झालीं, स्वतंत्र रुग्णालयें स्थापन झालीं आणि खानावळी, उपाहारगृहें, सहकारी संस्था—इत्यादि सर्व सार्वजनिक कार्यांतहि पृथक्पणा आला.

तथापि या साऱ्या सवलती पदार्थांच्या होत्या—पैशाच्या नव्हत्या. ४०० रुबल हें मासिक उत्पन्न पक्षाच्या सभासदासाठीं "कमाल" ठरविण्यांत आलें, आणि ज्या तज्ज्ञांना याहून जास्त पगार मिळे त्यांचेकडे तुच्छतेनें पाहिलें जाई. एक "अपरिहार्य संकट" म्हणूनच त्यांचा जादा पगार सहन केला जाई. पहिल्या पंचवार्षिक योजनेंतच, प्रातीमधील हा विरोध स्पष्ट झाला. परंतु त्यापेक्षां अधिक मूलगामी व मोठा फरक १९३१ च्या जूनमध्यें अस्तित्वांत आला. त्यावेळीं स्टॅलिननें जें सहाकलमी भाषण केलें, तें सुप्रसिद्ध आहे. त्यांत त्यानें समान प्रातीवर हल्लाच चढविला आहे.

पगारांतील समानता कायमची नष्ट करण्याचें ठरलें, कारण ती "उत्पादनाच्या समाजवादी पद्धतीला परकी व घातक आहे." ही समानता म्हणजे "मध्यम-वर्गीयांचें खूळ" आहे—राज्यसत्तेविरुद्ध गुन्हा आहे—"प्रतिक्रांति" किंवा "ट्रॉट्स्कीवाद" यासारखा पोकळ बुडबुडा आहे—असे ताशेरे स्टॅलिननें झाडले. मग काय? सर्व देशभर तशा प्रचाराचे नगारे वाजूं लागले. "पगाराच्या समानतेशीं" धर्म-युद्धच पुकारलें गेलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, पगारांतील विषमता हें समाजवादाचें पायाभूत तत्त्व होय, असें बहुसंख्य जनतेला प्रामाणिकपणें वाटूं लागलें.

असें नवीन धोरण आंखण्याचा हेतु पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील अडचणी दूर करणें हा होता. "भांडवलशाही राष्ट्रांशीं आपण बरोबरी करूं—किंबहुना त्यांना मागें टाकूं." अशा आश्वासनामुळें १९२७ सालीं, रशियामध्यें उत्साहाची जी प्रचंड लाट उसळली होती, ती खालीं बसत चालली; क्रांति-पूर्वकालांत राहाणीचें जें मान होतें, तें न उंचावतां, खालींच गेलें. म्हणून उत्पादनाचें प्रमाण

व त्याचा दर्जा वाढविण्यासाठीं, कांहींहि करून, नवें आमिष दाखविणें जरूर होतें. तें आमिष म्हणजे पगाराची विषमता—ती इतकी कीं, "भांडवलशाही राष्ट्रांशीं बरोबरी करण्यांत—किंवा त्यांना मागें सारण्यांत" रशिया यशस्वी झाला ! गंमत ही आहे कीं, हें विषमतेचें धोरण "संक्रमण—कालांतील योजना" किंवा "अपरिहार्य संकट" म्हणून स्वीकारण्यांत आलें नाहीं—तर समाजवादी तत्त्व-ज्ञानाचा विजय म्हणून ! रशियांतील नवीन उद्योगधंद्यांचें रक्षण करण्यासाठीं, कार्य-क्षमतेची नवी योजना आंखण्यांत आली. ती म्हणजे प्रत्येक कामगारानें उत्पादन करण्याऐवजीं श्रम–विभागणीनें उत्पादन वाढविणें ही होय. झालेल्या कामाप्रमाणें मोबदला देण्यास सुरुवात झाली. याला मुलामा चढविण्यासाठीं, "स्टाखानो-व्हिझम्" असें फसवें नांव देण्यांत आलें.

अलेक्सी स्टाखानोव्ह हा एक कोळशाच्या खाणींतील तरुण कामगार. त्यानें ता. ३० ऑगस्ट १९३३ रोजीं, एका रात्रींत, सहा तासांच्या पाळींत १०२ टन कोळसा खणला. नेहमींचें प्रमाण ७ टनांचें होतें. म्हणजे सरासरीच्या १४ पट अधिक उत्पादन त्यानें केलें. कांहीं दिवसांनीं त्यानें एका पाळींत १७५ टन—व पुढें तर २२७ टन कोळसा काढला. सरासरीपेक्षां ३२ पट उत्पादन !

स्टाखानोव्ह या तरुणाच्या अशा आश्चर्यकारक कार्याचे डिंडिम रशियांतील नभोवाणीनें, वृत्तपत्रांनीं व सार्वजनिक वक्त्यांनीं देशभर इतक्या उत्साहानें वाजविले कीं, फ्रान्समध्यें नेपोलियनचा पराभव झाला, त्या प्रसंगाचीच आठवण व्हावी. यानंतर एका पाठोपाठ एक असे अनेक चमत्कार निरनिराळे कामगार करून दाखवूं लागले. कोणा खाण–कामगारानें १२५ टन कोळसा एका पाळींत काढला, तर कोणी विणकरानें २०–२५ मागांऐवजीं सुमारें १५० माग चालविले, एका कामगारानें ५–५० मजुरांच्या कामाचा फडशा पाडला—अशा वार्ता "प्रवदा"मध्यें झळकूं लागल्या. प्रत्येक कारखान्यांत कोणी शें. २०० पट, तर कोणी ५०० पट, १००० पट, फार काय, २००० पट काम करणारे निघाले.

या चमत्कारांचें रहस्य काय ? तें खुद्द स्टाखानोव्ह यानेंच एका परिषदेंत उलगडून दाखविलें आहे. त्यानें सांगितलें, "पूर्वी आम्ही यंत्रानें थोडा कोळसा काढीत असूं, नंतर तो तेथून दूर ठेवण्याकरितां आम्हांला काम सोडून जावें लागे आणि मग परत येऊन पुनः कामास लागत असूं. पण आतां आम्ही असें ठरविलें कीं, एकानें कोळसा काढावा आणि तो हलविण्याचें काम दुसऱ्यानें करावें."

याचा अर्थ असा कीं, श्रम-विभागाचें तत्त्व स्वीकारलें गेलें. हें तत्त्व पाश्चात्य

राष्ट्रांतील खाण-धंद्यांत कैक वर्षें आधीं अवलंबिलें गेलें आहे. पण रशियांतील कामगाराची काम करण्याची पद्धति जुनीपुराणी व ऐषआरामाची होती. ती सोडण्यास तो कामगार राजी नव्हता, परंतु स्टाखानोव्हच्या नांवाचा उदोउदो करून रशियन कामगारावर नवी कार्य-पद्धति लादण्यांत आली.

मिळकतींतील विषमता ही जशी अपरिहार्य होती, तशीच ही श्रम-विभागाची कार्यपद्धतिहि. परंतु रशियामध्यें प्रातीची विषमता भांडवलशाही प्रमाणापलीकडे जशी गेली, तशीच ही श्रम-विभागाची कार्यपद्धतिहि मर्यादेबाहेर गेली व त्यामुळें तेथील कामगारांचे हाल वाढले.

मोलोटॉव्हनें एका परिषदेंत या कार्य-पद्धतीचें गुण-वर्णन करतांना असे उद्‌गार काढले कीं, "या कामाचा ताण पडण्याचा प्रश्नच येथें नाहीं. आपल्या कामांत मिनिटाकडे व सेकंदाकडे कामगारानें लक्ष दिलें, म्हणजे त्या कामांत एक प्रकारचें संगीत निर्माण होतें—संस्कृति निर्माण होते. आपल्या कामाकडे सुसंस्कृत दृष्टीनें कसें पाहावें हें या नव्या पद्धतीमुळें कळतें."

ही नवी सांस्कृतिक दृष्टि रशियन उद्योगधंद्यांत झपाट्यानें शिरली. कामगारांचे जे मुकादम किंवा "दादा" होते, त्यांना कारखान्यांत स्वतंत्र भोजनगृहें असत; व त्यांना सर्वसामान्य कामगारापेक्षां वीस पटीपर्यंत जास्त पगार दिला जाई. उदाहरणार्थ, एका खाणींतील ६० कामगारांना प्रत्येकीं दरमहा १००० ते २५०० रुबल मिळत, ७५ मजुरांना ८०० ते १००० रुबल मिळत, ४०० जणांना ५०० ते ८०० व उरलेल्या १००० लोकांना सरासरीनें १२५ रुबल मिळत. किमान पगाराच्या तीस पट कमाल पगार तेथें होते. १५०० कामगारांच्या खाणीचा जो डायरेक्टर असे त्याला व मुख्य इंजिनियरला सरासरी पगारापेक्षां १०० पट पगार मिळे. तो किमान पगाराच्या ३०० पट असे. यामुळें १९४३ सालीं, "लक्षाधीश कामगारवर्गाचा" उदय झाला, आणि त्याचा जयजयकार रशियन वृत्तपत्रांनीं केला.

यावर रशियाचा भगत असें म्हणेल, तेथील प्रातींतील ही विषमता कितीहि शोचनीय असली, तरी ती प्राति म्हणजे "पगार" आहे—भांडवलशाही राष्ट्राप्रमाणें "नफा" नाहीं. पण व्यवहारतः एखाद्या लक्षाधीश डायरेक्टरकडे शेताची मालकी आहे कीं नाहीं, हा प्रश्न फारसा महत्वाचा नाहीं, त्याची आपल्या हाताखालील कामगारांवरील सत्ता भांडवलशाही राष्ट्रांतील मालकवर्गापेक्षां अधिक आहे. त्या डायरेक्टराच्या मुलाबाळांना आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सुखसोयी इतरांपेक्षां अधिक मिळतील. त्यांचें उत्पन्न, कोणत्याहि भांडवलशाही लक्ष्मी-

पुत्राच्या संततीइतकेंच, "विनाश्रमाचें—ऐदीपणाचें" असेल. फरक फक्त इतकाच कीं, रशियांतील श्रीमंत, जमीन किंवा कारखाना स्वतःसाठीं विकत घेऊं शकत नाहीं; पण आर्थिक धोका न पत्करतां, मालकी हक्काचे सर्व लाभ जर उपभोगावयास मिळत असतील, तर शेती किंवा कारखाना विकत घेण्याची हौस कोणाला असेल?

अशा "लक्षाधीश कामगारांचें" महत्व लक्षांत येण्यासाठीं गरीब कामगारांचें जीवन तुलनेसाठीं घेतलें पाहिजे. सर्व जगांत "जीवनमानाचे" आंकडे प्रसिद्ध न करणारें एकटें एक राष्ट्र म्हणजे रशिया. आय-व्ययाच्या प्रती लावणारे आंकडे तेथें प्रसिद्ध करीत नाहींत. रशियन आंकडे-शास्त्रज्ञ आपल्या औद्योगिक उत्पादनाचे आंकडे, ढोल वाजवून जाहीर करतात, पण ग्राहकांसंबंधीं मात्र ते मूग गिळून बसतात. जे कोणी रशियन कामगारांत राहून तेथून बाहेर पडूं शकले व सत्य बोलण्याचें ज्यांनीं धैर्य दाखविलें, त्यांनीं त्या कामगारांची दुःखद कहाणीच निवेदन केली. पण "हे ट्रॉट्स्कीचे अनुयायी! ते खोटें—नाटें सांगतात!" असें म्हणून तिकडे दुर्लक्ष केलें गेलें.

तथापि रशियाच्या सरकारी माहितीची काळजीपूर्वक छाननी केली असतांना, तेथील कामगारांच्या शोचनीय स्थितीचें सत्य दर्शन होईल हें निःसंशय! उदाहरणार्थ, १९३८ सालीं, तेथील एका सरकारी नियतकालिकांत, झारशाहींत कापडाच्या गिरणींतील कामगाराला सेंट पिटर्सबर्ग येथें आपल्या कुटुंबाच्या अन्नाचा खर्च किती येई, हें दिलेलें होतें. त्यावरून पुढील आंकडेवार माहिती मिळते.

	१९१३	१९२९	१९३७
आठवड्याच्या अन्नाची किंमत–रूबल–	३·४०	५·९०	४९·६०
अन्नाच्या किंमतीचें प्रमाण–शेंकडा–	१००	१७२	१४४९
सरासरी पगार –रूबल –	२५	६६	२४५
प्रत्यक्ष पगाराचें प्रमाण –शेंकडा–	१००	१५४	६८

याचा अर्थ असा कीं, क्रांति—कालापासून १९२९ पर्यंत सरासरी जीवनमान शें. ५४ नें चढलें, आणि १९३७ सालीं, क्रांतिपूर्व कालापेक्षां शें. २२ नें उतरलें.

दुसऱ्या आंकडे-शास्त्रज्ञांनींहि असेच निष्कर्ष काढले आहेत; आणि माझ्या माहितीप्रमाणें, त्यांचें खंडन कोणाहि रशियन अधिकाऱ्यानें केलेलें नाहीं.

शेतीच्या उत्पन्नांतहि अशीच विषमता. १९३३ च्या फेब्रुवारींत स्टॅलिननें आपलें सुप्रसिद्ध भाषण करून "समानतेचा शाप" नष्ट केला. सामुदायिक शेतीचे प्रयोग सुरू झाल्यानंतर व त्याचा समान हिस्सा प्रत्येक शेतकऱ्याला

मिळाल्यानंतर, समानता नष्ट कशी करावयाची हा रशियापुढें एक विकट प्रश्न होता. पण लवकरच एक नामी युक्ति सांपडली. त्या शेतांतील धान्याची वांटणी सभासदांमध्यें समतेनें न करतां, ज्यानें जितकें दिवस काम केलें असेल, त्या प्रमाणांत केली गेली; आणि या कामाचें मोजमाप त्याच्या स्वरूपाप्रमाणें निरनिराळें ठरविण्यांत आलें. एकाद्या मजुरानें दिवसभर काम केलें, तरी त्याच्या कामाचा अर्धा दिवस धरला जाई, तर 'यंत्र–नांगरा'च्या चालकाचा एक दिवस म्हणजे ५ दिवस गणले जात. शासन-विषयक अधिकाऱ्याचा एक दिवस हा ५ किंवा १० दिवसांच्या बरोबर मानला जाई.

भांडवलशाही परिभाषेंत सांगावयाचें तर, शेतकरी हे रोजंदार बनले, आणि त्यांची मजुरी कामगारांप्रमाणेंच भिन्न भिन्न राहूं लागली. कझाकस्तान या अत्यंत दरिद्री विभागांतील सहकारी शेतीचा एक डायरेक्टर कोट्यधीश बनलेला आहे.

♤ ♤ ♤

कामगार, शेतकरी व सैनिक—हे रशियन सरकारचे तीन आधारस्तंभ. त्यांपैकीं कामगार व शेतकरी यांच्यामध्यें असलेली "भांडवलशाही समता" जशी रशियानें खणून काढली, तशीच सैनिकांमधील समतेचाहि स्टॅलिननें विध्वंस केला. "लाल सैन्यांतील" साध्या शिपायाला सध्यां दरमहा १० रूबल मिळतात, तर लेफ्टनंटला १००० व कर्नलला २४०० रूबल मिळतात. साधा शिपाई व सामान्य अधिकारी यांच्या पगाराचें प्रमाण इंग्लंडांत सुमारें १:४, अमेरिकेंत १:३ तर रशियांत १:१०० आहे. याचें समर्थन रशियाचे भगत कसें करतात हें पाहणें मौजेचें आहे. एका पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, "लाल सैन्यांत पगाराची विषमता असली तरी वर्गभेद नाहीं. शिपायाचा तनखा छोटा असला तरी टपाल, प्रवास, करमणूक, धूम्रपान इत्यादि बाबतींत त्याला इतक्या सवलती असतात कीं, अन्य देशांतल्या सैनिकाइतकाच तो सुखी असतो."

याच रीतीनें ब्रिटिश सरकारनें आपल्या सैनिकांचे पगार कमी करून आठवड्याला १८ पेन्स ठरविले व त्याच्या समर्थनार्थ २ पोस्टाचीं तिकिटें, ४ सिनेमाचीं तिकिटें वगैरे देतों असें म्हटलें, तर ब्रिटिश सैनिकाला काय वाटेल हें सांगणें कठीण आहे.

८

कामगारांची परिस्थिति व कामगारांचे संघ

लोकांना आपल्या कामाकडे "सांस्कृतिक दृष्टीनें" पाहण्यास शिकविण्यासाठीं रशियांत जे मजूरविषयक कायदे तयार करण्यांत आले, त्यामुळें फॅसिस्ट इटाली व नाझी जर्मनी यांतील कामगारांपेक्षांहि रशियन कामगारांचे हाल वाढले. एकादा रशियन कामगार कामाला वीस मिनिटांहून अधिक उशिरां आला, वेळेपूर्वी काम सोडून गेला किंवा टिवल्याबावल्या करीत राहिला अथवा असमाधानकारक उत्पादन करूं लागला, तर त्याला, आगाऊ सूचना न देतां, बडतर्फ करण्याचा अधिकार मुकादमाला व कारखान्याच्या व्यवस्थापकाला रशियांत आहे. आळशीपणामुळें बडतर्फ झालेल्या कामगाराचा घरावर हक्क रहात नसे; आणि धान्य-नियंत्रणाच्या काळांत राशन-कार्डावरहि हक्क रहात नसे. १९३९ सालीं प्रत्येक पगारी नोकराला एक नोंद-वही देण्यांत आली. तींत व्यवस्थापक हा कामगाराच्या वर्तनासंबंधीं, अपराधासंबंधीं, आस्था-आलस्यासंबंधीं शेरे लिहीत असे. अशी नोंद-वही दाखल न करणाऱ्या कामगाराला कामावर घेणें हा फौजदारी गुन्हा ठरविण्यांत आला.

यामुळें असंतुष्ट झालेले कामगार परदेशांत जाऊं लागले. त्यांचा लोंढा सरकारच्या दमदाटीनें थांबेना. म्हणून १९३८ सालापासून कामगारांना आपल्या कामाशीं बांधून ठेवणारे कायदे करण्यांत आले. जर कोणी विना-परवाना काम सोडून गेला, तर त्याला सक्तीची मजुरी करावी लागे. प्रत्येक गुन्ह्याची चौकशी पांच दिवसांच्या आंत एका न्यायाधीशाकडून होऊं लागली. पूर्वी न्यायाधीशाच्या जोडीला दोन सल्लागार असत, पण ते रद्द करण्यांत आले. न्यायाधीश व व्यवस्थापक यांनीं कामगाराविषयीं करुणा दाखविली, तर त्यांनाहि शासन करण्यांत येई. आरोग्याचा विमा व इतर विमे यांचा लाभ एकाच नोकरीवर दीर्घकाळ राहणाऱ्या कामगाराला मिळे. नोकरीला लागल्यापासून पहिल्या सहा महिन्यांत आजारीपणाचा भत्ता कामगाराला अजीबात मिळत नाहीं. नंतर तो थोडाथोडा मिळूं लागतो. तो भत्ता पूर्ण मिळण्यास कामगार एकाच नोकरीवर दहा वर्षें टिकून राहायला पाहिजे. नोकरी बदलली कीं, पुनः पहिल्यापासून श्रीगणेशा.

याच वेळीं सात तासांचा दिवस व सहा दिवसांचा आठवडा रद्द करण्यांत आला. मजुरीचे दर कमी करण्यांत आले व उत्पादनाचें प्रमाण वाढविण्यांत आलें, त्यामुळें कामाची वेळ शें. १५ टक्के वाढली, तरी कामगाराचें मासिक उत्पन्न तेंच

कायम राहिलें. त्या उत्पन्नांत, उत्पादनाचा वांटा भरला नाहीं म्हणून, कपात करण्यांत येई. ही कपात शें. ३२ कामगारांना भोगावी लागे. स्त्रिया व मुलें यांना अधिक काळ राबवूं नये किंवा रात्रीचें काम देऊं नये असे कायदे रद्द करण्यांत आले. हें सारें महायुद्धापूर्वीच घडलें. १९४१ च्या डिसेंबरपासून तर ज्या ज्या धंद्यांचा व वाहातुकीचा युद्धाशीं प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध असेल, ते "लष्करी कायद्याखालीं" आले. गैरहजेरी, आळशीपणा व निष्काळजीपणा—या गुन्ह्यांना फांशीची शिक्षा ठेवण्यांत आली.

♤ ♤ ♤

यावर असा प्रश्न उपस्थित होतो कीं, बाह्यतः तरी कामगार—वर्गाच्या हुकूमशाहीखालीं नांदणाऱ्या देशांत एकीकडे कामगारांचा कायदेशीर दर्जा खालावत आहे, त्यांचे प्राथमिक हक्क नष्ट होत आहेत, त्यांच्या राहणीचें मान क्रांति—पूर्व कालापेक्षां खालीं येत आहे, आणि दुसरीकडे एक नवा ऐषारामी वर्ग निर्माण होत आहे, असें असतांना त्याला कोणी विरोध कसा करीत नाहीं ?

भांडवलशाही लोकसत्ताक देशांतील कामगारांना सरकारी धोरणावर आपला प्रभाव पाडण्याचे दोन मार्ग खुले असतात—मतदानाची यंत्रणा आणि कामगार संघ.

एकपक्षीय राज्य—शासन असलेल्या देशांत मतदानाचा मार्ग मोकळा नाहीं. तेथें सरकारकडून उमेदवारांची एकच यादी मतदानासाठीं येते. मतदारानें त्यांतील उमेदवारांनाच अनुकूल किंवा प्रतिकूल मत द्यावयाचें. विरुद्ध मत देणें म्हणजे मोठा धोका पत्करणेंच होय. बहुतेक ग्रामीण विभागांत उमेदवारांची निवड जाहीर सभेंत जयघोषानें केली जाते; आणि त्यांत निवडीला वाव असतोच कोठें ? ती निवडणूक निरर्थकच ठरते. तेथें विरोधी पक्ष नाहीं कीं, स्वतंत्र वृत्तपत्र नाहीं. लोकमताचें दडपण राज्यकारभारावर आणण्यास कोणताहि मार्ग मोकळा नाहीं. मग जे असंतुष्ट लोक असतात, ते गुप्त मंडळ्या स्थापून राजकीय कट करतात. तेवढाच एक मार्ग त्यांना मोकळा असतो.

दुसरा आर्थिक उद्धाराचा मार्ग म्हणजे मजूर-संघ (ट्रेड युनियन). रशियामधील मजूर—संघानें काय कामगिरी बजाविली हें युरोपांतील रशियाच्या कैवाऱ्यांनाहि अज्ञातच आहे. यादवी युद्धाचे वेळीं व त्यानंतरचे काळांत, कारखान्यांतील समित्यांमार्फत मजूर-संघानें त्या देशाच्या आर्थिक उत्पादनावर आपली सत्ता बसविली; आणि देशाला अराजकापासून व अंदाधुंदीपासून वांचविलें.

पुढें "नवी आर्थिक योजना" (N.E P.) सुरू झाली. तेव्हांपासून सरकारच्या अर्थ-कारणांत मजूर-संघांना कांहीं स्थान राहिलें नाहीं. तरीसुद्धां कामगारांचें तात्कालिक हित पाहण्याचें काम रशियन मजूरसंघ दक्षतेनें करीत होता.

परंतु स्टॅलिनच्या नोकरशाहीची पकड बळकट झाल्यापासून मजूर-संघाच्या कार्यांत मूलगामी फरक झाला. पहिली पंचवार्षिक योजना सुरू होतांच हे सर्व मजूर-संघ सरकारच्या नोकरशाहींत अंतर्भूत झाले. त्यांचें काम आतां पूर्वीप्रमाणें मजुरांचें हित-रक्षण हें राहिलें नाहीं, तर मजुरांची शिस्त वाढवून त्यांना आपल्या कामांत जास्तींत जास्त वाकबगार करणें हेंच त्यांचें काम ठरलें. जे संघ कामगार-वर्गाच्या उद्धाराचें साधन होते, तेच आतां कामगार-वर्गावरील सत्तीचें साधन बनले. कामाचे तास वाढविणें, कामचुकारपणाला कडक शासन करणें इत्यादि जे अनेकानेक कायदे सरकारनें केले, त्या सर्वांच्या पाठीशीं मजूर-संघाच्या तशा शिफारशी होत्या. "मजूर-संघाच्या सूचनेनुसार, आम्ही असें फर्मान काढतों कीं," असाच सरनामा अशा सरकारी हुकुमांना जोडलेला असे.

रशियांतील मजूर-संघ हे उत्पादनाच्या शाखांप्रमाणें निरनिराळे असतात. त्यांमध्यें डायरेक्टर, व्यवस्थापक, कामकरी स्त्री इत्यादि सर्व समाविष्ट केले जातात. कारखान्यांत सभा भरवून निवडणुकी केल्या जातात. पण त्या निवडणुकी-साठीं वरिष्ठ कौन्सिलाकडून उमेदवारांची यादी येते. कामगारांचें काम हात वर करणें एवढेंच. त्यांच्या दोन पुढाऱ्यांनीं असें मत वृत्तपत्रांत प्रदर्शित केलें आहे कीं, "पगाराचें प्रमाण ठरविण्याचें काम हें सर्वस्वीं कारखान्याच्या प्रमुखाचे हातीं असलें पाहिजे. कामगारांनीं स्वहित-रक्षणार्थ सरकारशीं झगडतां कामा नये. तसें करणें म्हणजे सरकारचे अवयव कापणेंच होय. तें काम विकृत मेंदूच्या संधिसाधूंचेंच."

या सगळ्याचा अर्थ इतकाच कीं, रशियन सरकारनें प्रामाणिक बुद्धीनें "तात्पुरते उपाय" म्हणून जे योजले, त्यांनाच तात्त्विक मुलामा देऊन प्रचार करण्यांत आला. हे "तात्पुरते उपाय" तरी कां योजले? तर उत्पादन-वाढीची प्रेरणा देण्यास नवें तत्त्वज्ञान अपुरें ठरलें, आणि म्हणून पैशाचें आमिष ठेवण्यांत आलें. तसेंच कामगार लोकांनीं आपखुषीनें शिस्त राखली नाहीं, म्हणून शिस्तीची सक्ति करावी लागली.

या उपायांचा जो अतिरेक झाला, त्याचें समर्थन करतां येणार नाहीं. पण

त्याहिपेक्षां दुःखाची गोष्ट ही कीं, समाजवादी तत्त्वज्ञानामध्यें ज्या प्रेरणा आधाराला घेतलेल्या आहेत, त्याच एकदम ढांसळल्या. रशियांत समाजवादाचा जो प्रयोग चाललेला आहे, त्याचें ऐतिहासिक दृष्ट्या परीक्षण केलें असतां हेंच एक शोचनीय अनुमान निघतें कीं, या नव्या प्रेरणा मानवाला काम करावयास लावण्याला असमर्थ ठरल्या.

९

रशियांतील कायद्यांचें स्वरूप

यादवी युद्ध व दुष्काळ यांनीं रशियामध्यें हाहाःकार उडविल्यानंतर, हजारों-हजार मुलें उनाडटप्पू बनलीं—गुन्हेगारांच्या टोळींत सामील झालीं व नागरिकांना उपद्रव देऊं लागलीं. सरकारपुढें हा एक बिकट प्रश्न उभा राहिला.

या मुलांच्या स्थितीसंबंधानें परदेशांत मोठा प्रचार झाला. हेतु असा कीं, रशियांतील दुःखग्रस्त जनतेबद्दल सहानुभूति वाटावी आणि मुलांना सुधारण्याच्या तेथील आधुनिक पद्धतीबद्दल कौतुक वाटावें. " The Road To Life " या रशियन चित्रपटांत गुन्हेगारांची सुधारणा तेथें शिक्षेशिवाय कशी केली जाते हें दाखविलेलें आहे. हा चित्रपट जगभर दाखविला गेला—वाखाणला गेला. त्यावरून रशियाची गुन्हेगाराकडे पाहण्याची दृष्टि कशी मानस शास्त्रीय आहे हें जगाला कळून चुकलें.

समाजवादी रशियाच्या प्रारंभींच्या कायद्यांचीं मूलभूत तत्त्वें हींच होतीं. समाजवादी तत्वज्ञानाचे हे आधारस्तंभच होत. ते ढळले कीं सारें तत्त्वज्ञान ढांसळलेंच. परिस्थितीमुळें जो गुन्हेगार बनला, तो परिस्थिति बदलल्यावर जर सुधारूं शकला नाहीं, तर राजकीय संस्थांत बदल करून आपला विकृत समाज कसा सुधारेल ? मग पुराणमतवादी लोकच बरोबर ठरतील. कारण ते असें मानतात कीं, मानवी स्वभाव दुरतिक्रम आहे—अपरिवर्तनीय आहे. त्यांच्यामध्यें निःस्वार्थी व जबाबदार वृत्ति कधींच निर्माण होणार नाहीं, आणि अशा वृत्ती-शिवाय समाजवादी समाज अस्तित्वांतच येणार नाहीं.

देश कितीहि दरिद्री असो, त्याला उनाड मुलें सन्मार्गाला लावण्याचें व त्यांना राष्ट्राचे घटक बनविण्याचें सामर्थ्य असलेंच पाहिजे. तरच त्या समाजाची वाढ निकोप झाली आहे असें म्हणतां येईल. परंतु रशियानें हें सुधारणेचें सारें

शास्त्र गुंडाळून ठेवून ता. ७ एप्रिल १९३५ रोजीं असा हुकूम काढला कीं, बारा वर्षांपर्यंतच्या मुलालाहि फांशी देतां येईल. क्रांतिनंतर १८ वर्षांनीं घडलेली ही घटना. या काळांत, यादवी युद्धांतील पोरकी पोरें प्रौढ बनलीं होतीं. आतां तरुण गुन्हेगारांची जी पिढी निर्माण झालेली होती, ती नव्या राजवटींत जन्मलेली होती. पण त्यांना शिक्षकाकडून सुधारण्याऐवजीं सैनिकाकडून ठार करण्याचीच तरतूद झालेली होती. बारा वर्षांच्या मुलाला फौजदारी कोर्टांत प्रौढ माणसाप्रमाणें वागविण्याचा कायदा रशियाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि—सुसंस्कृत वा असंस्कृत—राष्ट्रांत सांपडणार नाहीं.

असाच जगावेगळा दुसरा कायदा म्हणजे जो सैनिक परदेशांत असतांना आपली लष्करी नोकरी सोडून जाईल, त्याच्या सर्व प्रौढ नातलगांना सैबेरियाच्या दूर विभागांत पांच वर्षें हद्दपार केलें जाईल. त्या सैनिकाचा गुन्हा माहीत नसला तर ही सौम्य शिक्षा, पण जर का तो गुन्हा त्या नातेवाईकांना माहीत असला, तर दहा वर्षेंपर्यंत कैद होऊन त्यांची सारी मालमत्ता जप्त व्हावयाची. मानवाच्या प्राथमिक अवस्थेंत एका गुन्ह्यासाठीं सर्व कुटुंबाला किंवा गटाला जबाबदार धरलें जाई. तीच वृत्ति या कायद्याच्या बुडाशीं आहे. १९३५ सालापासून, राजद्रोह किंवा क्रांति-विरोधी चळवळ, यासाठीं पकडलेल्या लोकांच्या नातलगांना हद्दपार करण्याची प्रथा वाढत चालली. "राजद्रोह" किंवा "क्रांति-विरोधी चळवळ" या शब्दांमध्यें, राजकीय मतभेद, गैरहजेरी, विध्वंस इत्यादि कोणतेंहि कृत्य सामावलें जातें. या सर्वांचा निष्कर्ष इतकाच कीं, प्रत्येक माणसानें आपलें कुटुंब हें आपल्या वर्तनासाठीं सरकारकडे ओलीस ठेवलेलें आहे, असें मानलें पाहिजे. याचा परिणाम स्त्रीवर्गावर असा झाला कीं, जिचा नवरा पकडला जाईल, ती रजिस्ट्राराच्या कचेरीकडे धांव घेते व एकतर्फी खुलासा करून घटस्फोट मिळविते. अर्थात् हें केवळ सरकारी शिक्षा चुकविण्यासाठीं असते. त्या पति-पत्नींचे संबंध पूर्ववत् चालू राहतात. पण १९४४ च्या घटस्फोटाच्या कायद्यानें हीहि पळवाट बंद केलेली आहे.

अशा कडक शिक्षांचें समर्थन करतांना क्रिलेंको हा रशियन न्याय-मंत्री म्हणतो, "राष्ट्र जितकें सामर्थ्यशाली असेल, तितकें तें आपल्या प्रतिपक्षाशीं उदारतेनें वागतें, असें उदारमतवादी लोकांचें मत आहे. पण तें चूक आहे—साफ चूक आहे. राष्ट्र जितकें अधिक समर्थ, अधिक शक्तिमान आणि प्रजा व सरकार यांचें बंधन जितकें अधिक दृढ, तितका आपल्या विरोधकांवर अधिक राग. जे लोक आमची समाजरचना बिघडवूं पाहतात, त्यांना कडक शासन करणें योग्यच ठरतें."

समाजवादी तत्त्वज्ञानांतील न्यायपद्धतीचा जो आभास रशियांत चालू होता, तोहि यावेळेस नष्ट करण्यांत आला. तेथील कायद्याच्या पुस्तकांत "शिक्षा" हा शब्द पुनः रूढ झाला व 'सूड, धाक, वचक' हे न्यायदानाचे हेतु मानण्यांत आले. "समाज-रक्षणाचें साधन" हें त्याचें स्वरूप पार नाहींसें झालें. रशियांत "शुद्धीकरणाच्या" सत्रांत जे लहान-थोर लोक बळी गेले, त्यांना "समाज-द्रोही" न म्हणतां, "पिसाळलेलीं कुत्रीं, उंदीर, साप, शेण, उकिरडा" अशीं विशेषणें देण्यांत आलीं. मार्क्सचें तत्त्व असें कीं, माणूस गुन्हेगार बनतो तो आपल्या परिस्थितीमुळें. मग प्रश्न असा कीं, परवांपर्यंत जे बोल्शेव्हिक पक्षाचे आधार-स्तंभ होते, ते सर्वच्या सर्व एकदम "देशद्रोही कुत्ते" कसे बनले? कोणती परिस्थिति त्याला कारण झाली? याचें उत्तर देणें मोठें अवघड होतें. पण कोणाहि मार्क्सवादी माणसाच्या मनांत सहज उद्भवणारा तो प्रश्न होता. तो प्रश्न डावल-ण्याचा एकच मार्ग म्हणजे समाजवादी तत्त्वज्ञानाचे सिद्धान्तच झुगारून देणें.

याच धोरणानें रशियांतील सर्व कायदे व हुकूम घडविले जातात आणि विवाह, घटस्फोट, पति-पत्नी-संबंध, प्रवास, धर्म, लष्करी शिक्षण—इत्यादि खाजगी व सार्वजनिक जीवनाचें नियंत्रण केलें जातें. त्यांपैकीं कांहीं थोड्या विषयांनाच मी स्पर्श करणार आहें.

गर्भपात व मुलांशीं अनैसर्गिक संबंध—हे दोन गुन्हे मानून त्यांना भांडवल-शाही राष्ट्रांत शिक्षा ठेवलेली असते. त्याबद्दल युरोपांतहि, साम्यवादी व समाज-वादी—दोघेहि त्या पद्धतीवर तुटून पडत असत. 'अनैसर्गिक संबंध' हा जर गुन्हा मानला, तर प्लेटोपासून प्राउस्टपर्यंत जे जे लेखक, चित्रकार व गवयी झाले, त्यांपैकीं निम्या कलावंतांना कारागृहांतच राहावें लागेल.

गर्भपातासंबंधीं समाजवादी विचार-सरणी अशी—सर्वसामान्य स्त्रीला मूल नकोसें असेल, तर ती संतति नियमन करील. पण एकादी स्त्री गर्भ-पात करण्यास प्रवृत्त होते, याचा अर्थ तिला तशींच मानसशास्त्रीय किंवा अर्थशास्त्रीय कांहीं कारणें असतील. पण या दोन्ही बाबतींत स्त्रीला नको असलेलें मूल जन्मास न येणेंच सामाजिक दृष्ट्या चांगलें. एकाद्या स्त्रीनें गरोदरपणापासून मुक्त होण्याचा निर्धारच केला असेल, तर तो ती, कायद्याची पर्वा न करतां, तडीस नेईल. (देशाच्या एका भागांतच गर्भपाताची संख्या पांच लाखावर जाई.) याचा अर्थ असा कीं, गर्भपात बेकायदा ठरविला, तर श्रीमंत स्त्रिया बेकायदेशीरपणें गर्भपात सुखानें करून घेत राहातीलच, पण गोरगरीब बायाबापड्यांना मात्र भोंदू वैद्यांच्या गलिच्छ जाळ्यांत सांपडावें लागेल.

गर्भपात बेकायदा ठरविणारा हुकूम हाच एक रशियन सरकारानें लोकमतास टाकला होता. कारखाने व सभा यांमध्यें याबाबत लोक-मताचा कौल घेण्यांत आला. पण बहुसंख्य लोकमत विरुद्ध गेलें. तेव्हां लोकमत धाब्यावर बसविण्यांत आलें आणि ता. २७ डिसेंबर १९३६ रोजीं गंर्भपात बेकायदा ठरविणारा हुकूम निघाला. लोकमताशीं असा खेळ पुनः कधीं रशियन सरकारानें केला नाहीं. गर्भपात कायदेशीर ठरण्यासाठीं जीं कारणें जर्मनी, इंग्लंड व अमेरिका येथें पुरेशीं ठरतात, त्यांहून फार कडक कारणें रशियांत आहेत.

घटस्फोटाचे जे कायदे १९४४ च्या जुलैमध्यें जारी करण्यांत आले, ते तर मध्ययुगाला शोभणारे आहेत. स्थानिक वृत्तपत्रांत घटस्फोटाची जाहिरात द्यावी लागते. तसेंच, वैयक्तिक परवान्यावरहि घटस्फोटाची नोंद करावी लागते. हा परवाना राशन आणतांना, नोकरी मिळवितांना किंवा प्रवासावर निघतांना दाखवावा लागतो. घटस्फोटाचे खटले जनतेच्या "न्याय-मंदिरांत" चालतात. त्यांचा कारभार उघडा असतो आणि त्यांचें धोरण पति-पत्नीमध्यें समेट करण्याचें असतें. समेट न झाला तर त्या "न्याय-मंदिराचें" काम संपतें-घटस्फोट देण्याची त्याला सत्ता नसते.

मग वरिष्ठ "न्याय-मंदिरा"कडे धांव घ्यावी लागते. घटस्फोटाला योग्य कारणें कोणतीं ? याचा निर्देश कायद्यांत कांहींच नाहीं. घटस्फोट द्यावा कीं न द्यावा, हें प्रादेशिक "न्याय-मंदिराच्या" न्यायाधीशाचे विवेकावर अवलंबून असतें. सामान्यतः न्यायाधीशाचा कल घटस्फोट न देण्याकडेच असतो. त्याचेवर विभागीय, जिल्हानिहाय व अंतिम अशीं—"न्याय-मंदिरें" आहेत. पण त्याकडे दाद मागणें म्हणजे पुष्कळ वर्षें व पुष्कळ पैसा घालविणें होय. पूर्वी घटस्फोटाची फी ५० रूबल होती, ती आतां ५०० ते २००० रूबल करण्यांत आली. त्याशिवाय वकिलाची फी वगैरे इतर खर्च आहेतच. खालच्या "प्रादेशिक न्याय-मंदिरांत" घटस्फोट मिळविण्यासाठीं कमींत कमी ३००० रूबल खर्च येतो. पण १९३८ सालच्या सरकारी आंकड्यांवरून, रशियांतील नागरिकाचें सरासरी मासिक उत्पन्न २८९ रूबल होतें. याचा अर्थ साधारणपणें एक घटस्फोट मिळविण्यास एका वर्षाच्या प्राप्तीवर पाणी सोडावें लागतें. याचाहि अर्थ हाच कीं, इंजिनिअर, डायरेक्टर व वरिष्ठ अधिकारी यांच्यापेक्षां कमी प्रतीची आर्थिक स्थिति असणाऱ्या लोकांना घटस्फोट मिळणें अशक्य झालें आहे. १९४४ सालीं घटस्फोटाचा नवा कायदा जारी झाल्यानंतर पहिल्या महिन्यांत, अखिल रशियांत, घटस्फोटाचा एकहि अर्ज दाखल झाला नाहीं.

व्यवहारतः रशियानें घटस्फोट रद्दच केला आहे असें समजलें पाहिजे. तत्त्वतः रशियांतील प्रत्येक घटक राज्याला संघराज्यापासून फुटून निघण्याचा हक्क आहे, पण युक्रेन कधीं-काळीं स्वातंत्र्य पुकारील काय ? त्याचप्रमाणें आपल्या संसारांतील जोडीदारापासून फुटून निघण्याचा हक्क रशियन नागरिकाला आहे, पण तो अंमलांत आणणें कठीण.

रशियांतील स्त्रीचें लग्न एकदां झालें कीं, तिला सारा जन्म प्रजोत्पादनांत घालवावा लागतो. ज्या कायद्यानें घटस्फोटाला बंदी केली, त्यानेंच ब्रह्मचारी, विधुर व तिहीपेक्षां कमी मुलें असलेलीं कुटुंबें यांवर जादा कर बसविला. उलट तीन मुलें असणाऱ्या आईला आर्थिक देणगी देण्यांत येते, चार किंवा अधिक मुलांच्या मातेला मासिक भत्ता देण्यांत येतो, ५-६ मुलें असणाऱ्या स्त्रीला "मातृ-पदक" बहाल करण्यांत येतें, ७-९ मुलें असणाऱ्या आईला "मातृगौरव" अशी पदवी देण्यांत येते, आणि १० किंवा अधिक मुलें असणाऱ्या स्त्रीला "शौर्य-शालिनी माता" असा किताब अर्पण करण्यांत येतो. या धोरणाचे पोवाडे "प्रवदा" वगैरे पत्रांनीं मुक्तकंठानें गाइले. 'प्रवदा'कार लिहितो कीं, 'मातृत्वाचें माहात्म्य जगांत कोणी प्रथम गायिलें असेल तर तें आम्हीच.'

पण हे पोवाडे आचरटपणाचेच नव्हेत काय ? इंग्लंडमध्यें तर दुसरें मूल जन्मास आलें कीं, त्या कुटुंबाला भत्ता मिळूं लागतो. पूर्वी नाझी जर्मनीनें प्रजावाढीचा कार्यक्रम आंखून ब्रह्मचर्यावर कर बसविला, तेव्हां रशियांतील वृत्तपत्रांनीं त्याची टर उडविली होती. आतां मनांत असें येतें कीं, त्या संपादकांना "शौर्य-शालिनी मातांशीं" विवाह-बद्ध करावें !

लेनिनच्या मृत्यूनंतर रशियांत जे जे म्हणून कायदे झाले, ते सर्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत व्यक्ति-स्वातंत्र्याच्या नाड्या हळुहळु आखडणारेच ठरले. इकडून तिकडे जाण्याचेंहि स्वातंत्र्य राहिलें नाहीं. १९३२ सालच्या एका हुकुमानें रशियन नागरिकाला आपल्या देशांत कोठेंहि संचार करण्यास बंदी घालण्यांत आली. मोठमोठ्या उद्योगधंद्यांचीं शहरें व त्यांच्या आसपासचा २० ते १०० किलोमीटरचा प्रदेश यांत प्रवेश करण्याला खास परवानगी घ्यावी लागते. घरांतून चोवीस तास बाहेर राहावयाचें झालें, तर त्यासाठीं पोलीसला कळवावें लागतें. कोणत्याहि आधुनिक राष्ट्रांत, शांततेच्या काळांत, असे नियम जारी असल्याचें माहीत नाहीं.

परदेशचा प्रवास तर केवळ सरकारी कामासाठींच. इतरांना पूर्ण वर्ज्य.
कोणी परदेशाला जाण्याचा बेकायदा प्रयत्न केला, त्याला तर फांशीची शिक्षा.

चरें, सरकारनें एकाद्याला आपल्या कामासाठीं परदेशाला पाठविलें, तरीहि तो धोकाच. तो परत आला कीं, "विटाळलेला" म्हणून जो तो त्याच्याकडे संशयानें पाहणार. त्याचा "विटाळ" आपल्या देशाला होऊं नये—बाहेरच्या जगाचें सत्यज्ञान आपल्याकडे पसरूं नये—गेलीं पंचवीस वर्षें आपण जी रशियाभोवतीं तटबंदी उभी केली आहे, तिला तडा जाऊं नये, हा तेथील सरकारचा महत्वाचा विचार. त्यापुढें इतर सारे विचार तुच्छ. म्हणूनच १९३८ सालीं नाझी जर्मनींतील निर्वासितांना रशियानें मनाई केली. तसेंच फ्रान्समधील 'लष्करी तुरुंगांत' जी "जागतिक पथकें" होतीं, त्यांतील जीवंत राहिलेल्या सैनिकांनाहि रशियांत येण्यास बंदी झाली. त्यामुळेंच स्टॅलिन व हिटलर यांचा दोस्तीचा करार झाल्यानंतर फॅसिस्ट–विरोधी जर्मनांना नाझी जर्मनीच्या ताब्यांत देण्यांत आलें. त्याचे नांवनिशीवार पुरावे या देशांत उपलब्ध आहेत.

या सर्व धोरणाचा अर्थ काय असेल ? अर्थ हाच कीं, समाजवादी तत्त्वज्ञानाप्रमाणें, स्वयंप्रेरणेनें शिस्त पाळण्याचें ध्येय ढांसळलें आणि म्हणून त्याचे जागीं बळजबरी व धाकदपटशा आला, आणि त्याच्याच जोडीला इतर लोकसत्ताक राज्यांतील परिस्थितीशीं रशियाची तुलना होऊं नये, म्हणून सत्यज्ञानाची गळचेपी करण्यांत आली.

१०

नवा शासक वर्ग

रशियांतील सर्व सत्तेचें केंद्र म्हणजे पक्ष. तेथील नव्या राजवटीचें आकलन होण्यासाठीं बोल्शेव्हिक पक्षाचे सभासद व पुढारी यांच्यामध्यें गेल्या दहा वर्षांत जे मूलगामी बदल झाले, ते ध्यानांत घेतले पाहिजेत. तरच स्टॅलिनच्या तत्त्वज्ञानाचें महत्त्व चटकन् कळून येईल.

प्रथम पुढारीपणांतील बदल पाहूं. "शुद्धीकरणाच्या" यज्ञांत ज्या क्रांतिकारक नेत्यांची आहुति पडली, त्यांची नामावळि मी येथें देत बसत नाहीं. पण लेनिनच्या काळांतील पुढाऱ्यांपैकीं आतां फक्त एकटा स्टॅलिन जिवंत आहे, एवढें ध्यानांत धरलें म्हणजे पुरे. सर्वसाधारणपणें असें मानलें जातें कीं, अशा चौकशीनंतर कत्तल करण्याचा तडाखा फक्त उच्च कोटींतील पुढाऱ्यांनाच बसला, आणि त्या योगें स्टॅलिननें आपले सर्व प्रतिस्पर्धी दूर केले व रशियाला अंतर्गत

व बहिर्गत अशा पेंचप्रसंगांतून सोडविण्यासाठीं त्याला जें आपलें सूक्ष्म राजकारण खेळावयाचें होतें त्याला मोकळें मैदान मिळालें.

हें जर खरें असतें, तर केवळ राजकीय पेंच-प्रसंग सोडविण्यासाठींच "शुद्धीकरण" अवलंबिलें असतें आणि त्यासाठीं रशिया व बोल्शेव्हिक पक्ष या दोहोंच्याहि परंपरेला साजेल अशा निर्दयतेनें फक्त राजकीय पुढाऱ्यांची वाट लागली असती. त्यामुळें क्रांतिप्रवण राज्यसत्तेचा पाया उखडला गेला नसता. असा राजकीय पेंचप्रसंग म्हणजे लोकसत्ताक देशांतील मंत्रि-मंडळाच्या पेंचप्रसंगा-सारखाच मानतां आला असता—मग पेंच-प्रसंग सोडविण्याचा रशियाचा मार्ग वेगळा असेना कां, त्याला प्रति-क्रांतीचें स्वरूप आलें नसतें.

शुद्धीकरणाचें हें समर्थन अगदीं चूक आहे. पक्षांतील तळापासून माथ्या-पर्यंतच्या सर्व व्यक्तींना या "शुद्धीकरणानें" ग्रासून टाकलें. किंबहुना त्या पक्षाचा पिंडच पूर्णपणें पालटून टाकला. याला पुरावे म्हणून सरकारी दप्तरांतील कांहीं आंकडे पुढें देतों.

१९३४ सालीं, "शुद्धीकरणाच्या" सत्रापूर्वी बोल्शेव्हिक पक्षाची १७ वी काँग्रेस भरली होती. तिला १९१७ चे आधींपासून—क्रांति-काळाचे पूर्वीपासून—पक्षाचे सभासद असलेले शें. २२·६ प्रतिनिधि हजर होते. पण "शुद्धीकरणा"-नंतर लगेच १९३९च्या मार्चमध्यें पक्षाची १८ वी काँग्रेस भरली असतांना तसे जुने सभासद फक्त शें. २·४ होते. याचा अर्थ या "शुद्धीकरणां"तून फक्त $\frac{1}{5}$% प्रतिनिधि वांचले.

१९१७ सालापासून, म्हणजे क्रांति सुरू झाल्यापासून जे पक्षाचे सभासद झाले, ते १७ व्या काँग्रेसमध्यें शें. १७·७ होते. पण १८ व्या काँग्रेसमध्यें त्यांची संख्या शें. २·६ होती. यादवी युद्धापूर्वीपासून सभासद असलेल्यांची संख्या १७ व्या काँग्रेसमध्यें शें. ४० होती; तर १८ व्या काँग्रेसमध्यें ती फक्त शें. ५ होती. १९१९ पासून किंवा त्यापूर्वीपासून पक्षाचे सभासद असलेले प्रतिनिधि १७ व्या काँग्रेसमध्यें शें. ८० होते, तर १८ व्या काँग्रेसमध्यें शें. १४·८ होते.

नक्की आंकडे सांगावयाचे तर, १८ व्या काँग्रेसच्या वेळीं पक्षांच्या सभासदांची संख्या १५८८८५२ होती. त्यांतील फक्त २०००० —म्हणजे शेंकडा १·३— हे "जुने बोल्शेव्हिक" होते— १९१७ पासून किंवा त्यापूर्वीपासून ते पक्षाचे सभासद होते. पण १९१८ सालीं पक्षाच्या सभासदांची संख्या २६०००० होती व त्यापैकीं बहुसंख्य सभासद तरुण होते. बाकीच्यांचें काय झालें ?

यादवी युद्धांत $\frac{1}{4}$ सभासद ठार झाले असें म्हणतात. असेलहि. पण तरी दोन लाख सभासद १८ व्या काँग्रेसला हजर असावयास हवे होते. पण त्याऐवजीं २०००० शिल्लक होते—१९३४ ते १९३९ या कालांत $\frac{9}{10}$ खलास झाले! आणि हे कांहीं पुढारी नव्हते—पक्षाचे प्रतिनिधिहि नव्हते. ते साधेसुधे शिपाईगडी होते—क्रांति घडविणारे व यादवी युद्धांत झुंजणारे शेतकरी—कामकरी होते.

"शुद्धीकरणा" नंतर बोल्शेव्हिक पक्षाचा जणुं पुनर्जन्मच झाला. क्रांतीच्या त्या शूर पक्षाचें नांव तेवढें राहिलें. पण सभासद मात्र शेंकडा १·३ च उरले.

तरीसुद्धां रशियाचे भगत कदाचित् असें म्हणतील कीं, रशियांतील कम्युनिस्ट पक्ष हा अजून शेतकरी-कामकरी यांचाच आहे. आहे का तो तसा? सरकारी आंकडेच असें सांगतात कीं, १७व्या काँग्रेसमध्यें जमलेल्या प्रतिनिधींपैकीं शें. ९·३ हे प्रत्यक्ष शारीरिक श्रम करणारे कामगार होते. १८ व्या काँग्रेसमध्यें तर असे आंकडेच देण्यांत आले नाहींत. उलट, ठराविक एकमतानें, कामगारांच्या संरक्षणाचीं कलमें रद्द करण्यांत आलीं. त्यामुळें आतां रशियांतील कम्युनिस्ट पक्ष हा, तत्त्वतः व व्यवहारतः, कामगारांचा पक्ष असा मुळींच राहिला नाहीं. पक्षाच्या "मध्यवर्ती समितींत" १३९ प्रतिनिधि असतात. पण त्यांत स्टाखानोव्ह-सारख्या गाजलेल्या एकाहि कामगाराला घेण्यांत आलें नाहीं.

मग कम्युनिस्ट पक्ष म्हणजे कसा आहे? त्याचे सुमारे १५ लाख सभासद असतात. ते सर्वसत्ताधीश असतात. साऱ्या मोक्याच्या जागा अडवून ते देशाचा राज्यकारभार करीत असतात. १९३४ सालीं जे श्रमजीवी नाहींत असें ठरलें, ते या पक्षांत बहुसंख्य आहेत. रशियन सरकाराला आपल्याशिवाय देशांत एकच मोठा वर्ग दिसतो—आणि तो म्हणजे नोकरशाहीचा व तज्ज्ञशाहीचा. रशियांतील सरकारी अधिकाऱ्यांपैकीं $\frac{1}{3}$ इंजिनियर असतात; आणि बाकीचा अधिकारी—वर्ग. हा वर्ग जनतेपासून दूर दूर जात चालला आहे आणि आनुवंशिक हक्कांमुळें त्याचें वर्चस्व शाश्वत स्वरूप पावत आहे.

११

सक्तीची मजुरी

रशियन क्रांतीमध्यें किती लोकांना गेल्या वीस वर्षांत आपले प्राण—किंवा आपलें स्वातंत्र्य—गमावावें लागलें हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. पण त्याबाबत

रशिया मौन पाळीत असतो. तरी असें अधिकृत रीतीनें बाहेर आलें आहे कीं, श्वेत समुद्राचा कालवा व तुर्कस्तान—सायबेरिअन रेल्वे यांचें बांधकाम केवळ सक्तीच्या मजुरीनें करून घेण्यांत आलें. त्यासाठीं दहा लाख लोकांना बळजबरीनें कामास लावलें.

साऱ्या जगांत जीवनमानाचे आंकडे प्रसिद्ध न करणारा एकच देश आहे—आणि तो म्हणजे रशिया. १९२६ ते १९४० या काळांतील खानेसुमारीचे आंकडे प्रसिद्ध करण्यांत आले नाहींत. १९३७ च्या जानेवारींत खानेसुमारी करण्यांत आली, पण तिचे आंकडे प्रसिद्ध करण्यांत आले नाहींत. त्याचें सरकारी कारण असें कीं, "जनतेच्या वैऱ्यांनीं घोटाळा केल्यामुळें खानेसुमारींत भयंकर चुका झाल्या." म्हणून आंकडे—शास्त्रज्ञांच्या मंडळाचें "शुद्धीकरण" करण्यांत आलें आणि १९३९ च्या जानेवारीमध्यें नवी खानेसुमारी करण्यांत आली. तींत रशियाची एकूण लोकसंख्या १७ कोटी १ लाख २६ हजार ठरली. पूर्वीच्या दोन खानेसुमाऱ्यांवरून लोकसंख्येंत दरसाल वाढ ३० लाखांनीं व्हावयास हवी. या हिशेबानें पाहतां १९३९ च्या खानेसुमारींत दीड कोटी लोक कमी झालेले दिसतात. हा लोकसंख्येचा ऱ्हास कशामुळें झाला? संततिनियमनानें खास नव्हे. कारण त्यावेळीं त्याचीं साधनें रशियांत दुर्मिळ होतीं. १९३२ च्या दुष्काळांत कांहीं लाख लोक मेले असतील. पण सक्तीच्या मजुरांमध्यें मृत्यूचें प्रमाण शें. ३० असावें. पण हा सारा तर्क आहे. निश्चित एकच सांगतां येतें कीं, रशियांतील शें. १० लोकसंख्या वेपत्ता आहे.

♤ ♤ ♤

हे झाले सरकारी आंकडे. ट्रॉट्स्की वगैरे लेखकांनीं दुसरी बाजू दाखविली आहे. वेठ-बिगारीचें काम प्रत्यक्ष पाहून लुसियन ब्लिट् या ज्यूनें १९४३ मध्यें "समाजवादी मित्रमंडळाला" एक अहवाल सादर केला, त्यांतील कांहीं माहिती मी पुढें देतों.

१९३९ मध्यें पोलंडचा पराभव झाला. तेव्हां रशियानें व्यापलेल्या भागांत तो गुप्तपणें गेला. त्याला दहा महिने तुरुंगांत काढावे लागले. एका कैद्यासाठीं जी कोठडी होती, तींत ८ कैदी कोंबण्यांत आले होते. त्यांना दहा मिनिटें व्यायाम करण्यास सुभा मिळाली, ती २३६ दिवसांनीं! आणि दुसरी संधि मिळण्यास आणखी एक महिना लागला. त्यांना वाचन—लेखन—पत्रव्यवहार करण्यास पूर्ण बंदी. मोठ्यानें बोललें किंवा खिडकी उघडली, तरी शिस्तभंगासाठीं

शिक्षा–४८ तास भिंतीला खेटून उभे राहण्याची. गुन्हा मोठा असेल तर कमरे-इतक्या गार पाण्यांत ४८ तास उभें केलें जाई. तिचा परिणाम बहुधा अर्धांग-वायु, वेडेपणा किंवा मृत्यु यांत दिसून येई. कैद्याला प्रश्न बहुतेक रात्रीं विचारीत, आणि त्यावेळीं यथेच्छ मारझोड करीत—कत्तलीची भीतिहि दाखवीत. स्त्रियांनाहि मारपीट होई. विशेषतः पोलंडमधील "विद्यार्थी–संघटनेच्या" सभासद असलेल्या मुलींना झोडपण्यांत येई. वेडेपणा व आत्महत्या यांचें प्रमाण कैद्यांमध्यें मोठें होतें.

चौकशीअंतीं कैद्यावर कांहीं राजकीय आरोप सिद्ध झाला नाहीं, तर त्याला "सुधारण्यासाठीं" म्हणून ३ ते ८ वर्षांची शिक्षा देऊन मजुरांच्या छावणींत पाठविलें जाई. रशियन प्रदेशांत अनधिकृत प्रवेश हाच त्यांचा गुन्हा. जर्मनां-पासून बचाव करण्यासाठीं जे पोलिश लोक रशियांत घुसले, त्या सर्वांचे कपाळीं हाच भोग आला.

ता. ४ एप्रिल १९४१ रोजीं ब्लिट् हा प्लेसेक येथील मजुरांच्या छावणींत दाखल झाला. तेथें ३५००० कैदी होते. जून महिन्यांतहि तेथील उष्णतामान. ०° च्या खालीं असे. तरीहि झाडें तोडण्याचें काम तेथील स्त्री-पुरुष कैद्यांना दररोज १२।१३ तास करावें लागे. त्यांना सकाळ–संध्याकाळ थोडेंफार खावयास दिलें जाई. मध्यंतरीं फक्त कढत पाणी. ना साखर ना भाजी,–मग फळें कोठलीं? ना कपडे ना पांघरुणें–मग खाटा कोठल्या? त्यामुळें सहजच कैदी निरनिराळ्या रोगांना बळी पडत. झाडें तोडण्याचें जितकें काम कैद्यांना नेमून दिलें जाई, त्यांतील निम्मे काम पार पाडणें सुदृढ माणसालाहि कठीण जाई. स्त्रियांच्याहि कामाचें प्रमाण तेंच. आणि राशनचें अन्न मिळावयाचें, तें केलेल्या कामाच्या प्रमाणांत. त्यामुळें चोरी, व्यभिचार यांचा अवलंब जीव जगविण्यासाठीं स्त्रिया करीत. आणि वेतन काय? तर एका रात्रीकरतां एक भाकर. शें. ३० माणसें दर-साल मृत्युमुखीं पडत. रविवार असो किंवा मे महिन्याचा पहिला दिवस असो—काम हें केलेंच पाहिजे. विश्रांतीचें नांव नाहीं.

शिक्षेची मुदत संपली म्हणजे कैद्याची आपोआप सुटका होत नाहीं. त्यासाठीं सरकारचा खास हुकूम सुटावा लागतो. तो राजकीय कैद्यांचे बाबतींत कधींच सुटत नाहीं. सुटलाच तर पांच वर्षें शिक्षेची मुदत वाढण्याचा सुटतो. त्याची सुटका मृत्यूनंतरच. शें. १० तरी कैदी असे मृत्युमुखीं पडतात. सामुदायिक शेतीच्या काळांत ५० लाख "कुलकांना" (शेतकऱ्यांना) हद्दपार करण्यांत आलें. नंतर "शुद्धीकरणाचें" सत्र सुरू झालें. १९३९ च्या ऑगस्टमध्यें मॉस्को येथें

रिबेनट्रॉप आकाशांतून अवतरले. त्याचा तिटकारा कोणीच व्यक्त केला नसेल असें कसें होईल? आणि रशियांत मतभेद हाच मुळीं गुन्हा. खरोखर तेथील लोकांचें जिणें कसें असेल याची कल्पना पाश्चात्य लोकांना येणें कठीण. एका रशियन पत्र-पंडितानें अभिमानानें सांगितलें कीं, "सक्तीच्या मजुरीवर नेलेल्या लोकांची संख्या १ कोटी ८० लक्षापेक्षां अधिक नाहीं असें मी छातीवर हात ठेवून सांगतों." सरकारी आंकडे दोन कोटींचा उल्लेख करतात.

गेल्या वीस वर्षांतील रशियामध्यें तत्त्व व व्यवहार यामध्यें एवढें खिंडार पडलें आहे कीं, त्यावर विश्वास ठेवणें कठीण. रशियाच्या भगतांना आपल्या लाडक्या कल्पना सोडणें जिवावर येतें. पण सत्य तें सत्यच.

१२

अढळ सिद्धान्तांचें तत्त्व

आतां आपल्या विवेचनाचें सार सांगण्याची वेळ आली आहे.

गेल्या वीस वर्षांत रशियानें जें धोरण स्वीकारलें, त्याचे तात्त्विक दृष्ट्या दोन अर्थ संभवतात. एक म्हणजे रशियानें आपली समाजवादी आकांक्षा सोडून दिली असेल. मग त्याच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणांत गूढ असें कांहींच रहात नाहीं. उलट एका नूतन, विकासशील राष्ट्राच्या नेत्यांनीं कौतुकास्पद चातुर्यानें व धूर्ततेनें सत्तेचें राजकारण कसें चालविलें याचें सुसंगत चित्र डोळ्यापुढें उभें राहतें. लॉर्ड बीव्हरब्रुकपासून वेंडेल विल्कीपर्यंत जे वास्तववादी मुत्सद्दी राजकारणांतील व अर्थ-कारणांतील व्यवहार जाणतात, त्यांनीं रशियाच्या धोरणाचा हाच अर्थ लावला, आणि त्याप्रमाणेंच त्यांनीं आपल्या या नव्या जोडीदाराशीं वर्तन ठेवलें.

रशियाच्या धोरणाचा दुसरा अर्थ असा कीं, त्या राष्ट्राची समाजवादाकडे "आगे कूच" चालूच आहे; आणि त्याच्या अलीकडील घटना या केवळ "तात्पुरत्या योजना" आहेत. परंतु रशियाच्या विकासाचें विहंगमावलोकन केलें म्हणजे त्या योजना तात्पुरत्या वाटत नाहींत. समाजवादाच्या मूलभूत तत्त्वांशीं विरोधी अशा दिशेनें रशिया सतत व सुसंगत चाललेला आहे असेंच दिसून येतें; एवढेंच नव्हे, तर त्यांत समाजवादी तत्त्वांचा त्याग करून त्यांचे जागीं नवीन तत्त्वज्ञान रूढ करण्यांत आलें आहे असेंहि दृष्टीस पडतें. या नव्या तत्त्व-

ज्ञानाचें स्वरूप आपल्याला अद्याप निश्चित करावयाचें आहे.

याशिवाय रशियाचे भगतगण असाहि युक्तिवाद करतात कीं, रशियामध्यें कांहीं तरी बिघडलें आहे हें कबूल—तात्पुरत्या योजनापेक्षां वेगळें धोरण व हुकूम तेथें जारी आहेत हेंहि कबूल, आणि त्यामुळें रशियाचा भविष्यकाळ धोक्यांत येण्याचा संभव आहे हेंहि कबूल; पण जोंपर्यंत रशियन सरकारचा आर्थिक पाया अढळ आहे—म्हणजे उत्पादनाच्या साधनांवर सरकारची मालकी आहे व नफेबाजीची पद्धत नष्ट झालेली आहे—तोंपर्यंत समाजवादाच्या दृष्टीनें रशियांत कांहींहि फेरबदल झालेला नाहीं. सध्यांचें विकृत असें राजकीय व सांस्कृतिक वातावरण या आर्थिक पायामुळें लवकरच आपोआप निवळेल.

या एका विधानांत दोन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा असा कीं, खाजगी भांडवलशाही अर्थ-व्यवस्थेपेक्षां रशियाची आर्थिक रचना प्रगतिपर आहे. दुसरा मुद्दा असा कीं, अशा राष्ट्रीय अर्थ-व्यवस्थेंतून सुखी व निकोप असा समाजवादी समाज आपोआप निर्माण होईल. यांतील पहिला मुद्दा खरा आहे, दुसरा खोटा आहे, असें मला वाटतें.

आर्थिक दृष्ट्या रशियामध्यें शासनात्मक भांडवलशाही (State Capitalism) आहे. उत्पादनाचीं साधनें शासनसंस्थेच्या मालकीचीं आहेत, आणि मालाचें उत्पादन व वाटप यांवर सत्ता शासन-संस्थेचीच आहे. अर्थ-शास्त्रज्ञांच्या दृष्टीनें शासनात्मक भांडवलशाही व शासनात्मक समाजवाद यांमध्यें कांहींच फरक नाहीं. त्या दोहोंत फरक आहे तो देशाच्या राजकीय व सामाजिक रचनेंत—"सर्वांवर सत्ता शासन-संस्थेची आहे, पण शासनसंस्थेवर सत्ता कोणाची?" या प्रश्नांत आहे.

आपण असें पाहिलें आहे कीं, सरकारच्या धोरणाचें नियंत्रण, निवडणुकीच्या किंवा मजूर-संघाच्या द्वारें, राजकीय किंवा आर्थिक दडपण आणून, करण्याची सत्ता रशियन जनतेला मुळींच नाहीं. इंग्लंड किंवा अमेरिका यांतील खाणीकामगारांपेक्षां उरलमधील खाणी-कामगारांना आपली मजुरी, आपले कामाचे तास, आपली राहण्याची परिस्थिति, यावर कमीच सत्ता चालवितां येते. त्यांना संप पुकारतां येत नाहीं, सरकारांतील आपले प्रतिनिधि निवडतां येत नाहींत, पार्लमेंटमध्यें, वृत्तपत्रामध्यें किंवा रस्त्यावर आरडाओरडा करतां येत नाहीं. "ब्रिटिश नागरिक ब्रिटिश आरमारा चा जितक्या प्रमाणांत मालक आहे, त्याहून रशियन कामगार आपल्या कारखान्याचा मालक अधिक प्रमाणांत नाहीं."

खासगी भांडवलशाहीच्या मानानें, रशियांतील सरकारी मालकी व नियोजन

हा आर्थिक दृष्ट्या प्रगतिशील आहेत. पण जर्मनींतील निर्यातीचें नियंत्रण व आयातीचें वाटप हेंहि तसेंच मानतां येईल; आणि त्यामुळें नाझींचें आर्थिक नियोजन पाश्चात्य राष्ट्रांच्या स्थितिशील धोरणापेक्षां प्रगत ठरेल. हिटलरचा जर्मनी, युद्धापूर्वी व युद्धकालांत, शासनात्मक भांडवलशाहीकडे वेगानें धांव घेत होता. जर्मनींतील जमीनदारांची व कारखानदारांची सत्ता खिळखिळी करण्यांत आली होती. सरकार सांगेल तें उत्पादन कारखानदारांना काढावें लागे, आणि सरकार सांगेल तो पगार कामगारांना द्यावा लागे आणि सरकार सांगेल त्या किंमतीला माल विकावा लागे. ते कारखान्याचे केवळ नाममात्र मालक राहिले होते. त्यावरील त्यांचा अधिकार, रशियन कारखान्यांतील डायरेक्टराइतका मर्यादित होता. आणि त्यांच्या उत्पन्नाला "नफा" हें नांव असलें तरी, रशियांतील डायरेक्टराच्या पगाराप्रमाणें, तें उत्पन्नहि सरकारच ठरवून देत असे. यावरून जर्मनींतील नाझीवाद हा समाजवादाच्या मार्गावर होता, आणि अधिक सुखी समाज निर्माण करीत होता, असें आपल्याला म्हणतां येईल काय? "मुळींच नाहीं." असें उत्तर कोणताहि साम्यवादी रागानें देईल; पण त्याच आधारावर तो रशियाला समाजवादी ठरवील.

ट्रॉट्स्की वगैरे विरोधी साम्यवाद्यांचें मत आपल्याला मान्य करतां येणार नाहीं. तें मत असें कीं, स्टॅलिनच्या नोकरशाहीनें देशांत कितीहि गोंधळ घातला असला, तरी रशियाची अर्थव्यवस्था राष्ट्रीय स्वरूपाची असल्यानें तो देश मूलतः समाजवादी आहे. मार्क्स व एंगल्स यांनीं निःसंदिग्धपणें असें प्रतिपादिलें आहे कीं, केवळ राष्ट्रीयीकरण झालें कीं समाजवाद आला असें मुळींच नाहीं. समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीसाठीं राष्ट्रीयीकरण व नियोजन जरुरीचें आहे हें खरें, पण तेवढेंच पुरेसें नाहीं, हें गेल्या वीस वर्षांतील इतिहासानें सिद्ध केलें आहे. राष्ट्रीयीकरण व नियोजन यांचें पर्यवसान समाजवादांत होईल कीं फॅसिझममध्यें होईल, हें त्या देशांतील राजकीय व नैतिक परिस्थितीवरून ठरतें. ज्याप्रमाणें सरकारी मालकी व नियोजन म्हणजे फॅसिझम नव्हे, त्याप्रमाणेंच राष्ट्रीयीकरणाचें रशियन अर्थ-कारण म्हणजे समाजवाद नव्हे.

ऐतिहासिक विकास-क्रमामध्यें नियोजित व शासनात्मक अर्थव्यवस्था हे प्रगतीचें पाऊल आहे हें खरें, पण तें औद्योगीकरण, यांत्रिकीकरण, विमानवहातूक, शास्त्रीय खतें, यांच्याइतकेंच अपरिहार्य आहे. रशियांतील प्रचारकांनीं कारखाने व विद्युत्-गृहें उभारणें म्हणजे समाजवाद आणणें असा पुकारा केला; पण विद्युत्गृहें, शास्त्रीय खतें, सरकारी मालकी, नियोजन—हे स्वतः "डावे"

नाहींत कीं "उजवे" नाहींत—ते केवळ कालाच्या दृष्टीनें प्रगतिपर आहेत—सामाजिक किंवा नैतिक दृष्टीनें नव्हेत. 'राष्ट्रीय अर्थ–व्यवस्था' ही फासिस्ट, लोकसत्ताक किंवा समाजवादी अशा कोणत्याहि राज्यसंस्थेची सेवक असूं शकेल.

याप्रमाणें विचार करतां आपण असा निष्कर्ष काढूं शकतो कीं, कांहीं भ्रष्ट समाजवादी म्हणतात त्याप्रमाणें, राजकीय, सांस्कृतिक व नैतिक परिस्थिति ही आर्थिक पायावर आपोआप उभारली जाणारी इमारत नव्हे. त्या परिस्थितीवरून देशांतील अर्थ–व्यवस्थेचा विनियोग कोणत्या कामीं होणार हें ठरतें.

आर्थिक स्थितीचें महत्त्व कमी लेखण्याचा आमचा उद्देश नाहीं. जोंवर उत्पादनाच्या साधनांची मालकी खाजगी आहे, तोंवर समाजवाद येणें अशक्य आहे. त्याचप्रमाणें समाजवाद येण्यास राष्ट्रीयीकरण हें एकच साधन समर्थ नसलें, तरी ती एक आवश्यक घटना आहे यांत शंका नाहीं. गेल्या वीस वर्षांतील अनुभवावरून, केवळ उत्पादन–साधनांचें राष्ट्रीयीकरण केल्यानें, नव्या जगाची निर्मिति होईल, ही मार्क्सवाद्यांची आशा आपल्याला कायमची सोडून द्यावी लागते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्थळप्रत.
१३
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... दि: .....

वस्तुनिष्ठ घटना व व्यक्तिनिष्ठ जबाबदारी

इतिहासांतील समाजवादाचा पहिला प्रयोग वाममार्गाला केव्हां लागला? कां लागला? आणि तसें होणें अटळ होतें काय? हें निश्चित करतां येतें का पाहूं.

ऐतिहासिक दृष्ट्या दूर अंतरावर गेल्याशिवाय या प्रश्नांचें निर्णायक उत्तर देणें कठीण आहे. पण त्या उत्तराची सर्वसामान्य रूपरेखा दृग्गोचर होऊं लागली आहे. रशियाच्या प्रयोगानें समाजवादाची शक्यता शाबीत होत नाहीं आणि नाशाबीतहि होत नाहीं. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत तो प्रयोग करण्यांत आला आणि म्हणून तो अपुरा राहिला. समाजवादाचें मूलभूत तत्त्व असें आहे कीं, ज्या उद्योगप्रधान राष्ट्रांतील जनता राजकीय दृष्ट्या अत्यंत सुबुद्ध आहे, तेथेंच कामगार–वर्ग प्रथम सत्ताधीश होतो. परंतु झारचा रशिया, युरोपच्या मानानें, अत्यंत मागासलेला होता, हें सुप्रसिद्ध आहे. त्याची परंपरा आशियाछाप होती, आणि तेथील कामगारांच्या दसपट लोकसंख्या खेडूतांची होती. निरक्षर लोकांची संख्या शें. ८० होती. जर्मनी किंवा अमेरिका या देशांत समाजवादाचा प्रयोग झाला असता, तर त्याचे परिणाम निराळे दिसले असते. युरोपमधील असाच मागासलेला देश

जो स्पेन, तेथेंहि कामगार व मध्यमवर्ग यांचा संयोग करण्याचा प्रयोग झाला, पण तोहि असाच फसला.

परंतु प्राप्त परिस्थितींत रशियाचा जो प्रकार झाला, तो अपरिहार्य होता, कीं सारा स्टॅलिनचाच दोष होता? या प्रश्नांतून दुसरा मोठा प्रश्न निघतो तो म्हणजे ऐतिहासिक नियतिवादाचा—इतिहासांत सर्व घटना आधींच निश्चित झालेल्या असतात का लोकोत्तर व्यक्ति त्यांना आकार देऊं शकतात?

भौतिक शास्त्रांतील नियम जितके सत्य ठरतात, तितक्याच प्रमाणांत आंकडे—शास्त्राच्या नियमांनुसार इतिहासांतील घटना घडत असतात, एवढेंच आपण आपल्या सध्यांच्या ज्ञानाच्या बळावर म्हणूं शकतों. हवामान, आर्थिक स्थिति इत्यादि परिस्थितीच्या दडपणाखालीं जो लोक–समुदाय दीर्घकाळ सांपडला असेल, त्याची पुढेंमागें प्रतिक्रिया काय राहील याचा अंदाज स्थूलमानानें करतां येतो. "पुढें––मागें" व "स्थूलमानानें" हे यांतील शब्द महत्वाचे आहेत. कारण त्यांच्या कक्षेंत पुढाऱ्यांच्या वैयक्तिक प्रभावाचा अंतर्भाव होऊं शकतो. मात्र आपण जर इतिहासाचें समालोचन शतका–शतकाच्या विशाल कालखंडानें केलें, तर मात्र असें स्वच्छ दिसून येतें कीं, पुढाऱ्यांच्या वैयक्तिक प्रभावाचें महत्व अगदीं उपेक्षणीय असतें, आणि परिस्थितीच्या प्रभावाचे परिणाम पुष्कळसे समान येतात.

या रीतीनें आपण आत्मविश्वासानें असें भाकित करूं शकतों कीं, दळणवळणाचीं साधनें अधिक वेगाचीं झालीं, तर युरोप–खंडाचें एकीकरण निश्चित होईल. तें काम हिटलरच्या हातून पार पडलें नाहीं, तर स्टॅलिन तें करील, आणि स्टॅलिननें केलें नाहीं तर दुसरा कोणीतरी एक दोन शतकांत तें उरकील. इतिहास हा नदीसारखा आहे आणि वैयक्तिक प्रभाव हा त्या नदीच्या तळाशीं असलेल्या खडकासारखा आहे. नदीचें पाणी मैलभर खालीं वाहात गेलें कीं, तेथील जमिनीच्या रचनेनुसार त्याचें पात्र विस्तीर्ण होईल, मग तेथें तळच्या खडकाची दाद तिला कोठली? मात्र शंभर यार्डांच्या लहानशा प्रवाहाचें स्वरूप तो खडक बदलूं शकतो.

राजकारण वर्षांवर्षांनीं मोजलें जातें—शतका–शतकांनीं नव्हे, म्हणून पुढाऱ्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याला व जबाबदारीला वाव मिळतो. इतिहासदृष्ट्या युरोपचें एकीकरण हिटलर करतो का दुसरा कोणी करतो, याला फारसें महत्व नाहीं. नाझीवादाचे कंगोरे व कोनेकोपरे एक दोन शतकांत झिजून–झिजून गुळगुळीत झाले असते, वांशिक श्रेष्ठतेचा सिद्धांत व ज्यू लोकांची पारध या

भूतकाळांतल्या गोष्टी होऊन बसल्या असत्या, आणि शाश्वतचा परिणाम म्हणजे संयुक्त युरोपखंड निर्माण झाला असता. त्याचें स्वरूप सुमारें सन २५०० सालीं हिटलरच्या कल्पनेप्रमाणें झालें असतें. पण राजकीय दृष्टीनें—म्हणजे अल्पकालाच्या मोजमापानें—मानवी हालअपेष्टा व इतिहास-प्रवाहाला मिळालेलें दुःखद वळण यामध्यें प्रचंड फरक पडलेला दिसला असता. हाच नियम स्टॅलिनच्या राजवटीला लागू आहे. ऐतिहासिक दृष्ट्या हिटलर किंवा मार्शल पेताँ यांच्या—इतकेंच स्टॅलिनचें अस्तित्वहि ऐतिहासिक दृष्ट्या अपरिहार्य नव्हतें.

रशियाच्या इतिहासांत किमान ५।६ तरी असे प्रसंग गेल्या २० वर्षांत उद्भवले कीं, दोन समान मार्गांपैकीं कोणत्याहि एकाची निवड तेथील राज्यसत्तेला करतां आली असती. ते मार्ग इतिहासानें पूर्व-नियोजित केलेले नव्हते. अशीं वाटा फुटण्याचीं कांहीं स्थळें सांगावयाचीं तर, १९२७ सालचें चीनविषयक धोरण, १९२९—१९३० सालचें शेतीविषयक धोरण (शेतीचें घाईनें व सक्तीनें समूहीकरण केल्यानें शेतकऱ्यांना आपलीं गुरेंढोरें मारावीं लागलीं व पिकें जाळावीं लागलीं आणि त्यामुळें दुष्काळ, शुद्धीकरण, दडपशाही, यांचें सत्र सुरू झालें. सामुदायिक शेतीची घाई केली ही चूक स्टॅलिननेंहि पुढें अप्रत्यक्षपणें कबूल केली.) १९२९ सालचें प्रशियाविषयक धोरण (प्रशियांतील सोशल डेमोक्रॅटिक सरकाराविरुद्ध कम्युनिस्ट व नॅशनल सोशॅलिस्ट यांनीं केलेली एकजूट) आणि शेवटीं १९३९ सालचा स्टॅलिन-हिटलरचा करार.

यापैकीं कोणत्याहि प्रसंगीं, विशिष्ट मार्गच चोखाळण्याची सक्ति इतिहासानें वा दैवानें रशियन पुढाऱ्यावर केलेली नव्हती. त्याची संपूर्ण जबाबदारी त्या नेत्यांवरच होती, आणि निराळें धोरण सुचविणाऱ्या आपल्या पक्षांतील विरोधकांना चिरडून टाकून रशियन नेत्यांनीं आपलें स्वतःचें धोरण पुढें दामटलें. रशियांतील साम्यवादी प्रयोगाला प्रारंभीं परिस्थितीची प्रतिकूलता होती, आणि तिच्यांत भर पडली तेथील राजवटींच्या चुकांची.

या चुकांचें सर्वसाधारण कारण कोणतें? स्टॅलिन-सरकारनें जें धोरण आंखलें त्याचे प्रेरक हेतु कोणते? आपण हें पाहिलेंच आहे कीं, परराष्ट्रीय धोरणाच्या कक्षेंत, रशियाच्या हितासाठीं युरोपांतील कामगारवर्ग निर्दयपणें दडपला गेला. त्याचा परिणाम म्हणजे एकाहि देशांत समाजवाद स्थिरावला नाहीं. रशियन नेते युरोपपासून मुद्दाम अलग राहिल्यामुळें युरोपांतील परिस्थितीविषयीं त्यांना गाढ अज्ञान होतें; एवढेंच नव्हे तर, युरोपांतील पुरोगामी पक्षाच्या निराळ्या चळवळींबद्दल द्वेष करण्याचा माथेफिरूपणाहि त्या रशियन नेत्यांच्या डोक्यांत व

रशियन पक्षाच्या परंपरेंत शिरला. शेवटीं रशियाच्या धोरणांत कमालीचा ताठरपणा आला; आणि त्यांत आकस्मिक बदलहि पुष्कळ झाले. त्यामुळें तेथील हुकूमशाही राजवटीचा ओघ वेड्यावाकड्या वाटेनें वाहूं लागला आणि त्यांत सनदशीर विरोध व लोकमत यांचा समतोल राखण्याचा गुणहि वाहून गेला.

रशियाच्या अंतर्गत धोरणांतून समाजवादी तत्त्वांचें हळुहळु उच्चाटन झालें, याचीं कारणें दोन,—नव्या राज्यकर्त्यांची स्वतःचें आसन टिकविण्याची प्रवृत्ति आणि क्रांतिकाळांतील आमिषांची धूळधाण. यापैकीं शेवटचें कारण हेंच निर्णायक ठरलें आणि त्यामुळेंच रशियांतील प्रयोगाला अपयश आलें.

१४

नव्या प्रेरणांचा विनाश

मध्य–युगांतील सरंजामशाहींत मानवाला धर्मापासून प्रेरणा मिळे. त्याचे जागीं आर्थिक स्पर्धेची प्रेरणा भांडवलशाहीनें आणून ठेवली. त्या प्रेरणेविना भांडवलशाही जगूंच शकणार नाहीं. त्या भांडवलशाही स्पर्धेच्या ऐवजीं नव्या प्रेरणा निर्माण करण्याचें कार्य समाजवादाचें होतें—त्याशिवाय समाजवाद अस्तित्वांतच येऊं शकत नाहीं.

१९१७ च्या क्रांतीनें नफ्याची प्रेरणा व आर्थिक स्पर्धा रद्द केली. दुकानदार हा सरकारचा नोकर बनला. त्याचा पगार दुकानांतील उलाढालीवर अवलंबून राहिला नाहीं. शेतकरी हळूहळू रोजंदार बनला. त्याचा मुशाहिरा कांहीं प्रमाणांत धान्याचे रूपानें दिला जाई, पण त्याला शेताबद्दल किंवा जनावराबद्दल मालकीची, जिव्हाळ्याची भावना वाटेनाशी झाली. कामगारांना शिक्षेची किंवा बडतर्फीची भीति राहिली नाहीं. शाळेंतील विद्यार्थी आपल्याला ज्यांत गोडी वाटेल तेंच शिकूं लागला. अधिकाऱ्याशिवाय सैनिक लढूं लागले आणि उपाध्यायाशिवाय लोक लग्नें करूं लागले. घटस्फोट तर केवळ इच्छामात्रेंकरून मिळूं लागले.

क्रांतिकालांतील नव्या प्रेरणा म्हणजे—वैयक्तिक स्पर्धेऐवजीं सामुदायिक भावना, आर्थिक व कायदेशीर दडपणाऐवजीं आपखुषीची शिस्त, लढाऊ राष्ट्रवादाचे ऐवजीं समाजाविषयींच्या जबाबदारीची जाणीव व आंतरराष्ट्रीय वर्गीय संघटना, जन्म किंवा हुद्दा यांच्या प्रतिष्ठेच्या जागीं श्रमाची प्रतिष्ठा, ईश्वराचे व पुढाऱ्याच्या वात्सल्याचे जागीं समतेच्या भूमिकेवरील नागरिकांचा बंधुभाव, सूडा-

ऐवजीं सुधारणा, सक्तीऐवजीं समजूत—थोडक्यांत म्हणजे "सर्वांसाठीं मी व माझ्यासाठीं सर्वजण" ही समतेची, संघटनेची व भ्रातृभावाची भावना सर्वत्र पसरली व त्यामुळें एक नवेंच आध्यात्मिक वातावरण सर्वत्र कोंदून राहिलें.

हें सारें वर्णन म्हणजे आज क्रूर चेष्टा वाटते. अगदीं कट्टर कम्युनिस्टाच्या मनांतहि, हें वर्णन ऐकून "केवळ मनोराज्य", "कल्पनेचा विलास", "भावनेचा खेळ", असे शब्द आपोआप उमटतात. रशियांतील वस्तुस्थिति पंचवीस वर्षें अनुभविल्यामुळें त्यांचीं मनें नकळत आंबून—विटून गेलीं आहेत. "रशिया म्हणजे समाजवाद." अशी आपली समजूत त्यांना कायम ठेवावयाची असल्यामुळें खरोखर समाजवाद म्हणजे काय याचें विस्मरण त्यांना घडलें आहे. भांडवलशाही समाजपद्धतींतील प्रेरणा नष्ट झाल्या, पण त्यांचे जागीं नव्या मानवी प्रेरणा आल्या नाहींत. त्यामुळें एक पोकळी निर्माण झाली, व समाज अर्धांग-वायूनें पीडिला गेला. कोणत्याहि समाजाची अर्थव्यवस्था कशीहि असली, तरी त्याला जर कांहीं कार्याच्या प्रेरणा व नैतिक मूल्यें नसतील, तर तो अंदाधुंदी व अराजक यामध्यें विसर्जन पावेल किंवा हुकूमशहाच्या चाबकाखालीं नांदणारा मुका जमाव तरी बनेल.

१९१७ सालीं रशियांत जें नवें तेज निर्माण झालें, तें प्रारंभींच्या विघ्नाविरोधाविना विजयी होईल अशी आशा धरतां येण्यासारखी नव्हती. परंतु रशियांतील समाजवादाचा इतिहास हा प्रगति व परागति यांनीं विणलेला नाहीं. तेथील विकासाची रेषा पहिल्या दहा वर्षांत एकसारखी वर चढत चाललेली आणि नंतर सतत व अखंड खालीं येणारी आहे. त्याचा परिणाम म्हणजे क्रांति—नंतर एक पिढी होऊन गेल्यावर, जीवनाच्या सर्व क्षेत्रांत नव्या प्रेरणा निरपवादपणें उडून गेल्या, आणि त्यांच्या जागीं पूर्वी टाकून दिलेल्या जुन्या प्रेरणा येऊन बसल्या.

हा अधःपात त्वरेनें पूर्ण करण्याचें काम दुसऱ्या महायुद्धानें बजावलें. ता. १२ सप्टेंबर १९४३ रोजीं, मॉस्को येथील प्रार्थना-मंदिरांत, धर्मगुरूची अधिकृत रीत्या स्थापना झाली, ही घटना अनेक दृष्टींनीं अर्थपूर्ण होती. मानवी समाजापुढें नवें ध्येय, नव्या नैतिक निष्ठा व जीवन-मरणायोग्य नवी श्रद्धा निर्माण करण्याचे कामीं रशियन राज्यपद्धति अपेशी ठरली, याची ही कबुली होती. नवें वातावरण निर्माण करण्याचे कामीं एका पिढीचा काळ हा फार थोडा आहे, असें रशियाचा एखादा कैवारी म्हणेल. पण त्यानें युरोपांतील सुधारणेची व पुनरुज्जीवनाची चळवळ पाहावी व मुसलमानी धर्माचा इतिहास नजरेखालीं

घालावा. जी खरी मानसिक क्रांति असते, ती केव्हांहि, पावसाळ्यांतील पुराच्या वेगानें, धावत येते. तिच्यामुळें मुक्त झालेल्या भावनात्मक शक्तींचे प्रवाह जीर्ण परंपरा धुऊन नेतात, आणि तरीहि ल्यूथर, महंमद किंवा गॅलिलियो—यांना हुकुमी वृत्तपत्रें किंवा नभोवाणी यांची मदत नव्हती. किती थोड्या काळांत मोठ्या राष्ट्रामध्यें मानसिक परिवर्तनें घडवून आणतां येतात, हें नाझी चळवळीनें दाखविलें आहे. त्या तत्त्वज्ञानानें अवघ्या १० वर्षांत ख्रिस्ती धर्म व मानव—धर्म यांचें उच्चाटन केलें व तेथें आपलें आसन मांडलें.

रशियामध्यें जुन्यापुराण्या धर्मसंस्थेचें पुनरुज्जीवन केलें, याचें कारण बाल्कन राष्ट्रांतील लोकांचीं मनें जिंकावयाचीं होतीं, असें रशियाचे कैवारी म्हणतील आणि तें पुष्कळ अंशांनीं खरेंहि असेल; पण त्यामुळें आमचाच मुद्दा सिद्ध होतो. रशियांतील समाजवादाजवळ पुरेसें नैतिक आकर्षण नसल्यामुळें, त्याला आपल्या अंतर्गत व बहिर्गत धोरणाला पाठिंबा मिळविण्यासाठीं, जुन्या धार्मिक प्रेरणांवर विसंबून रहावें लागलें.

स्लाव्ह देशांतील लोकांच्या परिषदा मॉस्को येथें १९४१ सालापासून सालोसाल भरत आल्या आहेत. त्यांना पोलंड, झेकोस्लाव्हाकिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, मॉन्टेनिग्रो इत्यादि देशांचे प्रतिनिधि हजर रहात. त्यांचीं भाषणें १९१० सालींसुद्धां प्रतिगामी ठरलीं असतीं. स्लाव्ह देशाचें नेतृत्व "कामगारांच्या पितृभूमीकडे" आलें. त्याचा प्रतिस्पर्धी आतां "भांडवलशाही समाजरचना" हा राहिला नाहीं, तर स्लाव्ह देशावर आक्रमण करणारा हाच त्यांचा वैरी झाला.

"सर्व जर्मनांचें एकीकरण" हे शब्द ऐकतांच रशियाच्या कैवाऱ्याच्या तळपायाची आग मस्तकास जाते. पण "सर्व स्लाव्हांचें एकीकरण" असें म्हटलें कीं, ते सहानुभूतीनें पाहूं लागतात. पण खरोखर पाहतां, स्लाव्ह–एकीकरणाची चळवळ ही वांशिकच आहे, आणि तिनें रशियाच्या साम्राज्य–विस्ताराच्या धोरणाला पुष्टीच दिली. तिचा मुख्य हेतु बाल्टिक, एजिअन व एड्रियाटिक समुद्रांना प्रवेशमार्ग मिळवून देण्याचा होता—अजून आहे. कॉमिन्टर्न संस्थेचें विसर्जन करून तिच्या जागीं धर्म–संस्था व स्लाव्ह–एकीकरण हे आले, याचा अर्थ रशियानें समाजवादी धोरण सोडून साम्राज्यवादी धोरण स्वीकारलें असा होतो.

या बदलाचे वेळीं नवें लष्करी धोरण व देशाभिमानाची नवी लाट उसळली. लष्करांतील शपथ बदलली. रशियन सैनिकाला अशी शपथ द्यावी लागे, "कामगारांच्या मुक्ततेचें, समाजवादाचें व सर्व मानवांच्या बंधुभावाचें महान् ध्येय गांठण्यासाठीं लढण्याची आणि माझे सर्व विचार व आचार त्यासाठीं खर्च

करण्याची मी प्रतिज्ञा करतों." पण १९३९ सालापासून "माझी पितृभूमि व माझें सरकार यांची सेवा जिवांत जीव असेपर्यंत करण्याची मी प्रतिज्ञा करतों." अशी शपथ रूढ झाली. ता. १५ मार्च १९४४ रोजीं "आंतरराष्ट्रीय गीत" हें राष्ट्रगीत म्हणून रद्द करण्यांत आलें आणि त्याचे जागीं असें नवें राष्ट्रगीत सुरू झालें—"स्वतंत्र लोकसत्ताक राज्यांचा संघ असलेला महान रशिया.....!"

या नव्या राष्ट्रगीतांत आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा उल्लेख अजिबात नाहीं.

जुन्या धर्तीचीं लष्करी विद्यालयें ता. २३ ऑगस्ट १९४३ रोजीं उघडण्यांत आलीं. त्याच वर्षीं ता. १० ऑक्टोबर रोजीं लष्करांतील "राजकीय अधिकारी" (पोलिटिकल कमिसार) ही जागा रद्द करण्यांत आली. १९४२।४३ च्या हिंवाळ्यांत "गार्ड रेजिमेंट" पुनः सुरू करण्यांत आली. "लेनिनचें पदक" व "लाल निशाणाचें पदक" यांच्या जागीं सुवारॉव्ह, कुटुझाव्ह, ॲलेक्झांडर, नेव्हस्की यांच्या नांवाचीं पदकें ता. २९ जुलै १९४२ पासून देण्यांत येऊं लागलीं. १९३५ सालापासून खास अधिकाऱ्यांचे खाने व क्लब, खेळ व सलामी पुनः सुरू झाले. झारच्या सैन्यांतील अधिकारी सन्मानाचीं जीं चिन्हें आपल्या पोशाकावर लावीत, तीं पुनः सुरू करण्याचा हुकूम ता. ६ जानेवारी १९४३ रोजीं निघाला. नवीं सन्मान-चिन्हें काढणें कांहीं कठीण नव्हतें, परंतु या हुकुमाचा हेतुच असा होता कीं, क्रांतीच्या वेडेपणाचे उरलेसुरले अवशेषहि कायमचे संपुष्टांत आले आहेत, हें जगजाहीर व्हावें.

या नव्या धोरणास अनुसरून शाळेंतील पुस्तकें, इतिहासाचे ग्रंथ, फार काय, ज्ञानकोशहि निराळे लिहिले गेले. "शुद्धीकरणाच्या" कालपर्यंत, रशियाचा मुख्य इतिहासकार पोक्रोव्हस्की हा होता. त्यानें मार्क्सवादी दृष्टिकोनांतून इतिहासाकडे पाहिलें होतें, आणि देशाभिमान व विभूति-पूजा यांच्या साऱ्या सोंगांवर हल्ला चढविला होता. १९३४ सालीं पोक्रोव्हस्कीची इतिश्री झाली. त्याचे जागीं शेस्टाकोव्ह आला. त्याचें गाजलेलें इतिहास-पुस्तक सर्व शाळांमध्यें १९३६ पासून चालू झालें. त्यावर असें ब्रीद-वाक्य लिहिलेलें होतें, "आम्ही ज्या आमच्या राष्ट्रावर प्रेम करतों, त्याचा आश्चर्यकारक इतिहास आम्हांला माहीत पाहिजे!" त्यानंतर आला टार्ले. त्याच्या कारकीर्दीत तर इतिहासाला नवेंच भडक स्वरूप आलें.

शुद्धीकरणापर्यंत, १७ व्या व १८ व्या शतकांतील प्रजेच्या बंडाच्या पुढाऱ्यांना कामगारांच्या क्रांतीचे अग्रदूत असें सरकारी रीत्या मानण्यांत येत होतें व तें रास्तहि होतें. पण त्या पुढाऱ्यांपैकीं बुलाव्हिन हा स्टॅलिनची आराध्यदेवता

"पीटर दि ग्रेट" याच्याविरुद्ध बंड करून उठला होता, आणि उरलच्या खाणी-कामगारांचा व शेत-मजुरांचा पुढारी पुगाचोव्ह याचा पराभव प्रिन्स सुवाराव्ह यानें केला होता. या प्रिन्सच्या स्मरणार्थ स्टॅलिननें "सुवाराव्ह पदक" निर्माण केलें होतें. कांहींहि झालें तरी ते पुढारी म्हणजे सरकारविरुद्ध उठलेले बंडखोर होते आणि म्हणून त्यांचें वर्तन चूक होतें. यामुळें रशियांतील अधिकृत इतिहासकारानें असें ठरविलें कीं, "ते पूर्वीचे क्रांतिकारक पुढारी खरे मुत्सद्दीच नव्हते. त्यांच्या चळवळी गुंडगिरीच्या होत्या." या सिद्धान्तानुसार स्पार्टाकस-पासून डांटन-लेनिनपर्यंतचा सर्व क्रांतिकारक इतिहास "गुंडगिरीनें भरलेला" मानून, लेखणीच्या एका फटकाऱ्यानें नाहींसा करतां येईल.

ता. ७ नोव्हेंबर १९४१ रोजीं, रशियन राज्यक्रांतीच्या २४ व्या वाढदिवशीं, स्टॅलिननें एक सुप्रसिद्ध भाषण केलें आणि त्यांत विभूतिपूजेचें नवें तत्त्व उद्घोषिलें. स्टॅलिन म्हणाला, "या महायुद्धांत तुम्हांला आपल्या थोर पूर्वजांच्या पराक्रमी प्रतिमांपासून स्फूर्ति मिळो. हे पूर्वज म्हणजे अलेक्झांडर नेव्हस्की, डिमिट्री डोनस्की, कुझमा मिनिन, डिमिट्री पोझ हार्स्की, अलेक्झांडर सुवाराव्ह, मायखेल कुटुझाव्ह. हे सहा पुरुष रशियाचीं आराध्यदैवतें होत; आणि त्यांना मार्क्स, एंगल्स व क्रांति-कार्यांतील जुने हुतात्मे यांच्या बरोबरीनें मान दिला पाहिजे." अशा प्रचाराच्या नौबती वाजूं लागल्या.

रशियाच्या या सहा राष्ट्रसंतांच्या प्रभावळीमध्यें चार राजपुत्र, एक संत आणि एकजण सामाजिक प्रगतीचा कैवारी नसलेला असे आहेत. कुझमा मिनिनविषयीं १९३० सालच्या रशियन ज्ञानकोशांत असा शेरा आहे, "हा मातृभूमीसाठीं वर्गविरहित भावनेनें लढणारा योद्धा होता आणि म्हणून तो राष्ट्रवीर मानला पाहिजे असें मध्यमवर्गीय इतिहासकारांचें म्हणणें आहे." प्रिन्स पोझहार्स्की यानें १६११ सालीं आपल्या सैनिकांना पोलिश लोकांशीं लढण्यासाठीं नेलें. प्रिन्स सुवाराव्ह यानें फ्रेंच राज्यक्रांतीशीं लढा दिला, आणि पुगाचोव्हनें कामगार-क्रांतीशीं सामना दिला. प्रिन्स कुटुझाव्ह यानें शेतकऱ्यांचें बंड मोडून काढलें, नेपोलियनला धूळ चारली व पोलिश लोकांचा पराभव केला. प्रिन्स डॉनस्कॉय यानें १४ व्या शतकांत मांगोल लोकांशीं युद्ध केलें. तो सनातन धर्मसंस्थेचा एक संत आहे.

याच्या पाठोपाठ साहित्य व कला चालू लागल्या. रशियांतील चित्रकार भूत-काळांतील युद्धाचीं व वर्तमानकाळांतील रशियन क्रांतीचीं चित्रें रंगवूं लागले. तेथील कवि-गण "मातृभूमीच्या पवित्र चरण-धूलीचें" पुनरपि स्तवन करूं

लागले आणि तेथील कादंबरीकार जुन्या राष्ट्रवीरांचीं चरित्रें चितारूं लागले. १९४२ सालीं ज्या चार कादंबऱ्यांना "स्टॅलिन-पारितोषिक" मिळालें, त्यांमध्यें अशाच वीर-पुरुषांचें गुणगान केलेलें आहे. त्याच वर्षी ज्या भाव-गीतासाठीं "स्टॅलिन-पारितोषिक" देण्यांत आलें, त्याची पहिली ओळ अशी आहे,—

"मी एक रशियन मनुष्य आहें—मॉस्को नगरीचा पुत्र आहें—रशियाच्या वैभवाचा वारस आहें."

त्या वर्षी पारितोषिक मिळालेल्या "फ्रंट" या नाटकांत असें दाखविलेलें आहे कीं, यादवी युद्धांतील एक जुना बोल्शेव्हिक पुढारी महामूर्ख आहे; आणि म्हणून त्याला त्याच्या जागेवरून हांकलण्यांत येत आहे. त्याच वर्षी अलेक्सी टॉलस्टॉय यानें एक नाटक लिहिलें. त्याचा चित्रपटहि झाला. त्यांत इव्हानचे अत्याचार रंगविलेले आहेत. पण "ते सारे अत्याचार काल्पनिक आहेत आणि क्रूर इव्हान हा खरोखर संयुक्त व शक्तिमान रशियाचा आणि त्याच्या सामर्थ्य-शाली सैन्याचा संस्थापक होता; त्यानें जें जें केलें, तें तें ऐतिहासिक दृष्ट्या जरूर होतें." असें वर्णन कोलार्झ यानें आपल्या पुस्तकांत केलें आहे.

यावर टीका काय करावी? रशियाच्या मानसिक विकासाचें हें गमकच होय.

♤ ♤ ♤

जर्मनीनें जवळजवळ सर्व युरोप खंड पादाक्रांत केलें, हें रशियानें उदार व तटस्थ वृत्तीनें पाहिलें. वैचारिक युद्धाच्या कल्पनेला रशियन सरकारनें नाक मुरडलें. जर्मनीनें जेव्हां फ्रान्सवर हल्ला चढविला आणि दोस्त राष्ट्रें जेव्हां पराभवाच्या कड्यावर उभीं होतीं, तेव्हां रशियानें "दुसरी आघाडी" उघडली नाहीं. जेव्हां जर्मनीनें खुद्द रशियावरच प्रत्यक्ष आक्रमण केलें, तेव्हांच रशिया राष्ट्रीय घोषणांचा पुकारा करीत, आपल्या राष्ट्राच्या संरक्षणार्थ, युद्धासाठीं उभा ठाकला. त्याचें हें युद्ध मार्क्सऐवजीं सुवारावहच्या नांवानें चाललें, त्यांत आंतरराष्ट्रीय गीताऐवजीं राष्ट्रगीत गाइलें जाऊं लागलें, त्यांतील सैनिक झारचीं सन्मानचिन्हें मिरवूं लागले, आणि धर्म-संस्थेंतील दाढीवाल्या उपाध्यायांच्या आशीर्वादानें सैनिक रणांगणाकडे कूच करूं लागले—या सर्वांचा अर्थ एकच—आणि तो म्हणजे समाजवादी प्रेरणांचा समूळ नाश.

१९१७ च्या क्रांतीनें कार्याच्या ज्या नव्या प्रेरणा रशियन जनतेच्या हृदयांत व मस्तकांत रुजविल्या होत्या, त्या सर्व स्टॅलिनच्या राजवटीनें निर्माण केलेल्या

दांभिक वातावरणांत करपून गेल्या. त्या प्रेरणा नूतन-कोमल अशा मानसिक शक्ति होत्या. त्यांचें संगोपन काळजीपूर्वक करावयास हवें होतें. प्रेमाच्या व बंधुभावाच्या वातावरणांतच त्या वाढीस लागल्या असत्या व मूळ धरूं शकल्या असत्या आणि त्यांनीं शेवटीं मानवाचा सर्व पिंडच बदलून टाकला असता. परंतु स्टॅलिनची राजवट ही १९ व्या शतकांतील जडवादांतून निघालेली होती. तिला मानसिक निर्णायक शक्तींचें महत्त्व कधींच कळलें नाहीं. "साध्यावरून साधनांची योग्यता ठरते." या सिद्धांतावर ती राजवट उभारलेली होती. ती मुक्या शेतकऱ्यांच्या निष्क्रियतेला लवकरच कंटाळली. तिनें माणसांच्या जीवंत समाजाला प्रयोग-शाळेंतील कच्च्या मालासारखें मानलें व त्यावर छिनी, हातोडे, आम्लें व प्रचाराचे प्रखर सूर्यकिरण यांचे आघात केले. ते यशस्वी झाले असें वर वर पाहणाऱ्याला वाटेल. जनतेला जें जें सांगितलें गेलें, त्यावर तिनें विश्वास ठेवला आणि आपल्या पुढाऱ्यांचा जयजयकार केला असें दिसलें. जर्मनी किंवा जपान यां-मधील शूर-वीरांप्रमाणें ते राबले, झुंजले व मेले, असें भासलें. परंतु त्यांच्या अंतरंगांतील नव्या प्रेरणांचे झरे आटून गेले होते; आणि म्हणून त्यांचे जागीं, अडगळीच्या खोलींत धुळींत पडलेल्या जुन्या प्रेरणा आणून बसवाव्या लागल्या.

नव्या नैतिक वातावरणांत नवा मानवसमाज निर्माण करण्याचें ध्येय रशियन राज्यक्रांतिला साध्य करून घेतां आलें नाहीं. या अपयशाचें अंतिम कारण म्हणजे त्याचें तत्त्वज्ञान १९ व्या शतकांतील भाकड भौतिकवादाचें होतें, हें होय. त्या तत्त्वज्ञानानें, मानवाला आध्यात्मिक पुष्टीची गरज असते हें ओळखलें नाहीं आणि म्हणून धर्माच्या जुन्या अफूच्या गोळ्या हातीं धरणें समाजवादी रशियाला भाग पडलें.

भ्रम-निरास

"प्रथम जर्मन सैन्याचा व नंतर लाल सैन्याचा—असे लागोपाठ दोन जोराचे तडाखे मिळतांच, पोलंडचा चक्काचूर झाला. व्हर्सायच्या तहाची अवलक्षणी अवलाद असलेला असा हा पोलंड देश बिगरपोलिश लोकांना दडपून जीवंत राहिला होता. आतां त्याला पुनः जीवंत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं, हें प्रत्येक जण जाणतो."

—मोलोटोव्ह (ता. ३१ ऑक्टोबर १९३९)

"पोलंड समर्थ व स्वतंत्र असावा अशी माझी नेहमीं इच्छा होती."—

—स्टॅलिन (१९४४)

१ रशियाचें सत्तेचें राजकारण

१

आपल्या आतांपर्यंतच्या विवेचनाचा निष्कर्ष असा—रशियांतील साम्यवादी सरकार म्हणजे सरकारी भांडवलशाहीचें, हुकूमशाही स्वरूपाचें, एकतंत्री राज्य. आर्थिक क्षेत्रांत तें प्रगतिकारक आहे, पण दुसऱ्या प्रत्येक क्षेत्रांत प्रतिगामी आहे. राजकारण, संस्कृति, शासक व शासित यांचे संबंध इत्यादि बाबतींत, बहुतेक सर्व भांडवलशाही लोकसत्ताकांच्या मानानें तें प्रतिगामी आहे. त्याचें धोरण राज्य-विस्ताराचें आहे. त्याचीं साधनें नवीं असलीं, तरी साम्राज्यशाही रशियाचे जुने हेतुच त्याच्या मनांत खेळत आहेत.

जगांतील इतर राष्ट्रांत जे कामगार-वर्ग व प्रगतिशील शक्ति आहेत, त्यांना दुसऱ्या कोणत्याहि बलाढ्य राष्ट्रापेक्षां रशियाचा अधिक उपयोग होत नाहीं. रशिया हा प्रतिगामी प्रवृत्तिवर दरारा बसवूं शकत नाहीं आणि पुरोगामी चळवळींचें आशास्थान बनूं शकत नाहीं. अन्य राष्ट्रांतील उजव्या-डाव्या पक्षांशीं रशिया जें धोरण ठेवतो, तें केवळ आपल्या स्वतःच्या तात्पुरत्या हितावरून ठरवितो. पूर्वीप्रमाणें यापुढेंहि रशिया, चालू घडीच्या गरजेप्रमाणें, आपले दोस्त निवडील किंवा टाकून देईल—त्यांचें राजकीय तत्त्वज्ञान काय आहे याची तो अशा वेळीं मुळींच पर्वा करीत नाहीं.

तथापि, रशिया व इतर राष्ट्रें यांच्या सत्तेच्या राजकारणांत एक फरक आहे.

सत्तेचें राजकारण म्हटलें कीं, तें संधिसाधु व तत्त्वशून्य असावयाचेंच. आपत्तीच्या वेळीं, यश मिळविण्यासाठीं, नीतितत्त्वांचा बळी नेहमींच दिला जातो. पण ही तत्त्वशून्यता व नीतिशून्यता यांच्यामध्यें प्रमाणाचा कांहीं फरक असतो.

लोकशाही राष्ट्रांत परराष्ट्रीय धोरणावर लोकमताचा प्रभाव फारच थोडा पडतो. परंतु कांहीं कांहीं वेळां जनतेच्या मतामुळें अनर्थ टळूं शकतात. उदाहरणार्थ, लावल-होअर करार. लोकमताचा असा प्रभाव क्वचितच पडतो हें खरें. परंतु राज्यकर्त्यांवर त्याचें सुप्त दडपण सदैव असतें. कांहीं प्रमाणांत कां होईना, त्या राज्यकर्त्यांना मतदार-संघाला किंमत द्यावी लागते, बरेचसें स्वातंत्र्य उपभोगणाऱ्याला वृत्तपत्रांना महत्त्व द्यावें लागतें; आणि पार्लमेंटमधील विरोधी पक्षाला तर अधिकच मान द्यावा लागतो. लोकमताच्या अभिव्यक्तीचीं हीं साधनें कितीहि अंधुक, भित्रीं व बुजरीं असलीं, तरी त्यांना डावलणें राज्यकर्त्यांना शक्य नसतें. या लोकशाहीच्या मुखांची प्रशस्ति पुष्कळ वेळां फार केली जाते हें खरें, पण डावे पक्ष त्याची योग्यता नेहमीं फारच कमी लेखतात. वस्तुस्थिति अशी आहे कीं, या साधनांनीं राज्यकारभार शुद्ध व समतोल राखण्यास मदत होते, आणि त्यामुळें इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रांचें राजकारण, थोडेंफार वळण घेऊन, खुरडत-रखडत चालतें, पण रशियाप्रमाणें वाकड्या-तिकड्या मार्गानें वेफामपणें कधींहि धावत-वाहात जात नाहीं.

लोकशाही राष्ट्रें कांहीं काळ हुकूमशहांचीं आर्जवें करतील; पण चोवीस तासांत एकदम आघाडी बदलणें किंवा शाई वाळण्यापूर्वीच तहाचे कागद फाडून टाकणें हें लोकशाहीला अशक्य आहे. रशिया व जर्मनी यांचे राज्यकर्ते अशा नियंत्रणांनीं कधींच जखडलेले नसतात. ते एका पोकळींत बसून राज्यकारभार करतात, आणि म्हणून ते आपलीं तोंडें एकदम बदलूं शकतात आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील आपल्या जोडीदारांना चकित करून सोडतात. यापुढील राजनैतिक झगड्यांत रशियाला हा मोठाच फायदा मिळणार आहे—त्याचें पुढील धोरण काय राहणार याचा कोणाला कांहींच अंदाज बांधतां येणार नाहीं. जहाजाच्या तळाशीं जसें जड वजन भरलेलें असतें, व त्यामुळें त्या जहाजाचा तोल राहतो, त्याप्रमाणें, कोणत्याहि राष्ट्राच्या राजकारणाला नैतिक मूल्यांचें वजन आधाराला पाहिजे असतें. तें नसलेलें राष्ट्र आपली नौका कशीहि वल्हवूं शकतें, पण परंपराबद्ध राष्ट्रांची गोष्ट निराळी. पश्चिम युरोपखंडांतील राष्ट्रांचे मुत्सद्दी हेहि केव्हां केव्हां तह मोडतात—पण तेव्हां ते अगदीं अगतिक झालेले असतात, आणि तसें करतांना त्यांचें मन त्यांना खात असतें. उलट, रशियन राज्यकर्ते आपल्या

भांडवलशाही जोडीदाराला हसत हसत चकवितात, आणि त्यावेळीं त्यांचें मन अगदीं शांत असतें. कारण ते या "भांडवलशाही नीतिशास्त्राचा" धिक्कार करण्यास शिकलेले असतात; शिवाय, आपण एका ध्येयासाठीं हें सारें करीत आहोंत, अशी सुप्त भावना त्यांचे चित्तांत असते—मात्र तें ध्येय नक्की काय आहे, हें ते पार विसरलेले असतात.

१९ व्या शतकाच्या परंपरेंत अजून वावरत असणाऱ्या पाश्चात्य मुत्सद्द्यांना राजकारणाचा हा धक्के देण्याचा नवा खेळ समजून घेण्यास कांहीं काळ लागेल. त्यांना या खेळाची फक्त चुणूक आतांपर्यंत दिसलेली आहे. त्याचें पूर्ण ज्ञान त्यांना होईपर्यंत रशिया सारे फायदे लाटील. म्युनिचनंतरच्या काळांत नाझी जर्मनीनें असेच फायदे लाटले.

२

रशिया व इतर सत्ता-गट यांचेमध्यें दुसरा एक फरक आहे. बोल्शेव्हिक पक्ष व इतर डावे पक्ष यांच्यामध्यें पूर्वीपासून जी स्पर्धा आहे, तिच्यांतून हा दुसरा फरक निघालेला आहे. तो एका तात्त्विक वादांतून जन्मास आला आहे. तो वाद केव्हांच विझून गेला. पण वाद संपला, तरी सूड शिल्लक राहतो, या नेहमींच्या अनुभवाप्रमाणेंच येथें घडलें. इंग्लंड, फ्रान्स, इटली, पोलंड, ऑस्ट्रिया व स्पेन या देशांतील मजूर पक्षाचे व समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते व पुढारी हे दुसऱ्या "इंटरनॅशनलचे" घटक असले, तरी रशियाच्या दृष्टीनें ते "क्रांति-विरोधी अल्पसंख्य" ठरतात, हें पुष्कळ रशियन भगतांना माहीत नाहीं. रशियाचा हा द्वेष किती भयंकर व विषारी आहे, हें वाढत्या फासिस्ट संकटाशीं तोंड देण्याचे कामीं, युरोपांतील समाजवादी कार्यकर्त्यांशीं सहकार्य करण्याचें मॉस्कोनें सतत नाकारलें, यावरून उघड झालें आहे. हिटलरच्या "लष्करी तुरुंगांत" कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट कार्यकर्त्यांना शेजारींशेजारींच ठार करण्यांत आलें आणि तरी कम्युनिस्ट हे सोशॅलिस्टांना "सामाजिक फासिस्ट" म्हणून शिव्या देतच होते.

१९३४ सालीं रशियानें फ्रान्स व झेकोस्लाव्हाकिया या देशांशीं लष्करी करार केले आणि स्वतः तो राष्ट्रसंघांत सामील झाला. त्यावेळच्या परराष्ट्र-धोरणाला अवश्य होतें म्हणून त्यानें "जनता-आघाडी" उघडली अशी एकजूट रशियानें केली, तरी डाव्या पक्षाविषयीं त्याचें खरें हृदयपरिवर्तन मात्र झालें नाहीं. "जनता-आघाडीच्या" समित्या आणि फॅसिस्ट-विरोधी शांततावादी

मोहिमा यांच्या पडद्यामागें रशियाचीं कारस्थानें व कट जोरानें चालू होते. त्यांनीं कळस गांठला स्पेनमधील यादवी युद्धाचे वेळीं. पुढें युद्ध चालू असतां, रशियानें सर्व डाव्या गटांचा निःपात करण्यासाठीं शस्त्र उचललें. कम्युनिस्टांचें धोरण अत्यंत चंचल असतें. त्यांतील स्थिर भाग एकच—आणि तो म्हणजे विरोधकांशीं असहिष्णुता.

गेल्या कांहीं वर्षांत कम्युनिस्ट पक्षांनीं फ्रान्सियांतील उच्च वर्गांशीं सहकार्य केलें, ऑस्ट्रियांतील राज्यपक्षाशीं सख्य जोडलें, इटालींतील कॅथॉलिकांशीं दोस्ती केली, त्यांच्या पोप गुरूशीं वाटाघाटी करून सनातनी मताला मान दिला, आणि अमेरिकेंतील "रिपब्लिकन" व "डेमोक्रॅट" या पक्षांना आलटून पालटून पाठिंबा देऊन तेथील भांडवलशाहीला उचलून धरलें. अवघ्या दोन वर्षांत त्यांनीं ब्रिटिश मजूर पक्षाची वारंवार नालस्ती केली. कधीं त्या पक्षानें महायुद्धाला पाठिंबा दिला म्हणून—तर कधीं पुरेसा पाठिंबा दिला नाहीं म्हणून; कधीं जर्मन-विरोधी धोरण ठेवलें म्हणून, तर कधीं जर्मनीला अनुकूल धोरण ठेवलें म्हणून. त्या कम्युनिस्ट पक्षांनीं इंग्लंडांतील मजूर-पक्षावर शिव्यांची जी लाखोली वाहिली, ती मासळींचा सौदा करणाऱ्या बायांनाहि लाजविणारी होती, किंवा रशियांतील सरकारी वकिलालाहि लाज आणणारी होती. गंमत ही कीं, त्याच मजूर पक्षाशीं नातें जोडण्यासाठीं कम्युनिस्ट पक्षानें पुढें विनंति केली. आपलेच शब्द त्यांनीं गिळले—थुंकले—आणि पुनः गिळले. कोणताहि बदल स्वीकारण्यास कम्युनिस्ट पक्ष तयार असतो—फक्त एक बदल त्याला करतां येत नाहीं, कामगारवर्गाच्या अन्य पक्षांशीं प्रामाणिकपणें सहकार्य करण्याइतका बदल त्याच्यांत होऊं शकत नाहीं.

रशियन पक्षाच्या परंपरेंतच ही तुटक वृत्ति अंतर्भूत आहे. बोल्शेव्हिक (बहुसंख्य पक्ष) व मेन्शेव्हिक (अल्पसंख्य पक्ष) या दोहोंमध्यें १९०३ सालच्या लंडन परिषदेपासून जी फूट पडली आहे, ती अजून नाहींशी झालेली नाहीं. बोल्शेव्हिक हे क्रांतिकारक व केन्द्र-सत्तावादी होते, तर मेन्शेव्हिक हे सुधारणावादी व लोकशाही-भक्त होते. यानंतरच्या काळांत लेनिनच्या अनुयायांनीं 'मेन्शेव्हिक' हा शब्द सर्व सुधारणावादी समाजवादी पक्षांना लावण्यास सुरुवात केली. १९१९ सालीं "कम्युनिस्ट इंटरनॅशनल" स्थापन झाल्यावर "मेन्शेव्हिक म्हणजे समाजवादी" असें समीकरण ठरून गेलें.

गेल्या दहा वर्षांत समाजवादी पक्षानें पुष्कळ वेळां क्रांतिकारक धोरण स्वीकारलें; पण तेथील कम्युनिस्ट पक्षानें समेटाचें धोरण पत्करलें. दोन्ही प्रतिस्पर्ध्यांच्या भूमिका बदलल्या गेल्या. तात्त्विक मतभेद तर आतां राहिलेच नव्हते. पण

"क्रांतिविरोधी मेन्शेव्हिकांचा" विवेकशून्य द्वेष मात्र शिल्लक राहिला होता. रानटी टोळ्या, कलहाचें कारण विसरलें गेलें तरी, पिढ्यान्पिढ्या द्वंद्व युद्ध खेळत राहतात, त्यांतलाच हा प्रकार. रानटी गट, धार्मिक पंथ आणि राष्ट्रें यांच्याप्रमाणेंच विशिष्ट संप्रदायाच्या चळवळीहि द्वेषाची परंपरा अकारण पुढें चालवितात.

रशियाच्या राजकीय धोरणाचें दुसरें एक सयुक्तिक कारण आहे. भांडवलशाही राष्ट्रांशीं सख्य जोडणें, हें मजुरांच्या स्वतंत्र चळवळीशीं समेट करण्यापेक्षां सोपें आहे, अशी जाणीव रशियन नेत्यांना असते. भांडवलशाही राष्ट्रांशीं सख्य करतांना निर्विकार मनानें, परस्परांचें हिताहित तोलून-मापून, पाहतां येतें. परंतु कामगार वर्गाच्या पुढाऱ्यांशीं बोलतांना नैतिक व तात्त्विक प्रश्न उपस्थित होतात. मग रशियाला आपलें कारस्थानी धोरण चालवितां येत नाहीं, कारण त्यावर नैतिक दडपण येऊन पडतें.

इंग्लंडमधील कम्युनिस्ट पक्ष आणि मजूर पक्ष यांचें सूत जमलें असतें, तरी १९३९ च्या सप्टेंबरमध्यें तें खासच तुटलें असतें. कारण मजूर पक्षानें कांहीं स्टॅलिन-हिटलरच्या कराराला मान्यता दिली नसती. किंवा तें सख्य टिकलें असतें, तरी १९४१ सालीं युद्धपोषक धोरणाला मजूर पक्षानें नकारच दिला असता. "कम्युनिस्ट इंटरनॅशनल" ही संस्था रशियन सरकारला आंधळेपणानें अनुसरत असतांनाहि क्रेम्लिनच्या धोरणाला तिचें लोढणेंच होऊन बसलें. मग डावे पक्ष व डाव्या चळवळी रशियाला किती अवजड वाटत असतील! परक्यांशीं व्यवहार करणें सोपें, पण घरांतील माणसांशीं वागणें कठीण, हें रशियन पुढाऱ्यांनीं पुरेपूर ओळखलें होतें. ध्येयवादी व्यक्ति व संस्था यांच्याशीं कारस्थानें करतां येत नाहींत, म्हणून रशियांतील कम्युनिस्ट पक्षाच्या जुन्या सभासदांचें शिरकाण करण्यांत आलें व "पक्षातीत तज्ज्ञांना" जवळ करण्यांत आलें. यामुळेंच आंतरराष्ट्रीय राजकारणांत मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाटी करण्यापेक्षां इंग्लंडमधील बीव्हरब्रुक व अमेरिकेंतील विल्की यांच्याशीं संबंध ठेवणें रशियाला अधिक सुखाचें वाटलें. रशियन सरकारचें बहुमानाचें पदक रिबेनट्रॉपनंतर बीव्हरब्रुक याच परदेशी मुत्सद्याला प्रथम मिळालें. याच धोरणामुळें रशियानें "आंतरराष्ट्रीय लेबर ऑफिस"मध्यें भाग घेण्यास सहेतुक नकार दिला. हेतु असा कीं, रशियांतील मजूर-विषयक कायदे व मजुरांची स्थिति ही जगाच्या नजरेस पडूं नये व त्याच्या चिकित्सेस पात्र होऊं नये.

रशियन राज्यकर्ते, आपणच समाजवादाचे ठेकेदार आहों, अशी अजून

अधिकृतपणें बतावणी करीत असतात. त्यामुळें रशियाशीं संबंध न ठेवतां जगांत ज्या समाजवादी चळवळी स्वतंत्रपणें चालतात, त्यांचें काय करावें हा फार मोठा प्रश्न त्यांचेपुढें उभा असतो. हा प्रश्न दोन मार्गांनीं सोडविला जाईल. एक म्हणजे अशा स्वतंत्र चळवळींनीं आपलें स्वातंत्र्य गमावून रशियाच्या सत्तामिलाषी राजकारणाच्या बदलत्या धोरणाप्रमाणें वागण्यास तयार होणें. नाहीं तर, दुसरा मार्ग म्हणजे रशियन सरकारनें आपण समाजवादी असल्याची बतावणी सोडून देणें व त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणांतील आपलें सामर्थ्य व शस्त्र टाकून देणें.

यांपैकीं एकहि मार्ग व्यवहारी नसल्यानें रशियन सरकारला एकच मार्ग मोकळा राहतो. आणि तो म्हणजे स्वतंत्र समाजवादी चळवळींची व त्यांच्या नेत्यांची निंदा-नालस्ती व छळणूक करणें हाच. खुद्द रशियांत सामाजिक क्रांतिकारक, अराजकवादी, ट्रॉट्स्कीवादी, जुने बोल्शेव्हिक, मेन्शेव्हिक इत्यादि चळवळे निघाले. त्यांच्याशीं तेथील सरकारनें जें धोरण ठेवलें होतें, त्याचाच हा विस्तार होय. "ट्रॉट्स्कीवादी" व "मेन्शेव्हिक" हे शब्द रशियांत इतक्या लवचिकपणें ताणले जातात कीं, त्यांत सरकारचें अंधदास्य न पत्करणाऱ्या कोणाहि माणसाची गटडी वळतां यावी. जाणून-बुजून धूळफेक करून प्रतिस्पर्ध्यांचा कांटा काढण्याच वेडच रशियन सरकारला लागलें आहे.

"शुद्धीकरणें" केल्यापासून रशियन राज्यकर्त्यांना असें वाटूं लागलें आहे कीं, आपल्या आंतरराष्ट्रीय आकाक्षांना खरें भय जर कोणाकडून असेल तर तें, अन्य देशांतील राजकीय दृष्ट्या जागृत असलेल्या डाव्या पक्षांकडून—निंदक व प्रतिगामी लोकांकडून—नव्हे. निंदकाशीं कसें वागावें याचा मार्ग सांपडतो, पण ध्येयवादी लोक निग्रही असतात, आणि त्यामुळें ते सतत उपद्रवाचें व भयाचें कारण होऊन बसतात. हा नियम जसा व्यक्तींना, तसाच चळवळींनाहि लागू आहे. यामुळें विस्तार पावूं इच्छिणाऱ्या रशियन सरकारची पहिली चिंता, पोलंड व बाल्टिक संस्थानें यांतील डाव्या पक्षाचें विसर्जन कसें करावें, हीच होती.

३

रशियानें पोलंडवर स्वारी केल्यापासून, जर्मनीनें पोलंडवर स्वारी करीपर्यंतच्या दोन वर्षांच्या काळांत, पूर्व युरोपला समाजवादाची दीक्षा देण्यासाठीं, रशियन सरकारचा हुकमी उपाय म्हणजे समुदायच्या समुदाय हद्दपार करणें हा. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सामुदायिक हद्दपारी पूर्वी झाल्याचें इतिहासाला माहीत नाहीं. १९४० सालीं फेब्रुवारीमध्यें, एप्रिलमध्यें, जूनमध्यें व १९४१ च्या जूनमध्यें—

अशा चार लाटांनीं ही सामुदायिक हद्दपारी रशियानें सिद्धीस नेली. पूर्व पोलंडमधून अशा हद्दपार केलेल्या लोकांची संख्या सुमारें दहा लाख भरेल आणि हद्दपारीसाठीं नांवें नोंदलेल्या लोकांची संख्या तर याहून अधिक भरेल. पण मध्यें रशिया-जर्मनीचें युद्ध आलें. त्यामुळें हद्दपारीचा हा कार्यक्रम खंडित झाला-निदान लांबणीवर पडला.

हद्दपार झालेल्या लोकांचे तीन वर्ग पडतात. ते असे—(अ) ३ ते ८ वर्षांची शिक्षा झालेले लोक वेठबिगारीच्या कामावर उत्तर ध्रुवाकडे धाडले गेले. त्यांना झाडें तोडणें, खाणी खणणें—अशा धोक्याच्या उद्योगधंद्यांत राबविलें जातें. (ब) पडित जमिनीवर कुटुंबांच्या वसाहती करून त्यांच्याकडून जंगल तोडणें, लांकूड कापणें, रस्तें बांधणें—इत्यादि कामें करून घेतलीं जातात. (क) कझाकस्तानसारख्या मध्य—आशियांतील प्रदेशात कुटुंबाची वसाहत करून त्यांच्याकडून, तेथील रहिवाशांच्या हाताखालीं, कामें करवून घेणें. त्यांना बाहेर जाण्यास बंदी असते, बाकी सारें नाममात्र तरी स्वातंत्र्य.

लंडन येथें ता. ३० जुलै १९४१ रोजीं पोलंड व रशिया यांमध्यें जो करार झाला, त्यांत असें ठरलें कीं, हद्दपार झालेल्या सर्व प्रकारच्या पोलिश लोकांना बंधमुक्त करावें. त्याप्रमाणें पोलिश सरकारनें, रेडक्रास वगैरेंच्या मदतीनें आपले सुमारें पांच लाख नागरिक शोधून परत आणले. हद्दपार झालेल्या निम्म्या लोकांचा पत्ता लागला. बाकीच्या दुर्दैवी जीवांपैकीं शें. २० लोक उत्तर ध्रुवा-कडील छावण्यांत किंवा मायदेशीं येतांना वाटेंत मृत्यु पावले. १९४२ सालीं रशिया व पोलंड याचे राजनैतिक संबंध तुटले, तेव्हां रशियामध्यें राहिलेल्या पोलिश लोकांना रशियन अधिकाऱ्यांनीं "रशियन नागरिक" म्हणूनच वागविण्यास सुरुवात केली.

बाल्टिक संस्थानांतून सामुदायिक हद्दपारी अशाच प्रचंड प्रमाणावर झाली. त्यांत अराजकवादी, मेन्शेव्हिक, ट्रॉट्स्कीवादी, लोकशाहीवादी, पोलीस अधिकारी, विदेशी कंपन्यांचे प्रतिनिधि, परदेशांत प्रवास करून आलेले, विदेशी राजकीय संस्थांशीं संबंध ठेवणारे, रेडक्रॉस संस्थेचे पोलंडमधील अधिकारी, पाद्री, व्यापारी, जमीनदार, कारखानदार, हॉटेलवाले, खाणावळवाले वगैरे वगैरे चौदा तऱ्हेचे लोक होते. याचा अर्थ असा कीं, पुढील तीन प्रकारचे लोक रशियाला हुसकून लावावयाचे होते.

(अ) राजकीय दृष्ट्या जागृत व क्रियाशील असणारे सर्व लोक—त्यांतहि डाव्या मताचे प्रथम–पण कम्युनिस्ट हे मात्र अपवाद.

(ब) जुन्या राज्यकारभारांतील वरच्या थराचे लोक.

(क) जागतिक दृष्टि ठेवून वागणारे लोक.

पूर्व पोलंडमध्यें हें राष्ट्र-विच्छेदन करतांना शिक्षक, वकील, संपादक, इत्यादि बुद्धिजीवी वर्गांचीहि गठडी वळण्यांत आली—मग त्यांचीं राजकीय मतें कांहींहि असोत. विशेष म्हणजे १९४१ च्या जूनमध्यें, हद्दपारीची जी चौथी लाट उसळली, तींत प्रत्यक्ष कम्युनिस्ट पक्षाचे सभासदहि पुष्कळ होते. त्यांनीं क्रांतिकारक स्थानिक समित्या स्थापना केल्या होत्या, आणि कामगारांचीं लढाऊ दलें निर्माण केलीं होतीं. रशियाचे अधिकारी पोलंडमध्यें येण्यापूर्वीच्या अंदाधुंदीच्या काळांत याच कम्युनिस्ट लोकांनीं तेथें आपला अंमल चालविला होता.

हद्दपारीचा नियमच असा असे कीं, ज्याला हद्दपार करावयाचें, त्याचें सर्व कुटुंबच हद्दपार करावयाचें—यांतील लहान मुलांना "अर्भकालयांत" पाठविलें जाई. हें सामुदायिक हद्दपारीचें कार्य करतांना मुद्दाम निष्ठुरपणा व क्रूरपणा केला जात नसे. पण तें अशा भयंकर परिस्थितींत पार पाडलें जाई कीं, त्यामुळें बरेच लोक वाटेंतच मरण पावत. जनावरांना नेण्याच्या बंदिस्त मोटारींतून, तीन आठवड्यांपर्यंत हद्दपार लोकांना प्रवास करावा लागे. ज्यांना हद्दपार करावयाचें त्यांना रशियन अधिकारी, आपल्या हातांतील यादीप्रमाणें, रात्रीच्या वेळीं पाचारण करीत; आणि सर्व सामानाची बांधाबांध करण्यास फक्त एका तासाची मुदत देत. प्रत्येक कुटुंबाला जास्तींत जास्त १०० शेर वजनाच्या वस्तु नेतां येत असत. त्यांना घेऊन जाणाऱ्या आगगाड्या पहांटेपूर्वीच निघत. त्यांचीं सारीं दारें व खिडक्या बंद केलेलीं असत. फक्त नैसर्गिक विधिसाठीं व अन्न घेण्यासाठीं कांहीं भोकें असत. उत्तर ध्रुव किंवा मध्य आशिया या मुक्कामाला गाड्या पोहोंचेपर्यंत त्यांचीं खिडक्यादारें उघडलीं जात नसत.

रशियाच्या या धोरणाचा हेतु असा कीं, आपण जे नवीन प्रदेश मिळविले, तेथें "चळवळ्यांनीं" शिरकाव करूं नये. आणि हे चळवळ्ये कोण? तर रशियाच्या मतें, डाव्या-उजव्या गटांतील राजकीय दृष्ट्या जागृत असणारे सभासद, बौद्धिक, आर्थिक व सामाजिक जीवनाचे संघटक व पुढारी आणि स्वतंत्र विचार व आचार करणाऱ्या लोकांचे गट. १९४४ च्या उन्हाळ्यांत वॉर्सा येथील बंड मोडून काढण्यासाठीं जर्मन लोकांनीं भयंकर दडपशाही केली, तेव्हां रशियानें दुष्टपणें तटस्थ धोरण स्वीकारलें, त्याचाहि हेतु हाच. आपले त्रासदायक दोस्त दूर करण्याची ही रशियाची पद्धत फार जुनी आहे. पहिल्या महायुद्धाचे वेळीं,

रशियांतील झार सरकारनें आर्मेनियांतील प्रजेला आक्रमक तुर्की लोकांविरुद्ध बंड करून उठण्यास प्रोत्साहन दिलें. पण शेवटीं, तुर्की लोकांनीं या बंडखोर आर्मेनियनांची कत्तल चालविली असतांना, रशियानें त्यांना कांहींहि मदत केली नाहीं. ही कत्तल रशियन सेनेच्या डोळ्यादेखत झाली हें विशेष. त्या कत्तलींत जे आर्मेनियन लोक वांचले, त्यांना आपण जिंकलेल्या प्रदेशांत जाण्यास बंदी मात्र रशियन सरकारनें केली.

अशा रीतीनें ज्या देशाचा कणा व मेंदू मोडून-तोडून टाकला जातो त्या देशांतील जनता म्हणजे एक लोळागोळा झालेला, हवा तो आकार घेणारा समाज बनतो. मग तो सहजच रशियांतील समाजवादी हुकूमशाहीच्या अनुरोधानें वागूं लागतो.

आपण येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, रशियामध्यें हे जे लाखों नवीन नागरिक आले, त्यांना पार्लमेंटशिवाय, लोकमताच्या टीकेशिवाय, जीवन कंठणें शिकावयाचें होतें. संचार-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, वाचन-स्वातंत्र्य, उद्योग-स्वातंत्र्य—या सर्वांचा अपहार करणाऱ्या नव्या कायद्याखालीं त्यांना वागावयाचें होतें. पूर्वी पोलंड किंवा लिथुआनिया येथील अर्धवट हुकूमशाहीच्या कारकीर्दींतहि जीं संकुचित व कडक बंधनें त्यांच्या स्वप्नांत आलीं नाहींत, त्या बंधनांच्या चौकटींत, त्यांना आपलें सर्व जीवन बसवावयाचें होतें. जिंकलेलीं राष्ट्रें गिळंकृत करण्याचा रशियन सरकारचा हा मार्ग आहे.

४

रशिया व जर्मनी यांच्या पूर्व–युरोपमधील राजकीय धोरणांची तुलना केली म्हणजे त्यांत कांहीं साम्यें दिसतात व कांहीं वैषम्यें हि दिसतात. जिंकलेल्या राष्ट्राला भयभीत जनतेचा कळप बनवून त्या जनतेंतील ध्येयवाद व नेतृत्व मारून टाकण्याचे रशिया व जर्मनी यांचे प्रयत्न एकसारखे आहेत. पण त्या दोघांचें साम्य येथेंच संपतें.

जर्मन लोकांना वसाहत करण्यासाठीं पूर्वेकडे जागा पाहिजे होती, म्हणून पोलंड व युक्रेन या देशांमध्यें त्यांचें धोरण असें होतें कीं, तेथील मूळच्या प्रजाजनांना हळूहळू नाहींसे करावयाचें व त्यासाठीं त्यांची उपासमार करावयाची. त्यांतील पुरुषवर्गाला अलग ठेवावयाचें; आणि सामुदायिक कत्तलीहि करावयाच्या. त्यांतून जे मूळचे रहिवासी जीवंत राहतील, त्यांना त्यांच्या वांशिक प्रतिष्ठेनुसार गुलामगिरींतील कमी-अधिक दर्जा द्यावयाचा.

रशियाची परिस्थिति याचेविरुद्ध होती. त्याचेजवळ अफाट प्रदेश व तोटकें मनुष्यबळ; म्हणून त्यानें आपलें धोरण निराळें आंखलें. रशियाला उद्योग-धंद्यांची वाढ करावयाची आहे, रस्ते बांधावयाचे आहेत आणि अशींच इतर प्रचंड सार्वजनिक कार्यें पार पाडावयाचीं आहेत. त्यासाठीं त्याला फिरता मजूर-वर्ग हवा आहे. त्याचप्रमाणें सैबेरिया व मध्य आशिया अशा दूरच्या पडित भागांत वसाहत करणारे लोकहि त्याला हवे असतात. रशियामध्यें दोनशेंहून अधिक भिन्नभिन्न राष्ट्रांचे लोक राहात आहेत. त्यांना हलविणें व वसविणें हें कार्य केवढें प्रचंड आहे!

या महायुद्धापूर्वी युक्रेनमधील लाखों लोकांना सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें होतें; आणि महायुद्ध सुरू झाल्यानंतर तर व्होल्गामधील सर्वच्या सर्व जर्मन प्रजासत्ताक राज्यच हद्दपार झालें. लिथुआनिया या देशाची एकूण लोकसंख्या ३० लाख. त्यांतील ७ लाख लोकांना हद्दपार करण्याचें ठरलें. पूर्व पोलंडमधील एकूण लोकसंख्या १ कोटी ३० लक्ष. त्यांतील ३०–४० लाख लोकांना हद्दपार करण्याचें ठरलें. या कार्यक्रमाला खीळ बसली, जर्मनीच्या आक्रमणानें. हें युद्ध समाप्त झाल्यानंतर, रशियाला पूर्व व आग्नेय युरोपवर निष्कंटक प्रभुत्व लाभेल, आणि तेव्हां सर्व जगाला आश्चर्यचकित करणाऱ्या अनेक गोष्टी घडतील. त्यांपैकीं एक म्हणजे पूर्वी कधींहि झालीं नाहींत, अशा प्रचंड प्रमाणावर लोकसमुदायांचीं सक्तीचीं स्थलांतरें. तीं स्थलांतरें मोठ्या कुशलतेनें केलीं जातील—अर्थात् मानवी मूल्यांची पर्वा मुळींच न करतां! रशियन सरकार खुद्द आपल्या लोकांवर अंमल चालवितांनाहि मानवी मूल्यांची पर्वा करतें कोठें?

२ रशियाचें विस्तारशील धोरण

या महायुद्धापूर्वी युरोपच्या भूमीवर एक त्रिकूट स्वामित्व गाजवीत होतें, तें म्हणजे इंग्लंड-जर्मनी-रशिया. या त्रिकुटांतील प्रत्येक जण अशी करामत करी कीं, तीमुळें दुसऱ्या दोघांत भेद निर्माण व्हावा—आणि त्यांच्यांत युद्ध निर्माण झालें, तर आपण खो खो हसत सुटावें.

आपल्या इच्छा बाजूस सारून आपण भविष्यकाळाकडे पाहिलें, तर आपल्याला काय दिसेल? विजय मिळाल्यानंतर थोडा काळ आनंदामध्यें व आभासामध्यें निघून जाईल. पण त्यानंतर मोठ्या प्रमाणावर असेंच एक त्रिकूट पुनः अवतीर्ण

होईल. तें म्हणजे इंग्लंड-अमेरिका-रशिया. आतांच तिन्ही बाजूंवर दडपण पडत चालल्याचें भासत आहे—अटलांटिक महासागरावर आर्थिक व सांपत्तिक दडपण, पॅसिफिक महासागरावर व उत्तरेकडे राजकीय दडपण, आणि युरोप व मध्यपूर्व यांवर राजकीय व भौमिक दडपण.

या त्रिकुटापैकीं इंग्लंडची भूमिका बचावाची राहील—चर्चिलच्या शब्दांत सांगावयाचें तर "आहे तें शाबूत ठेवण्याची" राहील. आपल्या साम्राज्यांतून फुटून निघण्याच्या प्रवृत्तींचा बीमोड करणें, आपल्या वसाहतींचे पाश लवचिक करणें आणि आपल्या अंकित देशांना पुष्कळसें स्वातंत्र्य देणें—हीं कामें यापुढें इंग्लंडला करावीं लागतील. ब्रिटिश साम्राज्याचे धागेदोरे ढिले पडतील हें निःसंशय. त्याचा फायदा घेण्यास दुसरे दोवे टपून राहिलेलेच आहेत. त्यांपैकीं अमेरिका आर्थिक विस्ताराकडे आणि युद्धाच्या मोक्याच्या जागा जिंकण्याकडे लक्ष पुरवील. अमेरिकेला नवे मुलुख जिंकावयाचे नाहींत. पण लष्करी तळांचें जाळें मात्र जगभर विणावयाचें आहे. पण त्यामुळें तिचें इंग्लंडशीं वाकडें येण्याचें कांहींच कारण नाहीं. आर्थिक स्पर्धेमुळें मात्र अँग्लो-सॅक्सन राष्ट्रांचा स्थिर गट निर्माण होणार नाहीं. त्यामुळें रशियाला आपले डावपेंच खेळण्यास भरपूर संधि मिळेल.

या तिन्ही राष्ट्रांतील सर्वांत जास्त सामर्थ्यशाली व विस्तारशाली राष्ट्र म्हणजे रशिया. जागतिक राजकारणाच्या रंगभूमीवर हें राष्ट्र नव्यानेंच येत आहे. त्याच्या अंगीं निर्दय चैतन्य सळसळत आहे. त्याचें अर्थकारण राष्ट्रीय स्वरूपाचें आहे, राजकारण केंद्रित आहे व त्याची कार्यपद्धति हुकूमशाहीची आहे. त्यामुळें रशिया म्हणजे एक प्रचंड व सुसंघटित राष्ट्र डोळ्यापुढें उभें राहतें. याचे उलट, ब्रिटिश साम्राज्य हें दुबळें, विस्कळित व विकेंद्रित झालेलें आहे. त्याच्या तुलनेनें रशिया म्हणजे एखाद्या जुन्यापुराण्या किल्ल्याच्या मोडकळीस आलेल्या लांब तटबंदीकडे व खोल खंदकाकडे पाहणारें एक अवाढव्य लढाऊ जहाज ! याचा अर्थ असा नव्हे कीं, हें जहाज त्या तटबंदीवर हल्ला चढवील. पण किल्ल्यांतील व जहाजांतील लोकांना एकमेकांच्या सामर्थ्याची कल्पना आहे, एवढाच त्याचा अर्थ. त्या सामर्थ्याचें गुप्त दडपण पडल्याशिवाय राहात नाहीं.

मध्यपूर्व, भूमध्यसमुद्र आणि युरोपखंड—हीं सर्व स्थानें माऱ्याला उघडीं असल्यामुळें तेथें रशियाचें दडपण अधिक पडेल. हेंच सौम्य शब्दांनीं सांगावयाचें तर, या दडपणाचा परिणाम "सत्ता-विभाग" निर्माण करण्यांत होईल. याची नक्की व्याप्ति परस्परांच्या शक्तीवर अवलंबून राहील. जेथें तुल्यबल राष्ट्रें असतील

तेथें या "सत्ता-विभागांचें" कौर्य केवळ व्यापारी सवलती व राजकीय तह यांपुरतेंच राहील. इंग्लंड व पोर्तुगाल यांमध्यें तसें तें आहे. हींच राष्ट्रीय बलाचीं पारडीं जरा हालूं द्यात कीं, लगेच हेच "सत्ता-विभाग" अंकित देशांसारखे वागविले जातील आणि त्यांतील विमान-तळांचा व लष्करी ठाण्यांचा उपयोग यथेच्छ केला जाईल. त्यानंतर आणखी एक धक्का त्या पारड्यांना बसूं द्या, म्हणजे त्या "सत्ता-विभागांत" नामधारी सरकारें स्थापन होतील, किंबहुना, ते प्रदेश अधिकृत रीत्या बड्या राष्ट्रांत विलीन होणार नाहींत इतकेंच; पण त्यांचें पूर्ण विसर्जन होईल. याचा दाखला माँचुको व जपान यांच्या संबंधांत दिसून आलाच आहे. पूर्व पोलंड व बाल्टिक संस्थानें यांना शेवटचा धक्का मिळाला, तो म्हणजे लष्करी बळावर जिंकणें, किंवा दडपशाहीचे बळावर लोक-मत घेणें.

"राज्य-विस्तार" या शब्दाचा अर्थ राजकीय दृष्ट्या सुबुद्ध असलेले लोकहि जुन्या संदर्भानेंच घेतात. नाझी जर्मन हे रशियनांना "आशियाचे लुटारू" म्हणून संबोधूं लागले, आणि त्यांनीं स्टॅलिनला चेंगीझखानाच्या पंक्तीस बसविलें. रशियानें झेकोस्लाव्हाकिया आपल्या ताब्यांत घेतला, तेव्हां इंग्लंडांतील हुजूर पक्षाचे लोक कुजबुजूं लागले, "हें तर लष्करी आक्रमण!" यामुळेंच युरोप खंडांत रशिया आपल्या सत्तेचा विस्तार करीत असतांनाहि त्यावर येथील जनतेचा विश्वास बसत नाहीं. आधुनिक राजकीय युद्धाचें तंत्र म्हणजे दुसऱ्या देशांत अंतर्गत भांडणें लावून त्याला गुलाम करणें. हें तंत्र हिटलरनें वापरलें होतें. पण त्याचा खरा अर्थ अजून सर्वांचे ध्यानांत आला नाहीं.

रशियन संघ-राज्याची घटनाच अशी आहे कीं, तिच्यामध्यें भिन्न भिन्न थरांतील राज्यांचा समावेश झालेला आहे, आणि नवीं नवीं राष्ट्रें आत्मसात् करण्याचा गुण तिच्या ठायीं आहे. हा गुण एकवंशीय जर्मन साम्राज्यामध्यें फारसा नव्हता. जर्मनीनें झेकोस्लाव्हाकिया गिळणें म्हणजे आपल्या शरिरांत कांहीं तरी विजातीय द्रव्य सामावून घेण्याइतकें धोक्याचें होतें, पण रशियानें एखादें नवें "स्वयं-सत्ताक प्रजासत्ताक राज्य" आपल्यांत सामील करून घेणें म्हणजे एखाद्या मोठ्या राजवाड्यांत एक नवा दगड बसविणें होतें. १९४३ सालीं रशियन राज्यघटनेनें घटक राज्यांना अधिक स्वायत्तता दिल्याचा देखावा केला. त्यामुळें ही सामिली-करणाची त्याची शक्ति अधिकच वाढली. हंगेरियन, स्लोव्हाकियन किंवा सॅक्सोनियन—यांपैकीं कोणत्याहि समाजवादी स्वतंत्र सरकाराचें स्वागत करण्यास रशिया आपलीं दारें उघडीं टाकून सिद्ध आहे. प्रत्येक राष्ट्राचे बाबतींत हें सामिली-करण, कमी-अधिक काळांत, क्रमाक्रमानें होत जातें, आणि शेवटीं जेव्हां त्याचें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम 22036 वि: निबंध-
भ्रम-निरास १७७
क्रमांक 2203 दि: 2/12/68

रशियांत पूर्ण विलीनीकरण होतें, तेव्हां तें आपखुषीनें झालें, असा देखावा दिसतो.

"स्टॅलिनची हांव किती आहे?" हा प्रश्न भोळसट व निरर्थक आहे. मोठ्या साम्राज्यांचा विस्तार विशिष्ट नियमांनींच होतो. कोणत्याहि बलाढ्य राष्ट्राभोंवतीं राजकीय पोकळी निर्माण झाली, म्हणजे तें राष्ट्र आपल्या "सत्तेचे विभाग" वाढवीत जातें. प्रतिकाराचें दडपण येईपर्यंत त्याचें हें कार्य चालतें. दळणवळणाचीं साधनें जास्त, उद्योगधंद्यांचें प्रमाण अधिक व राहणीचें मान मोठें, त्यामुळें रशियाच्या पश्चिमेकडील राष्ट्रांचें आकर्षण अधिक. स्थैर्य व सत्ता अधिकाधिक मिळविण्याच्या इच्छेंतून राज्यविस्ताराची कल्पना वाढीस लागते. त्यानंतर जगाच्या बाजारपेठा कबीज करण्याची लालसा उद्भवते आणि ती पूर्णत्वानें कधींच तृप्त होत नाहीं.

उलट, राष्ट्राचें सामर्थ्य वाढलें कीं, लहान देशांचा त्याचा लोभहि वाढतो. ते लहान देश बाहेरच्या मदतीशिवाय आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण करूं शकत नाहींत. बड्या शेजारी राष्ट्राचें ते "पाल्य" बनतात, आणि नंतर हळूहळू त्याचे "उपग्रह" बनून शेवटीं त्याच्या कक्षेंत सामावले जातात. युरोपमध्यें रेल्वे अस्तित्वांत आल्यापासून ५० वर्षांचे आंत जर्मनींतील सुमारें ३०० स्वतंत्र राज्यें रीशच्या एका राज्यसत्तेच्या अंमलाखालीं आलीं. असेंच एकत्रीकरण सर्व युरोप खंडांत आतां होणार आहे. सध्यांच्या विमान-युगांत छोट्या राष्ट्रांचें जीवन १०।२० वर्षांपलीकडे राहणार नाहीं. जर्मनींतील लढाऊ व एकतंत्र राष्ट्रांचें एक संयुक्त राष्ट्र बनलें. गेल्या शतकाचे मध्यास, जर्मनींतील इतर राज्यांचे बाबत प्रशियानें जें धोरण ठेवलें, तेंच आज रशिया पूर्व व मध्य युरोपचे बाबत ठेवीत आहे.

२

या विचार-सरणीचें खंडन कांहीं राजकारणी लोक दोन प्रकारांनीं करीत असतात. १९ व्या शतकाच्या दृष्टिकोनांतून ते पाहात असतात. त्यांचा पहिला मुद्दा असा कीं, युद्ध संपल्यावर रशियाला दीर्घ काळ शांततेची आवश्यकता वाटेल; आणि दुसरा मुद्दा असा कीं, रशियाला आपल्या बेचिराख झालेल्या प्रदेशाची पुनः उभारणी करण्यासाठीं इंग्लंड-अमेरिकेच्या आर्थिक मदतीवर विसंबून राहावें लागेल.

अर्थात्, रशियाला शांततेची गरज भासेल—आणि तशी इंग्लंडलाहि भासेल. परंतु मैत्रीचे व परस्पर-सहकार्याचे, बेनेस-मोलोटाव्ह करारांसारखे जे तह झाले, त्यांमुळें "सत्ता-विभागांचें" क्षेत्र वाढलें आणि त्यांचें स्वरूप लढाऊ न राहतां

शांततेचें राहिलें. या सत्ता-विभागामध्यें मैत्रीची दोरी आवळत आवळत तिला गुलामीची गांठ मारीपर्यंत चतुराईनें पावलें टाकतां येतात. समजा, उद्यां रुमानियांतील सरकार बदललें आणि तेथील विरोधी पक्षावर शस्त्र उगारलें गेलें, तर त्यासाठीं इंग्लंड रशियाशीं युद्ध पुकारील काय? किंवा पोलंडच्या सरकारनें देशांतील सर्व पक्ष वितळवून एकच "राष्ट्रीय ऐक्य" नांवाचा पक्ष उभारला आणि युक्रेनच्या प्रजासत्ताकाशीं संबंध जोडला, म्हणून तरी इंग्लंड रशियाशीं युद्ध पुकारील काय? अशा क्षुल्लक कारणावरून नवें जागतिक युद्ध सुरू होईल, असें फक्त वेडा माणूसच म्हणूं शकेल. परराष्ट्रखात्यांतील तज्ज्ञ लोकांना त्या त्या घटनांचा आशय व त्यानंतर होणाऱ्या घडामोडी यांचें ज्ञान झालेलें असलें, तरी "न्यू स्टेट्स्मन् ॲन्ड नेशन्" सारखें पत्र, त्या घटनांचें योग्य ते समर्थनच करीत बसेल.

हीच स्थिति आर्थिक मदतीचीहि. हंगेरीनें रशियाशीं संलग्न व्हावें कीं नाहीं याबद्दल सन. ९८·५ हंगेरियन लोकांनीं अनुकूल मत दिलें. तें मत खरें होतें कीं कृत्रिम होतें याची चिकित्सा न करतां, अमेरिकेंतील यंत्रांचे कारखानदार रशियाला आपला माल निर्यात करण्याचे करार पूर्णपणें पाळतील. पूर्वी जपाननें चीनवर आक्रमण केलें, म्हणून काय इंग्लंड-अमेरिकेनें जपानला तेल पुरविण्याचें थांबविलें? फार कशाला? व्हर्सायच्या तहानंतरहि, इंग्लंड-अमेरिकेंतील शस्त्रास्त्रांच्या कारखानदारांनीं जर्मनीला पुनः शस्त्रसंपन्न करण्याचें आपलें काम बंद ठेवलें नाहीं.

शस्त्रांच्या धंद्यावर लोकमताचें नियंत्रण निर्माण होण्याची शक्यता दिसत नाहीं. पण तें निर्माण झालें असें मानलें, तरी शांततेच्या काळांत देशाची पुनः उभारणी करण्यासाठीं लागणारा माल निर्यात करण्यास कोण बंदी घालील? आणि रशियाची पहिली गरज हत्यारांची नाहीं. रशिया हा साऱ्या जगांत एक मोठी व आकर्षक अशी बाजारपेठ होऊन बसेल, आणि जगाचा व्यापार हा आपल्या स्वतःच्या नियमांनींच चालेल—नैतिक विवेकाच्या सूक्ष्म लहरीनुसार नव्हे.

१९३२ सालापर्यंत जुन्यापुराण्या मुत्सद्द्यांना असें वाटे कीं, हिटलर हा ज्यू लोकांना ज्या धमक्या देतो, त्या तो कधींच खऱ्या करून दाखविणार नाहीं. कारण त्याला अशी भीति पडेल कीं, जर्मन उद्योगधंद्यांना अल्पकाळासाठीं दिलेलें कर्ज अमेरिका परत घेईल. पण प्रत्यक्ष काय घडलें हें सर्वांना माहीत आहे.

रशियाचें धोरण आर्थिक पाशांनीं नियंत्रित करतां येईल, ही आशा वाटण्याचीं दोन कारणें आहेत. (अ) इंग्लंड-अमेरिका यांच्यांतील व्यापारी स्पर्धा बंद होईल व दोघांचें व्यापारी धोरण एकच संयुक्त राहील. (ब) इंग्लंड-अमेरिका या

देशांतील प्रत्येक व्यापारी संस्थेचें पूर्ण नियंत्रण परराष्ट्र खातें व स्टेट खातें करील. (निर्यातीच्या व्यापारावर नियंत्रण घालण्यानें भागणार नाहीं. तसें केलें, तर ज्या व्यापारी संस्थांना पूर्वी केलेले करार मोडावे लागतील, त्यांना नुकसान-भरपाई देणें सरकारला भाग पडेल, एवढेंच नव्हे तर, त्यांना दुसऱ्या बाजार-पेठाहि मिळवून द्याव्या लागतील. म्हणजे तेथील सरकारला पोलीस व दाई या दोघांचें काम करावें लागेल.) याचा अर्थ असा कीं, इंग्लंड-अमेरिकेंतील खाजगी भांडवलशाही रद्द केली, तरच हें धोरण यशस्वी होईल.

♤ ♤ ♤

येथें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपण युरोपच्या भवितव्याचा विचार करीत आहों, तो वर्षाच्या मापानें नव्हे, तर वर्ष-दशकाच्या मापानें. युरोपवर प्रभुत्व मिळविण्याची पैज रशिया हळूहळू जिंकील, सत्ता-विभागावरील आपली पकड घट्ट करील व आपल्या सत्ता-विभागांचें क्षेत्रहि हळूहळू वाढवील. हें यश हस्तगत होईपर्यंत, लहान लहान देशांतील अंतर्गत घटनांचें स्वरूप रशिया आपल्या प्रयत्नांना देईल. गुलाम करण्याचें तंत्र बरोबर वापरलें जाईल. फक्त त्याची गति व ताल रोग्याच्या नाडीप्रमाणें कमी-जास्त ठेवण्यांत येईल. आरंभीं वेगानें, अकल्पितपणें जोरदार आघात केले जातील आणि नंतर शांततेचा प्रदीर्घ काळ येईल. धक्के देणें व शांत ठेवणें—या क्रिया अनेक वर्षें आलटून पालटून चालतील, आणि एकदां आपलें इच्छित पूर्ण झालें, म्हणजे मग सदिच्छेच्या गोष्टी बोलल्या जातील. हें सारें भविष्य भीतिप्रद वाटेल. पण सत्तेच्या राजकारणांतील मागच्या अनुभवांचें हें सारच आहे.

३

मध्य व पूर्व युरोप जर्मनीच्या स्वामित्वाखालीं कैक शतकें होतें. ऑस्ट्रियाचें साम्राज्य भंग पावल्यामुळें सत्तेचा तोल बिघडला व युरोपांत पोकळी निर्माण झाली. व्हर्सायच्या तहानें एक बलाढ्य युरोपियन राष्ट्र नष्ट केलें व त्याचे जागीं लहान लहान राज्यांचें अस्थिर संघटन उभें केलें. पण त्यांपैकीं एकाहि राज्याला आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य टिकविण्याची ताकद नव्हती. बाल्कन व डॅन्यूब खोरें यांमधील राज्यें संभाव्य उपग्रहासारखीं होतीं व तीं सूर्याचा शोध करीत होतीं.

तीन मोठ्या राष्ट्रांनीं त्यांना आपल्या कक्षेंत ओढण्याचे प्रयत्न केले. तीं राष्ट्रें म्हणजे रशिया, फ्रान्स व जर्मनी. त्यांपैकीं जर्मनीनें आपल्या व्यापारानें व पंचमदळी

कारस्थानानें यश मिळविलें. पण रणांगणावरील पराभवामुळें जर्मनीचे तुकडे झाले. १९१८ सालीं असलेली अस्थिर परिस्थिति पुनः मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली. आल्प्स् पर्वताच्या पूर्वेकडील युरोप राजकीय, आर्थिक व तात्त्विक या दृष्टींनीं अननुभूत अशा अराजकावस्थेंत सांपडला. पण सध्यां युरोप खंडावर रशिया हेंच एक मोठें राष्ट्र उभें आहे व त्याला कोणी प्रतिस्पर्धी नाहीं. त्याचा जवळचा प्रतिस्पर्धी एकच, आणि तो म्हणजे फ्रान्स. पण प्रत्येक बाबतींत त्याचा चेंदामेंदा करण्याचें सामर्थ्य रशियाजवळ आहे. पांचव्या चार्ल्सनंतर युरोप खंडांतील राजकारणाचा तोल एका राष्ट्राकडे इतका कधींच झुकला नव्हता.

या परिस्थितींतील महत्वाची गोष्ट म्हणजे युरोपच्या पूर्वेकडील अर्ध्या भागावर असलेलें जर्मनीचें प्रभुत्व धुळीस मिळालें ही होय. यावर कोणी अशी शंका घेईल, पहिल्या महायुद्धांतहि जर्मनी हरला होता; आणि तरी तो सावरला, तसें आतां होणार नाहीं कशावरून ? पण आतांची परिस्थिति मूलतःच भिन्न आहे. पहिल्या युद्धानंतर जर्मनीचे पूर्वेकडील शेजारी—पोलंड व रशिया—परस्परांशीं लढत होते. पश्चिमेकडे फ्रान्स हा शेजारी होता, पण त्याची लोकसंख्या जर्मनीचे निम्मी, आणि त्याचें औद्योगिक सामर्थ्य फारच कमी. त्यामुळें आपल्या बड्या शेजाऱ्यावर कायमचें वर्चस्व स्थापण्याची कल्पना फ्रान्सला स्वप्नांतहि आली नाहीं. पण आतां जर्मनीचा विजयी शेजारी रशियन राक्षस हा आहे, जर्मनीच्या उद्योगधंद्यांची कत्तल झालेली आहे, त्याची भूमि परक्यांकडून प्रथमच व्यापली जाईल आणि त्याचें वजन खच्ची केलें जाईल. त्याचा पूर्वेकडील भाग रशियाच्या घशांत जाईल, तर पश्चिमेकडील भाग पोलंडच्या मुठींत जाईल; आणि पोलंड हा कांहीं रशियाचा प्रतिस्पर्धी नव्हे. तो त्याचा केवळ उपग्रह. यांप्रमाणें रशियाच्या सत्ता-विभागाची सीमा बर्लिनच्या पूर्वेस ५० मैलांवर येऊन थडकेल.

जर्मनीवरील रशियाचा ताबा किती काळ टिकेल हें आम्हाला माहीत नाहीं. पण तो जेव्हां संपेल, तेव्हां जर्मनींतील लोकांमध्यें कधींहि सुधारतां येणार नाहींत असे प्रचंड दोष निर्माण झालेले दिसतील याची खात्री बाळगा. जर्मनीची तात्पुरती फाळणी जी केली जाईल ती कायमचीच होऊन बसेल. एका भागांत कम्युनिस्ट सरकार तर दुसऱ्या भागांत फ्रेंचांच्या ताटाखालचें सरकार—अशी द्विदळ राज्यव्यवस्था जर्मनींत उत्पन्न होईल. पुढील पांच वर्षांत कोणकोणत्या घडामोडी होतील, याचा तपशील सांगणें कठीण आहे. पण जसजसें दक्षिणेकडे यावें, तसतसें हे फेरबदल झपाट्यानें व स्पष्टपणें झालेले दिसतील. इंग्लंडला पूर्व युरोपचें फेडरेशन बनविण्याची आशा होती, परंतु बेनेसनें मॉस्कोला जाऊन

रशिया-झेकोस्लोव्हॅक करार केला, त्यामुळें ती आशा ढांसळली. हें लेखन चालू असतांना, १९४४ च्या सप्टेंबरमध्यें, बाल्कन्स जिंकण्याचे रशियाचे प्रयत्न ऐन जोसांत आले आहेत आणि राजकारणांतील आधळ्या माणसालासुद्धां, रशियाचे पोलंडमधील हेतु काय आहेत हें स्पष्टपणें दिसूं लागलें आहे. स्टॅलिनच्या मनांत कोणते हेतु होते, याचा काथ्याकूट करीत बसण्यापेक्षां आपण प्रत्यक्ष घटनांचाच विचार केला पाहिजे. आणि ती घटना अशी आहे कीं, रशिया व पाश्चात्य राष्ट्रें यांच्या सत्तेची सीमा वॉर्साच्या पूर्वेस होती ती प्रागच्या पश्चिमेस आली.

३ डाव्या पक्षांची संशय-निवृत्ति

१

रशियाचा विस्तार कोठपर्यंत होणार? या प्रश्नाला एकच उत्तर असें कीं, दोन जर्मन साम्राज्यांच्या पाडावामुळें व फ्रान्सच्या दुबळेपणामुळें युरोपांतील सत्तेचा तोल जो बिघडला आहे, तो पुनः सावरीपर्यंत.

मात्र रशियाचें चैतन्य दृढ व एकजीव आहे, तर युरोपांतील सुप्त शक्ति विस्कळीत झालेल्या आहेत. त्या शक्तींची नक्की विभागणी करणें कठीण. तथापि "सनातनी" व "पुरोगामी" अशा दोन गटांत त्या शक्तींची वांटणी करतां येईल.

सनातनी शक्तींचें दौर्बल्य उघडच आहे. त्यांचा उद्देश एकच—व तो म्हणजे आहे ही स्थिति कायम ठेवणें—१९ व्या शतकाला २० व्या शतकावरून ओढून पुढें नेणें—क्रियेला निष्क्रियतेनें थोपविणें. या शक्तिजवळ जेत्यांना देण्याजोगें बक्षिस नाहीं आणि जितांना आशा दाखविणारी योजना नाहीं. ८ कोटी जर्मन लोकांचें भवितव्य काय ठेवावें हें कोडें सोडवितांना पाश्चात्य मुत्सद्दी कसे गोंधळून जातात, हें पाहिलें म्हणजे दुःख वाटतें. जर्मनांना पुनः नवें शिक्षण द्यावें या कल्पनेला ते नाक मुरडतात. कारण त्यांना शिकविण्यासारखें तत्त्वज्ञान आपणाजवळ नाहीं, ही जाणीव त्यांना आहे. १६।१६ वर्षांचीं जर्मन मुलें स्वतःचा नाश वेडेपणानें करून घेत आहेत अशी तक्रार पाश्चात्य मुत्सद्दी करतात; पण त्या मुलांनीं जीवंत कसें राहावें याचा मार्ग मात्र ते दाखवीत नाहींत. वेढा पडलेल्या किल्ल्यानें शरण जावें असा सल्ला ते देतात. पण शरणागतीनंतर काय होईल, हें मात्र ते सांगूं शकत नाहींत. युरोपचें किंवा जगाचें भवितव्य काय असावें, याची मार्गदर्शक कल्पना त्यांचेपाशीं नाहीं. ना निशाण, ना कार्यक्रम—अशी त्यांची अवस्था आहे. "अटलांटिक सनदेची" शाई, ती वाळण्यापूर्वीच, उडून गेली.

तथापि, परंपरागत मूल्यांचें पुनरुज्जीवन करण्यास आतांइतका योग्य काळ इतिहासांत क्वचितच असेल. हिटलर गेला म्हणजे हुकूमशाहीची भीति गेली असें मुळींच नाहीं. त्या भीतीमुळें पाश्चात्य राष्ट्रांतील जीर्ण मूल्यांना नवें आकर्षक तेज चढलें आहे. मानवी हक्क व नैतिक परंपरा या आपण ५० वर्षांपूर्वी गृहीत धरीत होतों. आतां त्या जगातील बहुतेक भागांतून उखडल्या गेल्या आहेत व बाकीच्या भागांतून उखडल्या जात आहेत. चौकशीविना अटक न होणें, भाषण-स्वातंत्र्य असणें, दिवाणी कायदा चालू असणें, मानवी जीवनाविषयीं आदर बाळगणें, शिष्टाचाराची अलिखित संहिता असणें—या सर्व गोष्टी पूर्वी किती शिळ्या व हास्यास्पद वाटत होत्या! कारण त्यावेळीं आपला स्वर्ग हाताशीं आलेला होता. पण आतां आपला चोहों बाजूंनीं पराभव झाल्यामुळें त्याच गोष्टी आतां अत्यंत महत्वाच्या वाटूं लागल्या आहेत. गुदमरून जाण्याच्या यातना ज्यांच्या कपाळीं आल्या असतील, त्यानाच प्राण-वायूचें महत्व कळावें ही दुःखाची गोष्ट होय. त्याप्रमाणें नाझी जर्मनीमध्यें किंवा स्टॅलिनच्या रशियामध्यें एक वर्ष साधा नागरिक म्हणून राहिलेल्या माणसांना मूलभूत स्वातंत्र्याचा अपहार म्हणजे काय हें कळूं शकतें. पण ही तुलना करणें किती जणांना जमतें?

इंग्रज नाविकानें आपल्या कामांत हलगर्जीपणा केला, तर त्याच्या पगारांत कपात होईल; पण जर्मनी-रशियामध्यें तो यंत्रविध्वंसाचा गुन्हा मानून त्याला मृत्यूची शिक्षा दिली जाईल. हा फरक किती जणांना कळतो? मर्यादित लेखन-स्वातंत्र्य आणि मानवाला बातम्या देण्याऱ्या मानवी यंत्राचा दर्जा यांतील तफावत इंग्रज पत्रकाराला कशी कळणार? इंग्लंडांतील मुत्सद्दी चिरूट ओढील व सेनापति फोटोचा छंद चालवील, पण रशियांतील अधिकाऱ्यांना वरिष्ठांची लोंचटपणें पूजा करावी लागते. इंग्रज जनता असंतुष्ट असेल, पण कायद्याच्या कक्षेंत सुरक्षित असते. त्यामुळें पोलीस-राज्यांतील भयप्रद अस्थैर्य आणि एकतंत्री राज्यांतील धास्तीचें वातावरण याची कल्पना इंग्रज जनतेला कशी येणार? तिला फक्त आपल्या भग्न आशाच माहीत असतात. लोकशाहीचें वातावरण हें सांचलेल्या धुक्याप्रमाणें झालें आहे. त्यांतून जी हवा पोटांत घ्यावयास मिळते, त्याबद्दल कोणी कृतज्ञ असत नाहीं. पाश्चात्य संस्कृति आपलीं जीं मूल्यें गमावूं पहात आहे, त्यांचें महत्वच तिच्या ध्यानीं येत नाहीं, हें तिचें दुर्दैव आहे.

हीं सांस्कृतिक मूल्यें पुनः जीवंत कशीं होतील? युरोपमध्यें निर्माण झालेली पोकळी नव्या आशायानें कशी भरून निघेल? इंग्लंड, फ्रान्स व पश्चिम युरोपांतील इतर राष्ट्रें—यांचें केवळ राजकीय सख्य होऊन काम भागणार नाहीं. हें खरें

आहे कीं, पाश्चात्य युरोपांतील राष्ट्रांमध्यें रोमन संस्कृतीच्या प्रभावामुळें समान परंपरा निर्माण झाली आहे, ख्रिश्चन नीतिशास्त्र दोन हजार वर्षें तेथें रुजलें आहे आणि पाश्चात्य उदार-मतवादानें तेथें १०० वर्षें मूळ धरलें आहे. या सर्वांचें सार वरच्या राजकीय वादानें धुऊन नेलें जाणार नाहीं. फक्त त्यावर धूळ-धुरळ्याचे थर बसलेले आहेत. ते थर उडविल्याशिवाय त्यांतून स्फूर्ति मिळणार नाहीं. याचा अर्थ परंपरागत मूल्यें प्रगतिपर शक्तीनेंच पुनः सजीव होतील.

२

हें काम करण्यास समर्थ बनण्यासाठीं डाव्या पक्षानें आपले भ्रम सोडले पाहिजेत व आपलीं तत्त्वें पुनः प्राप्त करून घेतलीं पाहिजेत. डावा पक्ष हा अर्भकासारखा आहे—प्रारंभीं तो देशाभिमानाचें स्तन्य पीत होता; आणि नंतर रशियाच्या बाटलींतून दूध पिऊं लागला. ब्रिटिश मजूर पक्ष या पहिल्या अवस्थेंतून कधींच बाहेर पडला नाहीं, हें त्याच्या दांत पडलेल्या पुढाऱ्यांवरून सहज दिसून येतें. कम्युनिस्ट हे त्या बाटलीला चिलगले. पण त्यांना त्या बाटलींतील दूध पचवितां आलें नाहीं, हें त्यांच्या तोंडच्या वासावरून कळून येतें. हें रूपक खेदजनक आहे, पण "कम्युनिस्ट जाहीरनामा" निघून एक शतक लोटल्यावरहि युरोपची स्थिति काय आहे, हें पाहिलें म्हणजे त्या रूपकांतील सत्य कोण नाकारील ?

भ्रम-निरासाची पहिली संधि हुकली, याचें कारण मानसशास्त्र दृष्ट्या चुकीचा मार्ग अवलंबिला हें होय. "कामगारांना आपला असा स्वतंत्र मायदेश नसतो." हें 'कम्युनिस्टांच्या जाहीरनाम्यांतील' सुप्रसिद्ध वाक्य अमानुष व असत्य आहे. शेतावरील मजूर, खाणींतील कामगार किंवा रस्त्यावरील झाडूवाला, या सर्वांचे आपल्या गांवाशीं किंवा रस्त्याशीं जिव्हाळ्याचे संबंध असतात. तसेंच, भाषा व चालीरीति यांच्या परंपरांशींहि भावनेच्या बंधनांनीं, श्रीमंत लोकांइतकेच, ते बांधले गेलेले असतात. या भाव-बंधनांविरुद्ध जाणें म्हणजे मानवी स्वभावाविरुद्ध जाणें होय. तसें वर्तन तत्त्वनिष्ठ समाजवादानें व भौतिकवादानें अनेक वेळां केलें आहे. मानवाची भूक नाकारणें हें बरोबर नाहीं—तिच्यांत बदल करणें योग्य ठरेल. लोकांना राष्ट्रीय वृत्तिपासून जागतिक वृत्तिकडे न्यावयाचें असेल, तर त्यांच्या भावना समृद्ध केल्या पाहिजेत—त्या खंक करून चालणार नाहीं. दीर्घ काळ प्रवास करीत असलेला माणूस आपल्या जन्म-ग्रामीं आला, म्हणजे त्याचें हृदय उचंबळून येणारच; पण ज्यांनीं तें गांव कधींच सोडलें नाहीं, अशा

रहिवाशांची असहिष्णुता मात्र त्याचे ठायीं राहणार नाहीं. समाजवादी शिक्षणाचा हेतु, अशाच तऱ्हेचें परिवर्तन, लोकांच्या मनांत, राष्ट्राचे बाबतींत करणें, हा आहे. जगांतील सर्व गरीब व नम्र लोकांचा भ्रातृभाव ही एक जीवंत मनोवृत्ति झाली पाहिजे. कामगारांना सुट्टीच्या दिवशीं एका देशांतून दुसऱ्या देशांत राहावयास नेणारी संस्था स्थापन व्हावयास पाहिजे. आज हे विचार शेख महंमदी वाटतील, पण अशा तऱ्हेचें मानसिक पुनरुज्जीवन झालें नाहीं, तर समाजवादी चळवळ, नोकरशाहीच्या सांचेबंद मार्गानें, शोचनीय शेवटास जाऊन पोहोंचेल.

असाच दुसरा भ्रम डाव्या पक्षानें सोडावयास हवा. रशियाच्या कल्पना-चित्राची ओढ युरोपांतील पुरोगामी पक्षांना किती विलक्षण लागलेली आहे हें आपण पाहिलेलें आहे. कामगारवर्गाच्या क्रांतिकारक विभागानें आपल्या राष्ट्रावरील निष्ठा सोडली कीं, रशियाच्या चरणीं ती निष्ठा भक्तिभावानें वाहिली जाते, हें कांहीं यदृच्छेनें घडलें नाहीं. ज्यांना आपला स्वर्ग गमावला गेला असें वाटतें, त्यांना रशिया नंदनवन भासूं लागला.

यांत सर्वांत अधिक दुःख कोणाच्या वांट्यास आलें असेल, तर तें म्हणजे पूर्वी जर्मनीनें व्यापलेल्या देशांत भूमिगत राहून क्रांतिकारक चळवळ करणाऱ्या लोकांना. या भूमिगत क्रांतिकारकांना आपल्या राज्यकर्त्यांचा पराभव कां झाला व त्यांनीं विश्वासघात कसा केला हें माहीत होतें आक्रमण करणाऱ्या राष्ट्राबद्दल त्यांना सहजच द्वेष वाटत होता, पण त्याबरोबरच जुनी राज्य-पद्धति पुनः निर्माण होऊं नये असाहि निश्चय त्यांनीं केला होता. भूतकाळाला त्यांनीं झिडकारिलें होतें, पण भविष्यकाळाची स्पष्ट कल्पना त्यांना नव्हती. क्रांतिकारक मनोवृत्तीचें असेंच होतें. ही मनोवृत्ति प्रबळ पण पुसट असते. तिला अगदीं नवीन, पूर्ण स्थित्यंतर, नवा जन्मच हवा असतो. याच मनोवृत्तींतून खरी क्रांति निर्माण होते—क्वचित् भीषण अशी पोकळ क्रांतिहि निर्माण होते. तें ऐतिहासिक कारणांवर अवलंबून आहे. यापैकीं पहिल्या कोटींतील उज्ज्वल उदाहरणें इतिहासांत थोडींफार आहेत, पण दुसऱ्या कोटींतील मुबलक आहेत.

क्रांतीनें मारलेले समाज जीर्ण राजवटीच्या शृंखला फेंकून देऊन नव्या सुलतान-शाहीला सत्ताधीश करण्याचा मूर्खपणा पुनः पुनः करीत आले आहेत. हिटलर हा अधिकारारूढ कसा झाला ? तर जर्मनींतील भिकेस लागलेल्या मध्यम वर्गाच्या भांडवलशाही-द्वेषामुळेंच. अशा रीतीनें पूर्व युरोपमधील क्रांतिकारक भावना ही रशियाच्या विस्ताराचें साधन होऊन बसेल. जगापासून तुटलेले व अंधारांत—निराशेंत बावरणारे क्रांतिकारक रशियाच्या तेजस्वी कल्पना-चित्रावर, पाश्चात्य राष्ट्रांतील

रशिया-भक्तांपेक्षांहि, अधिक भाळतात. रशिया हेंच एक त्यांचें आशास्थान होतें. त्या रशियाची बदनामी जर्मन लोक जितकी अधिकाधिक करीत, तितकें त्यांच्या दृष्टीपुढील रशियाचें चित्र उज्ज्वल होई. खऱ्या निकोप अशा समाजवादी चळवळीचे अभावीं, उत्कृष्ट क्रांतिकारक कार्यकर्ते भावनेच्या पिंजऱ्यांत सांपडले आहेत; आणि ते आपल्या सुखस्वप्नांतून जागे होऊन पाहूं लागतात तों त्यांना रशियांतील शुद्धीकरणाचें, हद्दपारीचें व शत्रूच्या निःपाताचें सत्र चालू असल्याचें दिसून येतें व त्यांची छाती दडपून जाते, आणि त्यांचा पिंजरा बंद केला जातो.

या अनर्थांतून पाश्चात्य कामगारवर्ग बचावला जाईल अशी आपण निदान आशा करूं या. यापुढील कांहीं वर्षांत रशियांतील सत्यस्थिति हळूहळू ओळखली जाईल. युरोपच्या रंगभूमीवरील झगझगीत प्रकाशांत रशिया जों जों पुढें येत जाईल, तों तों आपल्या देशांतील अंतर्गत कारभाराविषयीं जगाच्या डोळ्यांत धूळ फेकणें त्याला अधिकाधिक कठीण होईल. अर्थात् रशिया आपल्याकडून नवीन जिंकलेल्या देशांना अलग ठेवण्याचा प्रयत्न जास्तींत जास्त करील. तसा प्रयत्न त्यानें पोलंड व बाल्टिक संस्थानें यांचे बाबतींत १९३९-४१ सालीं, त्यांना जिंकल्यानंतर, केला होता. सत्य अखेर बाहेर येतेंच; पण हळूहळू व मंद गतीनें.

१९३३ ते १९३९ या तब्बल सहा वर्षांच्या काळांत नाझी राजवटीनें, जर्मनींतील भयानक परिस्थिति, बहुसंख्य ब्रिटिश व फ्रेंच लोकांपासून कशी दडवून ठेवली होती, याचें स्मरण केलें म्हणजे पुरे; आणि जर्मनी हा रशियापेक्षां आपल्याला अधिक जवळ व प्रवासी लोकांना तेथें जाण्यायेण्यास पूर्ण मुभा. ज्यांना जर्मनींतील वस्तुस्थिति माहीत होती आणि म्हणून जे ती बहिऱ्या जगाच्या कानावर घालण्यासाठीं कंठशोष करीत होते, त्यांना "अत्याचारांचीं भडक वर्णनें करून उगाच युद्धाची आवई उठविणारे." असें दूषण देण्यांत आलें. आज रशियाची वस्तुस्थिति जगापुढें मांडणें तितकेंच अवश्य आहे. त्याबद्दल कोणी 'भले' म्हणणार नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. १९३३ १९३९ सालीं ज्यांनीं रशियाबद्दल असा आरडाओरडा केला त्यांचेवर जर विश्वास ठेवला गेला असता —किंवा त्यांचा आवाज जर मोठा असता—तर हें महायुद्ध टळलें असतें.

आज जे लोक पुढील भाकित सांगत आहेत, त्यांच्यापुढेंहि तेंच ताट वाढून ठेवलें आहे. पण आतां म्युनिचचें धोरण पत्करणारे लोकच डाव्या पक्षाचे झाले आहेत. १९३९ सालीं जर्मन-झेक तंट्याचे वेळीं हुजूर पक्षाची जी वृत्ति होती, तिचीच पुनरावृत्ति, रशिया-पोलंड संघर्षाचे वेळीं, समाजवादी व उदारमतवादी वृत्तपत्रांची होती. रशियानें केलेल्या भीषण व लष्करी आक्रमणाचें समर्थन

अल्पसंख्याकांच्या नांवानें केलें गेलें. आक्रमकाला न दुखविण्याची लालसा पूर्वीप्रमाणेंच याहि वेळेस दिसून आली, आणि जित राष्ट्राबद्दल तशीच असहिष्णुता दाखविण्यांत आली. "बड्या राष्ट्रामध्यें सलोखा राहावा म्हणून कांहीं कांहीं वेळां लहान राष्ट्रें व मोठीं तत्त्वें यांचा बळी द्यावा लागतो." अशी लपतछपत कबुलीहि दोन्ही वेळां देण्यांत आली. दोन्ही वेळां विवेक-शक्तीच्या प्रक्षोभाचीं तींच लक्षणें प्रकट झालीं.

म्युनिच कराराचे वेळीं समाजवादी लेखकांनीं वर्तमानपत्रांत लेख लिहून वाचकांची अशी बालंबाल खात्री पटविली होती कीं, जर्मनीचा अनुनय केल्यानें युद्ध निर्माण होईल—शांतता नव्हे. पण आतां तेच लोक आपला तो सारा वेदांत पार विसरून गेले आहेत. पूर्वी जर्मनी व आतां रशिया यांचे बाबतींत असा गैरसमज झालेला आहे कीं, आक्रमक राष्ट्राला मोकळें सोडलें, तर त्याची भूक भागली कीं, तें आपोआप स्वस्थ बसेल. या गैर-समजांतूनच अनुनयाची वृत्ति निर्माण होते. पण इतिहासाचा दाखला उलट आहे. परिस्थिति आपणाला शरण आली आहे असें दिसलें कीं, कोणत्याहि राष्ट्रास आक्रमणाचें स्फुरण चढतें. मग त्याला मोठा संघर्ष न करतां किती दूरवर मजल मारतां येईल, याचें भान राहात नाहीं. तें आपल्या ताकदीपेक्षां मोठी उडी मारतें व केवळ चुकीच्या अंदाजामुळें युद्धाच्या खड्ड्यांत पडतें. अशा चुकीच्या अंदाजांतूनच दोन्ही महायुद्धें जन्मास आलीं. अनुनयाचा हा खेळ बुद्धिबळासारखा उघडा नसतो; तर पत्त्यांसारखा अज्ञात असतो. एखाद्या लहान राष्ट्रावर बड्या राष्ट्रानें आक्रमण केलें, तर त्याचा निश्चित परिणाम नव्या जागतिक युद्धांत होईल, हें जर सर्वांना स्वच्छपणें व निश्चितपणें कळून चुकलें, तर तें आक्रमण होण्याचा संभव फारच कमी. याचा अर्थ असा कीं, आक्रमक राष्ट्राचा उद्योग, त्याची भूक भागल्यावर आपोआप थांबेल, असें मानणें चुकीचें आहे. तो उद्योग, परिस्थितींतून त्याला विरोध झाल्यावरच, थांबूं शकेल.

युरोपमधील सत्तेचा समतोल पुनः यावयाचा असेल, तर त्यासाठीं पाश्चात्य संस्कृतीला आधारभूत असणाऱ्या तत्त्वांचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे. पण हें काम हुजूरपक्षाच्या हातून होण्यासारखें नाहीं. समाजवादी चळवळीनें आपल्या भ्रामक कल्पना सोडल्या आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत स्वातंत्र्य व सामर्थ्य पुनः आपल्या अंगीं आणलें, तरच हें कार्य तडीस जाईल. युद्धानंतर ब्रिटिश सरकारावर मजूर वर्गाचें वजन पडो वा न पडो, त्याचें परराष्ट्रीय धोरणाचें सूत्र हें असलें पाहिजे कीं, दुसऱ्या कोणत्याहि बड्या राष्ट्राप्रमाणेंच रशियाचें धोरण आपले

स्वतःचे उद्देश साध्य करण्याचेंच राहील, आणि अन्य देशांतील किसान-कामगारांच्या भवितव्याविषयीं रशिया इतर बड्या राष्ट्रांइतकीच आस्था दाखवील. ही सत्य जाणीव स्पष्ट व निश्चित स्वरूपांत झाली नाहीं, तर डाव्या पक्षांना आणखी एका अनर्थास तोंड द्यावें लागेल.

♤ ♤ ♤

जसजशा रशियाविषयींच्या भ्रामक कल्पना नाहींशा होतील, तसतसा पाश्चात्य युरोपांतील—विशेषतः बंधमुक्त देशांतील—समाजवादी चळवळींना जोर चढेल. त्यांमध्यें दोन तट बहुधा पडतील—एक म्हणजे नवे, स्वतंत्र बुद्धीचे क्रांतिकारक व दुसरे, रशियाचे निष्ठावंत सहकारी. पहिले क्रांतिकारक हेच समाजवादाच्या पुनरुज्जीवनाचें सर्वांत मोठें आशास्थान होत.—किंबहुना तें एकटें एकच आशास्थान आहे. पण सध्यां तें सर्व कल्पनेंत आहे. रशियाच्या भगतांचा जो दुसरा वर्ग, त्याचा शेवट शोचनीय होण्याची भीति आहे. रशियाचें परराष्ट्रीय धोरण कोणत्याहि समाजवादी तत्त्वांवर आधारलेलें नाहीं. त्यामुळें त्याचे परदेशांतील सहकारी "तिसऱ्या इंटरनॅशनलचे" लढाऊ वीर आज असतील, तर उद्यां ते नकळत "तृतीयस्तंभी" होतील. क्रांतिच्या माहेरघराचे संरक्षक, असे हे कार्यकर्ते एका परक्या राष्ट्राचे उघड उघड हस्तक बनतील. समाजवादी पक्षांतील अल्पसंख्य वर्गांत हा बदल घडून आलाच आहे, आणि बहुसंख्य लोकहि त्याच मार्गानें घरंगळत जातील यांत शंका नाहीं. पूर्वी धार्मिक चळवळींच्या इतिहासांत जें घडलें, तेंच आतां समाजवादी चळवळींमध्यें घडत आहे. माथेफिरू व विकृत असे हे रशियाचे हस्तक आपल्या विपर्यस्त ज्ञानाप्रमाणें, स्वेच्छेनें तुरुंगांत जातील व मृत्यूलाहि कवटाळतील. त्यांचा हा सारा त्याग समाजवादाच्या नांवानें झाला, तरी वस्तुतः तो जुन्या धर्मासाठीं, रशियांतील लक्ष्मीपुत्रांसाठीं आणि इव्हॅन-पीटर अशा राज्यकर्त्यांच्या परंपरेच्या खातींच रुजू होईल.

कामगारवर्गाचे हे एके काळचे अत्यंत शूर व कडवे असे कार्यकर्ते होते; पण भ्रामक समजुतींमुळें ते वायां गेले, अशीच नोंद इतिहासांत केली जाईल.

२

आपल्या आवडत्या भ्रमाचा नाश याच्याइतकी दुसरी दुःखाची गोष्ट नाहीं. रशियाचे सहप्रवासी व भगत यांनीं रशियावर डोळे मिटून विश्वास ठेवण्याचें

वळण आपल्याला लावून घेतलें आहे. रशियन निष्ठेशीं प्रतारणा करणें हें त्यांना नैतिक विश्वासघातासारखें वाटतें. पण रशियानें आपली तत्त्वनिष्ठा कशी सोडली याची पर्वा ते करीत नाहींत. "सध्यां रशिया हें समाजवादी राष्ट्र राहिलेलें नाहीं." असें सत्य त्यांना कबूल करावयास लावलें, तरी ते अशी आशा करीतच राहतील कीं, कदाचित् स्टॅलिनच्या मृत्यूनंतर किंवा रशियांतील नोकर-शाहीची सत्ता मोडल्यानंतर, रशिया समाजवादी राष्ट्र बनेल.

अर्थात् केव्हां ना केव्हां तरी रशिया समाजवादी होणारच—तसा पोर्तुगाल होईल, अमेरिकाहि होईल; पण सध्यां आपण एवढें म्हणूं शकतों कीं, रशियाचें अर्थकारण राष्ट्रीय सत्तेखालीं आलेलें असलें, तरी न्यूझीलंड किंवा इंग्लंड यांच्या-पेक्षां रशिया समाजवादाच्या जवळ जाऊन पोहोंचलेला नाहीं. १९१७ पासून रशियाच्या विकासाची रेषा समाजवादाकडे जात नसून समाजवादापासून पराङ्मुख झालेली आहे. उलट इंग्लंडची विकास-रेषा मात्र थबकत थबकत, पुढें-मागें होत, पण निश्चितपणें समाजवादाकडे चाललेली आहे. तेथील वर्ग-भेदाचे तट कोसळत आहेत, आणि कामगार वर्गाच्या राहाणींत पुष्कळच वाढ होत आहे. अर्थात् कांहीं वेळां या विकासाला माघार घ्यावी लागते—प्रतिक्रिया सोसावी लागते. पण रशियांतील हुकूमशाहीचा तळ गांठण्याइतका अधःपात इंग्लंडचा सहसा होणार नाहीं. त्याची फार अधोगति झाली तरच हा अधःपात होईल, एरवीं नाहीं.

रशिया व इंग्लंड यांपैकीं कोणत्या देशांत समाजवाद अस्तित्वांत येण्याचा अधिक संभव आहे ? या प्रश्नाला आपण जर मार्क्सवादी कसोटी लावली, तर "इंग्लंड" हेंच त्याचें उत्तर येईल. देशांतील लोकशाही स्वातंत्र्याचीं तत्त्वें सुरक्षित ठेवणें हें कामगार-वर्गाला हितकारक असतें, अशी मार्क्सवादाची मूलभूत शिकवण आहे. भांडवलशाही लोकसत्ता म्हणजे पोकळ लोकशाही होय; आणि भांडवलशाही राज्य हें राज्यकर्त्यांच्या हातांतील एक खेळणें होऊन बसतें. पण लोकसभा, भाषण-स्वातंत्र्य, संघ-स्वातंत्र्य इत्यादि लोकशाही संस्थांमुळें कामगार-वर्गाला आपल्या संघटना उभारणें आणि आपली शक्ति संघटित करून वाढविणें शक्य होतें. हुकूमशहाच्या राजवटींत हें काम अत्यंत विकट होऊन बसतें.

रशियांतील एक सनदशीर पक्ष राज्यकर्त्या वर्गाशीं एकरूप झाला व कामगार-वर्गाच्या उद्धाराचें साधन राहिला नाहीं, हें आपण पाहिलें आहे. मजूर-संघांचीहि तीच गत. रशियामध्यें कामगार-वर्गाची हुकूमशाही नाहीं, तर इतर कोणत्याहि देशांतील राजकर्त्यांइतकेंच सत्तेला कवटाळून बसणाऱ्या अधिकारी

वर्गाची हुकूमशाही आहे. जगाच्या इतिहासांत आजपर्यंत कोणत्याहि शासकवर्गानें वा जातीनें आपण होऊन आपले हक्क व आपले अधिकार सोडलेले नाहींत, आणि त्यांतहि नुकत्याच स्थिर झालेल्या तरुण व शक्तिमान शासकवर्गानें तर तसा कल कधींच दाखविलेला नाहीं. शासक वर्गांतील कांहीं व्यक्तींचें तत्त्वज्ञान उदात्त असेल, पण सबंध वर्ग या दृष्टीनें तो सत्तेसाठीं अवश्य ते ते सर्व संग्राम करण्यास सिद्ध असतो.

इंग्लंडमधील हुजूरपक्षाची सत्ता मोडली, तरच तेथें समाजवाद येणें शक्य आहे— रशियामधील नोकरशाहीची सत्ता मोडली, तरच तेथें समाजवाद येणें शक्य आहे. सध्यांचा ब्रिटिश मजूरपक्ष म्हणजे एक लंगडें बदक आहे. परंतु खऱ्या समाजवादी चळवळीचा उदय होण्यास तेथील कायद्यानें व राज्यघटनेनें सवलती दिलेल्या आहेत. त्यांचा रशियांत अभाव आहे. शिवाय ब्रिटिश लोकशाहीची राज्य-घटना समाजवादाकडे क्रमशः संक्रमण करण्यास निदान संधि तरी देते. पण रशियांतील हुकूमशाहीचें टणक कवच फोडण्यासाठीं अत्याचाराचीच आवश्यकता आहे. समर्थ व सुसंघटित अशा पक्षानें, स्पष्ट व निश्चित ध्येयासाठीं क्रांतीचें निशाण हातीं घेतलें नसेल, तर ती क्रांति कोणत्याहि वाटेनें जाऊं लागते; आणि ज्या अर्थी रशियन हुकूमशाहीच्या परिस्थितींत असा पक्ष वाढूं शकत नाहीं, त्याअर्थी रशियांत जी नवी क्रांति होईल ती अंदाधुंदीची व भयंकर स्वरूपाची असेल. १९१७ च्या क्रांतिच्या उलट स्वरूप तिचें असेल, आणि तिच्यांत सुधारणा होण्याला वाव राहणार नाहीं.

या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा कीं, सर्व युरोपभर पसरूं पाहणारा रशियन साम्यवादाचा तोतया थोपवून धरण्यासाठीं खरी समाजवादी चळवळ निर्माण होणें अगत्याचें आहे. या कामाला समर्थ असा एकहि डावा पक्ष डोळ्यांपुढें दिसत नाहीं. योग्य वेळीं नवी जागतिक चळवळ उत्पन्न होऊन हा प्रलय टळेल कीं काय हें सांगणें कठीण आहे. जर तसें घडलें तर, डाव्या पक्षानें आजवर ज्या ज्या चुका केल्या व त्याग केले, ती सर्व मानवतेच्या सेवेसाठीं दिलेली किंमत मानतां येईल, आणि ती किंमत कांहीं फार मोठी म्हणतां येणार नाहीं. पण जर तसें घडलें नाहीं तर, आपण व पुढील कांहीं पिढ्या यांना फार वाईट काळ येईल व पाश्चात्य राष्ट्रांची अधोगति ही एक ऐतिहासिक घटना होऊन बसेल.

♤ ♤ ♤

रशियाच्या प्रयोगांतील अपयशापासून आपण सर्वांत मोठा धडा घ्यावयाचा

तो हा कीं, आर्थिक शक्ति महत्वाच्या असतात हें खरें, पण त्याच काय त्या महत्वाच्या असतात असें नव्हे. राष्ट्रीय अर्थ-कारण हें जुलुमाचें व परागतीचें साधन होऊं शकतें. केवळ अर्थकारणावर आपलें सर्व अवधान केंद्रित केल्या-कारणानें, समाजवादी पक्ष जनतेच्या विविध व चंचल अशा मनोवृत्तींना पाठमोरा झाला.

डाव्या पक्षाची भ्रमाच्या मगरमिठींतून सुटका करणें हें अर्धें कार्य होय. उरलेलें अर्धें कार्य म्हणजे नव्या आध्यात्मिक वातावरणांत भ्रातृभावाची नवी संघटना उभारणें. या संघटनेच्या पुढाऱ्यांनीं, जनतेच्या जीवनाचे अंशभागी होण्या-साठीं दारिद्र्याचें व्रत घेतलें पाहिजे, आणि अनिर्बंध सत्ता संपादन करण्या-पासून दूर राहिलें पाहिजे. असें होणें हें जर तुम्हांला मनोराज्य वाटत असेल, तर समाजवाद येणें हेंहि मनोराज्यच ठरेल.

सध्यांच्या ज्ञान-युगानें विभूतिपूजेचा अंत केला आहे. यामुळें झालेल्या जखमा अजून भरून निघाल्या नाहींत. प्रत्येकाच्या अंतर्यामीं पोकळी निर्माण झाली आहे—प्रत्येकाच्या आत्म्याला मोठी तहान लागली आहे. समाजवादी तत्त्वज्ञानानें जर ही पोकळी भरून काढली नाहीं व ही तहान शमविली नाहीं, तर त्याला आपल्या काळांत अपयश आल्याशिवाय राहणार नाहीं. फ्रेंच राज्यक्रांतिनंतर समाजवादी तत्त्वज्ञानाची जी परिणति झाली, ती म्हणजे इतिहासाच्या एका प्रकरणाची समाप्ति आहे—नव्या प्रकरणाची सुरुवात नव्हे.

महात्मा व हुकूमशहा :२:

"शास्त्र म्हणजे प्रचंड व प्रभावी पुनरुक्ति."

—सी. सी. प्रॅट.

('दि लॉजिक ऑफ मॉडर्न सायकॉलॉजी.')

संध्याकाळचे सहा वाजले आहेत. मी नुकतेंच मद्यपान केलें आहे. आणखी दोन पेले झोंकण्याचा जबर मोह मला होत आहे. हा निबंध लिहीत न बसतां बाहेर जाऊन भोजन करून यावें असेंहि मला वाटतें. याविषयीं मी माझ्या मनाशीं पाव तास झुंजलों आहें. पण शेवटीं मी बाटली बंद केली, कपाटांत ठेवली व माझ्या टेबलापाशीं येऊन बसलों; तेव्हां मला मोठें समाधान वाटलें.

शास्त्रीय दृष्ट्या, हें माझें समाधान अगदीं वरवरचें आहे. कारण मी माझ्या मनाशीं झुंज खेळण्यापूर्वीच या प्रश्नाचा निकाल लागलेला होता. मला हें उथळ समाधान मिळावें, आणि आतां मी जें लिहीत आहें तें लिहीत बसावें, हेंहि पूर्व-नियोजितच आहे.

अर्थात्, माझ्या मनांतल्या मनांत मी असें मानीत नाहीं—पाव तासापूर्वी तर तसें खासच मानीत नव्हतों. जर मी तसें मानीत असतों, तर "अंतः-कलह" निर्माणच झाला नसता आणि "दैवांतच असें लिहिलें आहे." असें म्हणून मी मद्याचे पेल्यावर पेले झोंकीत राहिलों असतों.

याप्रमाणें नियतिवादावरील माझा अविश्वास हा माझें वर्तन नियंत्रित करणाऱ्या घटनांमधून उत्पन्न झालेला असला पाहिजे. "हें सर्व पूर्व-नियोजित आहे." यावर माझा अविश्वास असेल, तरच पूर्व-नियोजित घटना घडून येईल. नियतिवर मी विश्वास ठेवूं नये अशीच माझी नियति दिसते. नियतिवादाच्या कल्पनेंतच विचार व आचार यांचा भेद अंतर्भूत असतो. "असें झालें तर" यावर आचाराचे नियम उभारलेले असतात, आणि कारण-मीमांसेवर तर्काचे नियम आधारलेले असतात. अशा जगांत राहणें मानवाला नियतिवादामुळें भाग पडतें.

हा विरोधाभास केवळ शास्त्रीय नियतिवादांतच आढळतो असें नव्हे, धार्मिक नियतिवादाच्या जगांत राहणारे मुसलमान लोकहि अशी द्विधा मनोवृत्ति प्रकट करतात. कुराणाच्या आज्ञेप्रमाणें प्रत्येक मुसलमान असें मानतो कीं, "प्रत्येक

मानवाचें नशीब त्याच्या गळ्यांत बांधलेलें असतें." परंतु जेव्हां त्याचे हातून कांहीं चूक घडते, तेव्हां तो आपल्या दुष्मनाला व स्वतःलाहि शिव्याशाप देतो.— जणुं कांहीं सर्व माणसांना आपल्या आवडीप्रमाणें आचार ठेवतां येतो. त्याचें वर्तन, आपल्या क्षेत्रांत, तंतोतंत कार्ल मार्क्सप्रमाणें असतें. मार्क्स म्हणे, "मनुष्याच्या मनाची ठेवण ही त्याच्या परिस्थितीचें फल होय." पण परिस्थितिजन्य कारणांनीं दुसरा माणूस त्याच्याशीं मतभेद दाखवूं लागला कीं, त्याचेवर मार्क्स शिव्यांची लाखोली वाही.

नियति विरुद्ध स्वातंत्र्य, हें द्वंद्व मानवाच्या मनांत सनातन आहे. या दोन्ही कल्पना मानवाच्या मूलभूत सहजप्रवृत्तींतून निर्माण झालेल्या आहेत. त्या कल्पना निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या रूपांनीं प्रकट होतात इतकेंच. या सृष्टिमधील अव्यवस्था पाहून भयभीत झालेल्या मानवाला त्या सृष्टीच्या पाठीशीं कांहीं एक व्यवस्था आहे, तिला नियंत्रित करणारें तत्त्व आहे, असें मानण्याची गरज भासूं लागते. त्या गरजेंतून नियतिवादाची कल्पना निघालेली आहे. आपण असुरक्षित आहोंत—साऱ्या विश्वांत वैषम्य-नैर्घृण्य आहे, अशी चिंता मनुष्याला वाटूं लागली म्हणजे तो आपल्या समाधानासाठीं कांहीं उपपत्ति शोधूं लागतो. त्यामुळें जें चमत्कारिक व भयप्रद असतें, तें परिचित होऊं लागतें. प्राथमिक अवस्थेंतील धर्म यासाठींच नैसर्गिक शक्तींना मानवाचें रूप देत असत. त्या देवता कितीहि उग्र व स्वैर असल्या, तरी मानवाच्या भावनांनीं त्यांचें हृदय हलत असे. त्यामुळें आपल्यावर जें जें संकट कोसळेल, त्याची उपपत्ति लागते व समाधान होतें.

सुमारें १६०० सालीं नियतिची कल्पना बदलली. तेव्हां वस्तूंचे स्वरूप गणितानें मांडतां येऊं लागलें आणि वस्तुवस्तूंचे एकमेकांवर काय परिणाम होतात यांचें शास्त्र बनलें. रंग, आवाज, उष्णता व थंडी, वर व खालीं, पशु व मानव हे सारे पदार्थ निरनिराळ्या कोटींतील आहेत, ही भावना जाऊन त्यांच्यामध्यें फरक फक्त अंशांचा आहे, जातीचा नव्हे, अशी उपपत्ति पुढें आली. तिचें फल असें कीं, या विश्वाच्या नियंत्रक शक्तिचें ज्ञान गणिताच्या भाषेंत लिहितां येऊं लागलें. मानवाचें ज्ञान जसजसें वाढत चाललें, तसतसे त्या दैवतांचे मानवी विकार कमी कमी होत गेले, आणि शेवटीं त्यांचें मानवी स्वरूप पूर्ण मावळलें. विश्वाच्या नियंत्याचें अधिष्ठान अशा प्रकारें बदललें, तरी मानवाच्या गळ्याभोंवतीं अडकविलेला नियतिवाद मात्र तसाच शाबूत राहिला. पूर्वी देवता अतिमानुषतेच्या चढत्या क्षेत्रांत होत्या; आतां अणु-परमाणु हे मानवाच्या

खालच्या कोटींतील उतरणीवर आलेले आहेत. पण दोन्हींचीं फलितें एकच. पूर्वी नियतिवाद मानवावर वरून खालीं अंमल गाजवीत असे, आतां तो खालून वर अंमल चालवीत आहे.

नियतिवादाचा विरोधक म्हणजे इच्छा–स्वातंत्र्य. त्याचा मानसशास्त्रीय अर्थ, प्रेरणा व संयम यांच्या द्वंद्वाचें फल. इच्छा–स्वातंत्र्याची कल्पना सर्व नैतिक मूल्यांच्या पद्धतिमध्यें मान्य केलेली आहे. नियतिवाद व इच्छा–स्वातंत्र्य या दोहोंवरील विश्वास हा मानवाच्या प्राथमिक प्रवृत्तींतूनच उत्पन्न होतो. नियतिवादावरील विश्वासामुळें नैसर्गिक शक्तिचें भय कमी होतें, विश्वाचें कोडें उलगडतें, आणि आपला कोणी त्राता आहे, या भावनेनें समाधान लाभतें. इच्छा-स्वातंत्र्यामुळें कृतीची प्रेरणा मिळते. हे दोन्ही परस्परांना पोषक आहेत.

२

प्राथमिक अवस्थेंतील मानवाचें सर्व आयुष्य धार्मिक विधींनीं भरलेलें असे. या धार्मिक विधींचा उद्देश आपल्या नशिबाचें नियंत्रण करणाऱ्या देवता प्रसन्न करणें हा असे. हे धर्मविधि करावेत का न करावेत, केले तर चांगल्या पद्धतीनें करावेत का वाईट पद्धतीनें ? हें ठरविण्याचें पूर्ण स्वातंत्र्य आपणाला आहे, असा विश्वास त्याला वाटत असे. याचा अर्थ तो त्या नियतिचा गुलाम नसे, तर तो आपली इच्छा त्या दैवतावर लादीत असे. तीं दैवतें मानवी भावनांनीं युक्त असत—अपूर्ण असत. त्यांच्या आचारांचें नियमन करण्यासाठीं वरिष्ठ देवांची गरज असे. त्या देवांवर दुसरे देव आणि त्यांच्यावर तिसरे—असें मागें जातां जातां पूर्ण निराकार, सर्वव्यापी व सर्वज्ञ अशा ईश्वराच्या कल्पनेपाशीं मानव जाऊन थडकतो.

प्राथमिक अवस्थेंतील माणूस स्थूल नियतिवादावरहि संतुष्ट असतो. मानवी मनाचा जसजसा विकास होतो, तसतशी उच्च उपपत्तीची त्याला भूक लागते, नियतिवादाचें जाळें घट्ट विणलें जातें, आणि तें जाळें हातीं घेणारी देवता सकल-गुण-संपन्न बनत जाते. या अवस्थेमध्यें नियतिवाद विरुद्ध इच्छा-स्वातंत्र्य हें द्वंद्व पुराण-कथांमध्यें नाट्यरूपानें प्रकट होतें. प्रभूच्या इच्छेविरुद्ध ईव्ह बऱ्या-वाईटाच्या ज्ञानाचें फळ चाखते. प्रोमेथस हा देवांचा अग्नि चोरून आणतो. जेकब देवदूतांशीं संग्राम करतो. "बेबलचा बुरुज" बांधला जातो व उध्वस्त केला जातो.

नियतिवाद व इच्छा-स्वातंत्र्य या दोहोंच्या संघर्षांत नियतिवादाचा जय होतो. कारण इच्छा-स्वातंत्र्याची कल्पना नंतरची आहे–अल्पवयस्क आहे. त्यामुळें

प्रोमेथसचा प्रत्येक प्रयत्न पराभूत होतो. हर्क्यूलसचे गोठे साफ करण्याचें कार्य कधींच तडीस जात नाहीं. एकंदरींत मानवाचे प्रयत्न ईश्वरी इच्छेपुढें पंगु ठरतात. त्यामुळें आत्मसंरक्षणाची इच्छा आत्म-विश्वासापेक्षां बलवत्तर होते. दुसऱ्या एकाद्या ग्रहावर देवमानवांच्या प्रत्येक संग्रामांत मानवाचा विजय दाखविला जाईल, तर तेथील मानवसमाज हा स्वतंत्र वृत्तीचा व आत्मविश्वासानें भरलेला असा होईल. त्याला धर्मगुरूंची, समाजनेत्यांची किंवा राजांची गरज लागणार नाहीं. असें त्या मानवसमाजाचें कल्पना-चित्र एकाद्या पावसाळी दिवसांत मनांत रंगविणें किती मौजेचें !

या कोड्याचा उलगडा करतांना ख्रिस्ती धर्मानें एक पाऊल पुढें टाकलें आहे. त्याच्या मतें, मानवाचें स्वातंत्र्य हें मिथ्या नाहीं—मानवी सृष्टीमध्यें सत्यच आहे, पण अतिमानवी सृष्टींत मात्र ईश्वर हा सर्वत्र व सर्वज्ञ आहे, आणि तो या विश्वाचें पूर्ण नियमन करतो. विश्वाचेच दोन भाग पाडले आहेत—एकांत मानवाला स्वातंत्र्य व दुसऱ्यांत देवाला स्वातंत्र्य. मात्र देवाचे नियम मानवाला अज्ञात असतात, पण मानवाच्या सर्व गोष्टी मात्र देवाला ज्ञात असतात. मानव स्वतःला जसें मानतो, तसा त्याचा देव असतो. "जशी ज्याची श्रद्धा तसा तो होतो." प्राथमिक मानवाच्या कल्पना-सृष्टींत देव व मानव यांचे आचार-विचार समान असत, परंतु ख्रिस्ती धर्माच्या कल्पनेप्रमाणें देव, मानव व पशु यांचे नियम निरनिराळे आहेत.

३

१७ व्या शतकाचे आरंभीं दैववादाला पूर्ण निराकार स्वरूप आलें व ईश्वर हा एक गणिती बनला. नवीन शास्त्रज्ञांनीं असें दाखविलें कीं, ईश्वरानें हें जग बीज-गणिताच्या नियमाप्रमाणें बनविलें आहे. नंतर विश्वाचा वास्तववादी विचार करतां करतां शास्त्रज्ञांनीं ईश्वराला नैसर्गिक नियमांतच विलीन करून टाकलें. कारण जो नियम परिपूर्ण आहे, त्याला नियंत्रकाची गरज नसते.

अणु, तारे, प्राणी, मेंदू, उच्च विचार—या सर्वांचें नियमन करणारे कायदे एकच आहेत असें मानलें जाऊं लागलें. त्यामुळें धार्मिक क्षेत्रांतील नियतिवादा-प्रमाणेंच शास्त्रीय क्षेत्रांतील नियतिवादहि विनाशाकडे धांव घेऊं लागला. अनुवंश—शास्त्र व परिस्थिति यांच्या कैचींत मानव सांपडला.

♤ ♤ ♤

नीतिशास्त्र हें इच्छा–स्वातंत्र्यावर आधारलेलें असतें. देव–देवतांना वश करून घेण्यासाठीं आदिमानव प्रार्थना करीत असे, शरण जात असे, धमकी देत असे, लबाडी करीत असे, लांच देत असे, स्वतःचें बलिदानहि करीत असे. हेंच त्याचें नीतिशास्त्र. इच्छास्वातंत्र्य व नियति यांच्यामधील पूल म्हणजे त्या आदिमानवाचे धर्मविधि.

देवाच्या ठायीं जसजशी सर्वंकषता भाविली गेली, तसतसे त्याला धमकी देण्याचे प्रकार बंद पडले, आणि नम्रता व शरणागति यांना नीतिशास्त्रांत महति प्राप्त झाली. ईश्वरी आज्ञेपुढें मानवाचें इच्छा–स्वातंत्र्य गौण ठरलें. ती ईश्वराची आज्ञा आपल्याला अनुकूल करून घेण्यासाठीं आपल्या इच्छेचा बळी देण्यास मानव तयार झाला. त्यानें आपलें इच्छा–स्वातंत्र्यहि ईश्वरार्पण केलें; आणि समाधि-अवस्थेंत तर जीवात्मा हा विश्वात्म्याशीं एकरूपच होतो. येथें विश्वाचा उलगडा पूर्ण होतो. "इच्छा न करण्याची मी इच्छा धरतों." या सूत्रांत सर्व आध्यात्मिक शास्त्रांचें सार आलें आहे. त्याचा अर्थ— अनासक्ति.

देवांचें स्वरूप गणिताच्या परिभाषेंत जसें बसलें, तसेंच नीतिशास्त्राचेंहि. "पुष्कळांचें पुष्कळ सुख" हें ध्येय नीतिशास्त्रानें मानवापुढें धरलें. इच्छा-स्वातंत्र्य व नियतिवाद यांचा समन्वय नीतिशास्त्रानें केला. मात्र देवतांचें स्वरूप बदलल्याबरोबर धर्मविधीचें स्वरूपहि बदललें. निसर्गाच्या शक्ति मानवाचें भवितव्य नियंत्रित करतात. पण त्या नैसर्गिक शक्तिवर प्रभुत्व मिळविण्याचें तंत्र मानवाला साध्य होत आहे. म्हणून तो स्वतःला दुसऱ्याचा दास मानण्याऐवजीं प्रभु मानूं लागला आहे. पूर्वी शांतपणें ध्यान--धारणा केल्यानें विश्वाचें ज्ञान होई, पण आतां त्यासाठीं प्रत्यक्ष संशोधन करावें लागतें. पूर्वी नंदन-वनांतून अधःपात झाल्यामुळें मानव जन्मास आला अशी कल्पना होती; आतां, विकासवादाप्रमाणें, अमिबापासून चढत चढत मानव उच्च श्रेणीला येऊन पोंचला आहे, आणि जीवनाचा लढा खेळण्यासाठीं सतत हिंसा करीत तो वर वर जात आहे, अशी कल्पना रूढ होत आहे. समाजानें दैवी आज्ञेप्रमाणें चालावें या ख्रिस्ती विचार-सरणीचा हेतु मानवाची "अंतर्गत सुधारणा" करावी हा होता. आतां जो नवा परिपूर्ण समाज निर्माण होत आहे त्याचा हेतु "परिस्थितींत सुधारणा" करावी असा आहे. नव्या आचारशास्त्राचा भर निष्क्रियतेपेक्षां क्रियेवर, शरणागतीपेक्षां प्रभुत्वावर, नम्रतेपेक्षां कठोरपणावर, मार्गदर्शनापेक्षां शास्त्रीय सत्यतेवर अधिक आहे. त्यामुळें साधुवर क्रांतिकारक कुरघोडी करतो--महात्म्यावर हुकूमशहा मात करतो.

पूर्वी ईश्वरी कल्पनेचा उपयोग जगाचें ज्ञान व स्वत.चें संरक्षण या दोन्ही कामासाठीं होत असे, आतां शास्त्रीय नियतिवादानें ज्ञानाचें कार्य आपल्या अंगावर घेतलें आहे. पण "आपला पिता आपलें रक्षण करीत आहे." अशी धीराची भावना शास्त्र निर्माण करूं शकत नाहीं. म्हणून पुनः पुराणकथांकडे मानव धांव घेत आहे. शास्त्राच्या घड्याळांतील टिकटिकीपेक्षां अरण्यांतील धार्मिक नगाऱ्यांचा आवाज मोठा होत आहे.

४

या शतकाचे प्रारंभीं, तात्त्विक पदार्थविज्ञानापासून प्रायोगिक गर्भशास्त्रापर्यंत विज्ञानाच्या बहुतेक सर्व शाखांत, शास्त्रीय नियतिवादाचे बाबतींत, सुस्थावस्थेंत असलेला एक पेंचप्रसंग विकोपास पोंचला.

१९०० सालच्या सुमारास, कांहीं विशिष्ट अणु-पुंज, छोट्या ओडिपस्प्रमाणें पृथक्पणें वागतांना आढळले. त्यांचें वर्तन एका विशिष्ट योजनेस अनुसरूनच होतें, पण स्वतःच्या कक्षेंत ते स्वातंत्र्यानें वागत असल्याचें आढळलें. रेडियमच्या सूक्ष्म कणाचें विभजन, प्रत्येक सेकंदास ५० कोटि अणु, या वेगानें होण्याची नियति ठरलेली आहे; आणि तें कार्य चालू असतांना, ते कण प्रकाश देत असतात; परंतु तो प्रत्येक अणु आपल्या परिस्थितींत कोणत्याहि बाह्य दडपणापासून मुक्त आहे असेंहि आढळून आलें.

रूदरफोर्ड व सॉडी या शास्त्रज्ञांनीं १९०३ सालीं असा शोध लावला कीं, रेडियो-ॲक्टिव्ह अणूंचें विभजन स्वयंस्फूर्त असतें–म्हणजे अणूची घटना, स्थिति किंवा परिस्थिति यांवर तें मुळींच अवलंबून नसतें. अणूच्या सद्यःस्थितीचें अत्यंत यथार्थ वर्णन शास्त्रीय परिभाषेंत एवढेंच करतां येईल कीं, त्याच्या भवितव्याविषयीं कांहींच निर्णय सांगतां येत नाहीं. त्याचें भवितव्य, जीन्सनें म्हटल्याप्रमाणें, बाहेरून ठरावयाचें नसून, अंतर्गत घटनेवरूनच निश्चित व्हावयाचें आहे. प्रत्येक अणु स्वातंत्र्य उपभोगतांना दिसतो. याचा अर्थ इतकाच कीं, त्याच्या वर्तनाचा उलगडा पदार्थविज्ञानाच्या परिभाषेनें मुळींच करतां येण्यासारखा नाहीं.

आइन्स्टाइननें १९१७ सालीं असा शोध लावला कीं, स्वयंस्फूर्त विभजनाचा हक्क सर्वच अणूंना आहे. त्याच सुमारास, श्रोडिंजर या शास्त्रज्ञानें असा सिद्धांत मांडला कीं, शून्य अवकाशांतून परिभ्रमण करणाऱ्या इलेक्ट्रॉनचा ठावठिकाणा नक्की सांगणें कठीण आहे, केवळ अंदाजानेंच तो सांगतां येईल; आणि अणूच्या

अंतर्गत असलेल्या इलेक्ट्रॉनबाबत अशीच अनिश्चितता आहे, असा सिद्धांत हिसेनबर्गनें मांडला आहे. डायरॅक् या शास्त्रज्ञानें तर असेंच गृहीत धरलें आहे कीं, काल व स्थल यांच्या पलीकडे, व पूर्णपणें आपल्या ज्ञानापलीकडे असलेल्या खालच्या थरांतूनच, स्थल-कालांतील सर्व घटना उद्भूत होतात.

या सिद्धांतामुळें पदार्थ-विज्ञानांत क्रांतिच झाली. त्या क्रांतीचा परिणाम आध्यात्मिक कल्पनांवरहि दिसून आला. ईशज्ञानाच्या चर्चेपासून मिस् डोरोथी सेयर्सच्या रहस्यकथांपर्यंत सर्वत्र क्रांतीचा हा परिणाम दिसून येऊं लागला. यांत निराशेची गोष्ट एकच घडून आली—आणि ती ही कीं, वरवर दिसणारी शास्त्रीय अराजकता नष्ट झाली आणि नियतिवाद स्वस्थानीं पुनः आरूढ झाला. हा फरक, आपण सूक्ष्म जगत् सोडून दृश्य जगताच्या राज्यांत शिरलों कीं जाणवूं लागतो. प्रत्येक अणु, ओडिपस्प्रमाणें, कितीहि स्वच्छंदानें वागत असला, तरी योग्य आकाराचे अणु-समूह आकलनीय अशा मार्गानेंच जात असतात.

अशा प्रकारें, अर्वाचीन पदार्थविज्ञानाचें फलित हें आहे कीं, सृष्ट पदार्थांचें स्पष्टीकरण भौतिक शास्त्रांना कांहीं मर्यादेपर्यंतच करतां येतें. मात्र त्याचा अर्थ असा नव्हे कीं, अणूच्या पोटांत कांहीं दैवी शक्ति कार्य करीत आहे. या सर्वांचा मथितार्थ इतकाच कीं, सूक्ष्म सृष्टींतील वस्तूंचें वा घटनांचें वर्णन वा स्पष्टीकरण आपल्याला स्थल—कालाच्या व कार्यकारणभावाच्या दृश्य साधनांनीं, यथायोग्य रीतीनें, करतां येणें शक्य नाहीं. मानवी क्षेत्रांतील अनुभवाची कक्षा ही त्या क्षेत्राचे खालीं असणाऱ्या घटनांना लागू पडणारी नाहीं. त्याचप्रमाणें, त्या क्षेत्राचे वर वावरणाऱ्या घटनांनाहि लागू होणारी नाहीं, हें आधुनिक विश्वविद्येनें सिद्ध केलें आहे.

स्वातंत्र्य व नियतिवाद यांतील या विसंवादाचें अणूच्या साम्राज्यांतील स्वरूप पुढील शब्दांनीं वर्णितां येईल:—

प्रत्येक इलेक्ट्रॉनला किंवा परमाणूला स्वातंत्र्य आहे, याचा अर्थ अनिर्बंधता किंवा दैवी प्रेरणा आहे असा नाहीं, तर फक्त, मानवी व्यवहाराला लागू असणाऱ्या निर्बंधापासून मुक्तता असा आहे. त्यांची हालचाल गणिती मोजमापानें किंवा मानवी अनुभवावरून निघालेल्या विचार—पद्धतीनें विशद करतां येणार नाहीं. ते 'इहलोकींचे' नाहींत असेंच म्हटलें पाहिजे, मात्र 'इहलोक' म्हणजे, आपण जें भौतिक दृश्य जगत् पाहतों तें, असा अर्थ केला पाहिजे. निराळ्याच 'लोकांत' त्यांचें वास्तव्य असतें. त्या लोकाचे व आपल्या दृश्य जगताचे नियम एक नसतात. त्यामुळें एकावरून दुसऱ्याचें अनुमान काढतां येणार नाहीं.

'नाहीं-नाहीं' असेंच वर्णन वरील वाक्यांत आलेलें आहे. कारण अणूच्या अधस्तरांतील सर्व घटना 'नेति नेति' अशाच शब्दांनीं वर्णन कराव्या लागतात. त्यामुळें आमच्या भौतिक शास्त्रांची मर्यादा किती आहे हें स्पष्ट होतें. पण शास्त्रांच्या या मर्यादितपणाचें ज्ञान हें शोचनीय किंवा दैवी मानण्याचें कारण नाहीं. त्या ज्ञानाचा अर्थ इतकाच नीं, गणिती पद्धतीनें विश्वाचें संपूर्ण आकलन करण्याची आशा फोल ठरली आहे. भूतकालांत विश्वाचें ज्ञान दैवी शक्तीनें करून देण्याचा प्रयत्न जसा फोल ठरला, तसाच हा प्रकार. पण यांत दुःख मानण्यासारखें काय आहे? ईश्वर गणितशास्त्राच्या कक्षेंत येऊन आतां कोटें अवघीं तीन शतकें होत आहेत; अधिक संशोधनाला आपल्याला अजून विपुल काल आहे.

गणितागत पद्धतीनें ज्ञान संपादण्याची एकमेव रीत आतां संपुष्टांत येत आहे, पण त्याबरोबरच विश्व--ज्ञानाचीं नवींनवीं साधनें उपलब्ध होत आहेत. पूर्वीच्या कालीं, विश्वाचीं कोडीं सोडविण्यासाठीं, धर्मशास्त्रें जी युक्ति करीत, तशाच युक्तीचा अवलंब भौतिक शास्त्रेंहि आपले गूढ प्रश्न सोडविण्यासाठीं करीत आहेत हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. ही युक्ति म्हणजे, 'विश्व हें एकजिनसी आहे आणि एकाच व्यापक नियमानें त्याचे व्यवहार चालत असतात.' ही कल्पना टाकून देऊन "विश्वांत निरनिराळ्या अवस्थांच्या श्रेणी आहेत." असें मानणें.

या कल्पनेनें भयभीत होऊन कांहीं शास्त्रज्ञ असें मानूं लागले आहेत कीं, आम्ही पुनः धर्म-क्षेत्रांत शिरत आहोंत. पण नाहीं. स्वातंत्र्य व नियतिवाद या द्वंद्वाचें कोडें उकलण्यासाठीं योजलेली ही एक पद्धति आहे. पूर्वीच्या धार्मिक पद्धतीशीं तिचें साम्य दिसतें, एवढेंच. या द्वंद्वाचें ज्ञान पूर्णत्वानें जोंवर झालें नाहीं, तोंवर असा विश्वास ठेवणें अवश्यच आहे. हें द्वंद्व—किंवा हा विसंवाद—तीव्र झाला म्हणजे शास्त्रीय ज्ञानांत पेंचप्रसंग उद्भवतो.

५

पदार्थ-विज्ञानापेक्षांहि अर्वाचीन प्राणिशास्त्रामध्यें, जगाच्या विविध अवस्था—श्रेणी मानण्याची गरज अधिक आहे. केंब्रिज येथील प्राणिशास्त्रज्ञ जे. नीडहॅम् यानें आपल्या लेखांत हा नवा दृष्टिकोन स्वीकारल्याचें दिसून येतें. हा शास्त्रज्ञ मार्क्सवादी—किंबहुना स्टॅलिनवादी—वृत्तीचा असून आध्यात्मिक किंवा चैतन्यवादी विचारसरणीकडे एक पाऊलहि टाकण्यास तो अतिशय अनुत्सुक आहे. म्हणून त्याचें उदाहरण

विशेष महत्त्वाचें आहे. स्वतःच्याच प्रयोगशाळेंत, प्रांजल बुद्धीनें, प्रयोग केल्यावर या हुकूमशहा-शास्त्रज्ञांना जे सिद्धांत उपलब्ध झाले, त्यामुळें, नाखुषीनें कां होईना, पण ते वाहत्या प्रवाहाबरोबर चालू लागले. नीडहॅमची प्रगति दाखविण्यास दोन उतारे दिले तरी पुरे.

नीडहॅमनें १९२८ सालीं लिहिलें, "सांपत्-काळीं जावशास्त्र हें सामान्यपणें रसायनशास्त्र बनलें आहे आणि शरीरशास्त्र हें पदार्थविज्ञानाच्या जवळ येत आहे." पण १९४१ सालीं त्यानें लिहिलें, "प्राणिशास्त्राचें रूपांतर पदार्थविज्ञान किंवा रसायन या शास्त्रांत करतां येणें शक्य नाहीं. कारण असत्पासून सत् निर्माण करणें अशक्य आहे." सॅम्युअल बटलर यानेंहि असेंच विधान केलें आहे कीं, "असत् हें सत् असूं शकत नाहीं." †

प्रायोगिक गर्भशास्त्राच्या विकासामुळें, गेल्या शतकाचे अखेरीस, प्राणिशास्त्रांत पेंचप्रसंग निर्माण झाला. १८९५ सालीं ड्रीश यानें असें दाखवून दिलें कीं, सर्व शास्त्रांचीं अनुमानें बाजूस सारून, कांहीं विशिष्ट जातींच्या गर्भावर कोणतेहि संस्कार करतां येतील—आणि तरी त्या गर्भांतून बाहेर येणाऱ्या प्राण्यांत कांहींहि फरक होणार नाहीं. वेडकाच्या अंड्याचें पहिलें विभजन झाल्यावर, दोहोंपैकीं एक पेशी कापून टाकली, तर अर्धा बेडूक जन्मास येत नाहीं, तर लहान आकाराचा पण संपूर्ण बेडूक जन्म पावतो. पुढील अवस्थेमध्यें हाच प्रयोग केला, तरी परिणाम हाच दिसून येतो. गर्भाशयांतील पेशींचा मोठा समूह हलविला, तरी परिणामांत कांहीं फरक होणार नाहीं. एकाद्या प्राण्याच्या पायाचे जागीं शेपटीची पेशी जोडली, तर तींतून शेपटी येत नाहीं, तर पाय प्रकट होतो. यामुळें शास्त्रज्ञांना

---

† एका उताऱ्यांत नीडहॅम् म्हणतो, "चित् हें जडापासून भिन्न आहे तें केवळ 'प्रमाणा'मुळें, 'प्रकारा'मुळें नव्हे. कारण सृष्टीच्या उच्च पातळीवर तें असतें. पण 'प्रकारां'तहि तें भिन्न असतें असें म्हणणें प्राप्त आहे. कारण उच्च पातळीवरील नियमच येथें अंमलांत येतात." ('टाइम्, दि रिफ्रेशिंग रिव्हर.')

आतां तर्कशास्त्राच्या प्राथमिक नियमाप्रमाणें पाहतां, 'प्रकाराची भिन्नता असणें' व 'प्रकाराची भिन्नता नसणें'—ही दोन्ही विधानें बरोबर असूं शकणार नाहीत. मार्क्सच्या विरोध-विकासवादाच्या भ्रांतिनें सुबुद्ध माणसाच्या मेंदूंतहि केवढे उत्पात होऊं शकतात, याचा हा सबळ पुरावाच आपल्यापुढें उभा आहे. "चित् हें जडापेक्षां केवळ संख्येमुळें भिन्न आहे, जीवन-व्यापारामुळें नव्हे." हें मत वाक्याच्या पूर्वार्धांत ग्राह्य मानल्यामुळें घोटाळा झाला आहे—आणि त्याचें खंडन उत्तरार्धांत करावें लागलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. दि. ...

मोठा विस्मय वाटला. कारण ज्या पेशी, पदार्थविज्ञान व रसायन या शास्त्रानुसार शेपटी बनावयाच्या, त्या आपली दिशा बदलून पाय कशा बनल्या? त्या पेशींना आपल्यावर डॉ. ड्रीश यांच्या सुरीचा प्रयोग होणार अशी कल्पना कशी असणार?

गर्भाच्या वाढींतील पुढील विशिष्ट अवस्थेंत हा परिणाम उलट होतो, हें दिसून आल्यावर तर, शास्त्रज्ञाचा हा विस्मय अधिकच वाढला. गर्भाचे अवयव विशिष्ट अवस्थेस पोंचले म्हणजे त्यांची स्थित्यंतर पावण्याची शक्ति नष्ट होते. मग त्यांच्या विकासाची दिशा निश्चित होते. अशा वेळीं, एकादा अवयव कापून अन्य जागीं जोडला, तर त्याची वाढ पूर्ववत्च होते, एवढेंच नव्हे तर, ज्या जागीं तो अवयव जोडला असेल, तेथील पेशींना आपल्यासाठीं जागा करून देण्यास तो अवयव भाग पाडतो. अर्थात् त्या वेळीं त्या पेशी लवचिक असल्या पाहिजेत.

स्पीमन व मॅंगोल्ड यांनीं १९२४ सालीं, अवयव जोडण्याचे जे परिणाम दाखविले, ते तर अद्भुतच आहेत. गर्भावस्थेंतहि वेडकाच्या डोक्यांतील डोळा काढून तो पोटाच्या खालच्या भागाला जोडला, तर पोटाची चामडी पारदर्शक बनते व त्या डोळ्याच्या लेन्सचें काम करते. शेवटीं, पॉल व्हीस् याला तर असें आढळून आलें कीं, हे प्रकार केवळ गर्भावस्थेंतच शक्य आहेत असें नव्हे, तर पुढील उत्क्रांतींतहि शक्य आहेत. नव्या शेपटीचा ताजा तुकडा पायाचे जागीं जोडला, तर तो पायाचे स्वरूपांतच वाढतो; परंतु वाढीस लागलेल्या शेपटीचा स्नायु कोटेंहि आरोपित केला, तरी तो शेपटीसारखाच वाढतो.

जीवनाचे नियम म्हणजे रसायन–पदार्थविज्ञानशास्त्रांतील नियमांचीच वाढलेली आवृत्ति होय, ही यांत्रिक कल्पना पूर्णपणें उध्वस्त झाली आहे. गर्भ-शास्त्राच्या प्रयोगांचें जें फलित दिसून आलें, तेंच प्राणिशास्त्राच्या अन्य शाखांतहि आढळून येतें. अणूच्या राज्यांत स्वतंत्रता व नियतिवाद यांचें द्वंद्व जितकें आहे, त्याहून पेशीच्या राज्यात तें तीव्र आहे. मात्र येथेंहि 'स्वतंत्रता' याचा अर्थ इतकाच व्यावयाचा कीं, सजीव वस्तूंच्या क्रिया निर्जीव वस्तूंच्या नियमानें बद्ध असत नाहींत—जडाचे नियम चित्ला जखडूं शकत नाहींत.

पूर्ण किंवा चतुर्थांश वेडकांत आपला विकास करून घेण्याचें स्वातंत्र्य जीवाला आहे, पण त्याचा अर्थ स्वैरपणा असा मात्र नव्हे. त्या जीवाची वाढ कशी होते, याचा उलगडा होण्यासाठीं योग्य ते प्रयोग करून त्यांचे पडताळे पारखून घेतले पाहिजेत—पदार्थविज्ञान व रसायन या शास्त्रांतील नियमांवरून त्यासंबंधीं अनुमानें बांधतां येणार नाहींत.

जीवन-विकासाचें हें गूढ उलगडण्याचा पहिला प्रयत्न वांझ ठरला. ड्रीश याची मीमांसा म्हणजे पोकळ शाब्दिक खुलासा होता. १९ व्या शतकांतील शास्त्रज्ञांच्या ईथरसारखाच तो पोकळ होता. 'क्ष' घटनेला ग्रीक भाषेंतील नांव दिलें कीं, शास्त्रीय ज्ञान झालें अशा जुन्यापुराण्या समजुतीस धरूनच तो खतपाणी होता. ड्रीशची 'एंटिलेची' म्हणजे 'उदात्त मन' किंवा 'परमेश्वरच' म्हणावा लागेल. (डॉ. सी. डी. ब्रॉड्–'दि माइंड अँड इट्स् प्लेस् इन् नेचर.')

या शतकाच्या पहिल्या तीस वर्षांच्या कालांत, चैतन्यवादी व जडवादी यांचा संघर्ष विकोपास पोंचला आणि मग जगांतील "विविध अवस्थांच्या श्रेणी" मानण्याची युक्ति, कमीअधिक प्रमाणांत, बहुतेक सर्व प्राणिशास्त्रज्ञानीं मान्य केली; अर्थात् तिचें तात्त्विक स्वरूप जो तो आपापल्या पद्धतीनें करीत राहिला.†

या 'अवस्था–श्रेणीं'चे नियम दोन प्रकारचे असतातः—(अ) सर्वसामान्य नियम. हे सर्व अवस्थांना लागू असतात, पण त्यामुळें कशाचाहि फारसा उलगडा होत नाहीं. उदाहरणार्थ, माझ्या बशींतील अंडें, ढकललें गेल्याशिवाय, जागचें हलणार नाहीं, या नियमानें अंड्याविषयींच्या माझ्या ज्ञानांत काय भर पडणार ?

(ब) विशिष्ट नियम. एकाद्या वस्तुसंबंधीं जें कांहीं ज्ञान असावयास हवें, तें बहुतेक सर्व या नियमांतून मिळतें. 'अवस्था–श्रेणीं'तील खालच्या थरांमधील नियमांवरून हे नियम बांधतां येत नाहींत; योग्य त्या अवस्थेंतील घटना अभ्यासूनच हे नियम बसवितां येतात. अणुखालच्या अवस्थेंतील घटनांचा अभ्यास करणेंच जेथें अशक्य होऊन बसतें, तेथें कोणताहि नियम घालून देतां येत नाहीं.

याचा अर्थ असा कीं, कोणतीहि वस्तु, निरनिराळ्या परिस्थितींत, वेगवेगळ्या संबंधांत, भिन्न पातळीवर भिन्न गुणधर्म प्रकट करील. उदाहरणार्थ, कर्ब परमाणूंचा समूह, निरनिराळ्या मिश्रणांत, भिन्न गुणधर्म प्रकट करील. जीव-तत्त्वाचे (स्पर्मा-टूझ) घटकहि गर्भाशयांत असतांना एक गुण दाखवितील, तर पुढें गर्भाची वाढ झाली असतांना, दुसरा गुण दाखवितील. खालच्या अवस्थेंतील त्यांच्या गुणधर्मा-वरून वरच्या अवस्थेंतील गुणधर्माची कल्पना करतां येणें अशक्य आहे. एकाद्या मिश्रणाच्या रासायनिक गुणधर्मांचें स्वरूपहि त्याच्या घटकावरून अनुमित करतां येत नाहीं. कारण, विशिष्ट अवस्थेमध्यें नवे विशिष्ट गुणधर्म एकदम, जणुं कांहीं

† असें विवेचन पूर्वी हेन्री ड्रमंड, हर्बर्ट स्पेन्सर, लॉईड-मॉर्गन, बुइल्समन्, अलेक्झांडर, सी. डी. ब्रॉड प्रभृति शास्त्रज्ञांनी केलेलें होतें; पण त्याचें निश्चित स्वरूप वुडगरच्या 'बायालॉजिकल् प्रिन्सिपल्स' या तात्त्विक ग्रंथांतच पाहावयास मिळतें.

उसळीसरसे, प्रादुर्भूत होतात. त्यावरूनच "आकस्मिक प्रादुर्भावा" चा सिद्धांत जन्मास आला." †

नीच अवस्थेवरून उच्च अवस्थेंतील प्रक्रियेचें अनुमान जसें करतां येत नाहीं, तसेंच उच्च अवस्थेवरून नीच अवस्थेंतील प्रक्रियेचेंहि अनुमान बांधतां येत नाहीं. प्रक्रियेचें अनुमान बांधण्यासाठीं कोणत्याहि वस्तूचे अवयव वेगळे करावे लागतात; परंतु कोणत्याहि अवयवाचें कार्य पृथक्पणें भिन्न असतें आणि त्या वस्तूचा विभाग म्हणून भिन्न असतें. जेव्हां एकादा शरीर–शास्त्रज्ञ स्नायु–संस्थेची तपासणी करतो, तेव्हां तो 'कांहीं मर्यादेपर्यंत' कृत्रिम परिस्थिति निर्माण करून, शरीराची स्थिति बदलूं शकेल—पण 'कांहीं मर्यादेपर्यंतच,'—पूर्णांशानें नव्हे. 'कोणत्याहि अवयवाची पार्श्वभूमि म्हणजे संपूर्ण जीव हीच.' (वुडगर).

कोणत्याहि वस्तूचें विश्लेषण केलें, तर प्रक्रियेंतील समान घटकांचेंच ज्ञान होतें; पण ते समान घटक पुनः एकत्र केले म्हणजे ती प्रक्रिया निर्माण होईल असें मात्र नाहीं. त्या घटकांचे संयोगीकरणाचे नियम प्रत्येक अवस्थेंत वेगवेगळे असतात. उदाहरणार्थ, एका चौकोनाचें विश्लेषण मी बिंदुबिंदूंत केलें, तर गणिताच्या नियमाप्रमाणें त्या बिंदूंची व्यवस्था होईल. ते बिंदु एकाद्या चित्राचे असतील, तर नवी व्यवस्था निर्माण होईल. अवस्थांमध्यें भेदभाव निर्माण होतो, तो वस्तुवस्तूंच्या भिन्नतेमुळें नव्हे, तर प्रत्येक अवस्थेंत त्या वस्तु कोणत्या पद्धतीनें एकत्र येतात, त्यावरून तो भेदभाव ठरतो. एकीकरणाच्या पद्धतीनें नवे गुणधर्म जे उत्पन्न होतात, त्यावरून "अवस्थांच्या श्रेणी" ठरत असतात. विशिष्ट अवस्थेंतील 'स्वातंत्र्य' म्हणजे हे नवे गुणधर्म व नवे संबंध—ते नीच अवस्थेंत निर्णायक स्वरूपांत प्रकट झालेले नसतात. तसेंच, 'नियतिवाद' म्हणजे एका अवस्थेचें पुढील उच्च अवस्थेंतील नियमांवर अवलंबून असणें.—हे नियम अंदाजणें किंवा बदलणें त्या 'नियति'ला शक्य नसतें.

याचाच अर्थ असा कीं, संपूर्ण वस्तुचें 'स्वातंत्र्य' ही त्या वस्तूच्या अवयवाची 'नियति.' या नियतिचें आकलन होण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे आपण अवयव आहों याचें आकलन होणें. अध्यात्मवादी संत हेंच सांगत आले आहेत—अंशाला अंशत्वाची जाणीव हवी. याचा अर्थ, हा विज्ञानावर अध्यात्माचा विजय आहे असा मात्र नव्हे—विज्ञानाच्या मर्यादा त्याच्या स्वतःच्या परिभाषेंत ओळखणें एवढाच त्याचा अर्थ.

† यालाच 'प्रादुर्भूत चैतन्यवाद' म्हणतात. याचा ड्रीशच्या चैतन्यवादाशीं कांहीच संबंध नाहीं. ही भ्रष्ट संज्ञा जितकी लवकर सोडली जाईल, तितकें चांगलें.

६

ही 'अवस्था-श्रेणींची' जाणीव आणि त्या अवस्था गणितागत नियमांचे अतीत असल्याची कल्पना, विज्ञानाच्या विविध शाखांमध्यें स्वतंत्रपणें करी निर्माण झाली, हें पाहणें मनोरंजक आहे.


मानसशास्त्रामध्यें, या शतकाचे प्रारंभींच, गणितागत मापनाची पद्धत मागें पडली. कोहिलर, कोफ्का व वेर्द्रिमेर या मानसशास्त्रज्ञांची विचारसरणी 'पूर्णत्वाच्या' कल्पनेनें भारलेली आहे. उदाहरणार्थ, एक त्रिकोण ही पूर्ण वस्तु आहे. त्याचें विश्लेषण करून मी विशिष्ट लांबीच्या तीन रेषा पाहूं शकतों—मापूं शकतों. पण केवळ दोन इंच लांबीची काळी रेघ ही त्रिकोणाच्या कर्णापेक्षां निराळी असते. त्या रेघेचें विशिष्ट स्वरूप, ती त्या त्रिकोणाच्या पूर्ण आकृतींतील योग्य स्थानीं असेल, तेव्हांच कळूं शकेल. मानवी शरीरांतील मूत्राशयामधील एकादी पेशी पृथक्‌पणें पाहणें–व मूत्राशयांत असतांना पाहणें–याच्याइतकेंच अंतर 'केवळ काळी रेघ' व 'त्रिकोणाचा कर्ण असलेली रेषा' यांमध्यें असतें. फळ्यावर काढलेली रेघ व कर्ण–दोन्हीहि सारखेच; पण आपल्या 'आकलन-शक्ति'चे दृष्टीनें त्या दोहोंत केवढा फरक असतो! दुसऱ्या दोन रेषा जोडल्या कीं, त्या रेघेचा आशय एकदम बदलतो; मात्र ती रेघ पूर्वीसारखीच असते. दुसऱ्या दोन रेषांच्या संदर्भात त्या रेघेचें स्वरूप बदलतें. नवीन मानसशास्त्रालाहि, भिन्न गुणधर्माच्या भिन्नभिन्न अवस्थांच्या श्रेणी मान्यच आहेत.

७

या आपल्या अवस्था-श्रेणी वरच्यावरच्या मजल्यावरील गच्चीप्रमाणें किंवा एकाद्या जिन्याच्या रुंद पायऱ्यांप्रमाणें आहेत. या पायऱ्यांचे आडवे पृष्ठभाग म्हणजे विशिष्ट अवस्थांतील नियमांचें आंखून दिलेलें क्षेत्र, आणि त्या पायऱ्यांचें उभें स्वरूप म्हणजे उच्च अवस्थांचा प्रादुर्भाव दर्शविणारीं 'उड्डानें.' या पायऱ्यांचा क्रम सर्वसाधारणपणें असा असेलः—स्थल-काल, अणुहून खालची अवस्था, पदार्थविज्ञान, रसायन, कण, अभेद्य सजीव घटक (प्रोटीन्, हॉर्मोन इ.), भिन्न होणारे सजीव घटक (पेशी व त्यांचे विभाग), उच्च (अभेद्य) पेशी व अवयव–असें करतां करतां उच्च मानसिक क्रियांपर्यंत हा क्रम राहील. यांपैकीं कांहीं पायऱ्यांचे पोटविभाग पाडावे लागतील आणि वरच्या अवस्थेंत या जिन्याला

फाटा फुटेल–पण आपल्या विवेचनाच्या दृष्टीनें त्याकडे लक्ष न दिलें तरी चालेल.

पायऱ्यांच्या या जिन्याची आकृति आणि तिच्याकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन–पुढीलप्रमाणें राहतील:—



यांतील 'श' म्हणजे शास्त्रज्ञ. त्याला जिन्याच्या साऱ्या पायऱ्या एकाच पातळींत दिसतात–पदार्थविज्ञानापासून मानसशास्त्रापर्यंत एकच अखंड वर्ण-पट पसरलेला आहे असें त्याला वाटतें. दोन अवस्थातील 'उड्डानें' हीं त्याला सूक्ष्म भेद-रेषा वाटतात. प्रत्येक क्षेत्रांतील घटना शास्त्रज्ञाला आकलनीय भासतात—निदान लवकरच आकलन होतील अशा भासतात. 'सर्वत्र शांतता व सुव्यवस्था नांदत आहे आणि कोठें कसलेंच गूढ नाहीं.' असें तो मानतो; फक्त पायऱ्यांना जोडणाऱ्या त्या सूक्ष्म रेषांचें तेवढें कोडें त्याला आहे.

पण 'स'च्या दृष्टिकोनांतून आपण पाहूं लागलों म्हणजे सर्वच कांहीं अज्ञात गूढ वाटूं लागतें. पायऱ्यांचे पृष्ठभाग दिसतनासे होतात आणि त्यांमधील उभीं उड्डानें—त्या भेद–रेषा–तेवढ्या आपल्याला दिसतात. एकादा सृष्ट पदार्थ जसा ठेवलेला असेल, तसा 'श' पाहतो; पण 'स' त्याच्या अंतर्यामीं दडलेलें गूढ पाहात असतो—अखंड सृष्टीचें गूढ उकलण्याचा प्रयत्न तो करतो.

"प्राण्याची नवी अवस्था कशी निर्माण होते—ती पद्धति आम्हांला अजून कळलेली नाहीं." अशी कबुली नीडहॅम् यानें नकळत दिली आहे. पण जें 'अद्याप कळलें नाहीं' तें शोधून काढणें हाच तर विज्ञानशास्त्राचा आद्य हेतु आहे. नीडहॅम् स्वच्छच म्हणतो, "एकाद्या विशिष्ट पातळीवरील नियमांचा नकाशा आपण तपशीलवार काढून देऊं शकलों, तरी निसर्गाच्या रचनेंत ते नियम कोठें, कसे वसतात याचें ज्ञान होण्याची आशा आपल्याला नाहीं—आपल्याजवळील उच्च व नीच अवस्थांशीं त्यांचें नातें कसें निगडित झालेलें आहे, याचा उलगडा होण्याची आशा आपल्याला नाहीं."

खरोखर, सृष्टीचे हे व्यापार आपल्याला गूढ आहेत-अज्ञात आहेत, असें कबूल करण्यास कांहींच अडचण नाहीं. आडव्या पातळीवरील व्यापारांचें तेवढें ज्ञान आपल्याला होतें, हें आपण पाहिलेंच आहे; पण उभ्या मार्गानें चालू असणारे नियम आपल्याला अज्ञातच आहेत.†

'उभ्या' मार्गाचा नियम म्हणजे सृष्टींतील उच्च जीव कसे, केव्हां व कां निर्माण होतात, याचा खुलासा वा अंदाज करण्याचे कामीं आपल्याला उपयोगी पडतील असे नियम. असे नियम शास्त्रशुद्ध भाषेंत आपल्याला मांडून दाखवितां येत नसले, तरी उच्च अवस्था निर्माण होण्याच्या सर्वसामान्य प्रवृत्ति कोणत्या आहेत याचा सुगावा आपण लावूं शकतों. या अवस्थांतराच्या प्रवृत्ति म्हणजे—संयोजन व विभजन, आकर्षण व अपकर्षण, एकीकरण व विशिष्टीकरण, विस्तार व विभाग, मीलन-प्रवृत्ति व मरण-प्रवृत्ति, इत्यादि. सारखेपणा, सुसंवादित्व, प्रेम-अशा कांहीं प्रवृत्ति जीवमात्राच्या सर्व अवस्थांमध्यें दिसून येतात. पण त्याचा अर्थ 'अध्यात्म' असा कसा करतां येईल? निराळ्या अर्थानें त्याला 'अध्यात्म' म्हणतां येईल इतकेंच.

८

स्वातंत्र्य व नियतिवाद या द्वंद्वाच्या चक्रांत सांपडलेल्या धर्म-शास्त्राला 'हें सारें विश्व एकजिनसी आहे.' ही आपली कल्पना सोडून द्यावी लागली आहे; आणि 'अवस्था-श्रेणी' किंवा 'भिन्न योनि' ही कल्पना अंगीकारावी लागली. आतां विज्ञानालाहि तीच कल्पना स्वीकारावी लागत आहे. ख्रिस्ती धर्माची व विज्ञानाची 'अवस्था-श्रेणीची' कल्पना मूलतः एकच आहे. ख्रिस्ती धर्माच्या मतें, वरच्या अवस्थांचे नियम खालच्या अवस्थांवरून अनुमित करतां येत नाहींत.

वरच्या अवस्थांमध्यें खालच्या अवस्थांतील घटना व त्यांचे नियम सूचित झालेले असतात. पण—

वरच्या अवस्थांतील घडामोडी खालच्या अवस्थेंत प्रकट झाल्या म्हणजे त्या अनाकलनीय व चमत्कारपूर्ण भासतात.

हे सारे नियम रसायन व गर्भशास्त्र—अशा शास्त्र-संबंधालाहि पूर्णपणें लागू

† 'शक्तीची अक्षय्यता' यासारखे नियम आपल्याला ज्ञात आहेत, पण त्यामुळें नव्या गुणधर्मांचा प्रादुर्भाव कसा होतो यावर कांहींच प्रकाश पडत नाहीं.

पडतात. ज्ञान-प्राप्तीचे दोन मार्ग धर्मानें शिकविले आहेत—(१) जागतिक वस्तूंचें संशोधन व (२) अतींद्रिय वस्तुचें ध्यान. पहिला मार्ग 'आडव्या' पातळीवरील, तर दुसरा 'उभ्या' पातळीवरील. दुसरा मार्ग हा सर्व भिन्न अवस्थांच्या सीमा उल्लंघून जातो. म्हणून अध्यात्मवाद्याकडे धर्मपीठें व विज्ञान हे दोघेहि सारख्याच अविश्वासानें पाहतात. परंतु धर्मोपदेशक व शाळामास्तर—या दोघांनाहि सृष्टिचीं अंतिम व निकटचीं गूढें उकलण्याचे कामीं पहिल्या मार्गाचा अपुरेपणाहि जाणवतो आणि दुसऱ्या मार्गाची सत्यता मानावी लागते.

अचेतन वस्तु व ईश्वर यांना जोडणारी धर्माची जी शिडी आहे, तिला फार थोड्या पायऱ्या आहेत—सृष्टि-निर्मितीच्या सहा दिवसांशीं जुळणाऱ्याच त्या प्रायः आहेत. विज्ञानाच्या शिडीला नाजूक अशा पुष्कळच पायऱ्या आहेत. अवस्थांच्या उंचींतील फरक पुष्कळ वेळां कळून येणारा नसतो. सूक्ष्मातिसूक्ष्म पोटविभाग पुष्कळच उत्पन्न होतात. पण सृष्टीला सातत्य माहीत नसतें—ती उड्डान करीत चालते. शिडीच्या पायऱ्या कितीहि लहान बनविल्या तरी शिडी म्हणजे कांहीं घसरगुंडी नव्हे. एकादा सूक्ष्म कण शिडीवर स्थिर राहील, पण घसरगुंडीवरून खालींच पडेल.

ज्ञान—प्राप्तीचे हे दोन मार्ग एकमेकाला पूरकच आहेत—बाधक नाहींत. एका भ्रमांतून आपण मुक्त झालों आहों आणि सृष्टीचें सत्यस्वरूप अधिकाधिक जाणण्याची आपली शक्ति आपण वाढवीत आहों. ही पद्धति, मागच्या पिढींत, कोणी उजळ माथ्यानें बोलून दाखवूं शकला नसता. न्यूटननें झाडावरून एक वस्तु खालीं पडतांना पाहिली आणि तिचें वजन, शक्ति व वेग याचें परिगणन त्यानें केलें. आतां आपण मागें जाऊन हें ठरवीत आहों कीं, झाडावरून जी वस्तु पडली, तें एक फळ होतें.

९

एकोणविसाव्या शतकांत विश्वाचा एकजिनसीपणा व परस्परावलंबित्व यांच्या कल्पना जशा मानवी मनामध्यें पक्क्या रुतून बसल्या होत्या, तसें 'अवस्था-श्रेणींचें' हें तत्त्व एकदां का आपल्या मनोभूमिकेंत ठामपणें रुजलें म्हणजे सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र, विज्ञानशास्त्र—या सर्वांमधील गोंधळ पुष्कळसा कमी होईल. हा गोंधळ कशानें उत्पन्न होतो? तर एका अवस्थेंतील विशिष्ट नियम दुसऱ्या अवस्थेला लागू केल्यानें आणि नीतिशास्त्राचीं मूल्यें प्राणिशास्त्राच्या सिद्धांताला लावल्यानें.

फ्रॉइड व मार्क्स यांना आपल्या विचार-पद्धतीच्या मर्यादा माहीत होत्या; पण त्यांच्या अनुयायांना त्या माहीत नाहींत. सर्व गोष्टींचा उलगडा करणारी एकच जादूची कांडी त्यांचेजवळ आहे. फासिझमची उपपत्ति मार्क्सवादी माणूस केवळ आर्थिक कारणांनीं लावील, तर नेपोलियनच्या वर्तनाची उपपत्ति एकादा मानस-शास्त्रज्ञ त्याच्या ठेंगणेपणावरून लावील. मग प्रश्न असा कीं, सारीं ठेंगू माणसें नेपोलियन कां होत नाहींत? अशा क्रांतिकारक माणसांची मानसशास्त्रीय परीक्षा करणें निदान, जोंवर त्यांचीं वैयक्तिक दुःखें त्यांच्या महत्कार्याला बाध आणीत नाहींत, तोंवर टाळलेंच पाहिजे.

एकाद्या कलावंताच्या कृतीचें ज्ञान त्याचें चरित्र, ऐतिहासिक पार्श्वभूमि वगैरे समजल्यानें, अधिक होईल हें मतहि तितकेसें सबळ नाहीं. त्या कृतीचें अंगभूत महत्त्व जाणण्याचे कामीं त्यानें अडथळाच येतो. ग्रंथाची प्रस्तावना शेवटीं वाचावी–आधीं नव्हे. 'ज्यूलियस् सीझर' या शेक्सपीयरच्या नाटकाची सारी गोडी मी कायमची गमावून बसलों आहें—कारण, अर्ल इसेक्सच्या खटल्याची छाया ब्रूटसच्या चित्रणावर पडली आहे, ही ऐतिहासिक पार्श्वभूमि मला कळली.

१०

एका अवस्थेचें दुसऱ्या अवस्थेंत 'विसर्जन' करण्याच्या प्रवृत्तिमुळें जो गोंधळ होतो, त्याचे परिणाम नीतिच्या साम्राज्यांत फार दुःखदायक झालेले दिसून येतात.

आपल्या काळीं, नीतिशास्त्राची अधोगति पांच प्रमुख मार्गांनीं झालेली दिसते. ते मार्ग म्हणजे (अ) नैतिक मूल्यें शून्यावस्थेस नेणें आणि/किंवा (ब) प्राणिशास्त्र (क) मानसशास्त्र (ड) संख्याशास्त्र व (ई) अध्यात्मशास्त्र यांतील सिद्धांत नीतिशास्त्राला लावणें.

(अ) नीतिमूल्यांचें विश्लेषण व विसर्जन अनिर्बंधपणें करीत गेलें, म्हणजे त्याची परिणति प्रकट वा प्रच्छन्न 'शून्यवादांत' होते. किरिलॉव्ह 'दि पझेस्ड्–' मध्यें म्हणतो, "आपण विश्वास ठेवतों यावर आपला विश्वास नसल्याचा विश्वास जो माणूस बाळगतो, आणि तरी जो विश्वास ठेवीत नाहीं, तेव्हां आपण विश्वास ठेवीत नाहीं यावर त्याचा विश्वास बसत नाहीं. हें सारें विश्व मिथ्य आहे, असत्यावर आधारलेलें आहे, लीलेवर उभारलेलें आहे. म्हणून या

विश्वांतील सारे नियम "असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम्।" असे आहेत—सैतानाचें नाटक आहेत."

या शून्यवादानें रशियांतील बुद्धिजीवी वर्गांत १८६० मध्यें राजकीय चळवळ निर्माण केली होती. पण असें क्वचित्च घडतें. मात्र जडवादी तत्त्वज्ञानांत त्याचीं पाळेंमुळें रुजलेलीं आढळतात. या शून्यवादाचा आसरा घेऊन भ्रष्ट मुत्सद्दी, वेश्या, बडे व्यापारी, गुन्हेगार इ. समाजद्रोही माणसें आपल्या वर्तनावर शून्यवादाचा अभ्रा चढवितात. हें सर्व सामाजिक कार्यकर्त्यांना आढळून येतें. सर्व विश्व हें जर एकजिनसी असेल, तर त्याच्या नियमांचें मूळ वर ईश्वराकडे किंवा खालीं अराजकाकडे गेलें असलें पाहिजे. शून्यवाद दुसरा पर्याय मान्य करतो.

शून्यवादाच्या उफराटा परिणाम 'क्षमा' हा दिसून येतो. मी नाझीवादाचा धिक्कार कां करतों? तर त्यानें समाजांत केवढे उत्पात केले आहेत हें मी प्रत्यक्ष अवलोकन केलेलें आहे. तसेंच, प्रत्येक माणसाला नाझी होण्याचें—किंवा न होण्याचें—स्वातंत्र्य कांहीं मर्यादेपर्यंत तरी आहे असें मी मानतों. म्हणून जे नाझी बनले आहेत, त्यांच्याशीं माझा झगडा सुरू होतो—आणि इतरांनीं नाझी बनूं नये म्हणून माझा प्रयत्न सुरू होतो. माझ्या अवलोकनावरून माझें जें मत बनलें, त्यावरून मी हा निर्णय ठरवितों.

परंतु केवळ ऐतिहासिक, वांशिक आणि परिस्थितिजन्य कारणांनींच माणूस नाझी बनतो असें मीं मानलें, तर मी, "गरीब बिचाऱ्याकडे काय दोष?" असें म्हणून, त्याचेवर दया करीन, त्याला क्षमा करीन. पण असें करतांना मी त्या माणसाला पशूच्या किंवा यंत्राच्या दर्जाला पोंचवीत असतों. पण माझें मत मी त्याला मानवाच्या उच्च अवस्थेंत ठेवून बनविलेलें होतें. आपल्या बऱ्यावाईट कृत्याला जबाबदार नसणारा पशु किंवा यंत्र—हेंच जर त्याचें स्वरूप असेल, तर मी त्याच्याशीं निकराचा सामना करणेंच योग्य टरेल. गंजलेल्या वस्तऱ्याला मी क्षमा करीन, पण लगेच तो उकिरड्यावरहि फेकीन.

(ब) प्राणिशास्त्राचे नियम मानवाच्या नीतिशास्त्राला लागू केले म्हणजे डार्विनचे पुढील समाजशास्त्रीय सिद्धांत जन्मास येतात—"श्रेष्ठ असेल तोच तगेल," "श्रेष्ठ पुरुषाचे नैसर्गिक हक्क," इ. याच सिद्धांताचा प्रभावी आविष्कार म्हणजे फासीवादाचें तत्त्वज्ञान. प्राणिशास्त्र हें जंगलाचें समाजशास्त्र आहे. त्याचा उपयोग उच्च श्रेणींतील मानवावर केल्याचे परिणाम असेच व्हावयाचे.

(क) नीतिशास्त्राचें विसर्जन मानसशास्त्रांत करण्याचेहि असेच दुष्परिणाम दिसून येतात. धैर्य, स्वार्थत्याग या सामाजिक मूल्यांची परिणति 'मृत्यूची

सहजप्रेरणा असते,' अशा सिद्धांतांत करणें म्हणजे सजीव प्राण्यांची मीमांसा रसायनशास्त्रानुसार करण्यासारखेंच आहे. 'सदसद्विवेक' म्हणजे आईबापांच्या सत्तेचाच अंश आहे अशी उपपत्ति फ्राईड लावतो. पण कोणतेंहि कृत्य करण्या-न-करण्याचें इच्छा-स्वातन्त्र्य मानवाला असतें, आणि त्यावरच सुष्ट वा दुष्ट 'सदसद्विवेक' अवलंबून असतो, ही महत्त्वाची गोष्टच फ्राइड विसरला आहे. या इच्छा-स्वातंत्र्याची मातब्बरी मानसशास्त्रांत मोठी आहे. कळप किंवा समूह अथवा गर्दी-याहून मानवाचें नवें जीवन निराळें आहे-सामाजिक जाणिवेनें भरलेलें आहे.

'शेजाऱ्यावर मी प्रेम कां करावें?' असा प्रश्न फ्राइडनें 'Civilisation and its Discontents' या ग्रंथांत उपस्थित केला आहे. त्याचें उत्तर एकच मिळूं शकतें —आणि तें म्हणजे, मी व माझा शेजारी-हे दोघेहि एकाच वस्तूचे अंश आहोंत आणि म्हणून परस्परांशीं निगडित आहोंत." सर्व जीव 'एका देहाचे अवयव' आहेत, हें कळल्याशिवाय आत्मौपम्य बुद्धि निर्माण कशी होईल?

(ड) गणिती मापनाचे नियम भौतिक शास्त्राप्रमाणें नीतिशास्त्राला लावल्यानेंहि मोठे अनर्थ ओढवले आहेत. हुकूमशाहीच्या नीतिशास्त्राचा आधारच मुळीं हा आहे. हुकूमशाहीचें नीतिशास्त्रच असें आहे कीं, काहीं लोकांचा बळी देऊन त्याहून अधिक संख्येच्या लोकांचें कल्याण करतां येत असेल, तर तें बेशक करावें. म्युनिचच्या दिवसात चेंबर्लेन म्हणाला होता कीं, लहान देशासाठीं मोठ्या राष्ट्रांनीं धोके पत्करावेत, अशी अपेक्षा धरणें सयुक्तिक नाहीं. परंतु युद्धाच्या आघाडीवर एक माणूस जखमी होऊन पडला, तरी रुग्ण-गाडींतील पांच नोकरांनीं त्याला वांचविण्यासाठीं आपला जीव धोक्यांत घालावा, अशी अपेक्षा आपण धरीत नाहीं काय? रशियाच्या कैवाऱ्यांचा युक्तिवाद असा कीं, एका हेराला देशाबाहेर जाऊं देण्यापेक्षां एक हजार निष्पाप नागरिकाना तुरुंगांत कोंडून ठेवणें चांगलें, कारण तो मोकळा सुटलेला हेर हजारों लोकांच्या जीविताला अपाय करणारीं कृत्यें करील. पण या युक्तिवादांतील गोम अशी आहे कीं, हजार नागरिकांच्या बंदि-वासामुळें जी हानि होईल, तिचें अचूक मोजमाप करण्याचें कोणतेंच दृश्य साधन आपल्यापाशीं नाहीं. तसेंच, त्या संशयित हेराच्या कृत्यामुळें होणारा अपाय त्या हानिचे मानानें केवढा असेल हेंहि कळण्यास आपल्याला कांहीं मार्ग नाहीं.

आपण केवळ वर केलेले हात मोजून निर्णय देण्याची प्राथमिक पद्धत अवलंबीत आहों. पण जेथें नैतिक दृष्ट्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते, तेथें ही पद्धत चुकीची ठरते. एखाद्या क्रांतिमध्यें, फितूर व मूर्ख याना ठार

करावें लागतें. पण जो जो आपल्याशीं मतभेद दाखवील, तो तो फितूर किंवा मूर्ख म्हणतां येईल काय? मतभेदाचा पारा किती अंशावर चढला, म्हणजे त्याला फितुरीचें किंवा मूर्खपणाचें स्वरूप येतें? शस्त्र–क्रिया करणाऱ्या शस्त्रवैद्याचा चाकू व पशुहत्त्या करणाऱ्या खाटकाचा सुरा—यांतील फरक आपण निश्चित कसा करणार? कामगार–वर्गाची हुकूमशाही ही अधिकारी वर्गाची नोकरशाही केव्हां बनते, हें आपणाला कसें सांगतां येणार? विरोध–विकास–वादाचें मत असें आहे कीं, संख्येचें रूपांतर गुणांत होतें—पण तें कोणत्या अवस्थेंत, हें आपणांला माहीत नाहीं. संख्येवर अधिष्ठित झालेलें नीतिशास्त्र हें घसरगुंडी-सारखें असतें. त्यावरून एकदां सुटलें कीं, तळच गांठला जातो—मध्यें थांबण्याची सोय नाहीं. कारण त्यांतील फरक जातीचा नसून अंशाचा असतो–प्रकाराचा नसून प्रमाणाचा असतो.

हुकूमशाही नीतिशास्त्राचें दुसरें चुकीचें मत असें कीं, साध्यावरून साधनांची योग्यता ठरविली जाते. भौतिक सृष्टींत हें खरें असेल, पण तात्त्विक क्षेत्रांत व सामाजिक विकासांत असें मानतां येत नाहीं. अशा सदोष विचारांना अंतिम तत्त्वज्ञान मानलें म्हणजे नीतिशास्त्राचा खेळखंडोबा होणारच. ३०० वर्षांपूर्वी गॅलिलियोनें असें मत दिलें कीं, आंकडे–शास्त्राचे सिद्धांत "शून्य" व "अनंत" या चिन्हांना लागू नाहींत. समाजशास्त्रांत व्यक्तिचें स्थान "शून्य" व "अनंत" अशा दोन्ही प्रकारचें आहे, हें हुकूमशाही नीतिशास्त्राला अद्याप शिकावयाचें आहे.

(ई) महात्म्यांचें नीतिशास्त्र असें आहे कीं, निःस्तब्धपणें चिंतन करून जीं तत्त्वें आपल्याला योग्य वाटतील, तीं प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्याचा प्रयत्न करणें. हें कार्य अशक्य नाहीं, पण अत्यंत बिकट आहे. एकांतांतील चिंतनामुळें सामाजिक प्रश्नांकडे तटस्थपणें, क्वचित् विक्षिप्तपणें, पाहण्याची संवय जडते. सामाजिक विषयांना योग्य तें महत्त्व न दिल्यामुळें त्यांची उपेक्षाहि होणें शक्य आहे. एक विचारी गृहस्थ म्हणतो, "मित्रहो, शेवटीं आपण अशा निष्कर्षाला आलों आहोंत कीं, कांहींहि कृति न करणें हीच आपली उत्कृष्ट कृति ठरेल, म्हणून आपण ध्यान –धारणेंत निमग्न होऊं या."

याचाच आणखी एक परिणाम म्हणजे दुसरीं माणसें विचारशील असतील, यावर विसंबून राहणें. सदसद्विवेक बुद्धीचा "आंतला आवाज" ऐका, असा आग्रह धरण्यांत येतो. परंतु ध्यान-धारणेच्या तंत्रांत न मुरलेला "आंतला आवाज" हा केवळ त्या व्यक्तीच्या परंपरागत सुप्त विचारांचाच पडसाद असतो.

याचें मीं एक गंमतीचें उदाहरण पाहिलें आहे. आमच्या घर-मालकाची सात वर्षांची मुलगी आहे. ती युद्ध-काळांत वाढलेली आहे. दिवेबंदीच्या (Black out) काळांत खिडकींतून प्रकाश बाहेर जाऊं देणें हा गुन्हा होता—पाप होतें. ज्या दिवशीं लंडनमधील दिवे–बंदीचा हुकूम शिथिल करण्यांत आला, तेव्हां ती माझ्या खोलींत आली. तेव्हां माझ्या खोलीच्या खिडकींतून प्रकाश बाहेर येत होता. तें दृश्य तिनें पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें, म्हणून ती घाबरली होती. मीं तिला परोपरीनें समजाविण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या डोळ्यांतील भीति कांहीं नाहींशी होईना. तेव्हां माझी खात्री झाली कीं, हिच्यापुढें बुद्धिवाद व युक्तिवाद व्यर्थ आहे. दुसरे दिवशीं तिच्या आईनें मला असें सांगितलें कीं, "'आर्थरकाकांचा देवावर मुळीं विश्वासच नाहीं.' असें काल आमची मुलगी जोरजोरानें हुंदके देत सांगत होती."

आपले सामाजिक, लैंगिक इत्यादि प्रश्न सोडविण्यासाठीं "आंतल्या आवाजाची" कसोटी लावणें हें त्या मुलीला शोभणारेंच आहे. ध्यान-शास्त्रांत पारंगत झाल्याविना तिनें 'आंतला आवाज' हाच एक आपला वाटाड्या मानला, तर पुढील निवडणुकींत हुजूरपक्षालाच मत द्यावें लागेल. ध्यानाचा उपयोग आपल्याला परिस्थितीच्या शृंखलांतून मुक्त करण्याचे कामीं व्हावयास हवा. शास्त्रीय किंवा धार्मिक ठोकळेबाजपणाच्या अगदीं विरुद्ध स्वरूप "आंतल्या आवाजाचें" आहे. विज्ञान जेथें हात टेकतें, तेथून धर्मसंस्थेचें कार्य सुरू होतें, असें मानणें चुकीचें आहे. विज्ञानाचा मार्ग कुंठित झालेला पाहिला कीं, कांहीं धर्मगुरूंना आनंदाच्या उकळ्या फुटत असलेल्या पाहून मनाला चीड येते. एकाद्या तरुण प्रियकरानें झिडकारलेल्या मुलीचें प्रणयाराधन एकाद्या बदफैली वृद्धानें करावें तसें हें वाटतें.

निष्क्रियतेच्या उलट माथेफिरू उत्साहाचेंहि भय वाटतें. कांहीं धर्मगुरु बाह्य सुधारणेनें अंतःसुधारणा घडविण्याचा प्रयत्न करतात, पण ते साध्य-साधनांच्या भोवऱ्यांत सांपडतात. अध्यात्मवादी हे उफराट्या रीतीनें पण हुकूमशहाप्रमाणेंच कसे वागतात हें हक्स्लेनें आपल्या 'ग्रे एमिनन्स' या पुस्तकांत उत्तम प्रकारें दाखविलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २२५०३७ वि: ...
क्रमांक ....१.२.३..... नों: दि: ...

महात्म्याच्या नीतिशास्त्रांतील हे खांच-खळगे होत. तरीसुद्धां नैतिक पेंचप्रसंगामध्यें शिर-गणतीनें सामाजिक उपयुक्तता ठरविण्याची पद्धति फोल ठरते, आणि

तेथें ध्यान हेंच एक मार्गदर्शक होऊं शकतें. शास्त्रीय प्रयोगाच्या पद्धतीप्रमाणें ध्यानाच्या पद्धतीचाहि अभ्यास करावयास हवा. पण आधुनिक मानवाला हें कार्य बिकट वाटतें. निरिच्छतेची इच्छा धरण्याची पात्रता उपासनेच्या वाटेवर नाहींशी होते. जे लोक त्या मार्गाकडे वळतात ते त्यात इतके बुडून जातात कीं, आपल्या जुन्या सृष्टीचा सारा संबंध ते पार विसरून जातात. अशा प्रकारें 'अतिरिक्त तांबडा' व 'अतिरिक्त जाभळा' यामध्यें विचाराचा लंबक मागेंपुढें होत राहतो.

♤ ♤ ♤

आपल्या युगाचें माहात्म्य असें कीं, विज्ञानाचा विकास होतां होतां त्याला आपल्या मर्यादेचें ज्ञान होऊं लागलें आहे. त्यामुळें ३०० वर्षांपूर्वी विज्ञानानें ज्याची जागा बळकावली, त्या आध्यात्मिक विचार-परंपरेला जागा करून देणें त्याला प्राप्त झालें आहे संख्यानिष्ठ विचारपद्धति पूर्णत्वाला पोंचून आतां कुंठित होत आहे. तिची आक्रमक वृत्ति आतां संयत आली असून पूर्णत्वामुळें येणारी नम्रता ती धारण करीत आहे. १९ व्या शतकांतील यंत्र-युगाला आतां लांबी-रुंदीप्रमाणेंच खोली-उंची प्राप्त होत आहे. विज्ञान व अध्यात्म यांचा समन्वय करण्यास ही एक ऐतिहासिक संधि आहे.

नियतिवाद व इच्छा-स्वातंत्र्य, नीतिशास्त्र व तर्कशास्त्र यांमधील झगडा मिटविण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे आपण बाह्य परिस्थितिचा विचार करीत असतांना आंतरिक मनःस्थितिचाहि विचार करावयास हवा हें उभयान्वयी कार्य मानव-समाजानें आतांपर्यंत केलेल्या सर्व कार्यांपेक्षां अत्यंत बिकट आहे-पण तितकेंच तें आवश्यकहि आहे.

पण केवळ पवित्र उपदेश करणें पुरेसें नाहीं. मानवी जीवनाचें पावित्र्य व पूर्णत्व यांचा गमावलेला अर्धा भाग आपणाला जर परत मिळवावयाचा असेल, तर आपण योगाचें शास्त्र व कला शिकली-शिकविली पाहिजे. पण हें शिकण्यासाठीं योगावरील भाडोत्री मासिकें वाचून किंवा जडजंबाल शब्दांनीं प्राणायामाची तांत्रिक माहिती देणाऱ्या भोंदू गुरूचें प्रवचन ऐकून काहीं उपयोग होणार नाहीं. "आध्यात्मिक जीवना" वरील एक मासिक मला माहीत आहे. तें "खास जनतेसाठीं" आहे आणि त्याची किंमत फक्त आठ पेन्स आहे; पण नऊ तासांची कामाची पाळी आटोपल्यावर एकाद्या बस ड्रायव्हरनें तें मासिक घेतल्यास त्याचा कांहीं फायदा होईल, असें मला वाटत नाहीं.

योगशास्त्र केवळ पौरस्त्य राष्ट्रांमध्येंच जीव धरून आहे, म्हणून तें शिकण्या-साठीं आपणाला तिकडे वळलें पाहिजे. मात्र त्या पौरस्त्य योगशास्त्राचा अर्थ पाश्चात्य परिभाषेंत आपणाला समजावून सांगणारे योग्य दुभाषे मिळावयास पाहिजेत. नुसतीं भाषांतरें निरुपयोगी होत. त्यांचा उपयोग एक भोंदू लोकांना तरी होतो किंवा त्याकामीं आपलें सर्व जीवन वाहणाऱ्या लोकांना तरी होतो. वेदांत वाचतांना मला मरण–काळच्या यातना होतात. स्वात्माराम-स्वामी मला सांगतात, "ज्याला हठयोगाची साधना करावयाची आहे, त्यानें एकट्यानें, लहानशा मठांत वा पर्णकुटींत, एकांतवासांत राहावें. हें त्याचें स्थान डोंगर, नदी व अग्नि यांपासून दूर असावें; आणि तें निवासस्थान धनुष्याच्या लांबी—इतकेंच असावें. पुण्यशील राजाच्या समृद्ध प्रदेशांत हें स्थान असावें म्हणजे त्याला कोणाचाहि उपद्रव होणार नाहीं, आणि निवांतपणें, एकाग्रतेनें ध्यान-धारणा करणें त्याला सुलभ जाईल." आमच्या बस–ड्रायव्हरला यापैकीं काय साध्य आहे?

आपलें गमावलेलें अर्धें जीवन परत मिळविण्याची उत्कंठा आपल्याला जर खरोखर लागलेली असेल, तर आपण अध्ययन–अध्यापनाचे नवे मार्ग शोधून काढले पाहिजेत—योगशास्त्र हें विज्ञान व व्यायाम यांच्या बरोबरीनें शाळेंत शिकविण्याचें ध्येय निःशंकपणें धरलें पाहिजे. आपल्याला धार्मिक कर्मठपणा शिकवून धर्मवेडे लोक तयार करावयाचे नाहींत, तर संपूर्ण मानवी जीवन नव्यानें घडवावयाचें आहे.

या कामीं आपण नेटानें प्रयत्न करणें अवश्य आहे. विज्ञानाच्या अपूर्णतेचा परिणाम नैतिक व राजकीय क्षेत्रांत जाणवूं लागला आहे. मानवाचें संपूर्ण जीवन म्हणजे समाजाचा एक अंश असतो, आणि समाजाचें संपूर्ण जीवन हाहि एका उच्चतर व्यवस्थेचा अंश असतो. त्या सर्वांचा समन्वय केवळ बुद्धिवादानें करतां येणें अशक्य आहे. त्यासाठीं सर्वात्मैक्यभाव व प्रेमभाव यांचीच गरज आहे.

केवळ साधु व केवळ क्रांतिकारक—हा आतां आपल्याला वांचवूं शकत नाहीं. त्या दोघांच्या संयोगानेंच आपण तरून जाऊं शकूं. तसा संयोग करण्याची पात्रता आपल्या अंगीं आहे कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. पण जर ती नसेल, तर मात्र युरोपियन संस्कृतीची, थोड्याच वर्षांत, सर्व-संहारक युद्धानें किंवा रशियाच्या हुकूमशाहीनें होणारी राखरांगोळी टाळण्याची आशाच नको.

हें ज्ञान होण्यास फार सूक्ष्म बुद्धीची गरज आहे असें नाहीं. आपण भवि-तव्याचा फारसा विचार करीत नाहीं, म्हणून आपल्याला हें कळत नाहीं इतकेंच. देशांत शांतता असली म्हणजे पुढें कधीं युद्ध होईल असें आपण मानीत नाहीं;

आणि युद्ध चालू असलें म्हणजे पुढें कधीं शांतता होईल हेंहि मानीत नाहीं. आपली बुद्धि आपलें भविष्य कितीहि ओरडून सांगत असली तरी, आपल्या अंतःकरणांत एक अल्पसंतुष्ट व आनंदी आवाज उठत असतो. त्यामुळें आपण असें मानीत राहतों कीं, आपण कधींच मरणार नाहीं; व 'उद्यां'हि 'काल'च्या-प्रमाणेंच उगवेल. या आवाजावर अविश्वास ठेवण्याची आतां वेळ आली आहे.

—ऑक्टोबर १९४४

[स मा प्त]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलसंख्या
अनुक्रम 22036 दि: 1/11/11
क्रमांक 2203 नों: दि: 21/2/46

REFBK-0009462


2380